निबंध
१९५६

REFBK-0015196
REFBK-0015196

15 SEP 1976

८५५
निबंध
७४०६८
८/३/७०

१९५६

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ७४०६८ वि: निबंध
क्रमांक १८५६ नों. दि. ८/३/७०

पुणें ॐ

# माझीं स्वप्नें

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणें
क्र. क्र. १५१८६
११६५६ निबंध

न्या. राम केशव रानडे

REFBK-0015196

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
संमृद्धी योजना
१९७०

❀ प्रसाद प्रकाशन, पुणें ❀

प्रकाशक :
मनोहर यशवंत जोशी
प्रसाद प्रकाशन
१८९२ सदाशिव पेठ, पुणें २

प्रथमावृत्ति १९६६

किंमत ५ रुपये

मुद्रक :
र. भ. निगुडकर
प्रकाश मुद्रणालय
३९५/४ सदाशिव पेठ, पुणें २

# प्रकाशकाचे चार शब्द

'प्रसाद' मासिकांतून 'माझीं स्वप्नें' पूर्वी क्रमशः प्रसिद्ध झालीं होतीं. त्या वेळीं ही लेखमाला अतिशय लोकप्रिय झाली होती व त्याबद्दल वाचकांच्या पत्रांचा अक्षरशः पाऊस पडत होता. इतका कीं त्याची दखल लेखकाला आपल्या लेखमालेंत घ्यावी लागली. तीच लेखमाला आज ग्रंथाचे रूपानें प्रसिद्ध करीत आहोंत. या मालेंतील पहिला लेख कै. य. गो. जोशी यांनीं वाचला होता व त्याबद्दल न्या. रा. के. रानडे यांना पत्र लिहितांना त्यांनीं लिहिलें होतें :

"आपला लेख वाचून पाहिला. मला अत्यंत आवडला. तो किती आवडला हें शब्दांनीं लिहिणें शक्य नाहीं ... 'माझीं स्वप्नें' ही लेखमाला मी प्रसादकरतां आणि पुस्तकप्रकाशनाकरितां स्वीकारली आहे ... मी जवळ जवळ मृत्यूचें आमंत्रण टाळून जगलों आहें. इतक्या पराकाष्ठेचीं दुखणीं येऊन गेलीं. आतां मला जीवनांत उत्साह वाटूं लागला आहे, आणि त्याच वेळीं 'माझीं स्वप्नें' हा लेख मला वाचायला मिळाला हा एक आनंददायी योग आहे."

तत्त्वज्ञानाचे विषय रूक्ष असतात अशी सर्वसाधारण लोकांची समजूत असते. परंतु कै. य. गो. जोशी यांची 'सुबोध ज्ञानेश्वरी' वाचून अशी खात्री पटते कीं तत्त्वज्ञानसुद्धां ललित साहित्यापेक्षां अधिक आकर्षक भाषेंत सांगतां येतें व तें अधिक आनंददायी असतें. 'माझीं स्वप्नें' हीं तशाच आकर्षक पद्धतीनें कथन केलेलीं आहेत. हें पुस्तक वाचून वाचकांनीं आपले अभिप्राय कळविल्यास अशा प्रकारचें वाङ्मय प्रसिद्ध करण्यास आम्हांस अधिकच उत्साह येईल.

—प्रकाशक

# स्वप्न


| | पृष्ठ |
|---|---|
| पहिलें | १ |
| दुसरें | १३ |
| तिसरें | २३ |
| चवथें | ३३ |
| पांचवें | ४५ |
| सहावें | ५५ |
| सातवें | ६७ |
| आठवें | ७७ |
| नववें | ८९ |
| दहावें | १०३ |
| अकरावें | ११३ |
| बारावें | १२३ |
| तेरावें | १२९ |
| चवदावें | १४५ |
| पंवरावें | १५७ |
| सोळावें | १६७ |
| सतरावें | १७५ |
| अठरावें | १८५ |

# स्वप्न पहिलें

विश्वाचें कोडें अद्याप तज्ज्ञांना उमगलें नाहीं ह्याचें कारण विश्व असें एक रहस्यपुस्तक आहे कीं, त्याचीं पहिलीं बरींचशीं पानें फाटलीं आहेत, व शेवटचीं बरींचशीं पानें फाटलीं आहेत. आपण जें पुस्तक वाचतों तीं मधलीं पानें. असें असलें तरी त्या पानांमधून जितका बोध व फायदा करून घेणें शक्य आहे तितका घेतला पाहिजे.

लहानपणापासून आतांपर्यंत मी देव, विश्व व मानव ह्यांबद्दल खूप खूप वाचलें, व वाचल्यापेक्षांहि खूप विचार केला, पण विश्वाचें कोडें मला उलगडतां आलें नाहीं. मला वाटू लागलें कीं आपलें ज्ञान जसें वाढत जातें

तसें अज्ञानहि वाढत जातें. आपण ज्ञानाच्या बेटावर राहतों, व भोंवतीं अज्ञानाचा समुद्र पसरला आहे. आपलें हें बेट जसें वाढतें त्या मानानें त्याला मिळणाऱ्या अज्ञानरूपी पाण्याची कक्षा देखील वाढते. आपण ज्ञानाच्या डोंगरावर चढूं लागलों म्हणजे ज्या मानानें आपण उंच जाऊं त्या मानानें अज्ञानाचें क्षितिज देखील वाढतें.

असें असलें तरी दुःखी व निराश होण्याचें कारण नाहीं. ह्या बाबतींत रामकृष्ण परमहंसांची गोष्ट मला फार आवडते. ते एकदां म्हणाले—

"हें पहा ! तुमच्यासमोर गंगा नदी वहात आहे. तुम्हांला तहान लागली आहे. अशा परिस्थितींत गंगेचा उगम कोठें आहे व ती कोठें समुद्राला मिळते हें मला कळल्याशिवाय मी पाणी पिणार नाहीं, असें म्हणूं नका. तुम्हांला तहान लागली आहे तर अगोदर पाणी प्या; मग गंगा नदी कोठें उगम पावते व कोठें समुद्राला मिळते त्याचा शोध घ्या. मात्र हें लक्ष्यांत घ्या कीं, तुम्हांला शोध घेतां आला नाहीं तरी समोर वहात असलेल्या गंगेचें पाणी पिऊन तुमची तहान भागूं शकेल."

माझे वडील परमार्थ मार्गांतले मोठे अधिकारी होते. त्यांनीं लहानपणीं मला नाममंत्र दिला व लहानपणाच्या उत्साहांत मी प्रतिज्ञा केली की—

माझें ध्येय देवप्राप्ति करून घेणें.

माझी अशी समजूत होती कीं, अमुक इतका जप केला म्हणजे खास देवप्राप्ति होते; पण जप करूनहि जेव्हां देवप्राप्ति झाली नाहीं तेव्हां मी निराश झालों. मी खूप खूप वाचूं लागलों. आणि मला अनुभव आला कीं, देवाबद्दलचें आपलें ज्ञान ज्या प्रमाणांत वाढत जातें त्या प्रमाणांत देवाबद्दलचें अज्ञानहि वाढत जातें.

माझा नेहमीं पहिला नंबर असे, पण बी. ए. मध्यें असतांना देवाच्या नादानें इतकी उचल केली कीं, अभ्यासाचा पुरा बोजवारा वाजला. बी. ए. च्या चौथ्या टर्ममध्यें मला एक और अनुभव येऊं लागला. माझ्या अंगाची सदा लाही व्हावयाची आणि कांहीं केल्या बरें वाटायचें नाहीं. मला वाटूं लागायचें कीं, मी स्त्री आहें आणि कृष्ण माझा पति आहे ! ह्या

अवस्थेंत मी प्रेमविकारांत मग्न व्हावयाचा आणि माझ्या रोमरोमांत आनंदाच्या झिणझिण्या निर्माण व्हावयाच्या.

एका रात्रीं कृष्णाचा धांवा करत असतांना मला रात्रभर झोंप आली नाहीं. सूर्योदयाच्या सुमारास मी खिडकीतून बाहेर पाहूं लागलों तेव्हां नयन-मनोहर ढगांतून स्वरूपसुंदर सूर्यबिंब वर येऊं लागलें. तें पाहून खांडेकरां-सारखा कवि म्हणाला असता--

--काल संध्याकाळीं समुद्रांत बुडालेला सुवर्णकलश हातांत घेऊन रजनीदेवी वर आली असावी, पण सागराच्या तळाशीं गेलेला तो सुवर्ण-कलश हुडकतां हुडकतां तिच्या अंगावरले हिऱ्यामोत्यांचे दागिने गळून पडले असावेत, आणि ते दागिने शोधून ती परत आली असतांना तिनें वर आण-लेला कलश समुद्राच्या तरंगावर तेजानें तळपत आहे.

रत्नागिरींत राहणारा एखादा साहित्यिक म्हणाला असता—

स्वर्गातल्या आम्रवृक्षाचा हा पाडाला आलेला आंबा पृथ्वीतलावर घरं-गळत येत आहे.

रात्रभर कृष्णाचा धांवा करणाऱ्या मला ह्यांपैकीं कोणतीच कल्पना आली नाहीं. मला वाटूं लागलें—

राधा खरी का खोटी याबद्दल बडे बडे व जाडे जाडे विद्वान खुशाल वाद करोत; पण राधेप्रमाणें कृष्णाला पति समजून त्याला आपलें सर्वस्व अर्पण करण्यांत भक्तिप्रेमाचा जो उच्चांक आहे, व असें करतांना भक्ताच्या अंतः-करणांत आनंदाचे जे असंख्य फेरे निर्माण होतात त्याची मजा अनुभवा-शिवाय कळायची नाहीं. मी सूर्याला नमस्कार केला व म्हटलें—

"हे प्रभो! माझ्या अंःतकरणांत कृष्णाच्या भक्तीचा प्रकाश सदा तेवत ठेव व ज्या दिवशीं हा प्रकाश नाहींसा होईल त्या दिवशीं माझें जीवन देखील संपवून टाक,"

देवाच्या नादांत मी असलों तरी मला देव भेटत नव्हता. सवजज्ज आल्यावर कांहीं वर्षांनीं ह्या प्रश्नानें फार उग्र स्वरूप धारण केलें, व मला वाटूं लागलें कीं, फार मोठी तपश्चर्या केल्याशिवाय देवप्राप्ति होणें शक्य

नाहीं. संसारी माणसाला जास्तींत जास्त कडक वाटणारे नियम स्वीकारून सतत बारा वर्षें तपश्चर्या करावयाची असें मी ठरवलें.

बारा वर्षांचा काळ जसजसा सपंत आला तसतसा देव भेटत नाहीं म्हणून निराशेच्या दरींत मी तडफडूं लागलों. तापलेल्या तव्यावर पडलेलें फुलपांखरूं तडफडावें, किंवा पाण्याबाहेर काढलेला मासा तडफडावा त्याप्रमाणें दुःखातिरेकानें माझें मन तडफडूं लागलें. माझ्या मनांत आत्महत्येचे विचार जोरानें येऊं लागले. लौकिकदृष्टचा माझें जीवन सुखाचें होतें, राहण्यास बंगला, पगार मोठा, अधिकार फाशीं देण्याचा, समाजांत मानसन्मान, घरांत प्रेमळ माणसांचा सहवास--अशाहि परिस्थितींत देव भेटत नाहीं म्हणून आत्महत्या करावी असे विचार माझ्या मनांत जोरजोरानें उसळी मारूं लागलें, दुःखाच्या रात्री संपतां संपेनात. पण--

एका सुप्रभातीं माझ्या अंतःकरणांत एकाएकीं दिव्य प्रकाश दिसूं लागला व मला वाटूं लागलें कीं,

देव माझ्या अंतःकरणांत आहे.

माझी खात्री झाली कीं--

देव देवळांत नाहीं, देवघरांत नाहीं, चर्चमध्यें नाहीं, मशिदीमध्यें नाहीं तर तो आपल्या अंतःकरणांत आहे. रंगीबेरंगी व नवरसांनीं भरलेल्या मानवी जीवनसागरावर आलेला शुद्ध पांढरा फेंस म्हणजे ईश्वरप्राप्तीच्या मार्गी लागलें असतांना मिळणारा आनंद. हा आनंद म्हणजे मानवी जीवनाच्या सप्तरंगाचें इंद्रधनुष्य आहे. मानवी जीवनांतून अधून मधून चमकणारें हें इंद्रधनुष्य देवाचा साक्षात्कार घडवतें व सुखाचें सुखत्व वाढवून दुःखाचें देखील सुखांत रूपांतर करतें.

प्रोफेसर वुइल्यम जेम्स् ह्यानें असें म्हटलें आहे कीं, सर्वसाधारण मनुष्य आपल्या गुप्त मानसिक शक्तीचा फक्त दहा टक्के उपयोग करीत असतो. शास्त्रज्ञ म्हणतात कीं, आपल्या अंतरंगात फार मोठी दिव्यशक्ति आहे पण आपण त्या बाबतींत फार चिक्कूपणा करतों.

पूर्वीच्या काळच्या एका प्रख्यात चिक्कू माणसाची अशी एक गोष्ट सांगतात कीं, रात्री तो आपलें गांव सोडून परगांवीं निघाला. तीन मैल

गेल्यावर त्याला आठवण झाली कीं, घरांतला कंदील मालवला नाहीं. बायको जर कंदील मालवण्यास विसरली तर रात्रभर तेल जळेल. ह्या विचारानें तो व्याकुळ झाला. तो परत आपल्या घरीं आला. दार आंतून लावलें होतें. त्यानें बायकोला हांक मारली व म्हटलें,

"अग ! कडी काढूं नकोस व काडी देखील ओढू नकोस. कंदील विझवला आहे ना ?"

बायको म्हणाली—

"अहो ! कंदील तर मघाच विझवला; पण तुम्ही परत आलां त्यामुळें तुमच्या वहाणा झिजल्या नाहींत का ?"

तो चिक्कू गृहस्थ म्हणाला—

"अग ! काळजी करूं नकोस. मी हातांत वहाणा घेऊन आलों आहें."

ही गोष्ट ऐकून आपणांला हसूं येते. तत्त्वज्ञ व शास्त्रज्ञ म्हणतात कीं, त्या चिक्कू गृहस्थाप्रमाणें आपण देखील चिक्कू असतों. आपल्या अंतरंगांत दिव्य शक्तीचा अमाप सांठा भरलेला असतो, पण त्या बाबतींत आपण पराकष्ठेचा चिक्कूपणा करतों. मला अनुभव आला कीं, ह्या सांठ्याचा जास्तींत जास्त उपयोग करण्याची गुरुकिल्ली म्हणजे भक्तियोग——

भक्तिप्रेमाचा प्रकार कांहीं आगळा असतो.

कृष्णाचें मोहक चित्र पाहून मला वाटूं लागलें कीं, कृष्ण सगुण रूपांत आपल्यापुढें यावा व आपण त्याच्याशीं खूप खूप बोलावें. तसें पाहिलें तर ह्या प्रसंग किरकोळ होता, पण केव्हां केव्हां जीवनांतला किरकोळ प्रसंग फार मोठा ठरतो. अशा वेळीं न्यूटन आणि फळ, आर्किमेडीज आणि आंघोळ, नवकवि आणि पिपांतील उंदीर — हीं उदाहरणें आपल्यापुढें चटकन् येतात.

भक्तिप्रेमांत येऊन मी तळमळत होतों. रात्र बरीच झाली होती. बाकीचीं माणसें झोंपलीं होतीं. मी एकटाच अंथरुणावर बसून कृष्णाचा धांवा करून रडत होतों. एरवीं रडतांना आपणांला त्रास होतो, पण देवासाठीं आक्रोश करतांना देखील मजा वाटते. मी कृष्णासाठीं पराकाष्ठेचा रडलों व शेवटीं अगदीं काकुळतीला येऊन म्हटलें——

"देवा ! मायबापा ! कृपाघना ! परमेश्वरा ! अरे ! निदान--निदान —स्वप्नांत तरी तूं माझ्याकडे ये व माझ्याशीं बोल !"

इंग्लिशमध्यें एक म्हण आहे -- Utmost prayer is always answered. पराकाष्ठेच्या प्रार्थनेला नेहमीं उत्तर मिळतें.

अत्यानंदाची गोष्ट अशी कीं, त्या रात्रीं खरोखरच कृष्ण माझ्या स्वप्नांत आला. स्वप्न पहात असतांना आपणांस कळत नाहीं कीं आपण स्वप्न पहात आहों. त्या वेळीं आपणाला तें सारें खरें वाटतें व जागें झाल्यावर कळून येतें कीं, थोडचा वेळापूर्वी आपण पाहिलें तें स्वप्न होतें.

प्रत्यक्ष कृष्णाला पाहून मला अत्यानंदाचें भरतें आलें. अष्टसात्त्विक भावांनीं मी भरून गेलों. ज्ञानेश्वरींतील ओंवी मला आठवली—

किंबहुना सात्विका आठा। चाचरू मांडतां उमेठा।
संजयो झालासे चोइटा। संवाद सुखाचा ॥

राजसूय यज्ञांत लोकांचीं जेवणें झाल्यावर कृष्ण त्यांच्या हातावर पाणी घाली. त्या वेळीं कृष्णाला पाहण्याकरितां कितीतरी पुरुष व स्त्रिया गोळा होत. सौंदर्याच्या बाबतींत कितीतरी स्त्रियांचीं वर्णनें केलीं जातात. पण त्या साऱ्या सौंदर्यापेक्षां कृष्णाचें सौंदर्य अधिक मोहक होतें. तें सौंदर्याचें सौंदर्य पाहून मला वाटूं लागलें कीं, जगांतल्या साऱ्या सुखांपेक्षां कृष्ण-दर्शनाचें सुख फार मोठें आहे.

'शृंगाराच्या माथां पाय ठेवी' अशा तऱ्हेचा शांतरस कृष्णाच्या मुखावर ओसंडत होता.

गीतेच्या अकराव्या अध्यायांत विश्वरूप दर्शन आहे. कृष्णाचें दर्शन शांतरसानें भरलेलें आहे. ह्या शांतरसाच्या घरीं इतर कितीतरी रस पाव्हणे म्हणून आले आहेत. ज्ञानेश्वर म्हणतात—

जेथ शांताचिया घरा। अद्भूत आला पाहुणेरा।
आणि येराही रसा पांतिकरा। जाहला मान ॥
अहो वधूवरांचिये मिळणी। जैशी वराडियांही लुगडीं लेणीं।
तैसे देशियेचा सोकासनीं। मिरवले रस ॥

ज्या ठिकाणीं सर्व रस आहेत, पण शांतरस मुख्य आहे असें तें कृष्णाचें रूप पाहून माझ्या अंगावर आनंदाचे रोमांच उभे राहिले. कांहीतरी बोलावें म्हणून गीतेबद्दल मीं प्रश्न केल्यावर भगवान् म्हणाले—

"अरे! गीतेंत ज्ञानयोग, कर्मयोग व भक्तियोग यांचा समन्वय आहे व त्यामध्यें भक्तीवर विशेष जोर दिला आहे. गीतेमध्यें जो मनुष्य निर्माण केला आहे, तो आहे भक्तीप्रेमाचा. त्याचे हात आहेत कर्मयोगाचे व डोळे आहेत ज्ञानाचे. तूं गीतेकडे शास्त्र म्हणून पहा. गीतेंतील 'इति गुह्यतमं शास्त्रं' हे शब्द लक्ष्यांत घे. मानवी जीवनांत जीं महत्त्वाचीं मूल्यें आहेत त्यांचा वस्तुनिष्ठ पद्धतीनें विचार केला असल्यामुळें गीतेकडे शास्त्र या दृष्टीनें पाहिल्यास तुला विशेष प्रकाश दिसेल. तूं गीतेवर ठिकठिकाणीं प्रवचन करतोस. कोणत्याहि कोत्या विचारांना अणुमात्र थारा न देतां गीता ही सार्‍या मानवांच्या करतां आहे ह्या भूमिकेंतून तूं बोल म्हणजे श्रोत्यांना योग्य मार्गदर्शन होईल व मलाहि बरें वाटेल. तूं फार मोठा विद्वान आहेस; जगांतले तत्त्वज्ञानाचे कितीतरी ग्रंथ तूं वाचले आहेस. एक गुह्य गोष्ट सदा लक्ष्यांत घे कीं, अहंकाराचा वारा तुझ्या मनाच्या घरामध्यें कदापि येऊं देऊं नकोस. बाबा! रत्नांत ज्याप्रमाणें तेज, साखरेंत ज्याप्रमाणें गोडी, अत्तरांत ज्याप्रमाणें सुवास, त्याप्रमाणे अहंकारनाशांत तत्त्वज्ञानाचा पाया असतो. हा पाया नेहमीं भरभक्कम असूं दे म्हणजे गीतेचा तूं खरा अधिकारी होशील."

कमालीचें उकडत असतांना पाऊस पडल्यानंतर जसें एकदम बरें वाटतें त्याप्रमाणें चांगले विचार ऐकण्याकरितां मी भुकेला असतांना कृष्णाच्या तोंडून आलेले अमृतमय विचार ऐकून मी आनंदानें डोलूं लागलों.

मला वाटूं लागलें—

अहंकाराची नांगी मोडण्याकरितां भक्तिप्रेम हा रामबाण उपाय आहे. ज्ञान हें आवळ्यासारखें आहे. आवळा पौष्टिक असतो, पण ज्ञानाच्या आवळ्याला अहंकाराचा तुरटपणा असतो. मात्र हा आवळा भक्तिप्रेमाच्या साखरेंत घोळवला म्हणजे जो मोरावळा तयार होतो त्याची लज्जत और असते.

कृष्णाचे विचार ऐकून झालेल्या आनंदभरांत मी आणखी कांहीं प्रश्न विचारल्यावर भगवान् म्हणाले—

"फक्त ज्ञान संपादन करणें म्हणजे शिक्षण नसून शिक्षण ह्याचा अर्थ जीवनांत निर्माण झालेल्या समस्या सोडविण्याची पात्रता अंगीं येणें..... जेव्हां मनुष्य स्वतःशीं लढूं लागतो तेव्हांच तो मनुष्य ह्या नांवाला सार्थ ठरतो. स्वतःशीं न लढतां माणसें इतरांबरोबर लढतात म्हणून जगांत अनर्थ माजतात. अर्जुन प्रथम स्वतःशीं लढला, मग शत्रूबरोबर लढला. ह्यांतलें मर्म तूं लक्षांत घे......मनुष्याला हवा, पाणी, अन्न ह्यांची ज्याप्रमाणें आवश्यकता असते त्याचप्रमाणें माणसाला बरें म्हणवून घेण्याची जाज्वल्य भूक असते. प्रत्येक मनुष्याच्या अंगीं कांहीं ना कांहीं चांगला गुण असतो. आपण खोटी स्तुति करूं नये, पण त्या चांगल्या गुणांची स्तुति करावी..... आपल्या खोली-मध्यें आपण एखाद्या आदर्श व्यक्तीचा फोटो लावावा व एखादा अवघड प्रसंग निर्माण झाला म्हणजे अशा प्रसंगीं त्या आदर्श व्यक्तीनें कसें वर्तन केलें असतें त्याचा विचार करावा. ह्या विचारामुळें आपणांला चांगलें मार्ग-दर्शन होतें......"

माझ्या मनांत एकदम विचार आला--

माझ्या खोलीमध्यें मी कृष्णाचाच फोटो लावणार. प्रेसिडेंट रूझवेल्टनें आपल्या खोलींत लिंकनचा फोटो लावला होता. एखाद्या अवघड प्रसंगीं तो त्या फोटोकडे पाही व स्वतःशींच म्हणे--" माझ्या जागीं लिंकन असता तर ह्या प्रसंगीं त्यानें काय केलें असतें ?—" हा विचार मनांत आल्यावर त्याला योग्य तें मार्गदर्शन होत असे. मी देखील माझ्या खोलीमध्यें कृष्णाची तसबीर लावणार व एखादा अवघड प्रसंग आला म्हणजे स्वतःला विचारणार --अशा प्रसंगीं कृष्णानें कसें वर्तन केलें असतें ?

मीं कृष्णाला विचारलें--

" देवा, साधुसंतांना वाटतें कीं, सुखांत ज्याप्रमाणें आनंद आहे त्याप्रमाणें दुःखांत देखील आनंद आहे. सुखांत आनंद आहे हें म्हणणें ठीक आहे, पण दुःखांत कसा आनंद असेल ? "

भगवान हसून म्हणाले—

" हें समजून घ्यायला देवाबद्दल पराकाष्ठेचा आपलेपणा असावा लागतो,

व आपलें अंतःकरण मातेच्या प्रेमानें भरून यावें लागतें. तुला रामायणामध्यें कौसल्येच्या स्वप्नांत राम आला ती गोष्ट माहित आहे ना ? "

माझ्या डोळ्यापुढें एकदम कौसल्या दिसूं लागली. ती गरभार असतांना तिला एक स्वप्न पडलें. राम तिच्या स्वप्नांत आला व म्हणाला—

" माते ! तुला गरभारपणाचा केवढा हा त्रास ! तुला हें असें दुःख देण्यापेक्षां मी एकदम आठ वर्षांचा होऊन तुझ्यापुढे येतों म्हणजे तुझा सारा त्रास वांचेल. "

रामाचे हे शब्द ऐकून कौसल्या म्हणाली--

" रामा ? तूं देव असलास तरी पुरुष आहेस. आईला त्रास अथवा दुःख होऊं नये म्हणून तूं चांगल्या भावनेने बोललास; पण रामा ! आईला काय वाटतं---मातेला काय वाटतं---तें ऐक. रामा ! मला वाटतं तूं माझ्या पोटांत नऊ महिने नऊ दिवस रहावास. तूं माझ्या पोटांत असतांना मला खूप त्रास झाला तरी त्या त्रासांत देखील मला आनंद वाटेल. तूं जन्मल्यावर तुझं मुख पाहून मला जो आनंद होईल तो शब्दांच्या पलीकडचा आहे. रामा ! तूं एकदम बोलूं नकोस. लहान मूल जें हातानं डोळ्यानं बोलतं ती भाषा फक्त आईलाच कळते. रामा ! तूं बोलायला लागलास तरी एकदम व्याकरणशुद्ध बोलूं नकोस. अरे ! बोबड्या बोलांत जो आनंद आहे तो व्याकरणशुद्ध भाषेंत नाहीं. रामा ! तूं खोड्या कर. ताकानं भरलेलं किंवा दुधानं भरलेलं भांडं तूं खुशाल सांड. लोक म्हणतील–मुलगा किती खट्याळ आहे !–आईला किती त्रास देतो !–पण रामा ! मला तसं वाटणार नाहीं. मला असं वाटणार नाहीं कीं ताक सांडलं किंवा दूध सांडलं, तर मला वाटेल कीं आनंदाचा पूर वहात आहे. तूं एकदम चालूं नकोस. प्रथम रांग, मग चालूं लाग. मी चांगलं लुगडं नेसलं असतांना खुशाल तूं मातीचे पाय घेऊन माझ्या मांडीवर बैस. लोक म्हणतील–आईला हा त्रास देतो; पण मला वाटेल कीं तुझ्या पायाची माती म्हणजे सौख्याचा ठेवा आहे. रामा ! अरे तुझ्यामुळेंच मला वाटेल कीं सुखांत ज्याप्रमाणें आनंद आहे त्याचप्रमाणें दुःखांत देखील आनंद आहे. हा सारा आनंद तूं मला दे. अशा तऱ्हेने जर तूं लहानाचा मोठा झालास तर मला वाटेल कीं तू माझा सख्खा मुलगा आहेस. आणि

जर का एकदम आठ वर्षांचा होऊन तू माझ्यापुढें आलास तर मला वाटेल कीं तू माझा दत्तक मुलगा आहेस. "

राम व कौसल्या अदृश्य झाले, पण तो पाहिलेला प्रसंग माझ्या हृदयाला जाऊन भिडला. दुःखांत कसा आनंद असतो ह्याचें ह्यापेक्षा चांगलें उदाहरण मिळणें कठीण आहे.

माझ्या डोळ्यापुढें पुन्हा कृष्णाची मोहक मूर्ति दिसूं लागली. मी कृष्णाला म्हटलें--

" देवा ! मला तूं धन्य केलेंस. आतां आणखी एक प्रश्न विचारतों--ज्ञानेश्वरीमध्यें तूं भक्ताची खूप स्तुति केली आहेस; पण भक्तांना मी डोक्यावर घेतों. त्यांची टाच देखील हृदयीं धरतों असें कां म्हटलेंस ? ज्ञानेश्वरीमधें तूं म्हणतोस--

म्हणोनि गा नमस्कारु । तयाते माथा मुकुट करू । तयाची टाच धरू । हृदयी आम्ही ।।

माझा प्रश्न ऐकून भगवान म्हणाले--

" रामायणांत रामानें सीतेचा त्याग केल्यानंतर ती काय म्हणाली तें तुला माहित आहे ना ? "

माझ्या डोळ्यापुढें एकदम रामायणांतला प्रसंग आला. मला राम दिसूं लागला; सीता दिसूं लागली.

रावणाच्या अशोकवनाप्रमाणें रामाचे देखील अयोध्येमधें अशोकवन होतें त्या ठिकाणीं चंदन, पुन्नाग, अगरू, चंपक, फणस, पारिजात, मंदार इत्यादि वृक्ष होते. हंस, चक्रवाक, करंडक इत्यादि पक्षी कमळ-पुष्पांनी शोभित अशा पुष्करिणीमधून मनसोक्त क्रीडा करीत होते. राम व सीता अशोक वनातून पाळीव पक्ष्यांची शोभा पहात चालले असतांना राम म्हणाला--

" अलीकडे तुझी गति मंद कां झाली आहे ? "

सीतेनें लाजून रामाकडे एक कटाक्ष टाकला. तिला जवळ घेऊन राम म्हणाला--

" तुला कसले डोहाळे होत आहेत ? "

जानकी म्हणाली--

"तपोवनांत राहावं; ऋषीमुनींची सेवा करावी, अशी मला हल्ली वारंवार इच्छा होते."

राम म्हणाला—

"चिंता करूं नकोस. तुझी इच्छा पूर्ण होईल."

* * * *

त्याच दिवशीं हेरांनी रामाला सांगितले—

"सारे प्रजाजन आपली पराकाष्ठेची स्तुति करतात. ते म्हणतात—

'रामाचें जीवन चंद्राप्रमाणे आहे. त्यांनी केलेला सीतेचा स्वीकार हा चंद्रावरील कलंकाप्रमाणें आहे.' ते त्या बाबतींत आपली एकांतांत नेहमीं निंदा करतात. त्यांना ही गोष्ट अजिबात पटत नाहीं."

सीतेवरील प्रेमामुळें रामाचे डोळे अश्रूंनी भरून आले. रामाने खूप शोक केला. पण शवटीं निश्चय केला कीं—राजाच्या इच्छेपेक्षा प्रजेची इच्छा मोठी आहे. आदर्श राजा होण्याकरितां मला माझ्या सुखावर पाणी ओतलें पाहिजे.

रामानें लक्ष्मणाला आज्ञा केली कीं "उद्या रथांत बसवून तूं सीतेला तमसा नदीच्या तीरावर वाल्मीकीच्या आश्रमाजवळ सोडून ये. तिचे डोहाळे पुरे होऊंद्यात. तिचा मी त्याग करण्याचें ठरवलें आहे."

राम लक्ष्मण दोघेही रडूं लागले.

लक्ष्मणाने रामाची आज्ञा पाळल्यावर सीतेला जेव्हा वनांत कळलें कीं रामानें आपला त्याग केला आहे, तेव्हां ओक्साबोक्सी रडणाऱ्या लक्ष्मणाला ती म्हणाली—

'माझा जन्म दुःखासाठीच आहे, पण ह्या दुःखांत देखील मला आनंद आहे. राजाच्या इच्छेपेक्षा प्रजेची इच्छा मोठी आहे. ह्यासाठीं रामानें आपल्या सुखाची आहुती दिली. मी देखील माझ्या पतीला आनंदानें साथ देईन. मला वाटेल तितकें दुःख होऊं दे, पण माझ्या रामाचा कीर्तिध्वज जगांत चिरकाल राहूं दे!'

तें दृश्य पाहून मी देखील रडूं लागलों. सीता रामाची भक्त. दुसरी एखादी स्त्री असती तर ती आपल्या पतीला उद्देशून वाटेल तें अद्वातद्वा बोलली असती. मला वाटूं लागलें—

सीतेचे—आपल्या भक्ताचे हे उद्‌गार ऐकून राम देखील म्हणाला असता—

म्हणोनि गा नमस्कारूं। तयाने आम्ही माथा मुकुट करूं। तयाची टाच धरू। हृदयी आम्ही ॥

सीता, लक्ष्मण माझ्या डोळ्यांपुढून अदृश्य झाले. पुन्हा कृष्णाची मूर्ति मला दिसूं लागली.

अबोध मनाबद्दलचे ( Unconscious mind ) शास्त्रज्ञांचे विचार माझ्या मनांत चमकून गेले. डॉ. शॅफ्ट सवरी, डॉ. मनरो, डॉ. पारकिन ह्यांनीं बाह्य मन व अंतर्मन ह्याबद्दल मांडलेलीं प्रमेयें माझ्या ध्यानांत आलीं. तत्त्वज्ञांचा मुकुटमणी डॉ. जोड ह्याची विचारसरणी मला आठवली. ईश्वर प्रत्येकाच्या अंतःकरणांत आहे हें गीतेंतील वाक्य माझ्या ध्यानांत आलें. मी कृष्णाच्या पाया पडलों व सद्‌गदित अंतःकरणानें म्हटलें—

" देवा ! खरं पाहिलं तर तू निर्गुण निराकार आहेस; पण भक्तासाठीं सगुण साकार होतोस हेहि खरं आहे. "

कृष्णाने माझ्या पाठीवर हात ठेवला आणि एकदम मी जागा झालों.

सूर्य मावळला तरी त्याच्या प्रकाशाचा अंश मागें राहतोच. स्वप्न संपलें तरी त्यांतील आनंदाचा अंश मागें राहिला. त्या आनंदाच्या भरांत मीं स्वतःशीच म्हटलें—

**' अजि म्यां ब्रह्म पाहिलें '**

* * *

# स्वप्न दुसरें

स्वामी रामतीर्थांना एकदां विचारण्यांत आलें--

"तुमचा जास्तींत जास्त उत्कर्ष कोणत्या काळीं झाला ?"

रामतीर्थ म्हणाले–

"दुःखाच्या काळीं."

ह्या उत्तरांत फार मोठा अर्थ भरला आहे. सुख आणि दुःख या जोडीशिवाय जीवन नाही. असें असलें तरी माणसाला पाहिजे असतें सुख व तो टाळतो दुःख. त्याच्या लक्षांत येत नाही कीं, मानवी जीवनवस्त्र सुख-दुःखांच्या उभ्या नि आडव्या धाग्यांनी विणलें आहे. मनुष्याचें मनुष्यपण

टिकविण्यासाठी दुःखाची आवश्यकता आहे. व्हिक्टर ह्यूगो ह्यानें सार्थत्वानें म्हटलें आहे की,

Adversity makes man and prosperity makes monsters of men.

विपत्ति मनुष्याला मनुष्यत्व आणते, तर भरभराट मनुष्याला राक्षसत्व आणते.

दुःखाकडे पाहण्याची दृष्टी बदलावी व दुःखाचा जास्तींत जास्त उपयोग करून घ्यावा म्हणजेच उत्कर्ष होईल व आपण सुखी होऊं.

लहानपणासून मला चांगली झोप येते. पण झोपेंत मला फार स्वप्नें पडतात.

मीं एके ठिकाणीं वाचलें--

" फार स्वप्नें पडणें हें चांगलें लक्षण नव्हे. ज्यांत स्वप्न पडत नाही अशीच निद्रा चांगली. फार स्वप्नें पडण्याने मनुष्याचें आरोग्य विघडतें व तो दुःखी होतो. "

तज्ञाने लिहिलेल्या ह्या विचारांचा लहानपणीं माझ्यावर फार परिणाम झाला. माझें आरोग्य चांगलें होतें, मला झोपहि चांगली लागत होती. पण फार स्वप्नें पडण्यानें मनुष्य दुःखी होतो हें वाक्य वाचून मी दुःखी झालों. खूप पुस्तकें वाचून स्वप्नाशिवाय निद्रा कशी येईल त्याचा मीं प्रयोग सुरू केला, पण कांहीं केल्या हा प्रयोग जुळेना.

एका पुस्तकांत लिहिलें होतें.--

"स्वप्न म्हणजे दुःख; स्वप्न म्हणजे दुःख--असें मनाला सारखें बजावावें म्हणजे स्वप्नें पडत नाहींत."

हा प्रयोग मीं केला; पण माझीं स्वप्नें बंद झालीं नाहींत. उपयोग इतकाच झाला कीं स्वप्न म्हणजे दुःख ह्या समीकरणामुळे व मला रोज रात्रीं स्वप्नें पडत असल्यामुळे मी जास्त दुःखी बनत चाललों.

येशू ख्रिस्ताने म्हटलें आहे की--

दुःख म्हणजे ईश्वराचा आशीर्वाद आहे.

शेक्सपीअरनें म्हटलें आहे की--

Nothing is good or bad. That depends upon how you look at it.

कोणतीच गोष्ट चांगली अगर वाईट नसते. आपण ज्या दृष्टीने पाहतों त्यावर तें अवलंबून असतें.

मला नवीन दृष्टी प्राप्त झाली. स्वप्नरूपी दुःखाकडे मी निराळ्या दृष्टीने पाहूं लागलों; आणि मला अनुभव आला की ह्या दुःखांतच माझा फार मोठा उत्कर्ष साठवला आहे.

स्वप्नसृष्टि व जागृत अवस्थेंतील सृष्टि ह्यांमध्ये काय फरक आहे? स्वप्न ही अवस्था सर्वस्वी असत्य व आभासमय आहे का? जागृतींतील अनुभव व स्वप्नांतील अनुभव ह्यांचा संबंध काय आहे? जागृति व स्वप्न ह्या दोन अवस्थांमध्ये पारस्पर्य व एकसूत्रता आहे का? स्वप्नांतील अनुभव हे जागृतींतील अनुभवांचीं प्रतीक आहेत कीं प्रतिबिंबें आहेत?—— वगैरे प्रश्नांबद्दल तज्ज्ञांमध्ये एकमत नाही. आपणाला अनुभव मात्र येतो कीं केव्हा केव्हा जागृतावस्थेंत न सुटलेलीं गणितें व न सुटलेले पेचप्रसंग स्वप्नामध्ये सुटतात. आध्यात्मिक प्रांतांत मार्ग आक्रमत असतांना केव्हा केव्हा आपणाला दिव्य स्वप्नें पडतात व वाटूं लागतें——

"अरे! हें स्पप्न म्हणजे शब्दांनी वर्णन करण्याच्या पलीकडचा आनंद आहे."

रामरक्षा स्तोत्रांत दिव्य स्वप्नाची कल्पना आहे. एकनाथ म्हणतात——

**श्री ज्ञानदेवें येऊनी स्वप्नांत।**
**सांगितली मात मजलागी।।**
**अज्ञानवृक्षाची मुळी कंठास लागली।**
**येऊनी आळंदी काढ वेगी।।**

एकनाथांना पडलेलें हें दिव्यस्वप्न आहे. ज्या स्वप्नांत तुकारामांना मंत्रोपदेश झाला तें देखील दिव्यस्वप्न.

आपणाला अनुभव येतो की आपलें मन अत्यंत पवित्र झालें, विचाराच्या उंच डोंगरावर आपण जाऊन बसलों, व अंतःकरणाच्या कोपऱ्यातून आपण देवांची करुणा भाकली म्हणजे ज्या देवाचें आपण ध्यान करतों तो देव

सगुण, साकार रूपांत आपल्या स्वप्नांत येतो व आपणावरोबर बोलूं लागतो.

नेहमीच देव स्वप्नांत येतो असें नव्हे; पण जेव्हा तो येतो तेव्हा आपणाला पराकाष्ठेचा आनंद होतो. रात्रीं नेहमीच उच्च वाङमय वाचण्याने असलें स्वप्न पडण्यास मदत होते. पुष्कळदां असें होतें की आपण वाचतों एक व स्वप्न पडतें दुसऱ्याच विचाराबद्दल. त्या रात्रीं मी मासिक वाचत होतों. त्यांत लिहिलें होतें--

'पुष्कळ लोकांची अशी समजूत आहे की आपण जन्मभर वाटेल तीं पापें करावीं व मरणेचे वेळीं देवाचें नांव घ्यावें म्हणजे आपण उद्धरून जातों. पण ही समजूत चुकीची आहे. आपला जो स्थायीभाव असतो तोच मरण्याचे वेळीं दृष्टोत्पत्तीस येतो. गडकऱ्यांचा स्थायीभाव विनोद होता. ते आजारी पडले व लोकांना त्यांच्याबद्दल आशा वाटेना. ते अर्धवट बेशुद्ध अवस्थेंत होते. त्यांना ताप होता. ताप उतरत नव्हता. जवळ डॉक्टर बसले होते. मामला गंभीर होता. डॉक्टर कांहीसे बोलले. गडकऱ्यांना शुद्ध आली व त्यांनी डॉक्टरांना विचारलें--

"आपण काय म्हणलां ?"

डॉक्टर म्हणाले--

"तुम्हाला जर घाम आला तर तुम्हाला बरें वाटेल व ह्या दुखण्यांतून तुमची सुटका होईल."

मृत्यूच्या दारांत उभे असलेले गडकरी डॉक्टरांना म्हणाले--

"अहो ! उपाय सोपा आहे. तुम्ही घरीं जा, आणि भलें मोठें बिल मला पाठवून द्या. तें बिल पाहून माझ्या अंगाला अगदी दरदरून घाम येईल."

हें वाक्य ऐकून डॉक्टर हसूं लागले; पण हसता हसता त्यांच्या डोळ्यांत पाणी आलें; कारण गडकऱ्यांचा तो शेवटचा आजार होता व सारी आशा मावळली होती.

मासिकांतील हें लिखाण वाचून माझी खूप करमणूक झाली.

दुसऱ्या एका पानांत लिहिलें होतें--

जिवंत समाधि घेतांना ज्ञानेश्वर म्हणाले असतील--

"आज मी जिवंत समाधि घेत आहें. हें विश्वचि माझें घर हा माझा महामंत्र आहे. आज जग हें विश्वचि माझें घर म्हणत नाही. मित्रांनो, रामराम. ईश्वराने दिलेलीं कामें करण्यासाठी आपली ताटातूट होत असते. एक महान् नाटक चाललें आहे. भरतवाक्याच्या वेळीं मेलेलीं पात्रें देखील सजीव होतात व भरतवाक्य म्हणूं लागतात. भविष्यकाळीं जिकडे तिकडे मानवताधर्म प्रस्थापित होईल, विश्व एक घर होईल व भरतवाक्य म्हटलें जाईल, तेव्हा मी देखील जिवंत होऊन भरतवाक्य म्हणेन. तोंपर्यंत मित्रांनो, रामराम ! "

माझ्या डोळ्यांत एकदम पाणी आलें. ज्ञानेश्वरांच्या जिवंत समाधीचें जेव्हा जेव्हा मी वर्णन वाचतों तेव्हा तेव्हा माझे डोळे पाणावतात.

मासिकाच्या आणखी एका पानांत लिहिलें होतें--

" मनुष्याला दोन बायका असतात. एकीचें नांव बुद्धि व दुसरीचें नांव भावना. ज्याला एक बायको आवडती व दुसरी नावडती होते त्याचा संसार सुखाचा होत नाही. सवतीमत्सर होऊं न देतां दोन्ही बायकांच्यावर सारख्याच तऱ्हेने प्रेम करण्याचें कसब ज्याला साधलें त्याचा संसार सुखाचा होतो. "

हे विचार देऊन लेखकाने त्या विचारांबद्दल बरीच मल्लीनाथी केली होती. ती मल्लीनाथी वाचतां वाचतां मला झोप आली व एक दिव्य स्वप्न पडलें.

साहित्यांत आपण वाचतों कीं झोप घेतांना ज्या गोष्टीचा आपण विचार करतों त्या गोष्टीबद्दल आपणाला स्वप्न पडतें. पुष्कळदा अनुभव ह्याच्या उलट येतो. ज्या गोष्टींचा विचार आपण झोपताना करतों त्या गोष्टीबद्दल स्वप्न न पडतां दुसरेंच स्वप्न पडतें. मनुष्य अंतरंगांत पुष्कळदा चिंतन करत असतो. ह्या चिंतनाला धार नि आधार देण्यासाठीं मी पुष्कळदा वळतों महाभारताकडे. कधी कधी धारदार भाल्याचा आविष्कार आपण ललितरम्यतेने करतों, तर कधी भाल्याच्या नक्षीदार कामावर चिंतनाचा प्रकाशझोत उधळतों. महाभारतांतील कृष्णवाणीची मुरली माझ्या अंतरंगांतील आवाजाला नेहमीं झंकारित करत असते. अमक्याच रात्रीं दिव्य स्वप्न

पडेल ह्याची खात्री देतां येत नसली तरी एक गोष्ट निश्चित कीं रात्रीच्या वेळीं झोपण्यापूर्वी चांगले विचार वाचणें हें दिव्य स्वप्न पडण्याचें एक साधन आहे. पुष्कळदा असें होतें की जागृतावस्थेंत दिसणारें चिंतनरूपी जाडेंभरडें वस्त्र स्वप्नामध्यें उसवलें जातें व तरलकोमल तंतूंनी तें विणलें जाऊन त्याला तलमपणा व पारदर्शिकपणा प्राप्त होतो.

मला स्वप्नांत एकदम अर्जुन दिसूं लागला. गीता सांगून झाल्यावर युद्ध सुरू झालें होतें. पुढें युद्धांत कर्णाने युधिष्ठिराचा पराभव केल्यावर युधिष्ठिर अर्जुनास म्हणाला--

" व्यर्थ तुझा पराक्रम ! अजून तूं कर्णाचा वध केला नाहीस ! कशाला तें गांडीव धनुष्य घेऊन बसलास ! देऊन टाक तें दुसऱ्याला. तुझ्या गांडीव धनुष्यांत कांही अर्थ नाही. "

अर्जुनाची अशी प्रतिज्ञा होती की--

' जो कोणी गांडीव धनुष्याची निंदा करील व हें गांडीव धनुष्य दुसऱ्यास दे असें म्हणेल त्याचा मी वध करीन.'

युधिष्ठिराचे शब्द ऐकतांच आपली प्रतिज्ञा खरी करण्याकरता अर्जुनानें डोळे गरगरा फिरविले, आपलें खड्ग उपसलें व तो युधिष्ठिराचा वध करायला उद्युक्त झाला. तो देखावा पाहून मला भीति वाटली. जवळच कृष्णाची गोजिरी साजिरी मूर्ति उभी होती. मी त्या मूर्तीकडे आदरानें पाहूं लागलों.

कृष्ण अर्जुनास म्हणाला--

" अरे ! तूं जर आपल्या दादाला मारलेंस तर तुला क्षणभर तरी जगणें शक्य आहे का ? "

अर्जुन गयावया करीत म्हणाला—

" कृष्णा ! तूं म्हणतोस तें खरें आहे. पण सत्याचा महिमा मोठा नाही का ? मी सत्यप्रतिज्ञ आहें. माझी प्रतिज्ञा मोडण्यानें मला पाप नाही का लागणार ? "

कृष्णाने बोलण्यास प्रारंभ केला. गीता सांगणारा कृष्ण काय बोलतो, तें ऐकण्याकरतां मी साऱ्या इंद्रियांचे कान करून ऐकूं लागलों. कृष्ण म्हणाला—

" अरे ! तूं मूढ आहेस. धर्माचा सूक्ष्मपणा तुझ्या लक्षांत आला नाही.

सत्य, अहिंसा हीं फार उच्च तत्त्वें आहेत, पण त्या तत्त्वांना अपवाद आहेत हें तुझ्या लक्षांत येत नाही. सत्याकरतां सत्य व अहिंसेकरितां अहिंसा असें म्हणणाऱ्यांना धर्माचा खरा वारकावा कळला नाही. सत्य नि अहिंसा हीं तत्त्वें सापेक्ष आहेत. एखादा शत्रु अन्यायाने आपल्यावर चालून आला व आपसातीचे सारे मार्ग बंद झाले तर 'अहिंसा परमो धर्म: ।' असें म्हणून त्याला शरण जाण्यामध्ये खरा धर्म नाही. न्याय प्रस्थापित करण्याकरता नाइलाजाने जी कमींतकमी हिंसा केली जाते ती देखील अहिंसा या सदरांत पडते. शेतांत आपण बसलों असतांना एखादी गाय आपल्या पुढून गेली व नंतर कसाई येऊन धमकी देऊन जर तो आपणास गाय कोणत्या दिशेने गेली असें विचारूं लागला तर अशा वेळीं खरें बोलण्यामध्ये धर्म नसून असत्य बोलणेंच श्रेयस्कर असतें.

"सत्य आणि अहिंसा ह्यांचे सूक्ष्म वारकावे समजून घेतल्याशिवाय आपणाला खरा धर्म कळत नाही. तूं असें कर. युधिष्ठिराची तूं निर्भर्त्सना कर. कारण सज्जनाची निर्भर्त्सना करणें म्हणजे त्याचा वध केल्याप्रमाणे आहे. असें करण्याने तुझी प्रतिज्ञा खरी होईल व युधिष्ठिराचा प्राण जाणार नाही."

अर्जुनाला हें म्हणणें पटलें. त्याने युधिष्ठिराची निर्भर्त्सना केली व आपली प्रतिज्ञा खरी केली.

तो देखावा पाहून माझ्या मनावर विलक्षण परिणाम झाला. कृष्णाच्या तोंडून सत्य–अहिंसेचें तत्त्वज्ञान ऐकून मी आनंदसागरांत पोहूं लागलों. महाभारतांत तो प्रसंग मीं पूर्वी वाचला होता; पण वाचणें व पाहणें ह्यांत महदंतर आहे. नाटक वाचून जो आनंद होत नाही तो पाहून होत असतो.

माझ्या मनांत असा विचार येत असतांना तो देखावा नाहीसा झाला. थोड्या वेळाने कृष्णाची नयनमनोहर मूर्ति माझ्या डोळ्यांपुढें आली. कृष्णाचें चरित्र वाचून कितीतरी लोकांनी खूप शृंगारिक वाङ्मय लिहिलें आहे. डॉ. सिगमंड फ्यूडने म्हटलें आहे की––

**Everything, you and I do, springs from two motives—the sex urge and the desire to be great.**

(तुम्ही आणि मी करीत असलेल्या प्रत्येक गोष्टीचा उगम दोन हेतूंत

असतो—(१) लैंगिक आकर्षण, (२) मोठे होण्याची इच्छा.

कृष्णाची ती दिव्य मूर्ति पाहून वरील विचार माझ्या मनांत आला नाही. डोकें व अंतःकरण ह्याबद्दल माझ्या मनाच्या जलशयांत निरनिराळे तरंग उठले होते; त्याबद्दल कृष्णाला विचारल्यावर कृष्ण म्हणाला--

"ज्ञानानें डोकें मोठें होतें; पण एक गोष्ट लक्षांत ठेव की अंतःकरणाला फार किंमत आहे. देव देवळांत नाही, चर्चमध्ये नाही, मशिदींत नाही, तर तो प्रत्येकाच्या अंतःकरणांत आहे. ह्या दिव्य शक्तीचा आधार न घेतां जर ज्ञान वाढूं लागेल तर तें आपणाला विनाशाप्रत नेईल,"

कृष्णाला मीं मनोभावें नमस्कार केला व म्हटलें—

"देवा! केव्हा केव्हा डोकं व अंतःकरण ह्यांमध्यें झगडा होतो. अशा वेळीं कुणाचा जय व्हावा ?"

गोपालकृष्ण हसून म्हणाले--

"भारताची फाळणी झाली त्यावेळी त्या दिल्लीच्या डॉक्टरच्या जीवनांत काय प्रसंग घडला तें तुला माहीत आहे ना ?"

माझ्या डोळ्यांपुढून गोपालकृष्ण अदृश्य झाले व त्या डॉक्टरांची गोष्ट सजीव साकार स्वरूपांत येऊं लागली.

भारताची फाळणी झाली ह्यावेळी त्या तरुण डॉक्टराचा एकुलता एक लहान दोन वर्षांचा मुलगा लाहोरला आपल्या आजा-आजीकडे होता. आजोबांनी आपल्या मुलीचा मुलगा कांही दिवस आपणाकडे ठेवून घेतला होता. भारताची फाळणी झाली आणि लाहोरला हिंदूंची कापाकाप झाली. त्या डॉक्टराला बातमी समजली की त्या कापाकापींत आपले सासरे, सासूबाई व मुलगा ह्यांना कापून ठार मारण्यांत आलें!

डॉक्टर व त्याची बायको ह्यांच्यावर दुःखाचा डोंगर कोसळला. पांच-सहा वर्षे निघून गेलीं. एकदा डॉक्टर घरी असतांना त्यांना फोन आला की,

एका सात-आठ वर्षांच्या मुलाला मोटारीचा अपघात होऊन त्याला ऑपरेशनरूममध्ये नेलें आहे.

ते घाईघाईने आपल्या दवाखान्यांत आले. दारांत एक मुसलमान होता. तो डॉक्टरांना म्हणाला--

"डॉक्टरसाब, माझ्या मुलाला ऑपरेशनरूममध्ये नेलें आहे. आपण ऑपरेशनमध्यें फार निष्णात आहां. कांहीही करून आपण माझ्या मुलाला वांचवा. मी आपली जन्मभर सेवा करीन."

डॉक्टरांना कळलें कीं हा मुसलमान लाहोरहून दिल्लीला आला असतांना त्याच्या मुलाला अपघात झाला.

डॉक्टरांचें डोकें म्हणूं लागलें—

"अरे! तुझ्या मुलाला लाहोरच्या मुसलमानांनी मारलें. सूड म्हणून तूं ह्या मुसलमानाच्या मुलाला मार."

अंतःकरण म्हणालें—

"अरे! पण ह्या मुलाचा काय दोष? त्याला कां तूं मारणार?"

डोकें म्हणालें—

"शठं प्रति शाठ्यं हाच न्याय जगांत लागू आहे. तुझ्या मुलाचा काय दोष होता? त्याला कां मुसलमानांनी मारलें? त्या मारणाऱ्यांमध्ये कदाचित हाच लाहोरचा मुसलमान असेल. तूं खुशाल ह्या मुलाला मार! आणि जाहीर कर कीं ऑपरेशन करतांना हा मुलगा मेला म्हणून."

अंतःकरण म्हणालें—

"मुलाला मारूनहि तूं अडकणार नाहीस हें खरें; पण असलें कृत्य तुला शोभतें का?"

डोकें म्हणालें—

"तुझा मुलगा ठार मारला तें मुसलमानांना शोभलें का? तें कांही नाही. अशी सोन्यासारखी संधी पुन्हा येणार नाही. ह्या मुलाला ऑपरेशनरूममध्ये ठार मारण्यानेच तुझ्या दुःखाचें शमन होणार आहे."

ह्या वादांत डोक्याची सरशी झाली. मुलाला ठार करायचें असें ठरवून डॉक्टर ऑपरेशनरूममध्ये गेले. त्या आसुरी आनंदात त्यांनी हातांत शस्त्र घेतलें—

इतक्यांत अंतःकरणांतून कळवळून आवाज आला—

"तूं डॉक्टर आहेस का हैवान आहेस! हिंदु असो, मुसलमान असो, त्याचे प्राण वांचवणें हें तुझें कर्तव्य आहे."

त्या अंतःकरणातील दिव्य आवाजापुढें डोकें नरमलें. अंतःकरणाचा जय झाला. डॉक्टरांनी ऑपरेशन केलें आणि त्या मुलाचे प्राण वांचवले.

तो मुसलमान गृहस्थ म्हणाला--

" डॉक्टरसाब ! तुमचे उपकार मी कसे फेडूं ? तुम्ही माझ्या मुलाचे प्राण वांचवलेत. आता कृपा करून ह्याच्या आई-बापांचा शोध करण्यामध्ये मला मदत करा. "

'आ' वासून डॉक्टर त्याच्याकडे पाहूं लागले—

तो मुसलमान म्हणाला—

" लाहोरला हिंदूंची कत्तल झाली, तेव्हा ह्याच्या आजा-आजीना मुसलमान लोकांनीं ठार मारलें. त्यावेळीं मी शेजारी राहत होतों. हा मुलगा माझ्या घरीं खेळत होता. मुसलमानांची टोळधाड आली, त्यांनी मला विचारलें--

" हा मुलगा कोणाचा ? "

मीं म्हटलें--

" माझा. "

" माझा मुलगा म्हणून हा वांचला. तेव्हापासून ह्याच्या आईबापांच्या मी शोधांत आहें, पण अद्याप शोध लागला नाही. ! "

डॉक्टरांना नवीन प्रकाश दिसला. त्यांनी पुन्हां त्या मुलाला पाहिलें.

**तो त्यांचाच मुलगा होता !**

डोक्यावर हात मारून डॉक्टर म्हणाले--

'डोक्याची सरशी झाली असती—तर माझ्याच मुलाला मीं ठार मारलें असतें !'

× × ×

मी एकदम जागा झालों. विनाशाकडें धाव घेणाऱ्या ज्ञानाकडे पाहून बर्ट्रांड रसेलने निराशेने उद्‌गार काढले, 'ज्ञानापेक्षा अज्ञानानेच जगाचा उद्धार होईल.

मला वाटूं लागलें--

हे निराशेचे उद्‌गार खरे नसून अंतःकरणांतील दिव्यशक्तीरूपी मातेच्या सावलींत डोक्यांतील ज्ञान वाढलें तरच जगाचा उद्धार होईल.

* * *

# स्वप्न तिसरें

देव आपणांला भेटतो का ह्याबद्दल लोक खुशाल वाद करोत; पण आपल्या स्वप्नांत देव आपणाला साद देऊं लागला म्हणजे त्याच्या भेटीचा जो नाद आपणांला लागतो त्याबद्दल वाद करण्याचें कारण नाही.

भक्तिमार्गांत प्रवास करतांना आपणांला कळून येतें की, ज्याप्रमाणें हवा वाहूं लागली म्हणजे त्याला वारा म्हणतात किंवा ज्याप्रमाणें ढगांतून पाणी पडूं लागलें म्हणजे त्याला पाऊस म्हणतात, त्याप्रमाणें अंतरंगांत वास करीत असलेल्या परमेश्वराबद्दल निरतिशय प्रेम वाटूं लागलें म्हणजे त्याला भक्ति म्हणतात.

भक्तिमार्गांत बराच प्रवास झाल्यानंतर निर्गुण, निराकार परमेश्वर आपल्या स्वप्नांत सगुण साकार रूप घेतो व आपणांशीं बोलूं लागतो. त्यावेळीं होणारा आनंद म्हणजे स्वर्गीय सुखाचा उत्कृष्ट नमुना आहे.

संतांनीं हें सुख खूप अनुभवलें व महत्त्वाची गोष्ट अशी कीं, संतांच्या बद्दल आपण विचार करूं लागलों म्हणजे आपल्या स्वप्नांत आपली इष्ट देवता येते व मोठ्या प्रेमानें आपणांशीं बोलूं लागते.

एका रात्रीं मी महाराष्ट्रांतील निरनिराळ्या संतांच्याबद्दल विचार करीत होतों. आपला महाराष्ट्र प्रांत इतर प्रांतांच्या मानानें धनधान्याच्या बाबतींत कमी भाग्यवान् असेल, पण साधुसंतांच्या बाबतींत तो फार भाग्यवान् आहे. ज्ञानोबापासून विनोबांपर्यंत आपल्या प्रांतांत संतांची अखंड परंपरा सुरू आहे.

महाराष्ट्राचें साधुपंचायतन कोणतें असें जर कोणी विचारील तर त्याचें उत्तर असें कीं —

ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम व रामदास हें तें पंचायतन होय.

ह्याच पंचायतनाबद्दल मी त्या रात्रीं विचार करीत होतों. प्रथमतः मी ज्ञानेश्वरांच्याबद्दल विचार करूं लागलों.

ज्ञानेश्वरांनीं ज्ञान व कर्म ह्यांना योग्य तो मान देऊन भक्तियोगावर विशेष भर दिला आहे. भक्तियोगाबद्दल ते म्हणतात—

**जें जें भेटे भूत। तें तें मानिजे भगवंत।**
**हा भक्तियोग निश्चित। जाण माझा॥**

मला वाटूं लागलें—

भक्तिमार्ग उत्तम आहे ह्यांत वाद नाही, पण आपण असें लक्षांत ठेवलें पाहिजे की, भक्तीचे दोन प्रकार आहेत–(१) आंधळी भक्ति, (२) डोळस भक्ति.

आंधळी भक्ति त्याज्य आहे तर डोळस भक्ति ग्राह्य आहे. आंधळ्या भक्तीला ज्ञानाचें वावडें असतें तर डोळस भक्तींत ज्ञान व कर्म ह्यांचा समन्वय असतो.

खूप भक्ति आहे पण ती डोळस नसेल तर जो प्रकार होईल तो असा—

खूप पीक आलें आहे, कणसें दाटलीं आहेत, पण कणसांत दाणाच नाही; किंवा खूप सुंदर नगरी आहे, इमारती उत्तम आहेत, पण त्या नगरींत माणसेंच नाहीत; अथवा खूप सुंदर स्त्री आहे, तिच्यावर उत्तम वस्त्रालंकार आहेत, पण तिच्यांत प्राणच नाहीं.

ज्ञानेश्वरांचा भक्तिमार्ग समजून घेण्याचा मीं प्रयत्न केला आहे. त्या रात्रीं मला वाटूं लागलें--

जातिवादाच्या पलीकडे गेल्याशिवाय व सोवळयाओवळयाच्या खुळ्या कल्पना टाकून दिल्याशिवाय भक्तिमार्ग आचरूं पाहणें म्हणजे गोकाकचीं कृत्रिम फळें खाऊन आपली भूक भागवण्यासारखें आहे. भक्तीच्या प्रमाणांत अंतःकरण सोंवळें की ओवळें हा मुख्य प्रश्न आहे. ओंवळें घेऊन आपणांला भक्तीच्या गाभाऱ्यांत प्रवेश करतां येणार नाहीं. अंतःकरण सोंवळें असेल तर भक्तीच्या गाभाऱ्यांत आपणांला सहज प्रवेश मिळेल.

मला एक मजेशीर गोष्ट आठवली--

रामानंद नांवाचा पंडित कावेरी नदीच्या कांठावर सूर्याला अर्घ्य देत होता. जवळच एक चांभार चामडें धूत होता. त्या चामड्याचे थेंब पंडिताच्या अंगावर उडाले. पंडितानें संतापून त्या चांभाराला खूप शिव्या-दिल्या व म्हटलें--

" मला आतां पुन्हा स्नान करावें लागणार. "

चांभार म्हणाला--

" महाराज ! अपराधाची क्षमा करावी. चामड्याच्या थेंबापासून चामडें अपवित्र होत नाहीं. मात्र तुम्ही ज्या खूप शिव्या दिल्या त्याचे अपवित्र थेंब माझ्या अंगावर पडल्यामुळें मलाच आतां स्नान करावें लागणार ! "

असें म्हणतात कीं, ज्ञानेश्वरांनीं रेड्याच्या तोंडून वेद वदवले व भिंत चालवली. असल्या चमत्कारावर निंबाळचे संत रामभाऊ रानडे ह्यांचा प्रथम विश्वास होता, पण नंतर त्यांना आपल्या गुरूचें म्हणणें पटलें व वाटूं लागलें कीं, असल्या चमत्कारांवर विश्वास ठेवण्याचें कारण नाहीं.

मला वाटूं लागलें--

पुष्कळ लोक संतांचे चमत्कार पाहून त्यांना नमस्कार करतात; पण ही आंधळी भक्ति असून त्यामुळें आपला फायदा होत नाहीं. बुद्धिवादाला न पटणारे चमत्कार सोडून देऊन आपण संतांचें जीवन समजून घेऊं लागलों म्हणजे आपल्या जीवनांत सुखाचा सूर्य उगवतो.

मीं मनाशीं खूणगांठ बांधली कीं--

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ७४०६५ वि: निर्बंध
सं.क्र. ५९५८ नों. दि. ७/३/०९

**चमत्काराशिवाय नमस्कार हाच खरा भक्तीचा आविष्कार.**

ज्ञानदेवानंतर मी नामदेवांचा विचार करूं लागलों.

मला वाटूं लागलें—

जगांत पुष्कळ ग्रंथ आहेत, पण त्या सर्वांत उत्तम ग्रंथ म्हणजे माणूस. माणूस हा एक प्रचंड ग्रंथ आहे. लोकांना वाटतें—हा ग्रंथ आपल्याला "**थोडाफार**" समजतो; पण खरें सांगायचें म्हणजे लोकांना हा ग्रंथ "**फार थोडा**" समजतो.

नामदेवांनीं ज्ञानेश्वरांच्या समाधीचे जे अभंग केले आहेत ते माझ्या फार आवडीचे आहेत.

रडतांना आपणाला त्रास होतो; पण कांहीं रडणें असें असते कीं रडतांना देखील आपणाला बरें वाटतें. नामदेवांनीं केलेले समाधीचे अभंग म्हणतांना मला रडूं येतें व रडतां रडतां एक प्रकारचें सुख वाटतें.

मी अभंग म्हणूं लागलों--

**कासावीस प्राण मन तळमळी।**
**जैसी का मासोळी जीवनाविण ॥**
**दाही दिशा वोस वाटती उदास ॥**
**करिताती सोस मनामाजीं ॥**
**निवृत्तिदेव म्हणे करतां समाधान।**
**कांहीं केल्या मन राहात नाहीं ॥**
**बांधल्या तळयाचा फुटला असे पाट ।**
**ओघ बारा वाट मुरडताती ॥**
**बांधल्या पेंढीचा सुटलासे आळा।**
**तृण रानोमाळ पांगलेंसे ॥**
**हरिणीविण खोपी पाडियेली ओस।**
**दशदिशा पाडस भ्रमताती ॥**
**मायबापें जेव्हां त्यागियेलें आम्हां।**
**ऐसें संकट तेव्हां झालें नाहीं ॥**
**नामा म्हणे देवा पेटला हुताशन।**
**करा समाधान निवृत्तीचें ॥**

हे अभंग म्हणतां म्हणतां माझ्या डोळयांत पाणी आलें.

नामदेवांच्यानंतर मी एकनाथांच्याबद्दल विचार करूं लागलों. मला वाटूं लागलें—

माणूस विषारी वल्लीचें औषध करूं शकला, पण माणसाच्या मनांतील विष तो नाहींसें करूं शकला नाहीं.

मी एकदा पैठणला गेलों असतांना एकनाथ महाराजांनीं मला विशेष अनुभव दिला होता; व त्यावेळीं माझी खात्री झाली की पैठणला जाण्यांत फार फायदा आहे.

मी औरंगाबादला सेशन्स जज्ज असतांना एकदा एक हायकोर्ट जज्ज माझ्याकडे आले. ते आपल्या पत्नीला बरोबर घेऊन अजंठा व वेरूळ येथे जाऊन आले. त्यांनी मला विचारलें--

"आणखी कोठे जाऊं ?"

मीं म्हटलें—

"पैठणला जरूर जाऊन या."

त्यांना तो विचार पटला नाही, पण मी फारच आग्रह केल्यामुळ ते पत्नीला घेऊन पैठणला गेले.

संध्याकाळीं माझ्या बंगल्यावर आल्यावर त्यांची पत्नी मला म्हणाली,

"अहो ! नाथांची समाधी व नाथांचें घर पाहून ह्यांना अनुभव आला. त्यांच्या डोळयांतून कितीतरी वेळ अश्रू येत होते."

ते हायकोर्ट जज्ज मला म्हणाले—

"तुमचा मी आभारी आहें. पैठणला जो दिव्य अनुभव मला मिळाला तो कांहीं और होता. अजंठा व वेरूळ येथे जी कला आहे ती अप्रतिम आहे, पण पैठणला मला जो दिव्य अनुभव आला त्याची सर त्या कलेला येणार नाही."

वाणी, लेखणी आणि करणी अशा तिन्ही साधनांनी लोकांची आमरण सेवा करणारे व निर्गुण, निराकार परमेश्वराला सगुण, साकार मानवरूपांत पहाणारे एकनाथ महाराज लोकांना क्रांतिकारक उपदेश करतात की—

परमेश्वर समाजामध्येच आहे, मात्र तो पाहण्यासाठी अहंकार सोडला पाहिजे.

जनीं आहे जनार्दन ।
तया पहावया सांडी अभिमान ॥

नाथांच्यानंतर मी तुकारामांच्याबद्दल विचार करूं लागलों. तुकोबांना मी माउली समजतों. ह्या मातेबद्दल—ह्या माउलीबद्दल-मला फार आदर वाटतो. तुकोबांच्या सोशिकतेच्या कितीतरी गोष्टी मला आठवल्या.

एकदा तुकाराम रानांतून उसाची मोळी घेऊन येत होते. वाटेंत त्यांनी त्यांतले ऊस मुलांना वांटून टाकले, व ते घरीं फक्त एक ऊस घेऊन आले. त्यांच्या बायकोला फार राग आला. तिनें रागाच्या भरांत तो ऊस आपल्या नवऱ्याच्या पाठीवर मारला ! त्या उसाचे दोन तुकडे झाले !!

तुकोबा आपल्या पत्नीला म्हणाले—

" अग ! तुला लोक नांवें ठेवतात; पण तू फार प्रेमळ आहेस. मीं एकच ऊस आणला होता, पण तू दोन तुकडे केलेस—एक मला व एक तुला ! "

तुकोबांना समाजाने देखील फार छळलें, पण त्यांचा सोशिकपणा समुद्रा-एवढा अगाध होता.

तुकारामांच्यानंतर मी रामदासांचा विचार करूं लागलों. कांही लोक टीका करतात की—

रामदास कवि नव्हते हें सिद्ध करायला एवढा काथ्याकूट कशाला ? अहो, लग्नमंडपांतून पळून जातो तो कवि कसा असेल ? रामदास खरे कवि असते तर ते वधूसकट पळून गेले असते !!

दुसरे कांही लोक म्हणतात—

ज्ञानेश्वर काव्याचा महासागर आहे, तुकाराम कवित्वाची महानदी आहे, तर रामदास काव्याचा ओबडधोबड महातलाव आहे.

मला वाटूं लागलें—

मिळमिळीत अवघे टाकावें ।
उत्कट अन्य तेचि घ्यावें ॥

हा रामदासांचा खाक्या आहे. राममय झालेल्या समर्थांचा राम म्हणजे आत्माराम. ऑस्कर वाइल्डनें म्हटलें आहे की—

केवळ कलेच्या उपासनेनेच मनुष्य पूर्णत्वास पोचतो.

लोक कांहीही म्हणोत, पण मला वाटूं लागलें की--

चाफळ खोऱ्यांतील वारा प्यालेलें, प्रयत्नावर भर देणारें, आत्मप्रत्ययावर अधिष्ठित असलेलें, व

**प्रचितीविण जें बोलणें । तें वमनप्राय त्यागणें ॥**

हा महामंत्र असलेलें समर्थांचें काव्य जिवंत काव्य आहे.

**मनांत दिव्य विचार आल्याशिवाय दिव्य स्वप्न पडत नाही.** मला वाटलें, आज रात्रीं माझ्या मनांत बरेच दिव्य विचार आले आहेत. आतां दिव्य स्वप्न पडण्यास हरकत नाही. नेहमीच अंदाज खरे ठरत नसले तरी त्या रात्रीं माझा अंदाज खरा ठरला.

त्या रात्रीं श्यामसुंदर नयनमनोहर कृष्णाची मूर्ति माझ्या स्वप्नांत आली. कृष्णाच्या हातांत मंजुळ मुरली होती. देखावा रमणीय दिसत होता. माझा आनंद ओसंडून वाहत होता. आनंदानें मी नाचूं लागलों व कवि नसलों तरी माझ्या तोंडून उद्गार बाहेर पडले—

**हा कन्हय्या छेडी मंजूळ तान ।**
**त्या नादें घुमलें सारें रान ।**
**हरपली सर्वांची भूकतहान ।**
**कुणाला नुरलें भान ॥**
**धुंद झाल्या वृक्षवेली ।**
**पक्ष्यांचा नाच भोवताली ।**
**मोद देई ही कृष्णमुरली ।**
**म्हणे राम ॥**

एवढेंच काव्य म्हणून मी थांबलों नाहीं.

कृष्णाला पाहून माझ्या अंतःकरणांतील एक नाजुक कोपरा स्फुंदन करूं लागला व मी म्हणूं लागलों—

**सुखदुःखसंसारीं । देव धरावा अंतरीं ।**
**सारी चिंता हरी हरी । म्हणे राम ॥ १ ॥**
**गोड तुझें नाम । गोड तुझें धाम ।**
**गोड तुझें काम । म्हणे राम ॥ २ ॥**

देव माझा विचार। देव माझा उच्चार।
देव माझा आचार। म्हणे राम ॥ ३ ॥
संतांचा संग। नामामाजी दंग।
भेट पांडुरंग। म्हणे राम ॥ ३ ॥

थोडा वेळ मी थांबलों, आणि पुन्हा माझ्या तोंडून शब्द बाहेर पडूं लागले,

सद्गुणांचें करावें गान। नाहीं तेथे जातिधर्मा स्थान ।
लिंगाला वा वयाला नसे मान। म्हणे राम ॥ १ ॥
तोवरी वाजे सुखाचा ढोल। जोवरी न जाई मनाचा बोळ।
सुखी होण्या ध्यानीं धरा हा बोल। म्हणे राम ॥ २ ॥

कृष्णाची सुंदर मूर्ति माझ्यापुढें उभी होती. मी मोठ्या प्रेमानें कृष्णाला कांही प्रश्न विचारले.

कृष्ण म्हणाला--

"ओठांत पांडुरंग असून भागत नाहीं, तो अंतरंगांत असावा लागतो. देव देवळांत नाहीं, चर्चमध्यें नाहीं, तर तो प्रत्येकाच्या अंतःकरणांत आहे. चंद्राचा उदय झाल्यावर सागर आनंदाने बेहोष होतो. आकाशांत मेघांचा कटकडाट सुरू झाल्यावर मोर हर्षाने बेफाम नाचूं लागतो. सागर दिसल्यावर नदी कशी अधीरतेने धांवत येते. समुद्रामध्ये जी बेहोषता, मोरामध्ये जो बेफामपणा व नदीमध्ये जी अधीरता असते ती भक्तांत असते. अंतरंगांत वास करीत असलेल्या परमेश्वराची ओळख करून घेण्याकरतां तो अधीर झालेला असतो. त्या परमेश्वराचा साक्षात्कार झाला म्हणजे आनंदाने तो बेहोष होतो, हर्षानें बेफाम नाचूं लागतो व प्रेमानें म्हणूं लागतो कीं—

'अजि म्यां ब्रह्म पाहिलें.'

वीरवृत्तीबद्दल मी प्रश्न विचारल्यावर भगवान् म्हणाले—

"वीरवृत्ती वाढली पाहिजे; पण त्याचबरोबर वैरवृत्ती नाहीशी केली पाहिजे."

भक्तीबद्दलचे माझे प्रश्न ऐकून भगवान म्हणाले—

"आपल्या जीवनांत ज्ञान, कर्म व भक्ति ह्यांचा समन्वय झाला पाहिजे,

पण त्यामध्ये भक्तीला विशेष महत्त्व दिलें पाहिजे. भक्तीमुळे साऱ्या मानवजातीबद्दल आपलेपणा वाटूं लागतो व अंतरंगातून प्रेमाचे मधुर सूर निनादूं लागतात. भक्ति म्हणजे जीवनाचें जीवन व आनंदाचा कंद ! ज्याच्याजवळ भक्ति नाही तो वाळवंटांतील सुकलेल्या खोडाप्रमाणे असतो. संत म्हणजे भक्तीची सगुण साकार सजीव मूर्ति असतात. अखिल मानवजातीवर त्यांचें प्रेम असतें व हें विश्वचि माझें घर हा त्यांचा ध्यास असतो."

हे विचार ऐकून मी मंत्रमुग्ध होऊन गेलों व एकदम विचारलें—"देवा भक्तिमार्ग म्हणजे काय ?"

भगवान् हसून म्हणाले—

'समाजसेवेच्या गंधाक्षतांनी, सत्कर्मांच्या फुलांनी, अहंकारनाशाच्या धुपारतीनें अंतकरणांतील दिव्य शक्तीची केलेली पूजा म्हणजे भक्तिमार्ग.'

ही व्याख्या ऐकून मला फार आनंद झाला. वाङमयांत म्हटलें जातें की—"शृंगार हा रसांचा राजा आहे."

ह्या बाबतींत प्रश्न विचारल्यावर भगवान् म्हणाले—

शृंगाराला खूप मान आहे, यांत वाद नाही; पण रसांचा राजा शृंगार नसून शांतरस आहे."

ह्या उत्तराबद्दल मी विचार करीत असतांना एकदम गोपालकृष्णाची मूर्ति अदृश्य झाली, व अमेरिकेंत संचार करीत असलेले स्वामी विवेकानंद मला दिसूं लागले.

विवेकानंदांना आरंभीं खूप त्रास झाला, पण सर्वधर्मपरिषदेंत त्यांचें भाषण झाल्यावर त्यांचा जिकडे तिकडे खूप गाजावाजा झाला व त्यांना लोक खूप मान देऊं लागले.

एका खूप श्रीमंत गृहस्थाने त्यांना आपल्या घरीं बोलावलें व त्यांचें आदरातिथ्य केलें. विवेकानंद त्यांच्या घरीं राहत होते. ते तरुण होते, सुंदर होते व विद्वान होते.

त्या श्रीमंत गृहस्थाला एक मुलगी होती. ती दिसण्यांत अप्सरा होती. तिला वाटलें—

आपण विवेकानंदांच्या बरोबर लग्न करावें.

आजन्म ब्रह्मचारी राहण्याचा विवेकानंदांचा निश्चय होता.

एका रात्रीं ती मुलगी विवेकानंदांच्या खोलींत आली व म्हणाली—

" मी तुम्हाला एक विनंति करूं का ? "

" करा. "

" हें पहा, माझी अशी फार इच्छा आहे कीं मला तुमच्यासारखा मुलगा व्हावा. म्हणून तुम्ही माझ्याशीं लग्न करा. "

दुसरा एखादा मनुष्य असता तर ही विनंति ऐकून खूष झाला असता. त्याला अमाप पैसा मिळाला असता व नक्षत्रासारखी सुंदर बायको मिळाली असती.

जीवनांत खूप सौख्य मिळविण्याचा हा मार्ग चालून आला होता. विवेकानंद म्हणाले--

" तुमची एवढीच इच्छा आहे ना, कीं माझ्यासारखा मुलगा व्हावा ? "

ती स्त्री म्हणाली--

" होय. माझी तेवढीच इच्छा आहे. "

विवेकानंदांनीं पुन्हा तोच प्रश्न केला. ती स्त्री म्हणाली--

" होय स्वामीजी ! मला तुमच्यासारखा मुलगा व्हावा एवढीच एक माझी इच्छा आहे. "

विवेकानंद एकदम उठले. ते म्हणाले--

" तुझी इच्छा आत्ताच पूर्ण होईल. "

विवेकानंदांनी त्या स्त्रीला नमस्कार केला व म्हटलें--

" तूं माझी माता; मी तुझा मुलगा. "

तें दृश्य पाहून आनंदातिशयाने मी एकदम टाळ्या वाजवल्या. मी जागा झालों.

माझें स्वप्न संपलें होतें, पण त्याचा परिणाम अजून शिल्लक होता.

स्वर्गीय संगीत संपल्यावरहि मनावर त्याचा झालेला परिणाम कांहीं काळ मागें रेंगाळत राहतो.

त्या स्वप्नाच्या बाबतींत तसेंच झाले.

# स्वप्न चवथें

“ आज सकाळच्या डाकेला आपला लेख पोचला. आपला लेख वाचून पाहिला. मला अत्यंत आवडला. तो किती आवडला हें शब्दांनीं सांगणें शक्य नाहीं···माझीं स्वप्नें ही आपली लेखकाला मी प्रसादाकरितां आणि पुस्तक प्रकाशनाकरतां घेत आहें...मी जवळ जवळ मृत्यूचें आमंत्रण टाळून जगलों आहें. इतक्या पराकाष्ठेचीं दुखणीं येऊन गेलीं. आता मला जीवनांत उत्साह वाटू लागला आहे. आणि त्याच वेळीं “ माझीं स्वप्नें ” हा लेख मला वाचायला मिळाला हा एक आनंददायी योग आहे. ”

... २

'माझीं स्वप्नें' ह्या लेखमालेंतील पहिला लेख वाचून श्री. य. गो. जोशी, यांनीं जें पत्र मला पाठवलें त्यांतील हा उतारा आहे. पुढें ते वारले व दुसरा लेख त्यांना पहातां आला नाहीं ! असें व्हायला नको होतें ! पण--

होणं नी वाटणं ह्यांत जमीन-अस्मानाचं अंतर आहे.

ही लेखमाला सुरू झाल्यापासून वाचकांना कांहीं आगळं व वेगळं वाटत आहे. एक गृहस्थ म्हणतात--

"पँडोराची पेटी उघडली तेव्हां त्या पेटीमधून प्रथम सर्व दुःखें बाहेर पडलीं आणि सरतेशेवटीं आशा बाहेर आली. माझ्या जीवनांत अशींच खूप दुःखें आलीं. तुमची लेखमाला वाचूं लागल्यावर माझ्या जीवनांत मल आशा वाटूं लागली आहे."

दुसरे एक गृहस्थ म्हणतात—

बृहदारण्यकोपनिषदांत एक गोष्ट आहे. देव, असुर व मनुष्य प्रजापतीकडे गेले. प्रजापतीनें प्रत्येकाला उपदेश केला, तो म्हणजे

**द**

देवांनीं त्याचा अर्थ केला **दमन**

असुरांनीं अर्थ केला **दया**

व मनुष्यांनीं अर्थ केला **दान**

तुमचीं "माझीं स्वप्नें" ही लेखमाला वाचून मला वाटतें तुम्ही प्रत्येक वाचकाला उपदेश करतां तो म्हणजे—

**स्व**

माझ्यापुरता ह्या अक्षराचा मी अर्थ करतों--

स्वतःला सुधार.

तिसरे एक गृहस्थ म्हणतात--

स्वामी रामतीर्थांनीं एक व्याख्यानांत सांगितलें कीं, सर्वांत उत्तम पदार्थ म्हणजे स्वप्न. आपलीं "माझीं स्वप्नें" ही लेखकाला फार चविष्ट आहे. आम्हांला पंच-पक्वान्नांची मेजवानी मिळत आहे. जीवनांत आनंदाचे क्षण दिसत आहेत. कृपा करून जास्तींत जास्त स्वप्नें प्रसिद्ध करा.

पैशाचें दान करण्यांत जो आनंद आहे त्यापेक्षा अनुभवाचें दान करण्यांत

अधिक आनंद आहे. ह्या लेखमालेमुळें वाचकांच्या जीवनांत आशा व आनंद निर्माण होत असतील तर ती श्रीकृष्णाचीच कृपा.

एक गुह्य गोष्ट अशी आहे कीं, श्रीकृष्ण स्वप्नांत यावा असें वाटत असेल तर ज्ञानेश्वरी व गीता ह्यांबद्दल खूप मनन करणें. जेव्हां ज्ञानेश्वरीबद्दल मी विचार करतों तेव्हा मला वाटतं--

वाङ्मयांत ध्वनी थोडे, प्रतिध्वनि फार; थोड्या ध्वनींपैकी ज्ञानेश्वरी फार उत्तम ध्वनी.

त्या दिवशीं हरिभाऊ आपटे ह्यांच्या जन्मशताब्दीबद्दल उत्सव सुरू होता. रात्रीं माझ्या मनांत विचार आला--

मराठी साहित्य पद्याच्या प्रांतांतून प्रवास करत असतांना साहित्यदेवीला पडलेलें भव्य, रम्य व दिव्य स्वप्न म्हणज संत ज्ञानेश्वर; आणि मराठी साहित्य गद्याच्या प्रांतांतून प्रवास करूं लागल्यावर साहित्यदेवीला पडलेलें सुंदर, मधुर व मनोहर स्वप्न म्हणजे हरिभाऊ आपटे–

लोक म्हणतात--

ज्ञानदेव ज्ञानदेव म्हणता म्हणता ज्ञान देव देतो.

मला वाटते--

ज्ञानदेव ज्ञानदेव म्हणता म्हणता श्रीकृष्ण स्वप्नांत येतो.

भक्तीचा विचार, ज्ञानाचा उच्चार व कर्माचा आचार म्हणजे ज्ञानेश्वर.

लोकांना वाटतें--

चौपाटीवर भेळ खाण्यांत फार मजा आहे.

मला वाटतें--

चौपाटीवर भेळ खाण्यांत जी मजा आहे त्यापेक्षा परमार्थाच्या प्रांगणांत संतांचे बोल समजून घेण्यांत अधिक मजा आहे.

दिव्य स्वप्न पडण्याकरता ध्यान करणें हें उत्कृष्ट साधन आहे.

पावसाळ्याचे दिवस आहेत. पहाट झाली आहे. आकाशांत मळभ दाटून आलें आहे. बाहेर पावसाची गोड कुरबूर चालू आहे. थंडगार वारे अंगाशीं झोंबी खेळत आहेत. अशा वेळीं पांघरुण घेऊन झोपण्यांत जी मौज आहे त्यापेक्षा भक्तीचा पाऊस पडूं लागल्यानंतर अंतरंगांतील देवाच्या सान्निध्यांत

ध्यान करण्यामध्ये अविक मौज आहे.

दिव्य स्वप्न पडण्याकरता ज्याप्रमाणे कांही सावनें आहेत त्याप्रमाणें कांही पथ्यें देखील आहेत. एक पथ्य असें की जरी दुसऱ्यांनी आपली चेष्टा अगर निंदा केली तरी आपण चिडायचें नाहीं.

चिडण्याने मनःशांति विघडते व दिव्य स्वप्न पडण्याच्या वावतींत आडकाठी येते.

दुसऱ्यानें चेष्टा केली तर आपण चिडायच्या ऐवजी असें कांहीं बोलावें की त्याचा शेवट हास्यांत व्हावा व दुसऱ्यानें फेकलेला चेष्टेचा रंग उलटून त्याच्याच अंगावर पडावा.

एकदा हरिभाऊ आपटे ह्यांचें डोकें फार दुखत होतें. कांहीं केल्या बरें वाटेना. एका मनुष्यास त्यांची चेष्टा करण्याची लहर आली. तो हरिभाऊंना म्हणाला—

" हें पहा, गाढवाच्या पायां पडा म्हणजे डोकें थांवेल. "

अजिवात न रागवतां हरिभाऊ म्हणाले—

" वा ! फारच छान ! किती उत्तम उपाय सांगितला तुम्ही ! करा पाय पुढे. पडतों तुमच्या पायां. "

दिव्य स्वप्न पडावें अशी इच्छा असेल तर आपण दुसऱ्याची निंदा करतां कामा नये. केव्हा केव्हा असें होतें कीं, आपण दुसऱ्याची निंदा केली तर दुसरा आपली सवाई निंदा करूं शकतो.

एवढा मोठा बादशहा अल हरून ! पण त्याला दुसऱ्याची निंदा करण्याची हौस होती.

एकदा बादशहा रस्त्यानें चालला होता. तिकडून एक चकणा येत होता. बादशहा म्हणाला—

" काय रे चकण्या ! तुला एकाच्या दोन वस्तु दिसतात का ? "

चकणा म्हणाला—

" होय खाविंद. आत्ताच पहाना. तुम्हाला दोन पाय आहेत, पण मला दिसतें आहे की तुम्हाला चार पाय आहेत. "

अशा तऱ्हेचीं पथ्यें कसोशीनें पाळून व शक्य तीं साधनें अंमलांत आणून

देखील मला अनुभव येतो की—

दिव्य स्वप्न रोज पडत नाही.

आपण शक्य तितका प्रयत्न करावयाचा व त्यामुळे असा अनुभव येतो की केव्हा केव्हा दिव्य स्वप्न पडतें व खूप आनंद होतो.

लागोपाठ बरेच दिवस मी प्रयत्न करत होतों. त्या रात्रीं इंग्लिश विचारवंतांचे विचार वाचत होतों.

ॲडिसननें म्हटलें आहे—

Life is half spent, before we know what it is.

( जीवन काय आहे हें समजण्यापूर्वीच अर्धे जीवन संपतें. )

मॅकिव्हेली ह्यानें म्हटलें आहे—

The world takes you to be what you seem;
few know what you are.

( तूं जसा दिसतोस तसें जग तुला मानतें. तूं खरोखर कसा आहेस हें फारच थोडे लोक जाणतात. )

ब्लेक ह्यानें म्हटलें आहे—

The greatest lesson of life is to learn not to do
What one likes, but to like what one does;

( जीवनाचा सर्वांत मोठा धडा म्हणजे जें जें आवडेल तें करणें हें शिकणें नसून, जें आपण करूं तें आवडणें हें शिकणें होय. )

यंगनें म्हटलें आहे—

Do not go into the world to conquer but go out meaning to learn.

(जग जिंकण्याकरता जाऊं नको तर त्यापासून शिकण्याकरता जा.)

बोव्ही ह्याने म्हटलें आहे—

Discretion is the salt and fancy the sugar of life. The one preserves and the other sweetens it.

(तारतम्य जीवनाचें मीठ आहे, तर कल्पना जीवनाची साखर आहे. पहिलें टिकाऊपणा देतें, तर दुसरी जीवनाला मधुरता आणते.)

त्या रात्रीं माझ्या स्वप्नांत गोपालकृष्ण आले. मीं एकदम मनांत म्हटलें—

का तीर्थे जियें त्रिभुवनी । तियें घडती समुद्रावधानीं ॥
ना तरी अमृतरसास्वादनीं । रस सकळ ॥

समुद्रस्नानानें त्रैलोक्यांतल्या सगळ्या तीर्थांचें स्नान घडतें, किंवा अमृतरसाच्या सेवनाने साऱ्या रसांचें सेवन घडतें, त्याप्रमाणें गोपालकृष्णाच्या दर्शनाने साऱ्या सुखांचें दर्शन घडतें.

माझ्या मनांत कांही प्रश्न घोळत होते. ध्येयाबद्दल प्रश्न विचारल्यावर गोपालकृष्ण म्हणाले—

" शेतकरी उंच उंच आकाशाकडे पहातो, पण त्याचे पाय जमिनीवर असतात. माणसाने आपल्या ध्येयाचें मंदिर आकाशांत उंच उंच बांधावें, पण त्या मंदिराचा पाया व्यवहाराच्या जमिनींत पक्का केलेला असावा."

सौंदर्याबद्दल प्रश्न विचारल्यावर गोपालकृष्ण म्हणाले—

"बाह्य सौंदर्य हें ज्यांचें भांडवल आहे त्यांची वृद्धावस्था शोकांतिका असते; आणि आंतरिक सौन्दर्य हें ज्यांचें भांडवल असतें त्यांची वृद्धावस्था सुखांतिका असते."

संतुष्टपणाबद्दल प्रश्न विचारल्यावर गोपालकृष्ण म्हणाले--

" जीवनांत जे संतुष्ट असतात व ज्यांना ध्येय असत नाही अशा लोकांना जगाची प्रगती करतां येत नाही. जीवनांत जे असंतुष्ट असतात व ज्यांना उच्च ध्येय असतें असे लोक जगाची प्रगती करूं शकतात."

शक्तीबद्दल प्रश्न केल्यावर गोपालकृष्ण म्हणाले--

" जगांत दोन शक्ति आहेत : (१) शब्दशक्ति, व (२) शस्त्रशक्ति. अंतरंगांतील परमात्मा बोलूं लागला म्हणजे शब्दांना शक्ति येते. अशी शब्दशक्ति व शस्त्रशक्ति एकत्र आली म्हणजें कल्याणाची प्रभा फाकते."

प्रपंचाबद्दल प्रश्न केल्यावर भगवान् गोपालकृष्ण म्हणाले--

" प्रपंच सोडन परमार्थ करण्यापेक्षा प्रपंच असा करावा की प्रपंचच परमार्थ व्हावा."

आणखी कांहीं प्रश्न विचारल्यावर गोपालकृष्ण म्हणाले--

" नुसतें पाठ करण्याने किंवा बोलण्याने उपयोग होत नाहीं. तें अंगीं बाणलें पाहिजे. तबल्याचे बोल तोंडपाठ म्हणून दाखवणें सोपें आहे, पण ते

प्रत्यक्ष वाजवून दाखवणें कठीण आहे.. ज्यांना सुखाच्या गुलाबाचें फूल पाहिजे असेल त्यांनी गुलाबाच्या कांट्याचें दुःख भोगण्यास तयार असलें पाहिजे "...

माणसाबद्दल प्रश्न विचारल्यावर गोपालकृष्ण म्हणाले--

जगांत पुष्कळ ग्रंथ आहेत, पण त्या सर्वांत उत्कृष्ट ग्रंथ म्हणजे माणूस जगांत पुष्कळ आश्चर्यें आहेत पण त्या सर्वांत मोठें आश्चर्य म्हणजे माणसालाच माणूस ग्रंथ नीट समजला नाहीं. ह्या ग्रंथाचीं पानें आहेत सुख-दुःखांचीं, अक्षरें आहेत विचारां-विकारांचीं व ज्या शाईने तीं अक्षरें छापलीं आहेत ती शाई आहे सुष्टपणा व दुष्टपणा ह्यांचें मिश्रण असलेली. "

स्वर्गीय संगीत ऐकून मनुष्य डोलूं लागावा त्याप्रमाणे हीं उत्तरें ऐकून मी आनंदानें डोलूं लागलों.

मला वाटूं लागलें--

स्वप्नांत कां होईना, पण देव आला म्हणजे निराश मनाचे देखील पंख फडफडूं लागतात; विचारांना शक्ति येते, जीवनाला गोडी येते; गगनींचा नीलिमा बोलूं लागतो; बंधनाची भाषा मुक्त होते; फुलांचा गंध प्रेमाचा सुगंध देतो व जीवनाचे सप्त रंग अनंत रंगांत विलीन होतात.

गोपालकृष्णाला मोठ्या प्रेमाने नमस्कार करून मीं म्हटलें--

"देवा ! गीतेंत तूं ज्ञान, कर्म व भक्ति ह्यांचा समन्वय केला आहेस, पण असा समन्वय करतांना तूं भक्तीला सर्वांत जास्त महत्त्व दिलें आहेस. अकराव्या अध्यायांत तूं विश्वरूप दाखवलेंस व अर्जुनाला म्हणालास--

"वेदानें, तपश्चर्येनें, दानानें किंवा यज्ञाने असें रूप दिसणें शक्य नाहीं. अनन्य भक्तीनें मात्र हें शक्य आहे.

"अठराव्या अध्यायांत शेवटीं तूं गुह्यांतलें गुह्य अर्जुनाला सांगितलेंस व त्यामध्यें देखील भक्तियोगच सांगितलास.

"देवा ! तूं भक्तीवर इतका जोर कां दिलास ? "

माझा हा प्रश्न ऐकून भगवान गोपालकृष्ण म्हणाले--

"चांगला प्रश्न विचारलास. अरे ! तुला शरच्चंद्रांची गोष्ट माहीत आहे ना ? "

गोपालकृष्णांची मूर्ति अदृश्य होऊन माझ्या डोळ्यांपुढें निराळें दृश्य दिसूं लागलें.

शरच्चंद्रांना दारूचा फार नाद होता. दारू पिणें वाईट आहे, दारू सोडली पाहिजे हें त्यांना ज्ञात होतें. पण दारू सुटत नव्हती. दारू सुटण्याकरितां ते कर्म देखील करीत होते, पण दारू सुटत नव्हती. त्यांचें कर्म मोठें और होतें.

दारू सुटण्याकरितां ते एक प्रयोग करीत असत.

आज सबंध ग्लास दारू घेणें, उद्या पाऊण ग्लास घेणें, परवां अर्धा ग्लास दारू घेणें, तेरवां पाव ग्लास दारू घेणें, ह्याप्रमाणें दारू कमी कमी करण्याचा त्यांचा प्रयोग होता. पाव ग्लास दारू घेतल्यानंतर दारू अजिबात न घेणें हें खरें पर्यवसान होतें; पण शरच्चंद्रांना अनुभव आला कीं---

पाव ग्लासपर्यंत दारू कमी करत आल्यानंतर दुसरे दिवशीं ते पुन्हां सबंध ग्लास दारू घेत असत.

ज्ञान असून व कर्म करून देखील शरदच्चंद्रांना दारूचा नाद सुटेना. शेवटीं ते आपले गुरु रामकृष्ण परमहंस ह्यांच्याकडे गेले.

शरच्चंद्रांची हांक ऐकून रामकृष्ण म्हणाले—

" अरे ! तूं खुशाल दारू पी ! मात्र दारू पिण्यापूर्वी ती मला अर्पण कर म्हणजे झालें. "

चरच्चंद्रांना वाटलें—

गुरु किती छान आहेत ! आतां आपणाला खुशाल दारू प्यायला हरकत नाहीं. गुरूंना दारू अर्पण केली म्हणजे सारें पातक नाहीसें होईल.

ते मोठ्या आनंदानें घरीं गेले.

जेव्हा दारू पिण्याची वेळ झाली तेव्हां त्यांनीं ग्लास दारूनें भरला. दारू पिण्यापूर्वी गुरूंना अर्पण करणें जरूर होतें. शरच्चंद्रांच्या मनांत विचार आला—

माझी गुरुमाउली किती दयाळू, प्रेमाळू आहे ! ते मला आईप्रमाणें, मातेप्रमाणें, माउलीप्रमाणें आहेत. त्यांना पापाचा गंध नाहीं. वाईट आचार तर राहोच, पण वाईट विचाराला देखील ते शिवत नाहींत……

अशा माझ्या गुरुमाउलीला असली घाण, वाईट, अमंगळ दारू अर्पण करूं ? इतकें वाईट काम मी करूं ? ......

त्यापेक्षा मींच दारू सोडलेली काय वाईट ? ......

हा विचार इतका प्रभावी झाला कीं, शरच्चंद्रांनीं दारूनें भरलेला ग्लास जोरानें फेंकला. ग्लास फुटला; आणि त्यांचा दारूचा नाद सुटला.

हें दृश्य पाहून माझी खात्री झाली कीं, देवानें भक्तीवर जास्त जोर दिला आहे तें अगदीं योग्य आहे.

पुन्हां मला गोपालकृष्ण दिसूं लागले. मीं देवाला म्हटलें—

"देवा ! तुझें तत्त्वज्ञान मीं खूप वाचलें आहे. ह्या तत्त्वज्ञानांत असें आहे कीं, माणसाच्या अंतःकरणांत दिव्य शक्ति वास करत असते. आपण जेव्हां स्वतःसाठीं कांहीं काम करतों तेव्हां प्रकार वेगळा असतो. अशा वेळीं दिव्य शक्तीचा साक्षात्कार होत नाहीं; पण जेव्हां आपण देवाला स्मरून दुसऱ्यासाठीं कांहीं काम करूं लागतों तेव्हां आपल्या अंगीं दिव्य शक्तींचा संचार होतो. हें असें कसें ?"

गोपाळकृष्ण हंसून म्हणाले,

"अरे ! तुझ्या लहानपणची शंकरशेटची गोष्ट तुला आठवत नाहीं का ? तुझ्या जीवनांतील तो अविस्मरणीय प्रसंग नाहीं का ?"

मला एकदम तो प्रसंग दिसूं लागला.

मी त्या वेळीं हायस्कुलांत जात होतों. तात्यांना–माझ्या वडिलांना– फार वाटायचें कीं, मॅट्रिक परिक्षेंत मी शंकरशेट यावें.

त्या वेळीं कर्नाटकचे चार जिल्हे व गुजराथ मुंबई प्रांतांत होते. साऱ्या मुंबई प्रांतांत संस्कृत विषयांत मॅट्रिकच्या परीक्षेंत जो पहिला नंबर येईल त्याला पहिली शंकरशेटची शिष्यवृत्ति मिळावयाची व जो दुसरा येईल त्याला दुसरी शंकरशेट शिष्यवृत्ति मिळावयाची. सांगलीला मी सिटी हायस्कूलमध्यें जात असें. सरकारी हायस्कूलचा लौकिक मोठा असे. कारण त्या शाळेंतून शंकरशेटची शिष्यवृत्ति मिळविण्याचा मान पूर्वी मिळाला होता. सिटी हायस्कूलला हा मान अद्याप मिळाला नव्हता.

सांगलीला पाटीलशास्त्री शंकरशेटचा क्लास घेत असत. त्यांच्या क्लासांत

मी व काळे असे सिटी हायस्कूलचे दोघे विद्यार्थी व देसाई, पालकर व गाडगीळ असे सरकारी हायस्कूलचे तीन विद्यार्थी जात असूं.

पाटीलशास्त्री वरचेवर आम्हांला पेपर घालत व प्रत्येक खेपेस वेगवेगळ्या तज्ज्ञांकडून ते तपासून घेत. प्रत्येक खेपेस देसाई पहिला व मी दुसरा येत असें.

एकदा संध्याकाळीं तात्या फिरायला गेले होते. वाटेंत कांहीं मुलें आपसांत बोलत होतीं.

सिटी हायस्कूलचा एक विद्यार्थी म्हणाला—

" यंदां आमचा रानडे शंकरशेट येणार ! "

लगेच हायस्कूलचा विद्यार्थी म्हणाला--

" अरे, तोंड बघ तुझ्या त्या रानड्याचं ! आमचा देसाई यंदा शंकरशेट येणार ! "

हा संवाद ऐकून तात्यांना फार वाईट वाटलें. घरीं आल्यावर ते देवघरांत गेले. त्यांनी देवाची खूप विनवणी केली. त्यांच्या डोळ्यांत पाणी आलें. ते ते म्हणाले—

" देवा ! माझ्या रामला शंकरशेट आण ! "

तात्यांनी विनवणी केली खरी, पण साऱ्या मुंबई प्रांतांत संस्कृतमध्यें पहिला येणें कठीण होतें. एका सांगली शहरांत देखील मी पहिला येत नव्हतों, तर साऱ्या मुंबई प्रांतांत पहिला कसा येणार ?

मी खूप प्रयत्न करत होतों, पण प्रत्येक पेपरांत देसाई पहिला व मी दुसरा येत होतों.

इतक्यांत माझी आई फार आजारी पडली. ती जगते कीं मरते असा प्रसंग येऊन ठेपला. मला कांहीं सुचेना.

एका रात्रीं मी माजघरांत झोपलों होतों. कॉटवर आई होती. मध्यरात्रीं मी जागा झालों. आई व तात्या बोलत होते.

आई म्हणाली—

" मला आता हें दुखणें सहन होत नाहीं. देवा ! मला तुझ्याकडे ने. नेशील ना लवकर ? "

तात्या आईला म्हणाले--

" अग ! थोडा दम धर. आपला राम शंकरशेट आला म्हणजे मग मर. तोपर्यंत दम धर ! "

आई म्हणाली--

" माझी देखील फार इच्छा आहे कीं--रामला शंकरशेट आलेलं पहावं आणि मग मरावं ! "

मला एकदम रडूं आलें. मी डोक्यावरून पांघरूण घेतलें व मनसोक्त रडलों.

सकाळीं उठून देवघरांत गेलों. गोपाळकृष्णाच्या पायां पडलों व म्हटलें-

" मला मान मिळावा म्हणून शंकरशेट होण्याचा मी आजपत प्रयत्न करत होतों. तो विचार आतां गेला. माझ्या आईची शेवटची इच्छा पुरी करण्याकरतांच मी आतां प्रयत्न करणार. कृपा करून तूं मला मदतीचा हात दे. "

त्या दिवसापासून रोज देवाला नमस्कार करून मी अभ्यास करूं लागलों. कांहीं तरी अद्‌भुत शक्ति माझ्या अंगांत संचरली आहे असें मला वाटूं लागलें.

ज्या दिवशीं मॅट्रिकच्या परीक्षेंत संस्कृतचा पेपर होता तो दिवस माझ्या पत्रिकेंत घातवार होता.

देवाला नि आईला नमस्कार करून मी परीक्षेला गेलों.

आजपर्यंत मी खूप पेपर लिहिले आहेत. त्या दिवशीं मला वेगळाच अनुभव येत होता. संस्कृतचा पेपर लिहितांना माझ्या डोळ्यांपुढें आई दिसत होती व माझ्या डोळ्यांत पाणी येत होतें. पेपर लिहितांना मी म्हणत होतों

" आई ! हा तुझा पेपर ! "

पेपर देऊन घराकडे आलों. आईला नमस्कार केला व म्हटलें-

" आई ! तुझा पेपर देऊन आलों. "

आईनें आपला क्षीण हात माझ्या पाठीवरून फिरवला व म्हटलें—

" बाळ ! औक्षवंत हो ! "

मॅट्रिकचा निकाल लागला आणि जाहीर झालें कीं--

शंभरपैकी ब्याण्णव मार्क पडून सिटी हायस्कूलचा रानडे पहिला

शंकरशेट व शंभरपैकी एकुणनव्वद मार्क पडून सरकारी हायस्कूलचा देसाई दुसरा शंकरशेट. असेंही जाहीर झालें कीं—

सिटी हायस्कूलचा रानडे सांगली सेंटरला पहिला आला असून साऱ्या विषयांत अखिल मुंबई प्रांतांत तिसरा आला आहे.

सिटी हायस्कूलचे मास्तर व विद्यार्थी ह्यांचा आनंद गगनांत मावेना. शाळेला सुट्टी देण्यांत आली. मास्तर व विद्यार्थी माझ्याकडे आले व माझें अभिनंदन करूं लागले.

लोक गेल्यावर मला एकदम रडूं येऊं लागलें. मी देवघरांत गेलों, देवाच्या पायां पडलों व म्हटलें---

" देवा ! मी शंकरशेट येईपर्यंत जीव मुठींत धरून आई जगली आहे. आतां ती मला सोडून जाणार का रे ? देवा ! कृपा कर. आईला आणखी आयुष्य दे ! "

आई आतां मला सोडून जाणार ह्या विचाराने मला रडें आवरेना.

मी आईला नमस्कार केला व रडत रडत म्हटलें---

" आई ! तुझ्या आशीर्वादाने मी शंकरशेट आलों. आता मला सोडून तूं जाऊं नकोस ग ! "

मी एकदम जागा झालों. माझ्या जीवनांतील तो प्रसंग पाहिल्यामुळें माझे डोळे पाणावले.

नामदेवांच्या भाषेंत मी म्हणूं लागलों–

बांधल्या तळ्याचा फुटलासे पाट ।
ओघ बारा वाट मुरडताती ॥
बांधल्या पेंढीचा सुटलासे आळा ।
तृण रानोमाळा पांगतसे ॥
हरिणीवीण खोप पडियेली ओस ।
दशदिशा पाडस भ्रमताती ॥

* * *

REFBK-0015196

# स्वप्न पांचवें

माझीं स्वप्नें ही लेखमाला सुरू झाल्यापासून माझ्यावर पत्रांचा पाऊस पडत आहे, लोक अभिनंदनाचा वर्षाव करीत आहेत. एक गृहस्थ म्हणतात की, या लेखमालेमुळें मला जीवनांत अतोनात फायदा होत आहे.

दुसरे गृहस्थ म्हणतात—

आपण एकाच वेळीं दुहेरी कार्य करीत आहां. ज्वारीबरोबर तुरी पेरावी तसा प्रकार होत आहे.

कितीतरी लोकांनी मला चिंतेबद्दल रामबाण उपाय विचारला आहे.

एक गोष्ट खरी आहे कीं—

' चितेपेक्षा चिंता जास्त त्रास देते. '

कवि लोकांनी ह्यावर रामबाण उपाय म्हणून " चिंतामणि " शोधून काढला; पण—

चिंतामणि काल्पनिक आहे. जगांत तो कुणाहि जवळ नाहीं.

खूप लोकांनी मला पत्रें पाठवून चिंतेपासून सुटका करून घेण्याकरतां शास्त्रशुद्ध उपाय सांगण्याकरतां विनंती केली आहे.

रात्रीं मी अंथरुणावर पडलों असतांना ह्या लोकांच्या पत्रांतील विचार शिमग्याचें पोस्त मागणाऱ्या लोकांप्रमाणें माझ्या मनांत गर्दी करूं लागले. मला केव्हां झोप लागली कुणास ठाऊक, पण स्वप्नांत मी चिंतेनें व्याकुळ झालों होतों. माझीं गात्रें शिथिल झालीं होतीं, शरीराला कंप सुटला होता, देहावर रोमांच उभे राहिले होते, हातांतलें सारें बळ गळून पडलें होतें, त्वचेचा दाह होत होता; माझे पाय लटपटत होते, आणि माझें मन भ्रमण करीत होतें !

माझ्या समोर कृष्णाची मूर्ति उभी होती !

मीं कृष्णाला म्हटलें—

" देवा, चिंतेमुळे मी कासावीस झालों. कांही करूं नये असें मला वाटतें. जगून तरी काय करावयाचें आहे, असें मला वाटूं लागलें आहे. सुखी होण्याची माझी आशा मावळली आहे ! मला हा त्रास सहन होत नाहीं. मरण आलें तर बरें. देवा, मी तुला सर्वभावें करून शरण आलों आहें. तूंच माझा पिता, तूंच माझी माता आणि तूंच माझी इष्ट देवता ! मला चिंतारूपी सर्प चावला आहे. त्या सर्पाचें विष उतरविणारा तूंच खरा गारुडी आहेस ! "

मला कृष्णानें जो उपदेश केला तो ऐकून माझें साता जन्मांचें पुण्य फळाला आलें, असें मला वाटलें. कृष्णाकडून मीं

चिंता गीता

ऐकली. चिंतेबद्दल जगांत जीं तत्वज्ञानें आहेत त्या जणू कांही गायी आहेत व त्या गायींचें दूध काढणारा गोपालकृष्ण आहे. त्या गायींचें वासरू

मी आहें व कृष्णानें जें दूध काढलें तें म्हणजे चिंतागीता असें मला वाटूं लागलें.

गोपालकृष्ण म्हणाले :—

" चिंता नाहीशी करण्याकरतां कांहीं तरी भ्रामक उपाय करण्यापेक्षा मानसशास्त्राच्या मुशींतून तावूनसुलाखून निघालेले शास्त्रशुद्ध उपाय आचरणें श्रेयस्कर आहे. जेव्हां चिंता निर्माण होईल तेव्हां जास्तींत जास्त काय वाईट होईल तें अजमावावें व तें स्वीकारण्याची मनानें तयारी करावी. अशी तयारी झाल्यानंतर वाईट गोष्ट होऊं न देण्याची जास्तींत जास्त खटपट करावी; म्हणजे अग्नीपुढें बर्फ वितळावें त्याप्रमाणें चिंता वितळून जाते."

गोपालकृष्ण पुढें म्हणाले—

" कितीतरी लोक भूतकाळच्या चिंतेमुळे ग्रासलेले असतात, तर कितीतरी लोक भविष्यकाळाच्या चिंतेमुळे त्रस्त असतात. ह्या बाबतींत आपण असें लक्षांत ठेवावें कीं भूतकाळ संपलेला असतो; तो पुन्हां परत येत नाहीं. आपण जास्तींत जास्त काळजी वर्तमान काळाबद्दल घ्यावी. प्रत्येक उगवलेला दिवस पुनर्जन्म आहे असें समजून त्याचा जास्तींत जास्त उपयोग करून घेण्याचा प्रयत्न करावा. ' आज ' चांगला गेला म्हणजे, उद्यां तोच ' काल ' होतो व ' काल ' देखील चांगला होतो. आपण जास्तींत जास्त महत्त्व ' आज ' ला द्यावें म्हणजे ' काल 'ची व ' उद्या' ची फिकीर करण्याचें कारण पडत नाहीं.

" चिंता दूर करण्याकरतां रस्किन्नें आपल्या टेबलावर एक छोटा धोंडा ठेवला होता व त्यावर ' आज ' हा शब्द कोरलेला होता,

" चिंता नाहींशीं करण्याकरतां आपण आपल्या खोलींत पाटी लावावी.

आज

' आज ' चांगला गेला म्हणजे ' काल ' सुखाचें स्वप्न ठरतो व ' उद्या ' आशेची पहाट होतो."

मीं विचारलें—

" देवा, चिंता नाहींशी करण्याकरतां स्वस्तांतलें स्वस्त औषध कोणतें ?"

गोपालकृष्ण म्हणाले—

" स्वस्तांतलें स्वस्त औषध म्हणजे मनाला कामांत गुंतवून ठेवणें. मंडालेच्या तुरुंगांत लोकमान्य टिळकांना चिंता उत्पन्न झाली तेव्हां त्यांनीं गीतारहस्य लिहिणाच्या कामांत मन गुंतवून टाकलें. ह्यामुळें त्यांची चिंता कोठच्या कोठे पळून गेली. चर्चिलला दुसऱ्या महायुद्धांत विचारण्यांत आलें—

" तुमच्यापुढें केवढी मोठी चिंता आहे ? "

चर्चिलनें उत्तर दिलें—

" मी कामांत इतका गढून गेलों आहें कीं, मला चिंता करायला फुरसतच नाहीं. "

" लॉंगफेलोची बायको त्याच्यादेखत कपडे पेटून भाजून मेली. लॉंगफेलो चिंतेनें वेडा झाला; पण त्याचीं मुलें रडूं लागली तेव्हां तो आपल्या मुलांची माता झाला व कामांत इतका गढून गेला कीं त्याला चिंता करायला फुरसतच मिळेना !

" टेनिसन्चा जिवलग दोस्त आर्थर हॅलम् मरण पावला तेव्हां टेनिसन्नें म्हटलें—

" आतां मला कामामधें जास्तींत जास्त गढून जावें लागणार, नाहींतर चिंतेमुळें मी वेडा होईन "

" सृष्टिदेवीला पोकळी सहन होत नाहीं. आपण कामांत नसलों म्हणजे चिंतेचें भूत थैमान घालतें. आपण चांगल्या कामांत गढून गेलों म्हणजे मनाच्या दारावर पाटी लावली जाते

**' आंत येण्यास मनाई आहे ! '**

" आणि ती पाटी पाहून बिचारी चिंता बाहेरच राहते.

" तुला आतां समजून आलें असेल कीं,

" चिंतारोगावर स्वस्तांतलें स्वस्त औषध म्हणजे मनाला चांगल्या कामांत गंतवून ठेवणें. "

मी आणखी प्रश्न विचारल्यार गोपालकृष्ण म्हणाले—

" आपल्या बहुसंख्य चिंता काल्पनिक असतात. प्रत्यक्षांत त्या येतच नाहीत; पण अमुक अमुक होईल ह्या केवळ कल्पनेनें आपण भिऊन जातों

व नसती चिंता करतों. जरा कुठें डोकें दुखूं लागलें म्हणजे कितीतरी लोक 'मला ब्लड प्रेशर झालें असेल.' ' ह्या काल्पनिक भीतीमुळेंच चिंता-ग्रस्त होतात व अत्यंत दुःखीकष्टी होतात.

" निर्णय करण्यांत घिसाडघाई केली म्हणजे नसती काळजी निर्माण होते व आपणांला दुःखाचे काटे टोचूं लागतात.

" जरूर त्या सर्व गोष्टी माहीत करून घेऊन, सारासार विचार करून, शांत मनानें आपण निर्णय करूं लागलों व त्याप्रमाणें वागूं लागलों म्हणजे आपल्या पुष्कळशा चिंता निघून जातात.

" स्वतःकडे त्रयस्थपणानें पाहण्यास शिकणें हा चिंतानाशाचा महत्त्वाचा उपाय आहे.

" मनुष्यस्वभाव असा आहे कीं, तो किरकोळ गोष्टींचा फार बाऊ करतो, स्वतःला दुःखीकष्टी करून घेतो. तो जर स्वतःकडे त्रयस्थपणानें पाहण्यास शिकला तर त्याच्या कितीतरी काळज्या आपोआप दूर होतात.

" कायद्यांत एक सुंदर तत्त्व आहे—

'De minimis non curat Rex'

" कायदा किरकोळ गोष्टींना किंमत देत नाहीं.

" तूंहि किरकोळ गोष्टींना किंमत देऊं नकोस म्हणजे तुझ्या बऱ्याचशा चिंता पळून जातील."

कांहीं कांहीं गोष्टी आपल्या हातांत असत नाहींत, त्याबद्दल प्रश्न विचारल्यावर गोपालकृष्ण म्हणाले—

" अरे, ज्या गोष्टी आपल्या हातांत नाहींत, ज्या गोष्टींबद्दल कांहीं इलाज नसतो, अशा गोष्टी शांत चित्तानें स्वीकारण्याची मनाला सवय लावून घेणें हा चिंतानाशावर उपाय आहे."

" पुष्कळ वेळां आपण एखाद्या गोष्टीला भलती किंमत देतों व चिंतेने ग्रस्त होतों. तुला टॉलस्टॉयचें उदाहरण माहीत असेल. शेवटीं शेवटीं जगानें त्याला जास्तीत जास्त मान दिला. हजारों लोक त्याच्या घरीं जाऊन त्याचे दर्शन घेऊन स्वतःला धन्य मानीत. ते जें जें बोलत तें तें देववाक्याप्रमाणें टिपून घेण्यांत येई.

टॉलस्टॉय व त्यांची बायको ह्यांचें पुढें पुढें पटेना. पुढच्या पिढीला कळावें कीं, आपली चूक नसून सारा दोष आपल्या बायकोचा आहे, ह्या हेतूनें त्यांनीं एक डायरी ठेवली व त्यांत ते नोंद करूं लागले. पण त्यांच्या बायकोनें ती डायरी फाडून टाकली व स्वतःच एक डायरी ठेवून सारा दोष आपल्या नवऱ्यावर लादला.

टॉलस्टॉयनी देऊं नये त्या गोष्टीला भलती किंमत दिली व त्यामुळें चिंतेनें त्यांचें मन ग्रासून गेलें. ह्याच्या उलट तुकाराम महाराजांचें उदाहरण पाहा. त्यांची बायको कजाग होती; पण आपलें बरोबर असून आपल्या बायकोचें चूक आहे हें लोकांना पटविण्याचा त्यांनीं प्रयत्न केला नाहीं. ते शांत राहिले आणि चिंतेला त्यांच्याकडे येण्याचें धैर्य झालें नाहीं.

" शांति व चिंता ह्यांचें अहिनकुलवत् नातें आहे. मनुष्यानें शांतीशीं लग्न करावें म्हणजे त्याला अनुभव येतो कीं चिंता अशा मनुष्याची कांता होत नाही. "

विचाराबद्दल प्रश्न विचारल्यावर गोपालकृष्ण म्हणाले—

" कुविचारामुळें चिंता वाढते तर सुविचारामुळें चिंता पळून जाते. मनुष्य सुखी कीं दुःखी, हें त्याच्या विचारांवर अवलंबून असतें. एकाच परिस्थितींत दोन लोक असतात; पण एक सुखी असतो, तर दुसरा दुःखी असतो.

" दोन विद्यार्थिमित्र, शेजारीं राहत होते. एक 'अ' तुकडींत होता, तर दुसरा 'ब' तुकडींत होता. प्रत्येक तुकडींत पस्तीस मुलें होतीं. दोघांचाही आपापल्या तुकडींत अठरावा नंबर होता; पण पहिला नेहमीं चिंताग्रस्त असे, तर दुसरा आनंदी असे.

" पहिला म्हणे—' माझ्या वरती वर्गांत सतरा मुलें आहेत ! '

" ह्या विचारानें तो नेहमीं चिंताग्रस्त असे व त्याचें वर्गांत नीट लक्ष लागत नसे.

" दुसरा म्हणे—' वर्गांत माझ्याखाली सतरा मुलें आहेत ! '

ह्या विचारानें तो आनंदी असे. तो म्हणे—

" मी आणखी अभ्यास करणार व वरवर जाणार ! "

" चिंतेच्या बाबतींत विचाराला फार महत्त्व आहे. आपण सुविचाररूपी उमद्या घोड्यावर स्वार झालों म्हणजे चिंता पळून जाते व नरकाचा देखील

ग्रं. क्र. १५१९९६

स्वर्ग बनतो. उलट आपण कुविचाररूपी मरतुकड्या घोड्यावर स्वार झालों म्हणजे चिंता आपल्या मानगुटीवर बसते व स्वर्गाचा देखील नरक होतो."

"क्रोधामुळें चिंता वाढते. क्रोधावर विजय मिळवितां आला कीं चिंतेवर विजय मिळवितां येतो. आपण शत्रूवर देखील प्रेम करावें. नाइलाज म्हणून, कर्तव्य म्हणून, न्याय प्रस्थापित करण्याकरतां शत्रूबरोबर आपणांला लढावें लागेल; पण लढतांना आपली क्रोधाची भावना नसावी. आपल्याच अंगामध्यें दूषित भाग निर्माण झाला व त्याचें ऑपरेशन करण्याची पाळी आली तर रागावून कसें चालेल? अंतिम कल्याणाकडे लक्ष देऊन त्या भागाचें ऑपरेशन करणें श्रेयकर आहे ह्या भावनेनें वागायला नको का?

"ज्ञानेश्वरांना लोकांनीं किती त्रास दिला? इतका छळ होऊनहि ते कधीं लोकांच्यावर रागावले का? उलट पसायदान मागतांना म्हणाले—

**दुरितांचें तिमिर जावो। विश्व स्वधर्मसूर्यें पाहो**
**जो जें वांछील तो तें लाहो। प्राणिजात॥**

ज्ञानेश्वरांना क्रोध नव्हता म्हणून ते चिंतेपासून मुक्त होते. क्रोध व चिंता हे नवराबायको आहेत. क्रोध आला कीं त्यांच्या पाठोपाठ चिंता आलीच. क्रोधाला हांकलून दिलें कीं चिंता देखील त्याच्या पाठोपाठ निघून जाते."

फळांच्या अपेक्षेबद्दल मीं प्रश्न केल्यावर गोपालकृष्ण म्हणाले—

"ज्याला चिंतेपासून मुक्त व्हावयाचें आहे त्यानें फळाची अपेक्षा न करतां कर्तव्य कर्म करावें. 'निष्काम कर्म' हा चिंता दूर करण्याकरतां महामंत्र आहे. फळाची अपेक्षा ठेवून काम केलें व अपेक्षेप्रमाणें फळ मिळालें नाहीं कीं लोक चिंताग्रस्त होतात. निष्काम कर्म करणें हा सुखी होण्याचा महान् मार्ग आहे. येशू ख्रिस्तानें एके दिवशीं दहा महारोग्यांना बरे केले; पण त्यांपैकीं किती जणानीं त्याचे आभार मानले? फक्त एकानें! बाकीचे नऊ लोक आभार न मानतांच निघून गेले. जग हें असें आहे. अशा ह्या जगांत कर्तव्य कर्म म्हणून निष्काम कर्म करणें हा सुखाचा राजमार्ग आहे. ह्या राजमार्गावर येण्यास चिंतेला मज्जाव आहे!"

चांगली बाजू व वाईट बाजू ह्यांबद्दल विचारल्यावर गोपालकृष्ण म्हणाले,—

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वामित्व
अनुक्रम ...... वि: ......
क्रमांक ...... नों. दि. ......
९९५६ ७|३|७९

"प्रत्येक गोष्टीला चांगली बाजू असते व वाईट बाजू असते. वाईट बाजूपेक्षां चांगल्या बाजूकडे विशेष लक्ष दिलें म्हणजे चिंता कमी होण्यास मदत होते. तुकारामाच्या जीवनांत खूप हालाच्या गोष्टी झाल्या; पण त्यानें चांगल्या बाजूकडे विशेष लक्ष दिल्यामुळें तो चिंताग्रस्त झाला नाहीं. शोपेनहॉवरनें लोकांना मोलाचा उपदेश केला कीं, आपणाजवळ काय आहे त्याला किंमत देण्यापेक्षां आपणाजवळ काय नाहीं त्याला फाजील महत्त्व दिल्यामुळें आपण दुःखी होतों व चिंतेनें ग्रासून जातों.

"तूं असें लक्षांत ठेव कीं, जीवनाची चांगली बाजू पाहण्याची संवय केल्यामुळें चिंता कमी होण्यास मदत होते."

सुखाबद्दल मीं प्रश्न केल्यावर गोपालकृष्ण म्हणाले--

"मनुष्य सुखासाठीं धडपडतो, पण त्यानें असें लक्षांत ठेवावें, कीं सुख मिळवण्यासाठीं लढाई करावी लागते. मनुष्याला जिकडे तिकडे दुःखाची रात्र व चिंतेचें धुकें दिसत असतें. अंतःकरणांतील दिव्य शक्तीला स्मरून त्यानें जोरानें युद्ध सुरू केलें म्हणजे सुखाचा सूर्य उगवतो व चिंतेचें धुकें नाहींसें होतें !"

वैगुण्याबद्दल मीं प्रश्न केल्यावर गोपालकृष्ण म्हणाले--

"वैगुण्यामुळें मनुष्य चिंताग्रस्त होतो हें खरें असलें तरी त्यानें असें लक्षांत ठेवावें कीं पुष्कळ वेळां आपलीं वैगुण्यें आपणाला कल्पनातीत मदत करीत असतात. मिल्टन आंधळा झाला पण ह्या आंधळेपणांतच त्यानें उत्कृष्ट काव्य केलें. बीथोव्हेन बहिरा झाला, पण ह्या बहिरेपणांतच त्यानें उत्कृष्ट संगीतरचना केली. देवानें असें जग निर्माण केलें आहे कीं, जेव्हां मनुष्याची एक शक्ति कमी होते तेव्हां दुसरी शक्ति वाढते. ह्या नियमाचा पुरेपूर फायदा घेतला कीं चिंता कमी होण्यास मदत होते."

पापपुण्याबद्दल प्रश्न विचारल्यावर गोपालकृष्ण म्हणाले :--

"पापामुळें चिंता वाढते तर पुण्यामुळें कमी होते. पाप म्हणजे दुसऱ्याला पीडा देणें व पुण्य म्हणजे दुसऱ्याला सुख देणें ! जेणेंकरून दुसऱ्याच्या मुखावर पवित्र हास्य निर्माण होईल असें कृत्य म्हणजे पुण्य. आपण दुसऱ्याशीं चांगलें वागण्याचा प्रयत्न करूं लागलों म्हणजे आपोआपच स्वतःशीं चांगले होतों. पापपुण्याच्या त्या कल्पना लक्षांत घेऊन आपण पापाचा क्षय व

पुण्याची वाढ करूं लागलों म्हणजे चिंतेचा नाश होत जातो. "

प्रार्थनेबद्दल मीं प्रश्न विचारल्यावर गोपालकृष्ण म्हणाले.

" देव देवळांत नाहीं, मशिदींत नाहीं, चर्चमध्यें नाहीं, तो प्रत्येकाच्या अंतःकरणांत आहे. ह्या देवाची प्रार्थना करणें हा चिंता नाहींशी करण्याचा महान् उपाय आहे. प्रार्थनेमध्यें कल्पनातीत शक्ति असते. महात्मा गांधींनी म्हटलें आहे कीं, मी प्रार्थना केली नसती तर चिंतेनें व्याकुळ होऊन वेडा झालों असतों. " Man the Unknown " ह्या पुस्तकाचा कर्ता डॉ. कॅरेल् याला संशोधन करून समजून आलें कीं, प्रार्थनेमुळें पराकाष्ठेची शक्ति निर्माण होते व त्यामुळें चिंता पळून जाते.

" सर्वसाधारण मनुष्य आपल्या अंतरंगांतील दिव्य शक्तीचा फक्त दहा टक्के उपयोग करीत असतो. आपण खूप प्रार्थना केली म्हणजे अंतरंगांतील किती तरी टक्के शक्तीचा आपणाला उपयोग करतां येतो व त्यामुळें चिंता निघून जाण्यास मदत होते.

" अलोट सत्ता, संपत्ति व कीर्ति मिळविणाऱ्या नेपोलिअननें सेंट हेलेना-मध्यें उद्गार काढले, " माझ्या आयुष्यांत सहा दिवस देखील सुखाचे गेले नाहींत व माझें जीवन सदा चिंतेनें ग्रासलेलें असे ! "

ह्याच्या उलट मुकी, बहिरी व आंधळी हेलेन् केलेर म्हणते,

" खरंच, माझं जीवन किती अलोट सुंदर व अमाप सुखी आहे ! मला कशाचीच चिंता वाटत नाही ! "

ह्याचें कारण असें कीं, नेपोलिअनची दृष्टी बहिर्मुख होती व अंतःकरणांतील दिव्य शक्तीची प्रार्थना करण्याचें काम त्याच्या हातून कधीं झालें नाहीं. ह्याच्या उलट हेलेन् केलेर्ची दृष्टि अंतर्मुख आहे व अंतःकरणांतील दिव्य शक्तीची प्रार्थना करतांना ती रंगून जाते. "

गोपालकृष्णांचे बोल ऐकून मी रंगून गेलों. मला वाटलें आतां गोपालकृष्ण जाणार. म्हणून मोठ्या भक्तिभावानें मीं म्हटलें--

" देवा ! तुमचें बोलणें ऐकून तृप्तिच होत नाहीं. वाटतं तुम्ही खूप खूप बोलावं. कृपा करून आणखी कांहींतरी बोला ! "

गोपालकृष्ण म्हणाले—

“ जगांत पुष्कळ ग्रंथ आहेत, पण त्या सर्वांत उत्कृष्ट ग्रंथ म्हणजे माणूस. जगांत पुष्कळ आश्चर्यें आहेत; पण सर्वांत मोठें आश्चर्य म्हणजे माणसालाच माणूसग्रंथ नीट समजला नाही. ह्या ग्रंथाचीं पानें आहेत सुखदु:खांचीं व अक्षरें आहेत विचारविकारांचीं ! माणसाला माणूसग्रंथ नीट समजला नसला तरी मनुष्याच्या अंतरंगांत जी दिव्य शक्ति आहे तिचा शोध व बोध घेऊन मानवी जीवन सत्कार्यीं लावणें हीच मानवी जीवनाची इतिकर्तव्यता.

“ तूं आणखी असें लक्षांत ठेव की, चितेचें त्रैराशिक व्यस्त आहे. आपली चिंता जोपर्यंत लहान असते तोपर्यंत ती आपणास त्रास देते. दुसऱ्याची चिंता ती आपली चिंता असें समजून आपण आपली चिंता विस्तृत करूं लागलों म्हणजे ही मोठी चिंता त्रास देण्याच्या ऐवजीं सुख देते. ‘ आई ! चिंता करतों विश्वाची ’ असें म्हणणाऱ्या रामदासांना चितेपासून त्रास होण्याच्या ऐवजीं सुख झालें ह्या गोष्टींतलें मर्म लक्षांत घे व सुखी हो ! ”

शेवटीं गोपालकृष्ण म्हणाले,

“ तुझी चिंता गेली का ? आतां तूं आपल्याला योग्य वाटेल तें कर ! ”

नितान्त भक्तिभावनेनें मी कृष्णास नमस्कार केला व म्हटलें—

“ देवा ! तुझ्या कृपेमुळे माझी चिंता नाहीशी आली. आता तुझ्या उपदेशाप्रमाणें मी वागेन ! ”

मी आणखी कांहीं तरी बोलणार होतों; पण इतक्यांत जागा झालों. जागा झालों तरी माझ्या अंगावर अष्ट सात्त्विक भावांचे रोमांच उठले होते. कृष्णार्जुनसंवाद ऐकून ज्याप्रमाणें संजयाच्या अंगावर अष्ट सात्त्विक भावांचे रोमांच उठले त्याप्रमाणे माझी अवस्था झाली.

ज्ञानेश्वरांच्या भाषेंत मी म्हणूं लागलों—

“ किंबहुना सात्त्विकां आठा । चाचरु मांडतां उमेठा ।
संजयो जालासे चोहटा । संवादसुखाचा ॥ ”

* * *

# स्वप्न सहावें

प्रेम, खोकला व स्फूर्ति ह्या तीन गोष्टी कधी दाबून ठेवतां येत नाहींत; उलट त्या जितक्या दाबाव्यात तितक्याच जोराने त्या उसळून वर येतात. ह्याच चालीवर एका प्रोफेसरनें लिहिलें आहे—

" मी खूप लेखकांचें लिखाण वाचतों, पण कधी कोणाला पत्रें पाठवीत नाहीं. ' माझीं स्वप्नें ' ही तुमची लेखमाला वाचूं लागल्यापासून मात्र मला एक नवीन अनुभव येत आहे. कुणाही लेखकाला पत्र पाठवावयाचें नाही हा माझा नियम आता मला दाबून ठेवतां येत नाही, उलट जितक्या जोराने तो दाबून ठेवावा तितक्या जोराने तुम्हांला पत्र पाठविण्याची इच्छा उसळून वर

वर येत आहे.........माझ्यासारख्या हजारो लोकांच्या जीवनांत तुमच्या ह्या लेखमालेमुळें इष्ट अशी क्रांति होत आहे. मनुष्य जास्तींत जास्त मनःशांतीसाठी धडपडत असतो. तुमच्या लेखमालेमुळे मनःशांती मिळण्यास फार मदत होते.....आपण खूप खूप लिहा. मनःपूर्वक धन्यवाद—"

आपल्या लिखाणाबद्दल लोक काय म्हणतात वा लिहितात तें ऐकण्याची वा वाचण्याची लेखकाला आंतरिक ओढ असते. त्या ओढीनेच मला आलेलीं पत्रें रात्रीं निजण्याच्या वेळीं मी वाचीत होतों.

पहाटे मला एक स्वप्न पडलें.

सुप्रभात झाली होती. वसंत ऋतु झाला होता. जिकडे तिकडे फुलांचा सुगंध दरवळला होता. उषाकामिनी कपाळावर कुंकू लावून सुगंधी फुलांच्या माळा हातांत घेऊन पूर्वमंदिरीं स्वागत करण्यास उभी होती. आम्रवृक्षावर खूप मोहोर बहरला होता. मोहोराच्या चवदार मंजिऱ्या खाऊन उन्मत्त झालेल्या कोकिळा स्वागताच्या ललकाऱ्या मारीत होत्या. हिरव्यागार गवताचा गालिचा जिकडे तिकडे पसरला होता. पाचूच्या हिरव्या साड्या नेसून लता-वेली आगत-स्वागत करीत होत्या.

अन् त्यावेळीं एकदम नयनमनोहर गोपालकृष्णाची सावळी मूर्ति प्रगट झाली.

त्या मूर्तीला पाहून माझ्या मनांत गीतेचा विचार आला. निरनिराळ्या लोकांनी गीतेचें वेगवेगळें तात्पर्य काढलें आहे. शंकराचार्य, रामानुजाचार्य, मध्वाचार्य, वल्लभाचार्य, ज्ञानेश्वर, लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, गार्व, हॉल्टझ्मन, योगी अरविंद, आटो वगैरे तज्ज्ञांनी गीतेचें काढलेलें तात्पर्य पाहून साधारण मनुष्य भांबावून जातो.

मला वाटू लागलें—

आत्मज्ञान प्राप्त झाल्यावर कर्म करायला पाहिजे कीं नको हा वाद सामान्य लोकांना पाहिजे कशाला ? आपणाला कर्म करायचेच आहे. प्रश्न एवढाच आहे की, तें कर्म कुकर्म न होतां सुकर्म कसें होईल ?

ज्ञानोत्तर कर्म करायलाच पाहिजे—ज्ञानोत्तर कर्म करायचें कांही कारण नाही—असे दोन पक्ष घेऊन जेव्हा सामान्य लोक हमरीतुमरीवर येतात

तेव्हा मला एका हरिदासी कथेची आठवण होते.

आपल्या मुलाच्या लग्नांत कोणतें पक्वान्न करावयाचें ह्याबद्दल एकदा नवरा बायको जोरजोराने भांडत होते.

नवरा म्हणत होता—

" आपल्या मुलाच्या लग्नांत बुंदीचे लाडू करावयाचे. जरी शिल्लक राहिले तरी ते फुकट जात नाहीत."

बायको म्हणत होती—

" नाही. बुंदी हें श्रीमंती पक्वान्न नाही. आपल्या मुलाच्या लग्नांत जिलबी करायची. "

बुंदी कीं जिलबी ह्या विषयावर ते नवरा बायको दोन तास जोरजोराने भांडत होते.

लोकांनी तपास केला की—ह्यांचा मुलगा केवढा आहे ?

तेव्हां लोकांना कळून आलें की—

ह्यांना अद्याप मुलगा व्हावयाचा आहे !

तज्ज्ञ लोक कांहीही वाद करोत, पण ज्ञानोत्तर कर्म करायला पाहिजे कीं नको, हा वाद तुमच्या-आमच्यासाठी नाही.

मला वाटूं लागलें की, जो कोणी गीतेचें तात्पर्य काढतो त्याला थोडासा अहंकार येतो व तो म्हणूं लागतो की—

पूर्वीच्या लोकांना गीतेचें तात्पर्य बरोबर सांपडलें नाहीं, मला तें बरोबर समजलें आहे.

कमालीचे निरहंकारी असणारे निंबाळचे संत डॉ. रामभाऊ रानडे ह्यांनी " The Bhagavadgita as a Philosophy of God-realisation ह्या अलीकडे प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांत म्हटलें आहे कीं,

प्राचीन व अर्वाचीन पंडितांनी गीतेचें तात्पर्य काढतांना एक चक्रव्यूह निर्माण केला; पण त्यांतून बाहेर कसें पडावें हें त्यांना समजलें नाही.

डॉ. रानडयांना वाटतें कीं, त्या चक्रव्यूहांतून बाहेर पडण्याची गुरुकिल्ली आपणाला सांपडली, अन् ती गुरुकिल्ली म्हणजे ईश्वरी साक्षात्कार.

गोपालकृष्णाची मूर्ति पाहिल्याव र हे सारे विचार माझ्या मनांत चमकून

गेले व वाटूं लागलें की—

गीतेचें खरें तात्पर्य काय आहे हें गीता सांगणाऱ्यालाच विचारावें. त्याबद्दल गोपालकृष्णाला विचारल्यावर प्रभु म्हणाले—

"अरे! गीता अर्जुनाला सांगितली त्या अर्जुनाला काय वाटलें व तो काय काय बोलला तें तूं नीट समजून घे. म्हणजे तुला गीतेचें खरेंखुरें तात्पर्य समजेल."

मला एक नवीन दृष्टी आली. मला वाटूं लागलें की—

ज्ञानयोग, कर्मयोग व भक्तियोग ह्यांचा समन्वय व हा समन्वय करतांना भक्तीवर जोर, हें गीतेचें तात्पर्य आहे.

मीं कृष्णाला विचारलें—

"ज्ञानयोग व कर्मयोग ह्यांपैकी कोणता योग श्रेष्ठ?"

गोपालकृष्ण म्हणाले—

"गीतेंतच म्हटले आहे ना—

**"एकं सांख्यं च योगं च यः पश्यति स पश्यति।"**

"ज्ञानयोग काय किंवा कर्मयोग काय हे एकच आहेत हें ज्याला कळलें तो शहाणा."

मला वाटूं लागलें—

ज्ञानयोग व कर्मयोग हे एकच आहेत हें समजून घेण्याला दृष्टी अंतर्मुख झाली पाहिजे.

मला एक गोष्ट आठवली—

नवरा म्हणत होता—

"श्रीखंड व बासुंदी हे भिन्न पदार्थ आहेत."

बायको म्हणत होती—

"ते एकच आहेत. हें ज्याला कळलें तो शहाणा."

नवऱ्याला तें पटत नव्हतें. तो म्हणत होता—

"श्रीखंड वेगळें, बासुंदी वेगळी. दोघांची चव भिन्न, नांव भिन्न, रंग भिन्न, रूप भिन्न. कांही लोकांना श्रीखंड आवडतें तर कांही लोकांना बासुंदी आवडते. अशा परिस्थितींत श्रीखंड व बासुंदी एक आहेत असें कसें म्हणतां

ईल ? "

बायको म्हणाली--

"श्रीखंड करायचें झालें तर घरांत तुम्ही काय आणाल?"

नवरा म्हणाला --

"दूध आणीन, केशर आणीन, साखर आणीन."

बायको म्हणाली--

"ह्या जिनसांचें मी श्रीखंड करीन. पण आपण असें लक्षांत घ्या की-- बासुंदी करण्याकरितां हेच जिन्नस लागतात. अहो म्हणून मी म्हणतें--

**"एकं श्रीखंडं च बासुंदीं च यः पश्यति स पश्यति।"**

माझी खात्री झाली की-

वरवर विचार करण्यापेक्षां खोलवर विचार केला म्हणजे समजून येतें की--

श्रीखंड व बासुंदी ज्याप्रमाणें एक, त्याप्रमाणें ज्ञानयोग व कर्मयोग एक.

गीतेंत भगवान् गोपालकृष्णांनी म्हटलें आहे--

**"सांख्ययोगौ पृथग्बालाः प्रवदंति न पंडिताः॥"**

ज्ञानयोग व कर्मयोग हे भिन्न आहेत असें मूर्ख म्हणतात, शहाणे तसें म्हणत नाहीत.

भगवान् गोपालकृष्णांनी मला सांगितलें होतें कीं--

गीतेचें तात्पर्य काढतांना अर्जुनाच्या भूमिकेकडे लक्ष द्यावें.

गोपालकृष्णांनी अर्जुनाला ज्ञानयोग सांगितला, कर्मयोग सांगितला, पण त्याचें समाधान झालें नाहीं. तो कृष्णाला म्हणतो--

**व्यामिश्रेणेव वाक्येन बुद्धिं मोहयसीव मे।**

असल्या घोटाळ्याच्या बोलण्यानें तूं माझ्या बुद्धीला मोह पाडीत आहेस.

**यच्छ्रेय एतयोरेकं तन्मे ब्रूहि सुनिश्चितम्।**

ह्यांपैकी जें कोणतें श्रेयस्कर असेल तें निश्चित करून सांग.

ज्ञानयोग व कर्मयोग ह्यांचा समन्वय करण्याकरतां भगवान् गोपालकृष्णांनी सहाव्या अध्यायांत ध्यानयोग सांगितला. पण अर्जुन म्हणाला—

मन चंचल आहे. हा ध्यानयोग साधणें कठीण आहे.

असें दिसतें की, अजुनाची भूमिका सर्वसाधारण माणसाची आहे. मन एकाग्र करायला ज्याला फार कठीण वाटतें असा अर्जुन तुमच्याआमच्या-सारखा आहे.

सर्वसाधारण माणसाला ध्यानयोग जुळला नाही तरी त्याला श्रद्धा असते. अर्जुन विचारतो--

ज्याला श्रद्धा आहे पण मन ताब्यांत नाही, त्याला कांही आशा आहे का?

अर्जुनाच्या ह्या प्रश्नाने गीतेला कलाटणी मिळाली आहे. सहाव्या अध्यायाच्या शेवटीं भगवान् गोपालकृष्ण म्हणतात.

**श्रद्धावान् भजते यो मां स मे युक्ततमो मतः।**

जो श्रद्धावान् मला भजतो तो योग्यांचा मुकुटमणी आहे.

ह्यानंतर भगवान् गोपालकृष्णांनी भक्तीवर विशेष जोर दिला आहे. मी कृष्णाला म्हटलें—

"देवा! तूं जेव्हा ज्ञानयोग सांगितलास किंवा कर्मयोग सांगितलास तेव्हां अर्जुनाचें समाधान झालें नाहीं; पण जेव्हां भक्तियोगावर जोर देऊन तूं ज्ञानयोग व कर्मयोग ह्यांचा समन्वय केलास तेव्हां अर्जुनाचें समाधान झालें."

माझें हें म्हणणें ऐकून गोपालकृष्णांनी स्मित केलें व म्हटलें--

"भक्तीमध्यें पराकाष्ठेचें सामर्थ्य आहे."

मला एकदम एकलव्याची गोष्ट आठवली.

त्याने द्रोणांचा पुतळा तयार करून भक्तिभावाने इतकी धनुर्विद्या संपादन केली की, ती पाहून अर्जुन गांगरून गेला.

कबीरांना वाटलें की--

**कबीर कबीर क्या कहते है कबीर।**
**एक एक गोपीके प्रेममें बह गये कोटी कबीर।।**

तुकारामाचें चरित्र माझ्या डोळ्यांपुढें आलें; अन् माझी खात्री झाली की भक्तीमध्ये पराकाष्ठेचें सामर्थ्य आहे.

कीट्सला सत्य आणि सौंदर्य ह्यांच्या अभिन्नतेचा साक्षात्कार झाला. गोपालकृष्णांचे बोल ऐकून मला भक्ति आणि सामर्थ्य ह्यांच्या अभिन्नतेचा

साक्षात्कार झाला.

स्टीफन लीकॉकने म्हटलें आहे की—

ह्या जगांत भाषा निर्माण होण्यापूर्वी हास्य निर्माण झालें.

मला वाटूं लागलें की——

ह्या जगांत भाषा निर्माण होण्यापूर्वी भक्ति निर्माण झाली.

लोकमान्य टिळकांसारख्या टीकाकारांनी म्हटलें आहे की——

मोहनिवृत्ति हें मुख्य कार्य होतें. अर्जुनाला प्रथम मोह झाला व शेवटीं त्याचा मोह जाऊन गीतेच्या अठराव्या अध्यायांत 'माझा मोह गेला' अशी त्यानें पावती दिली आहे.

मला वाटूं लागलें——

अकराव्या अध्यायाच्या पहिल्या श्लोकांत मोह गेला अशी अर्जुनाने पावती दिली आहे. ज्ञानयोग ऐकून अथवा कर्मयोग ऐकून अर्जुनाचा मोह गेला नाही; पण नवव्या व दहाव्या अध्यायांतील भक्तिमार्ग ऐकून त्याचा मोह गेला.

तत्त्वज्ञानाचा पाया अनुभव आहे व अनुभव प्राप्त होण्याला भक्ति हें उत्कृष्ट साधन आहे.

माझी ही विचारसरणी ऐकून गोपालकृष्णांनी सम्मतिदर्शक मान हलविली.

मला एक मजेशीर गोष्ट आठवली.

ॲरिस्टॉटलने म्हटलें आहे की——

"बायकांना पुरुषांच्यापेक्षा कमी दांत असतात."

बर्ट्रांड रसेलनी त्या उद्गारावर शेरा मारला आहे की——

"माणसाने प्रचीतीशिवाय अथवा अनुभवाशिवाय बोलूं नये."

देवाला मीं एक प्रश्न विचारल्यावर गोपालकृष्ण म्हणाले——

"हें पहा. तत्त्वज्ञानाच्या प्रांतांत अहंकारनाशाला फार किंमत आहे. अर्जुनाला आरंभीं नुसताच मोह झाला नव्हता, तर त्याला अहंकार देखील आला होता. जेव्हा त्याचा अहंकार गेला तेव्हा त्याला तत्त्वज्ञान समजूं लागलें."

हे लाख मोलाचे शब्द माझ्या हृदयाला जाऊन भिडले. मला गौतम-बुद्धांची आठवण झाली. त्यांच्या काळीं एक तरुण विद्वान् होता.

त्याने निरनिराळ्या विद्यापीठांतून शिक्षण घेतलें, देशोदेशीं प्रवास केला व लोकांना तो वादांत जिकूं लागला.

तो म्हणूं लागला--

" मला सारें ज्ञान प्राप्त झालें आहे. माझ्याइतका शहाणा मनुष्य ह्या जगांत दुसरा कोणी नाही. "

एकदा त्याच्या घरीं गौतमबुद्ध गेले. त्यांचा संवाद चालू असतांना गौतम-बुद्ध म्हणाले--

" महासागरांत असणाऱ्या माशाच्या अंगाला जेवढें पाणी लागतें तेवढेंच पाणी ह्या महासागरांत आहे अशी त्या माशाची समजूत असते; पण त्याच्या अंगाला लागलेलें पाणी म्हणजे महासागर नव्हे. ज्ञानाच्या महा-सागरांत असाच प्रकार घडतो. मनुष्याला जें ज्ञान प्राप्त होतें तें पाहून त्याला वाटतें की तें ज्ञान म्हणजे ज्ञानाचा महासागर आहे; पण ही समजूत चुकीची नाही का ? "

गौतमबुद्धांचें हें भाषण ऐकून त्या तरुणाचा अहंकार नाहीसा झाला.

तो बुद्धांच्या पायां पडला व म्हणाला--

" मला क्षमा करा. माझा अहंकार नाहीसा झाला. "

गौतम बुद्धांनी त्या तरुणाला पोटाशीं कवटाळलें व म्हटलें--

" अहंकारनाश हा ज्ञानाचा पाया आहे. आता ज्ञान मिळवायला तूं लायक झालास. "

अहंकार व भक्ति ह्यांवर गोपालकृष्णांनी जो जोर दिला तो योग्य होता. बोलतां बोलतां गोपालकृष्ण म्हणाले--

" भक्तीचें माहात्म्य फार आहे ह्यांत वाद नाही—पण भक्ती डोळस असली पाहिजे—ती आंधळी असतां कामा नये— "

पुष्कळ लोक भक्ती करतात पण कितीतरी वेळां ती आंधळी असते.

राजा हा पृथ्वीवरील देवाचा अंश आहे व त्याने स्पर्श केल्यास असाध्य रोग बरे होतात, अशी पूर्वी भोळी समजूत होती. इंग्लंडचा राजा दुसरा

चार्ल्स ह्याच्या भोंवती रोग्यांचा एवढा गराडा पडे की, त्या गर्दीत कांही रोगी चेंगरून मरत. फ्रान्सचा राजा चौदावा लुई ह्याने एके दिवशीं सोळाशे रोग्यांना स्पर्श केला असें वर्णन करण्यांत आलें आहे.

मला वाटलें—

हा सारा आंधळ्या भक्तीचा प्रकार आहे. भक्ती आंधळी न होण्याकरता तिने बुद्धिवादाचा आश्रय घेतला पाहिजे.

मीं देवाला विचारलें—

" देवा ! भक्ती डोळस पाहिजे हयांत वाद नाहीं. भक्ताने देवाला कुठें पहावें ? "

गोपालकृष्ण म्हणाले—

" ईश्वर प्रत्येकाच्या हृदयांत आहे. भक्ताला अनुभव येतो की—

**करिता शोध देवाचा मिळेना ठाव हो मला।**
**करिता शोध ब्रह्माचा मिळेना ठाव हो मला॥**
**शोधूं जाता परी माझें अंतःकरण जेधवा।**
**लागला ठाव सर्वांचा वाटे आनंद तेधवा॥**

कृष्णाचे हे बोल ऐकून मला खूप आनंद झाला.

नीत्स्ये याने असें म्हटलें आहे की—

" ईश्वर एकोणिसाव्या शतकांत मयत झाला. "

डॉ. जोड हयाने खूप पुस्तकें लिहून लोकांना दाखवून दिलें की, ह्या जगांत देव नाही.

पण ह्याच जोडने जीवनाच्या संध्याकाळीं जगाला रामराम ठोकण्यापूर्वी लोकांना संदेश दिला की—

" ह्या जगांत तेच लोक सुखी होतात की ज्यांचा देवावर विश्वास आहे. "

अलीकडचे शास्त्रज्ञ म्हणतात की—

" देव देवळांत नाही, चर्चमध्ये नाही, मशिदींत नाही तर तो प्रत्येकाच्या अंतःकरणांत आहे. "

आश्चर्याची गोष्ट अशी की—

आज शास्त्रज्ञ जें म्हणतात, तें हजारों वर्षांपूर्वी गीतेंत अठराव्या अध्यायांत सांगण्यांत आलें आहे.

" **ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति ।** "

ईश्वर सर्व प्राण्यांच्या हृदयांत आहे.

पंधराव्या अध्यायांत देखील म्हटलें आहे--

**सर्वस्व चाहं हृदि सान्निविष्टो ।**

नीट विचार न करतां वरचा भाग वाचून कांही लोक म्हणतात--

गीतेंत चहा आहे.

मला एकदम एक मजेशीर गोष्ट आठवली. माझे प्रोफेसर बंधू ह्यांनी ती मला सांगितली होती--

मॅट्रिकच्या परीक्षेंत एक प्रश्न असा होता--

इंग्लंडांत दळणवळणाचीं साधनें कशीं आहेत ?

एका विद्यार्थ्याला दळणवळण ह्याचा अर्थ समजेना. त्यानें आपलें डोकें चालवलें व लिहिलें--

" इंग्लंडात वळणावळणावर दळणाच्या गिरण्या असल्यामुळे तेथे दळणवळणाचीं साधनें चांगलीं आहेत. "

मी आणखी एक प्रश्न विचारल्यावर गोपालकृष्ण म्हणाले--

" ज्ञानयोग व कर्मयोग हे एकच आहेत हें ज्याला कळलें तो शहाणा असें गीतेंत सांगण्यांत आलें आहे. तूं आणखी असें लक्षांत घे की, मनुष्य वरच्या पायरीवर गेला म्हणजे भक्ती व ज्ञान एकच आहेत असें त्याला कळतें. "

ह्या विचार मला फार उद्बोधक वाटला.

गीतेंत ज्ञानाचे देखील तीन भाग केले आहेत-- (१) सात्त्विक, (२) राजस, (३) तामस.

ज्या ज्ञानाच्या योगाने सर्व प्राणिमात्रांच्या ठिकाणीं परमेश्वराचें रूप पाहिलें जातें तें ज्ञान सात्त्विक होय, अशी गीतेची भूमिका आहे. गीतेला जें ज्ञान हवें आहे तें राजस वा तामस नसून सात्त्विक आहे, व सात्त्विक ज्ञानाचें स्वरूप असें आहे--

ज्ञानेश्वरांनी म्हटलें आहे--

जें जें भेटेल भूत। तें तें मानिजे भगवंत।
हा भक्तियोग निश्चित। जाण माझा ॥

हे विचार माझ्या मनांत आल्यावर माझी खात्री झाली की--

वरच्या पायरीवर गेल्यावर ज्ञान व भक्ती एकच दिसूं लागतात.

महाभारतांत कौरव-पांडवांचें युद्ध आहे व पांडवांच्या बाजला सल्ला द्यावयाला कृष्ण आहे. आपल्या मनांत देखील दुष्ट विचार व सुष्ट विचार ह्यांचें युद्ध सुरू असतें. त्याबद्दल प्रश्न विचारल्यावर गोपालकृष्ण म्हणाले—

"सुष्ट विचारांपेक्षा दुष्ट विचारांची संख्या मोठी असते; पण सुष्ट विचारांत जो जोर असतो तो दुष्ट विचारांत नसतो. सुष्ट विचार युद्ध कर-ण्याचें टाळत असतात. त्यांना वाटतें—

नको तें युद्ध.

अशा वेळीं सुष्ट विचारांनी अंतःकरणांतील दिव्य शक्तीला शरण गेलें पाहिजे. ती दिव्य शक्ती त्यांना म्हणते की—

युद्ध करणें हें तुमचें कर्तव्य आहे.

दिव्य शक्तीचा आधार घेऊन जेव्हा सुष्ट विचार दुष्ट विचारांबरोबर जोरानें युद्ध करतात तेव्हा सुष्ट विचारांचा जय होतो, व मनुष्य सुखी होतो. गीतेचें तात्पर्य काढतांना हाही विचार तूं लक्षांत घे. --"

गोपालकृष्णांचा हा विचार ऐकून मी आनंदाच्या हिंदोळ्यावर झोके घेऊं लागलों.

मला वाटूं लागलें--

सारंगी कितीही गोड वाजली तरी ती बुलबुलांच्या मधुर बोलांची बरो-बरी करूं शकत नाही; किंवा कितीही दिवे उजळण्यांत आले तरी त्यांचा प्रकाश पौर्णिमेच्या चंद्राच्या चांदण्याची बरोबरी करूं शकत नाही; त्याप्रमाणे

कितीही पुस्तकें वाचलीं तरी त्यांतील तत्त्वज्ञान गीतेच्या तत्त्वज्ञानाची बरोबरी करूं शकत नाही.

मी आणखी कांही प्रश्न देवाला विचारणार होतों, पण इतक्यांत जागा झालों,

व मनांत म्हटलें—

" देवा ! पुन्हा स्वप्नांत ये हं ! "

* * *

# स्वप्न

सातवें

मनुष्य जास्तींत जास्त विचार सुखदुःखांबद्दल करतो. देवाने जसें सुख निर्माण केलें आहे त्याचप्रमाणें दुःख देखील निर्माण केलें आहे. त्याने गुलाबाबरोबर धोत्रा देखील निर्माण केला, चंद्रभागेबरोबर साप देखील निर्माण केले, आणि मधमाशांबरोबर गांधिलमाशा देखील निर्माण केल्या.

एका रात्रीं सुखदुःखांबद्दल विचार करत असतांना मी तत्त्वज्ञ आणि शास्त्रज्ञ ह्यांच्याबद्दल विचार करूं लागलों. ह्या लोकांनी माणसाला सुधारण्याचा खूप प्रयत्न केला, पण ते निराश झाले.

महर्षी व्यासांनी धर्मावर जोर देऊन सांगितलें की—

तुम्ही पैसा मिळवूं नका किंवा भोग भोगूं नका असें मी तुम्हाला नाही सांगत. माझें तुम्हाला एवढेंच सांगणें आहे की--वाटेल तितका पैसा मिळवा, पाहिजे तितके भोग भोगा, पण हें सारें धर्मानें होऊं द्या.

शेवटीं व्यास निराश झाले, व महाभारताच्या शेवटीं त्यांनी आक्रोश केला की—

**ऊर्ध्वबाहुर्विरोम्येष न च कश्चिच्छृणोति माम् ।**
**धर्मादर्थश्च कामश्च स धर्मः किं न सेव्यते ॥**

हात उंच करून मी आक्रोश करून सांगत आहें की—बावांनो, धर्मानें अर्थ प्राप्त होतो, धर्मानें काम प्राप्त होतो, अशा परिस्थितींत धर्माचें सेवन कां करत नाही ? पण माझें कुणीच ऐकत नाही.

तत्त्वज्ञ सॉक्रेटिसानें लोकांना सुधारण्याचा खूप प्रयत्न केला. जीविताचें सौख्य विचारांच्या शुद्धतेवर अवलंबून असतें हा त्याचा महामंत्र होता; पण असल्या शिकवणुकीकरतां शिक्षा म्हणून त्याला विषाचा प्याला प्यावा लागला !

लोकांची सुधारणा करणाऱ्या व धर्मानें वागा सांगणाऱ्या येशू ख्रिस्ताला वधस्तंभावर जावें लागलें !

जगाचें जास्तींत जास्त कल्याण करूं पहाणाऱ्या तत्त्वज्ञ प्लेटोला त्याच्या शिष्यानें--राजा सिराक्यूज ह्यानें--गुलाम म्हणून विकून टाकलें !

अगदी अलीकडे लोकांना सुधारूं पहाणारा प्रख्यात तत्त्वज्ञ बर्ट्रांड रसेल निराश होऊन म्हणतो की--

जगाचा उद्धार ज्ञानापेक्षा अज्ञानानेंच होऊं शकेल.

विचार करतां करतां मला झोप लागली व माझ्या स्वप्नांत गोपालकृष्ण आले.

मीं त्यांना विचारलें--

"देवा ! सुखी होण्याचा महामंत्र कोणता ?"

भगवान् गोपालकृष्ण म्हणाले—

"अंतरंगांतील परमेश्वराला स्मरून, फलाशा मनांत न धरतां जास्तींत जास्त चांगलीं कामें करणें हा सुखाचा महामंत्र आहे."

भगवान् गोपालकृष्ण माझ्यापुढे होते, आणि माझ्या मनांत गोपालकृष्णांच्याबद्दल विचार सुरू होते. आदर्श व्यक्ती म्हणून मी त्यांच्याकडे पहात होतों. कविवर्य मोरोपंत ह्यांनी म्हटलें आहे की—

"झाले बहु, होतील बहु
आहेतहि बहु परंतु यासम हा"--

हें वर्णन गोपालकृष्णांना बरोबर लागू पडतें.

त्यांच्या व्यक्तिमत्त्वामध्ये परस्परविरुद्ध वाटणाऱ्या गुणांचा सुंदर, सुरेख समन्वय झाला आहे. त्यांच्यामध्ये ज्याप्रमाणें विजेचें चापल्य आहे, त्याचप्रमाणें सागराचें गांभीर्य देखील आहे. त्यांच्यामध्ये बालकाचें मनोहर सोज्ज्वळ, प्रेमळ रूप जसें आहे, त्याचप्रमाणें वृद्धाला लाजवणारा पोक्तपणा देखील आहे. त्यांच्यामध्यें साऱ्या विश्वाचा विचार करण्याची ज्याप्रमाणें चिंतनशीलता आहे, त्याचप्रमाणें अन्यायाविरुद्ध उसळणारा करारीपणा देखील आहे.

किती तरी लोक कृष्णाला देव न म्हणतां आदर्श पुरुष म्हणतात. मला वाटूं लागलें—

कृष्णासारखा आदर्श पुरुष जगांत झाला नाही. ह्या पुरुषामध्यें सागराची गंभीरता, गंगेची पवित्रता, स्वर्गाची दिव्यता, हिमालयाची उत्तुंगता, सूर्याची तेजस्विता व चंद्राची शीतलता आहे.

मीं कृष्णाला म्हटलें—

"कृष्णा ! लोकमान्य टिळक वारले तेव्हा सर्वांना दुःख झालें, पण त्या वेळीं महात्मा गांधी होते. महात्मा गांधींचा वध झाला तेव्हा सर्वांना दुःख झालें, पण त्या वेळीं नेहरू होते. पण पंडित जवाहरलाल नेहरू वारले तेव्हां लोकांना नुसतेंच दुःख झालें नाही, तर त्यांना वाटूं लागलें की आपण आता पोरके झालों !

"कृष्णा ! तूं माझ्या स्वप्नांत येतोस तेव्हा मला मोठा आधार वाटतो. पण नंतर जागा झालों म्हणजे तूं नाहीस ह्या विचाराने मी पोरका होतों. मला खूप खूप वाटतें की--

"तूं रोज माझ्या स्वप्नांत यावेंस; पण तसें होत नाही. असें कां ? रोज

माझ्या स्वप्नांत कां येत नाहीस ? खूप खूप तळमळ व्हावी, तुझी अत्यंत व्याकुळतेने आठवण यावी व तुझ्या भेटीसाठी कमालीची आसुसता वाढावी तेव्हां बऱ्याच दिवसांनी तूं माझ्या स्वप्नांत येतोस ! असें कां ? "

कृष्ण म्हणाला--

"अरे, मी म्हणजे तूंच. स्वप्नांत मी येतों ह्याचा अर्थ तुझ्या अंतः-करणांत जी परमेश्वरी शक्ती आहे ती सगुण रूप घेऊन तुझ्यापुढे येते व तुझ्याशीं बोलते. तुला गीतेंतलं वाक्य माहीत आहे ना ?

ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति ।

(ईश्वर सर्व प्राणिमात्रांच्या अंतःकरणांत आहे.)

तुझ्या अंतकरणांतील परमेश्वरी शक्ती रोज नाही तरी, पुष्कळ वेळां तुझ्या स्वप्नांत येते हे तुझें भाग्य नाही का ?"

भक्तीबद्दल मीं कृष्णाला विचारल्यावर कृष्ण म्हणाला--

"गीतेंत भक्तीवर जोर दिला आहे हें खरें आहे, पण तूं असें लक्षांत घे की, भक्ती डोळस पाहिजे, आंधळी असतां कामा नये."

मला एकदम लेलेशास्त्री ह्यांची आठवण झाली.

मी पुण्याला एस. पी. कॉलेजांत असतांना शास्त्रीबुवा संस्कृत शिकवीत असत. ते वर्गांत खूप मजेशीर गोष्टी सांगत व विद्यार्थी त्यांच्यावर फार खूष असत.

एकदा ते म्हणाले--

"भक्तीला महत्त्व आहे. पण ती डोळस पाहिजे. आंधळ्या भक्तीला कांहीच किंमत नाही."

उदाहरण म्हणून त्यांनी स्वतःचीच गोष्ट सांगितली. ते म्हणाले--

"लोक जातात म्हणून मला वाटलें की, मी व आपली बायको मिळून गंधर्वांच्या नाटकाला जावें.

"मीं माझा बेत बायकोला सांगितला; पण ती पडली पूर्वीच्या काळची. नवऱ्याबरोबर नाटकाला जाणें तिला पसंत पडेना.

"खूप समजूत घातल्यावर एकदाची ती कबूल झाली.

"पुढच्या रांकेचीं दोन खुर्च्यांचीं तिकिटें मीं खरेदी केलीं व आम्ही

दोघेजण नाटकाला गेलों.

" माझ्याजवळ बायको बसली होती. पण नवऱ्याजवळ बसल्यावर खाली मान घालून बसण्याच्या ह्या अंध समजुतीने ती बिचारी खाली मान घालून बसली.

" अशानें तिला नाटक कसें दिसणार ?

" मीं तिला खूप समजावून सांगितलें, पण ती बिचारी मानच वर करीना.

" शेवटीं मी रागावलों. तेव्हा तिनें मान वर केली व समोर नाटक पाहूं लागली.

" एका नटाने एका नटीचा हात हातांत घेतला होता व तो लाडे लाडे कांही तरी बोलत होता.

तें दृश्य पाहून

" इश्य बाई ! असला कसला पांचटपणा ! " असें म्हणून माझ्या बायकोनें जी खाली मान घातली ती नाटक संपेपर्यंत ! " शास्त्रीबुवांची ही गोष्ट ऐकून वर्गात हास्याचा धबधबा निर्माण झाला, आणि तो हास्याचा पूर संपण्यापूर्वीच शास्त्रीबुवा म्हणाले,

" अहो ! भक्ती पाहिजे, पण ती भक्ती आंधळी असतां कामा नये. ती डोळस पाहिजे. "

थोडा वेळ थांबून मीं कृष्णाला विचारलें—

" कृष्णा ! गीतेंत तूं जनकादिकांचें उदाहरण दिलेंस. वडे राजे, मोठे साधुसंत, व मान्यवर ऋषिमुनी ह्यांचीं उदाहरणें ठीक आहेत; पण मला तूं एका सामान्य माणसाची हकीकत सांग-

" हा मनुष्य शिक्षणाने बेताचा असावा, त्याची सांपत्तिक स्थिति ओढा-ताणीची असावी, संसारांत त्याला काळजी असावी, पण देवावर त्याचा पराकाष्ठेचा विश्वास असावा, ह्या विश्वासाच्या जोरावर तो आंतून आनंदी असावा, तो अत्यंत प्रेमळ असावा, व त्याला शेवटीं उत्तम गती मिळावी."

माझा हा प्रश्न ऐकून कृष्णाने हसल्यासारखें केलें व म्हटलें-

" अरे ! तुझे वडीलच असे नव्हते का ? "

एकदम कृष्ण अदृश्य झाला व माझे वडील—तात्या--व मी, ह्यांच्या जीवनांतला चित्रपट माझ्या डोळ्यांपुढे आला.

तात्या मॅट्रिक होऊन वकिलीची परीक्षा पास झाले व वकिली करूं लागले.

त्यांना वकिलीमध्यें फारसा पैसा मिळाला नाही-- पोटापुरता, कसाबसा जेमतेम मिळत असे; कारण ते खोटें कधी बोलत नसत.

एकदा एक पक्षकार त्यांच्याकडे आला. पांचशे रुपयांच्या प्रॉमिसरी नोटेवरून त्याला दावा करण्याचा होता.

बोलतां बोलतां तो पक्षकार म्हणाला—

"वकीलसाब ! ही दामदुपटीची नोट आहे. मी अडीचशे रुपये दिले व पाचशे रुपयांची प्रॉसिमरी नोट लिहून घेतली."

तात्या म्हणाले—

"ह्या नोटेवरून दावा लावतांना तूं प्रतिवादीला पांचशे रुपये देऊन नोट लिहून घेतलीस असें दाव्यांत म्हणणें खोटें नाही का ? ह्यामुळे तुला पाप लागणार नाही का ? बाबा ! असला खोटा दावा मी लावणार नाही !"

तो पक्षकार तात्यांच्याकडे 'आ' वासून पाहूं लागला. थोड्या वेळाने तो म्हणाला—

"अहो ! असल्या दामदुपटीच्या नोटांवरून सगळे वकील दावे लावतात. तुम्ही कां नाही लावत ?"

तात्या म्हणाले--

"बाबा ! कशाला मी पापाचा धनी होऊं ? असली खोटी वकिली करण्यापेक्षा मी उपाशी राहिलों तरी चालेल."

तो पक्षकार म्हणाला--

"आमच्या गांवच्या लोकांनी पुण्यवान् वकील म्हणून मला तुमच्याकडे पाठविलें आणि तुम्ही तर माझा दावा लावीत नाही. आता मी काय करूं ?"

तात्या म्हणाले--

"हें पहा ! अडीचशे रुपय देऊन पांचशे रुपयांची नोट लिहून घेतली असें म्हणून दावा लावला तर तो दावा एकदम खोटा ठरेल. त्यापेक्षा तूं

पांचशे रुपये दिलेस पण नंतर प्रतिवादीने अडीचशे रुपये तुला परत दिले, अशा स्वरूपाचा आपण दावा लावूं, म्हणजे तुलाही पाप लागणार नाही व मलाही पाप लागणार नाही. नोट पाचशेची असल्यामुळे कोर्टांत खोट्या मार्गाने तुला व्याजासकट पांचशें रुपये मिळतील हें खरें आहे, पण त्यांत तुला पाप लागेल. त्यापेक्षा व्याजासकट अडीचशे रुपये मागण्याने तुला कांहीच पाप लागणार नाही; व तुला मानसिक समाधान लाभेल. "

त्या पक्षकाराने खूप विचार केला. आणि शेवटीं तात्यांनी जो पापपुण्याचा विचार सांगितला तो प्रभावी ठरून त्याचा दावा तात्यांनी लावला.

ही हकीगत सांगून तात्या मला म्हणाले--

" राम ! असल्या वागणूकीमुळें मला पैसे कमी मिळतात; पण मनाला फार मोठें समाधान मिळतें. "

तात्यांनी संसारांत सुखदु:ख खूप अनुभवलें, पण त्यांची शांती कधी ढळली नाही. देवावर त्यांची अपार श्रद्धा होती, आणि ह्या श्रद्धेच्या जोरावर ते नेहमीं आनंदी असत.

संसारांत सुखदु:खें असणारच. असेंही म्हणतां येईल की, सुखदु:खें हें संसाराचें अन्न आहे. लोक हें अन्न कच्चें खातात म्हणून त्यांना त्रास होतो. जो मनुष्य हें सुखदु:खांचें अन्न तत्त्वज्ञानरूपी अग्नीवर शिजवून खातो त्याला तें अन्न रुचकर लागतें व तो आनंदी होतो.

अशा आनंदी माणसांपैकी तात्या होते.

त्यांना कितीहि त्रास झाला तरी ते म्हणायचे--

" अरे राम ! गोपालकृष्ण माझा आहे, तो माझी सारी काळजी करील. "

तात्यांना मीं एकदा म्हटलें--

" तात्या ! तुमची ही श्रद्धा मला द्या हो ! तुम्ही मला कांही पैसा दिला नाही तरी चालेल, पण ही श्रद्धा मला द्या ! "

मी वकील झालों व तात्यांच्या बरोबर वकीली करूं लागलों. पण पैसा पुरत नव्हता.

झालेलें कर्ज फिटत नव्हतें. बायकोच्या अंगावरचे दागिने विकून संसार

ढकलला जात होता. बायको गरभार राहिल्यानंतर डोहाळजेवण करायचें होतें; पण माझ्याजवळ फक्त तीन रुपयें शिल्लक असल्यामुळें डोहाळ-जेंवणाचा बेत रद्द करावा लागला !!

मला कांही सुचेना. मी सुन्न झालों. माझ्या डोळ्यांत पाणी आलें. तात्या म्हणाले--

" राम ! काळजी करूं नकोस. कृष्ण आपला आहे. तो तुझें व तुझ्या बायकोचें खास कल्याण करील. माझ्यावर विश्वास ठेव. सन्मार्ग सोडूं नकोस."

तात्या पैशाने दरिद्री होते, पण मनानें श्रीमंत होते. ते देवाची रोज प्रार्थना करावयाचे. म्हणावयाचे, " प्रार्थना करण्याच्या वेळीं हृदय शब्दशून्य हवें. हृदयशून्य शब्द काय कामाचे ? "

ते राम व कृष्ण ह्या देवांना मानीत व म्हणत, " मानवजातीचें कल्याण करणारीं जीं तत्त्वें, त्या तत्त्वांना मी राम व कृष्ण म्हणतों. "

ते मूर्तिपूजा करीत; पण त्यांना वाटे, मूर्तिपूजेने मनुष्य ध्यान करतां करतां गुणांत लीन होऊन जातो. मात्र जो मूर्तीलाच देव मानतो व गुणांचा विचार करत नाही त्याची मूर्तिपूजा फुकट होय.

ते मला एकदा म्हणाले, " राम ! मला खूप दु:ख असलें तरी मी कृष्णभक्त आहें. कृष्णालाच मी सारथी केलें आहे. अरे, कृष्ण माझा सारथी असल्यावर मला काय कमी आहे ? "

तात्या रोज गीता वाचत. त्यांचें जीवन पाहून मला वाटे, ज्ञान, कर्म व भक्ती ह्यांचा समन्वय गीतेंत आहे व हा समन्वय हेंच गीतेचें रहस्य आहे. अंतरंगांत जी ईश्वरी शक्ती आहे तिचा अनुभव म्हणजे ज्ञान; हा अनुभव प्राप्त होण्याकरितां केली जाणारी क्रिया म्हणजे कर्म व ह्या कर्मांत जेव्हा श्रद्धा ओतली जाते तेव्हा तिला म्हणतात भक्ती.

तात्या मला एकदा म्हणाले, " राम, तुला मी पैसा दिला नाही--वारसा-संपत्ती तुला मिळाली नाही, म्हणून तुला वाईट वाटतें का ? "

माझ्या डोळ्यांत एकदम अश्रू आले. मी म्हणालों—

" तात्या ! तुमचं कृष्णमय जीवन हाच माझा वारसा. कुबेराला लाज वाटेल अशी ही संपत्ती आहे. "

मी सबजज्ज झालों. मानमरातब मिळूं लागला. सांपत्तिक स्थिती सुधारली, पण तात्या वृद्ध झाले. ते म्हणूं लागले, " तरुणपणीं मी चांगल्या तऱ्हेने जगेन कसा ह्याची काळजी वाटे, तर आता मी चांगल्या तऱ्हेने मरेन कसा याची काळजी वाटत आहे. "

त्यांची मरणाची भाषा ऐकून माझी पत्नी त्यांना म्हणाली, " मला आजपर्यंत तुम्ही मुलीप्रमाणं वागवलं. कशाला इतक्या लवकर मला सोडून जातां ? "

तात्या म्हणाले, " यमू ! मरण कुणाच्या हातांत आहे ? देवाची हाक ऐकूं आल्यावर नको का मला जायला ? "

तात्या आजारी पडले, पण ते कुणाची सेवा घेईनात. कडेपर्यंत ते आपल्या पायांनी परसाकडेला जात होते. आम्ही सेवा करूं लागलों म्हणजे ते म्हणावयाचे, " बाळांनो ! देवाचे भक्त व्हा, म्हणजे तुमची सारी सेवा मला पोचेल बरं ! "

तो दिवस भाद्रपदांतील संकष्टीचा होता. सकाळीं तात्या मला म्हणाले,

" आज मी गेलों तर श्राद्ध व पक्ष तुला एकाच दिवशी करतां येईल. "

ह्या विनोदाला हसावें की रडावें !

त्या सकाळीं तात्यांचें जास्ती झालें.

किती तरी वकील, अधिकारी, डॉक्टर, नातलग त्यांच्या भेटीला आले. तात्या सर्वांना नमस्कार करत होते व म्हणत होते, " जातों मी आता ! "

सर्वांच्या डोळयांत पाणी येत होतें. मी, माझा भाऊ (डॉ. ज. के. रानडे) बहिणी साळूताई व योगाताई तात्यांच्या शेजारीं बसून त्यांचें अंग चेपत होतों व सारखे रडत होतों. तात्या म्हणाले, " बाळांनो ! मरणाच्या पूर्वी कोणी रडतं का ? "

आम्ही एकदम अश्रू गाळले तेव्हा तात्या मला म्हणाले--

" राम, गीता वाच ! "

आजपर्यंत मी खूपदा गीता वाचली आहे व म्हटली आहे, पण त्या दिवशीं मला गीता वाचतां येईना व म्हणतां येईना.

शब्द अस्पष्ट येत होते आणि मी कांही तरी म्हणत होतों.

तात्या म्हणत होते—

वासांसि जीर्णानि यथा विहाय
नवानि गृह्णाति नरो पराणि।
तथा शरीराणि विहाय जीर्णा-
न्यन्यानि संयाति नवानि देही ॥

( ज्याप्रमाणे मनुष्य जुनीं वस्त्रें टाकून नवीं धारण करतो, त्याप्रमाणे आत्मा जुनीं शरीरें टाकून नवीं ग्रहण करतो. )

तात्या मला म्हणाले, " मला आता पलंगावरून खाली काढून ठेवा. "

मीं एकदम म्हटलें--

" तात्या ! तुम्हांला जमीन टोचेल. आमच्या हातून हें होणार नाही ! तुम्ही चांगले बोलतां आहां यांतून तुम्हांला बरें वाटेल. "

तात्यांनी आम्हा साऱ्या भावंडांच्या पाठीवरून हात फिरवून म्हटलें.

" हरे कृष्ण ! "

" कृष्ण " म्हणतांच त्यांचा प्राण गेला.

आम्ही साऱ्यांनी इतका वेळ अश्रू आवरले होते. पण बांधल्या तळ्याचा पाट फुटावा व बारा वाटा पाणी मुरडूं लागावें त्याप्रमाणें तात्यांचा प्राण गेल्याबरोबर आम्ही त्यांच्या अंगावर अंग टाकलें व ओक्साबोक्शीं रडत म्हटलें-

" तात्या ! आम्हांला सोडून कसे हो गेलां ! "

भाऊला मीं म्हटलें--

" तूं सुट्टीला इकडे येशील पण तुला तात्या कसे दिसणार ? "

बहिणींना मीं म्हटलें--

" तुमचें माहेरपण मी करीन, पण मी तात्या कोठून आणूं ? "

आम्हांला रडूं आवरेना. पण—

इतक्यांत मी जागा झालों. सूर्य मावळला तरी प्रकाश मागे राहतो त्याचप्रमाणें--

स्वप्न संपलें तरी रडणें मागे राहिलें.

* * *

# स्वप्न

आठवें

मानवी जीवन डोंगराप्रमाणें आहे. ह्या सुखदु:खांच्या डोंगरावर एक आनंदाचें देऊळ आहे. ह्या देवळामध्ये प्रवेश केल्यावर अंतरंगांत निर्माण होणाऱ्या अनुकूल संवेदनांच्या अनंत लाटांचें वर्णन करण्यांत कोणत्याहि भाषेंतील शब्दभांडार अपुरें पडतें.

जेव्हा श्रीकृष्ण माझ्या स्वप्नांत येतो, तेव्हा ह्या देवळांत मी जातों. त्या वेळीं जो अनुपम आनंद मिळतो तो शब्दातीत व वर्णनातीत आहे.

त्या अवस्थेंत सुखानेच सुखाला भोगावें, आनंदानेच आनंदाला आलिंगावें, आणि लाभानेंच लाभाचा लाभ घ्यावा.

तेथे श्रमाला शांति लाभते, विश्रामाला विश्रांति मिळते, आणि अनुभवाला अनुभवाचेंच वेड लागतें.

ईश्वराच्या कृपाप्रसादाने शांतिरूपी ललनेशीं समागम होऊन आपण अत्यानंदाने आत्मस्वरूपांत रममाण होतों.

चंद्र तेथें चंद्रिका, शंभु तेथे अंबिका, संत तेथं विवेका, त्याप्रमाणे श्रीकृष्ण तेथे सुखदु:खाच्या पलीकडील अत्यानंदांची स्थिति.

* * *

त्या दिवशीं मी एके ठिकाणीं प्रवचनाला गेलों होतों. प्रवचनांत मीं सांगितलें--

" मनुष्य जास्तींत जास्त मन:शांतीसाठीं भुकेलेला असतो. सर्व सुखें असून जर एखाद्याला मन:शांति मिळत नसेल तर त्याचें जिणें म्हणजे पराच्या गादीवर कांटे पसरून त्यावर निजण्याप्रमाणें आहे.

क्रोध आला की मन:शांति नाहीशी होते; ह्यासाठीं क्रोधावर विजय मिळविण्याची खटपट करा.

गीतेंत काय किंवा ज्ञानेश्वरींत काय, क्रोधावर फार मोठे कोरडे ओढले आहेत.

क्रोध वाढला म्हणजे मनुष्य काय करील ह्याचा नेम नाही.

एका कज्जांत एका आरोपीला क्रोध आला होता; कारण काय ? तर तो बाहेरून आल्यानंतर त्याच्या बायकोने त्याला पाय धुवायला गरम पाणी देण्याच्या ऐवजी थंड पाणी दिलें.

झालें ! स्वारी भडकली ! त्या आरोपीने घरामधील पहार घेतली व बायकोच्या डोक्यांत पहार हाणून तिचा जीव घेतला.

मित्र हो ! आपण क्रोध ताब्यांत ठेवायची जास्तींत जास्त खटपट करा. तो सॉक्रेटिस पहा.

ह्याची बायको फार कजाग होती. ती नेहमी नवऱ्याला शिव्या द्यावयाची, पण सॉक्रेटिस थंड असे.

एकदां ह्या बाईने आपल्या नवऱ्यावर शिव्यांचा कडाकडाट केला; पण सॉक्रेटिसची शांति ढळली नाही.

शेवटीं चिडून त्याच्या बायकोने पाण्याचा हंडा सॉक्रेटिसाच्या डोक्यावर ओतला.

तेव्हा सॉक्रेटिस म्हणाला—

" मेघांचा कडकडाट झाल्यानंतर पाऊस पडलाच पाहिजे ! "

सॉक्रेटिसाची बायको कजाग होती, त्याचप्रमाणें संत तुकाराम ह्याची बायको देखील कजाग होती.

एकदा तुकाराम महाराजांनी शेतांतून उसाची मोळी आणली; पण वाटेंत ज्या ज्या मुलांनी ऊस मागितला त्यांना त्यांनी ऊस देऊन टाकले. शेवटीं ते घरांत एकच ऊस घेऊन आले.

स्वतःच्या मुलांच्यासाठीं ऊस न आणतां वाटेंतल्या मुलांना ऊस देऊन टाकल्याबद्दल तुकारामांची बायको फार संतापली.

तिने रागाच्या भरांत तो ऊस आपल्या नवऱ्याच्या पाठींत मारला, व ऊसाचे दोन तुकडे झाले.

तुकाराम शांतपणें म्हणाले—

" अग ! तुला लोक नांवें ठेवतात, पण तूं किती चांगली आहेस ! मीं एकच ऊस आणला पण तूं त्याचे दोन तुकडे केलेस-- एक तुला व एक मला ! "

ह्या गोष्टी सांगितल्यावर माझ्या तोंडून एकदम शब्द आले—

" ह्या गोष्टींमध्ये शांतीची परमावधी आहे. आपण मात्र इतके शांत होऊं नका ! "

हे शब्द ऐकल्यावर श्रोत्यांमधून एकदम हास्याचा मोठा फवारा उडाला.

* * *

त्या रात्रीं माझ्या स्वप्नांत गोपालकृष्ण आल्यावर मीं विचारलें--

" देवा, सॉक्रेटिसाने अथवा तुकाराममहाराजांनी जें वर्तन केलें त्याप्रमाणे इतरांनी वर्तन करावें काय ? "

गोपालकृष्णांनीं स्मित केलें व म्हटलें--

" हें पहा ! ह्या बाबतींत कांही मूलभूत नियम लक्षांत घे, म्हणजे बरें. माणसाने **स्वकर्म** करावें. स्वकर्माच्या पुष्पांनी मनुष्याने देवाची पूजा केली

म्हणजे त्याला सिद्धि मिळते.

**स्वकर्मणा तमभ्यर्च्य सिद्धिं विंदति मानवः ।**

स्वकर्म ह्याचा अर्थ--

जें शास्त्राला धरून आहे व जें स्वभावधर्माला अनुसरून आहे. एखादें कर्म स्वकर्म तेव्हाच होतें की जेव्हा तें शास्त्र व स्वभावधर्म ह्या दोन्हींना धरून असतें.

**यः शास्त्रविधिमुत्सृज्य वर्तते कामकारतः ।**
**न स सिद्धिमवाप्नोति न सुखं न परां गतिम् ।।**
**स्वभावजेन कौंतेय निबद्धः स्वेन कर्मणा ।।**

हें उत्तर ऐकून मला फार बरें वाटलें. मीं देवाला म्हटलें--

" देवा ! शास्त्र- नीतिशास्त्र- जेव्हा एकच नियम सांगतें तेव्हा फारशी पंचाईत नसते. पण जेव्हा शास्त्र एकापेक्षा अधिक पर्याय सांगतें तेव्हा आपल्या स्वभावधर्माला अनुसरून जो पर्याय असेल त्याप्रमाणें वर्तन करणें हेंच आपलें स्वकर्म. उदाहरणार्थ—

" एकनाथमहाराज आंघोळ करून येत असतांना त्यांच्या अंगावर एक दुष्ट मनुष्य चूळ थुंकत असे व त्यामुळें एकनाथमहाराज पुन्हा आंघोळ करण्यास जात असत. अशा वेळीं दुष्टाचा प्रतिकार न करतां आपण शांति धारण करावी हा एक शास्त्राचा पर्याय, व दुष्टाचा प्रतिकार करावा हा शास्त्राचा दुसरा पर्याय. एकनाथमहाराजांचा स्वभावधर्म पहिल्या पर्यायाला अनुकूल असल्यामुळे त्यांनी त्या दुष्टाचा प्रतिकार न करतां शांति धारण केली, म्हणून तें त्यांचें स्वकर्म झालें. त्यांची ती शांति पाहून त्या दुष्टाला पश्चात्ताप झाला व तो त्यांच्या पाया पडला. दुसऱ्या एखाद्या मनुष्याचा स्वभावधर्म दुष्टाचा प्रतिकार करावा ह्या पर्यायाला अनुकूल असेल तर त्या दुष्टाचा प्रतिकार करणें हें त्यांचें कर्तव्य ठरेल. "

माझा हा विचार गोपालकृष्णाला पटला.

अन् मला खूप आनंद झाला.

मीं गोपालकृष्णाला विचारलें--

" पांडवांच्यावर कमालीचा अन्याय झाला होता. अर्जुनाने युद्ध करणे

न्यायाचें होतें. तें शास्त्राला धरून होतें. शिवाय युद्ध हें अर्जुनाच्या स्वभाव-धर्माला अनुकूल होतें. म्हणून युद्ध करणें हें अर्जुनाचें स्वकर्म ठरत असल्यामुळें तूं त्याला

तस्मात् युध्यस्व ।

असें म्हटलेंस हे ठीक झालें; पण समज–

दुर्योधनाने तुला विचारलें असतें–

युद्ध करूं कीं नको ?

तर तूं काय उत्तर दिलें असतेंस ? ”

गोपालकृष्ण म्हणाले–

“ अरे ! युद्ध करणें हें दुर्योधनाच्या स्वभावधर्माला अनुसरून आहे; पण त्याचा पक्ष अन्यायाचा आहे. त्यानें युद्ध करणें हें न्यायाला – नीतीला – शास्त्राला धरून नाही. त्यामुळे युद्ध करणें हें त्याचें स्वकर्म ठरत नाही. म्हणून युद्ध करूं नको, असेंच मी दुर्योधनास सांगितलें असतें. ”

हें उत्तर ऐकून मला फार आनंद झाला.

मला विवेकानंदांची गोष्ट आठवली.

स्वामी विवेकानंद बोटींतून हिंदुस्थानला येत होते. डेकवर ते उभे असतांना एक बिशप हिंदुधर्माला खूप शिव्या देऊं लागले.

विवेकानंद त्यांना म्हणाले–

निरनिराळे धर्म म्हणजे नद्या आहेत. त्या ज्या समुद्राला जाऊन मिळतात त्याचें नांव परमेश्वर. अशा परिस्थितींत आपण कशाला आमच्या धर्माला शिव्या देतां ? ”

बिशप म्हणाले–

“ अरे ! तुझा धर्म मूर्खांचा, खुळचांचा व बावळटांचा आहे. तुझ्या धर्माला एकदां नाही, दोनदा नाही, तर हजारदां शिव्या देईन .”

असें म्हणून तो बिशप हिंदुधर्माला जोरजोराने शिव्या देऊं लागला. तेव्हा विवेकानंदांनी त्याचा हात पकडला व दरडावून म्हटलें—

" दे पाहूं शिव्या ! जर का माझ्या धर्माला तूं शिव्या दिल्यास तर तुला खाली समुद्रांत फेकून देतों."

मात्रा बरोबर लागू पडली.

तो बिशप म्हणाला—

" चुकलों. माफ करा. पुन्हा हिंदुधर्माला शिव्या देणार नाही."

ह्या ठिकाणीं विवेकानंदांनी जें वर्तन केलें तें त्यांच्या स्वभावधर्माला धरून होतें. त्याचप्रमाणें धर्माला — न्यायाला — नीतीला तें धरून होतें.

म्हणून गोपालकृष्णांच्या भाषेंत, तें त्यांचें स्वकर्म होतें.

स्वकर्म ह्याचा उलगडा मला झाला व मी गोपालकृष्णाला म्हटलें—

" देवा ! तुझे मूलभूत विचार ऐकून मी धन्य झालों."

आणखी कांही प्रश्न विचारावेत म्हणून मीं म्हटलें—

" देवा ! गीतेच्या सहाव्या अध्यायांत तूं ध्यानयोग सांगितला आहेस तो फार चांगला आहे. युक्त आहार-विहार व मनाचें संयमन ह्याबद्दलचे नियम उत्तम आहेत. मला आणखी कांही परवलीचीं अथवा खुणचीं वाक्यें सांग."

गोपालकृष्ण हसून म्हणाले—

" आपण कोण हें जाणून घेणें मुख्य काम आहे, व हें जाणण्याकरता ध्यानयोग साधन आहे.

" ध्यानयोग साधण्याकरता अहंकारनाशाची अत्यंत आवश्यकता आहे. जोपर्यंत अहंकार आहे तोपर्यंत ध्यानयोग साधत नाही.

तूं आणखी असेंहि लक्षांत घे की—

अंतरगांत जी दिव्य शक्ति आहे तिचा साक्षात्कार होण्यासाठी आर्तता निर्माण झाली म्हणजे ध्यान जुळतें."

मला तुकाराम व रामदास ह्यांच्या वचनांची आठवण झाली. तुकाराम म्हणतात–

> बा रे पांडुरंगा केव्हां भेट देशी ।
> झालों वनवासी तुझ्याविण ।।

रामदास म्हणतात––

> धावरे रामराया किती अंत पाहसी ।
> प्राणान्त मांडयेला न ये करुणा कैसी ।।

यामध्ये जी आर्तता आहे ती निर्माण झाली म्हणजे ध्यान जुळतें.

मीं देवाला म्हणटलें–

" देवा ! सहाव्या अध्यायांत गीतेंत तूं जो ध्यानयोग सांगितला आहेस तो बिनधोक करण्यासारखा आहे. पण ज्ञानेश्वरींत ध्यानयोग सांगतांना कुंडलिनी जागृत करण्याचा जो प्रयोग सांगितला आहे तो धोकादायक आहे. किती तरी लोक ज्ञानेश्वरी वाचून तो प्रयोग करतात. असला प्रयोग सद्-गुरूच्या मदतीशिवाय करणें चांगलें नसतें; पण ज्ञानेश्वरी वाचून मोह होतो व त्याप्रमाणें किती तरी लोक कुंडलिनी जागृत करण्याचा प्रयोग सुरू करतात, पण ह्या खटाटोपापायीं किती तरी लोक वेडे झाले आहेत. त्यांच्या शरीरावर व मनावर विपरीत परिणाम झाले आहेत. त्यांना उपाय काय ?"

गोपालकृष्ण म्हणाले—

" तूं जें केलेंस तें योग्य आहे. तुझ्या अनुभवापासून लोकांना पुष्कळच शिकण्यासारखें आहे. "

गोपालकृष्णांची मूर्ती अदृश्य झाली; आणि-–

माझ्या जीवनांत पूर्वी जो प्रकार झाला तो जशाचा तसा मला पुन्हा स्वप्नांत दिसूं लागला.

मी ज्ञानेश्वरी वाचत होतों. सहाव्या अध्यायांत ज्ञानेश्वर म्हणतात––

आता आंगाते आंग वरी ।
पवनाते पवनुचि वरी ।
ऐसी अनुभवाची उजरी ।
होंचि लागे ॥ १९० ॥

आसनावर बसल्यावर अंगाला अंग आपण होऊन सावरून धरतें. वायूला वायु आवरून धरतो. ह्याप्रमाणे अनुभवाचा उदय सुरू होतो.

मुद्रेची प्रौढी ऐसी ।
तेचि सांगिजेल आता परियेसी ।
तरी उरू ह्या जघनासी ।
जडोनि घाली ॥ १९२ ॥

मुद्रेची थोरवी अशी आहे. तीच आता सांगतों ऐक. पोटऱ्याला चिकटून मांडी घालावी.

ज्ञानेश्वरांनी पुढे म्हटलें होतें--

दोन्ही तळपाय वाकड करून ते गुदस्थानावर शिवणीपाशी चांगले स्थिर राहतील असे बळकट बसवावेत. खाली उजव्या पायाची टाच घालून तिने शिवण दाबावी. गुद व शिस्न ह्यांमध्ये जी चार बोटें जागा आहे त्यापैकी दीड बोटें वर, दीड बोटें खाली जागा सोडून मधल्या एक बोटाच्या जागेवर उजव्या पायाच्या टाचेच्या वरच्या बाजूने आपलें अंग वर तोलून घट्ट दाबावें. थोडया प्रमाणांत पाठीचा खालचा भाग उचलावा व त्याचप्रमाणे दोन्ही घोटे उचलून धरावेत. हें मूळबंधाचें लक्षण आहे. ह्यालाच वज्रासन असें गौण नांव आहे. ह्याप्रमाणे आधारचक्रावर मूळबंध बरोबर जुळला म्हणजे अपानवायु आंतल्या बाजूस संकोच पावूं लागतो....मग गळा आकुंचित होऊन गळयाच्या खळगींत हनुवटी अडकून बसते. असा जो बंध होतो त्याला जालंधर बंध म्हणतात....शिस्नावरील काठास व बेंबीच्या खालच्या भागास जो बंध पडतो त्याला वोढियाणा बंध म्हणतात...मग अपानवायु खवळतो व मणिचक्राला धक्के देतो...दुसरीकडे वज्रासनाची उष्णता कुंडलिनीला जागृत करते. जागृत झालेली कुंडलिनी वायूस खाऊन टाकते,

मासाचे लचके तोडते व हृदयाच्या ठिकाणचेहि एक दोन घास खाते. ती सप्तधातूंचा समद्र पिऊन टाकते···नाड्यांचें वाहणें बंद पडतें व वायूचे नऊ प्रकार गेल्यामुळे शरीराचे धर्म राहत नाहीत. ईडा व पिंगला या दोन्ही नाड्या एक होतात···मग दांत नवे येतात. नखें नवीं येतात. देह वायूसारखा हलका होतो. मग तो मनुष्य समुद्राच्या पलीकडेच पाहतो; स्वर्गातील विचार ऐकतो व मुंगीचें मनोगत ओळखतो. तो वायूवर बसतो व पाण्यावर चालतो.

मग समुद्रापैलाडी देखे। स्वर्गीचा आलोचु आइके।
मनोगत वोळखे। मुंगियेचे ॥
पवनाचा वारिका वळघे। चाले तरी उदकी पाउल न लागे।
येणे येणे प्रसंगे। येती बहुता सिद्धि ॥ २६९।२७० ॥

कुंडलिनी जागृत झाल्यावर अशा सिद्धि मिळत असल्यामुळे साहजिकच ज्ञानेश्वरी वाचून आपणाला मोह होतो व आपण ज्ञानेश्वरी पाहून प्रयोग करूं लागतों.

मला मात्र ध्यानयोगाचे प्रयोग करून खूप खूप त्रास झाला.

माझी प्रकृती पार बिघडून गेली. माझें मनःस्वास्थ्य नाहीसें झालें.

रस्त्यांतून चालू लागलों म्हणजे मी खाली पडतों का, अशी भीति वाटायची. कोर्टांत कामाला बसलों म्हणजे खुर्चीवरून मी खाली पडतों अशी भावना व्हावयाची.

जेवण नीट जाईना. झोप बरोबर येईना. मन सदा बेचैन असायचें.

मला तें जिणें नकोसें झालें. लौकिक दृष्ट्या माझें जीवन चांगलें होतें.

राहण्यास बंगला होता. पगार मोठा होता. फाशी देण्याच्या अधिकार होता. घरांत प्रेमळ माणसांचा सहवास होता.

पण—

माझ्या मनांत आत्महत्त्येचे विचार येत असत.

डॉक्टरना माझी प्रकृति दाखवली. त्यांनी ब्लडप्रेशर पाहिलें पण ब्लडप्रेशर नव्हतें.

त्यांनी लघवी तपासली, पण मधुमेहाचें चिन्ह कांहीच नव्हतें.

इंग्लंडमध्ये एकदा कांही अमेरिकन डॉक्टर गेले. दवाखान्यांत प्रत्येक रोग्याजवळ एका कार्डावर त्याचा रोग लिहिलेला होता.

कांही रोग्यांच्या बाबतींत, G. O. K. असें लिहिलें होतें.

अमेरिकन डॉक्टर इंग्लिश डॉक्टरांना म्हणाले—

" अहो ! आमच्या अमेरिकेंत खूप रोग आहेत; पण G. O. K. रोग अद्याप आमच्या पाहण्यांत नाही. "

" अहो ! G. O. K. म्हणजे God Only Knows. फक्त देवालाच माहीत ! "

★ ★ ★

मी देखील G. O. K. रोगाने पछाडलों होतों. माझ्या दुखण्याचें निदान डॉक्टरांना होत नव्हतें, व दुखण्याचें निदान होत नसल्यामुळे मला जास्तच काळजी वाटत होती.

मी खूप काळजी करूं लागलों, पण त्यामुळे माझें दुखणें बरें होण्याच्या ऐवजीं वाढतच गेलें.

शेवटीं मी खूप खूप पुस्तकें वाचलीं व जास्तींत जास्त विचार केला.

मला वाटलें—

संपूर्ण विसावा — शारीरिक व मानसिक विसावा — हा प्रयोग करून पाहावा.

पातंजल योगशास्त्रांत—

' स्थिरं सुखमासनम् '

असें म्हटलें आहे.

मी कॉटवर पडूं लागलों. शरीर निश्चल ठेवण्याचा प्रयोग सुरू केला. हा प्रयोग प्रथम अवघड वाटला, पण कांही दिवसांनी जुळला.

माझें शरीर अगदी निश्चल राहूं लागलें. एकएक तासभर मी कॉटवर निश्चल स्थितींत राहूं लागलों.

मला नुसता शारीरिक विसावा नको होता, तर मानसिक विसावा देखील पाहिजे होता.

मी मन निश्चल ठेवण्याचा प्रयत्न करूं लागलों.

पण मन निश्चल करणें महा कर्म कठीण आहे.

मन जितकें दाबावें तितकें जास्त उसळ्या मारतें.

मनांत विचार आणायचे नाहीत असें ठरवलें तर वाटेल ते विचार येतात.

मीं खूप प्रयत्न केला, पण मनांत कांहीच विचार आणावयाचा नाही हा प्रयोग साधला नाही.

शेवटीं मी ठरवलें कीं, मनांत देवाशिवाय कोणताच विचार आणायचा नाही.

हा प्रयोगहि कठीण आहे, पण बराच प्रयत्न केल्यावर हा प्रयोग साधला.

माझें शरीर निश्चल राहूं लागलें.

माझ्या मनांत देवाशिवाय कोणताच विचार येईनासा झाला.

मला शारीरिक व मानसिक विसांवा मिळूं लागला.

हा प्रयोग कल्पनातीत गुणकारी ठरला.

कोंबड्याला तुरा फुटावा, किंवा मोर आनंदाने नाचूं लागावा, अथवा आकाशांत इंद्रधनुष्य चमकावें त्याप्रमाणें माझी अवस्था झाली.

माझ्या मनाला शांतीचा तुरा फुटला. तें आनंदानें नाचूं लागलें व निरोगीपणाचें इंद्रधनुष्य माझ्या जीवनांत चमकूं लागलें.

* * *

मी एकदम जागा झालों. मला वाटूं लागलें--

मनाच्या आकाशांत जो जादूगार आहे तो सर्वश्रेष्ठ आहे. मनाच्या आकाशांत जो अद्‌भुत प्रकाश आहे तो विद्युद्दीपांच्या प्रकाशाप्रमाणे जड नाही–त्यांत चैतन्य आहे. पारिजातकाच्या फुलांनी भरलेली परडी लवंडावी व फुलें जमिनीवर ओघळावीं त्याप्रमाणे मनाच्या आकाशांत चैतन्याच्या तारका ओघळलेल्या दिसतात.

तो अद्‌भुत जादूगार आणि त्या चैतन्याच्या तारका पाहतां पाहतां वाल्मिकींना रामायणाचा व व्यासांना महाभारताचा साक्षात्कार झाला असेल.

अन्

त्याच जादुगाराच्या प्रभावानें आणि तारकांच्या प्रकाशाने मला निरोगीपणाचा साक्षात्कार झाला.

मीं मनाशींच म्हटलें —

देव देवळांत नाही, मशिदींत नाही, चर्चमध्ये नाही तर तो प्रत्येकाच्या अंतःकरणांत आहे.

* * *

नववें

# स्वप्न

सुंदर टिपूर चांदणं बरसत असावं, सुकुमार गुलाब पुष्पांच्या सुगंधाची हळुवार तरल लहर यावी, प्राणाहून प्रिय असलेल्या पत्नीचे प्रेमाचे शब्द ऐकूं यावेत—अशा वेळीं जो आनंद होतो त्या आनंदापेक्षा सहस्र पटींनी मोठा आनंद दिव्य स्वप्नांत आपणाला मिळतो.

टेनिसननें असें म्हटलें आहे,

**Thou art so full of misery**
**Were it not better not to be ?**

तूं इतका दुःखानें भरला आहेस की, तूं उत्पन्न झाला नसतास तर बरें

झालें असतें.

हा विचार एकांगी आहे. मानवी जीवनांत दुःख आहे त्याचप्रमाणें सुख देखील आहे. सुखदुःखांच्या पलीकडे जाण्याची शक्ती म्हणजेच खरा आनंद मिळण्याची युक्ती.

आपणाला दिव्य स्वप्नें पडूं लागल्यानंतर आपण एका विशिष्ट तंद्रींत जातों व स्वतःशींच म्हणतों—

आठवतां आठवतां आठवण विसरावी।
मीपणाचीं सारीं टरफलें निघून जावीं।
ध्यानीं मनीं देवरूप येई।
दुःखाची काळजी सरूनि जाई॥

आमच्या घरीं चार पिढ्यांचें गोपालकृष्ण हें दैवत आहे. गोपालकृष्ण आपल्या स्वप्नांत यावा म्हणून मी जास्तींत जास्त खटपट करीत असतों.

ह्या बाबतींत अनुभवाचा मंत्र असा की, गोपालकृष्णाला जास्तींत जास्त आवड म्हणजे गीतेची अन् ध्यानीं मनीं गीतेचा विचार सुरू झाला म्हणजें कृष्णाला स्वप्नांत यावेंसें वाटतें.

असें म्हणतात कीं टीकाकारांचे चार प्रकार आहेत—

(१) शुक (पोपटपंची करणारे)

(२) पिक (स्तुती करणारे)

(३) बक (धूर्त)

(४) काक (चोच्या मारून निंदानालस्ती करणारे)

मला वाटतें, असल्या टीकाकारांच्यापेक्षां ज्या टीकाकारांची टीका अनुभवावर अधिष्ठित आहे तेच खरे टीकाकार.

आद्य श्रीशंकराचार्य, ज्ञानेश्वर, लोकमान्य टिळक अशांसारख्या टीकाकारांनी गीतेवर टीका करतांना आपल्या अनुभवावर जोर दिला म्हणूनच त्यांच्या टीकांना महत्त्व प्राप्त झालें आहे.

गीतेमध्ये असें म्हटलें आहे की—

यज्ञानां जपयज्ञोऽस्मि ।

जपयज्ञाला गीतेने फार महत्त्व दिलें आहे. आपण देवाचें नांव जिभेने न घेतां अंतःकरणांत घेऊं लागलों म्हणजे आंतून एक रम्य सुरम्य नाद ऐकूं येतो. त्याला आपण अनाहत नाद म्हणू.

उत्कृष्ट गवयाचें गाणें ऐकतांना जितका आनंद होतो त्यापेक्षा हजारो पटींनी आनंद तो अनाहत नाद ऐकून होतो.

आपण त्या नादांत रंगून जातों. आपणाला वाटूं लागतें की देवच जप करीत आहे व आपण गप्प बसून ऐकत आहों. आणि आपली ब्रह्मानंदीं टाळी लागली आहे.

संत कबीराने देखील म्हटलें आहे—

राम हमारा जप करे। हम बैठे आराम ।

गीता माझ्या डोळ्यांपुढें होती आणि मी विचारतंद्रींत मग्न झालों होतों. लोकांना आपण मोठे व्हावेसें वाटतें. गीतेने ह्या बाबतींत चांगुलपणावर विशेष भर दिला आहे. मला एकदम शेक्स्पीअरची आठवण झाली. तो म्हणतो—

He is not great who is not greatly good.

जो फार चांगला असत नाही तो मोठा असत नाही.

विचारतंद्रींत असतांना मला केव्हा झोप लागली तें कळलें नाहीं. झोपेंत मला स्वप्न पडलें.

स्वप्नांत गोपालकृष्ण माझ्यापुढे आले व मला म्हणाले—

" ज्ञानेश्वरीचे पंचप्राण ह्या विषयावर प्रवचन कर. "

मी व्यासपीठावर बसलों. माझ्यासमोर हजारो स्त्रीपुरुष बसले होते. लाउडस्पीकरची व्यवस्था चांगली होती.

मला सारखी गोपालकृष्णाची मूर्ती दिसत होती व मी बोलत होतों. मला वाटत होतें की—

मी बोलत नसून गोपालकृष्णच माझ्या मुखांतून बोलतो आहे.

एका विशिष्ट भावावस्थेंत मी प्रवचन देत होतों. सारी सभा मंत्रमुग्ध होऊन प्रवचन ऐकत होती. माझ्या तोंडून शब्द फुटत होते,

साहित्यदेवी मराठी पद्यप्रांतांतून प्रवास करीत असतांना तिला पडलेलें भव्य, रम्य व दिव्य स्वप्न म्हणजे ज्ञानेश्वर.

मारुतीनें जन्मल्याबरोबर सूर्यबिंब ग्रासायला उडी मारावी त्याप्रमाणे मराठीच्या जन्मकाळीं ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी लिहून इतकी उंच उडी मारली की तितकी उंच उडी मराठीमध्ये अद्याप कोणत्याही पुस्तकाने मारली नाही.

आकाशाला उपमा आकाशाची, सागराला उपमा सागराची, त्याप्रमाणे ज्ञानेश्वरीला उपमा ज्ञानेश्वरीचीच.

ह्या ज्ञानेश्वरीचे पंचप्राण आपण समजून घ्या व त्याप्रमाणे वागा, म्हणजे तुमचें जीवन उच्च, उदात्त व उत्तुंग होईल. हे पंचप्राण म्हणजे जीवनाची शिदोरी आहे. ही शिदोरी द्रौपदीच्या थाळीप्रमाणे तुम्हांला केव्हाही उपयोगी पडेल.

पहिला प्राण प्रयत्नवाद हा आहे. दैव मोठें कीं प्रयत्न मोठा, हा वाद झाड आधी कीं बी आधी ह्या वादाप्रमाणे सदान्कदा चालणारा आहे; पण आपण अशी खूणगाठ बांधा की, जगांत जे लोक मोठे झाले त्यांनी प्रयत्नवादावर भर दिला होता.

म्हणोनि अभ्यासासि कांही ।
सर्वथा दुष्कर नाही ।

असें म्हणून ज्ञानेश्वरीने प्रयत्नवादावर भर दिला आहे.

संत दैववादी असतात ही समजूत चुकीची आहे.

असाध्य तें साध्य करितां सायास ।
कारण अभ्यास तुका म्हणे ।।

असें तुकोबांनी म्हटलें आहे.

रामदास तर ह्याच्याही पुढे जाऊन म्हणतात की--

यत्न तो देव जाणावा ।

एडिसनचे ते प्रख्यात उद्गार लक्षांत ठेवा. तो म्हणतो--

What is meant by extraordinary talent ?

It is nothing but two percent inspiration and ninety-eight percent perspiration.

अलौकिक बुद्धिमत्ता म्हणजे दुसरें तिसरें कांही नसून दोन टक्के प्रतिभा व अठ्याण्णव टक्के प्रयत्न होय.

पाश्चात्य लोक म्हणतात कीं—

ज्यांना ह्या जगांत मोठें व्हायचें आहे त्यांनीं जास्तींत जास्त प्रयत्नवादावर जोर देणाऱ्या डेमॉस्थिनीसचें उदाहरण लक्षांत ठेवावें.

डेमॉस्थिनीसची महत्त्वाकांक्षा होती की—

आपण जगांत पहिल्या प्रतीचा वक्ता व्हावें; पण त्याला तोतरें बोलण्याची खोड होती.

ही खोड नाहीशी करण्याकरितां तो तोंडांत गोट्या घालायचा व समुद्रावर जाऊन खूप मोठ्याने ओरडायचा. ह्या प्रयोगामुळे त्याचा तोतरेपणा गेला.

त्याला बोलतांना दम लागायचा. हा दोष नाहीसा करण्याकरिता तो डोंगरावर पळत वर जायचा व पळत खाली यायचा. ह्यामुळे त्याचा दम लागण्याचा दोष नाहीसा झाला.

त्याला बोलतांना उपमा-अलंकार यायचे नाहीत. त्याने उपमा-अलंकारांनी भरलेले एक भलें मोठें पुस्तक घेतलें आणि तें अथपासून इतिपर्यंत तोंडपाठ केलें.

त्याचे सारे दोष नाहीसे झाले. पण एक महान दोष राहिला. त्याला बोलतांना खांदे उडविण्याची वाईट खोड होती.

एक तास सुंदर बोलल्यानंतर तो लोकांना विचारी—

"कसें काय भाषण झालें ?"

तेव्हा लोक म्हणत—

"अरे डेमॉस्थिनीस ! आज तुझा उजवा खांदा चौसष्टदा वरती गेला व डावा खांदा त्रेसष्टदा वरती गेला."

लोकांचें आपल्या भाषणापेक्षा आपल्या खांद्यांकडे लक्ष असतें हें पाहून डेमॉस्थिनीस निराश झाला. पण त्याने प्रयत्न सोडला नाही.

त्यानें खांद्यांची खूप समजूत घातली, पण भाषण सुरू झालें की त्याचे खांदे आलटून पालटून वर जायचे.

शेवटी त्याने जास्तींत जास्त प्रयत्नवादाची कास धरून एक जालीम प्रयोग केला.

तो खोलींत कोपऱ्यांत उभा राहायचा. खोलीला आंतून कडी लावलेली असे. उजव्या खांद्याच्या वर एक नंगी तलवार टांगलेली असे. डाव्या खांद्या-दुसरी नंगी तलवार टांगलेली असे.

तो जोराने बोलूं लागे. जर का चुकून उजवा खांदा वर गेला की तो रक्तबंबाळ व्हायचा. जर का चुकून डावा खांदा वर गेला की तो रक्तबंबाळ व्हायचा.

त्याचे खांदे म्हणूं लागले—

" बाबांनो ! आता वर जाणें सोपें नाही !

ह्या जाज्वल्य प्रयोगामुळें डेमॉस्थिनीसचा शेवटचा महान दोष नाहीसा झाला व हा प्रयत्नांचा मेरुपर्वत जगांत पहिल्या प्रतीचा वक्ता झाला.

मित्रहो ! दुसरा प्राण अहंकारनाश हा आहे. ज्ञानेश्वरीमध्यें अहंकार-नाशावर फार जोर दिला आहे. ज्ञानेश्वर स्वतःविषयीं म्हणतात—

**आम्ही एक जाणा दीन नाथपंथी।**
**नीचाहुनी आम्ही अतिनीच।**

मानवी जीवनांत मनःशांती मिळविण्यासाठी अहंकारनाश हें रामबाण औषध आहे. कापरांत ज्याप्रमाणे सुवास, अत्तरांत ज्याप्रमाणें सुगंध, रत्नांत ज्याप्रमाणे तेज त्याप्रमाणे अहंकारनाशांत मनःशांती सांठवलेली असते.

आपण असें लक्षांत घ्या की—

**जो नम्र झाला भूता। त्याने कोंडिले अनंता।।**

जो स्वतःला शहाणा समजतो तो मूर्ख असतो, व जो स्वतःला फार शहाणा समजतो तो फार मूर्ख असतो.

जे खरे मोठे लोक असतात त्यांना अहंकाराचा वारा शिवत नाही.

एवढा मोठा सॉक्रेटीस. त्याने स्वर्गातील तत्त्वज्ञान पृथ्वीवर आणलें असें सार्थत्वाने म्हटलें जातें; पण तो इतका नम्र की तो स्वतःबद्दल म्हणतो–

**All I know is that I know nothing.**

मला जें माहीत आहे तें इतकेंच की, मला कांहीच माहीत नाही.

शहाण्यांचा मेरुमणी न्यूटन. तो वाळवंटांत उभा असतांना त्याचे भक्तगण म्हणाले—

"जगांतील सारें ज्ञान तुमच्याजवळ आहे. तुमच्याइतका विद्वान आजपर्यंत झाला नाही."

न्यूटनने वाळवंटातले चार कण हातांत घेतले, व म्हटलें—

"जगातील सारें ज्ञान ह्या अफाट वाळवंटाइकें आहे व माझें ज्ञान ह्या वाळूच्या चार कणांइतकें आहे."

महात्मा गौतम बुद्ध एवढे मोठे विद्वान. ते एका झाडाखाली उभे होते. त्यांचे भक्त त्यांना म्हणाले––

"जगांतील यच्चयावत् ज्ञान आपणांजवळ आहे. आपणांइतका विद्वान जगांत कोणीच नाही."

गौतम बुद्धांनी झाडावरचीं चार पानें आपल्या हातांत घेतलीं, व भक्तगणांना तीन प्रश्न विचारले.

"ह्या झाडावर पानें किती ?"

कुणाला बरोबर उत्तर देतां आलें नाही.

दुसरा प्रश्न--

"ह्या जगांत झाडें किती ?"

कुणाला बरोबर उत्तर देतां आलें नाही.

तिसरा प्रश्न--

"जगांतल्या साऱ्या झाडांवर पानें किती ?"

ते भक्त काय उत्तर देणार ? गौतमबुद्ध म्हणाले,

"जगांतल्या साऱ्या झाडांवर जितकीं पानें आहेत तितकें ज्ञान अफाट आहे. आणि माझें ज्ञान फक्त ह्या चार पानांएवढें आहे.

"हा नम्रपणा अंगीं बाणवण्यास शिका; अहंकाराला झुरळाप्रमाणे झटकून टाका व जीवनाची मौज लुटा.

इंग्लिशमध्ये एक वाक्य आहे—

**Peace of mind comes when egoism or egotism vanishes.**

जेव्हा अहंकार निघून जातो तेव्हा मनःशांती प्राप्त होते.

तिसरा प्राण समाजसेवेबद्दलचा आहे. ज्ञानेश्वरीमध्ये भक्तीवर विशेष जोर दिला आहे. ह्या भक्तीमध्ये समाजसेवा आहे. अहंकारनाश आहे, व कर्तव्यकर्म केल्यानंतर त्याचें फळ ईश्वराला अर्पण करण्याची बुद्धी आहे.

असें म्हणतां येईल की, समाजसेवेच्या गंधाक्षतांनी, कर्तव्यकर्मांच्या पुष्पांनी, अहंकारनाशाच्या धूपारतीने अंतःकरणातील दिव्य शक्तीची केलेली पूजा म्हणजे भक्तिमार्ग.

एकनाथांना समाजांतच देव दिसत होता. आणि भक्तिमार्गावर जास्तींत जास्त जोर देणारे व " भक्तिप्रेमाविण ज्ञान नको देवा " असें म्हणणारे एकानाथमहाराज समाजाला देव मानून त्याची सेवा करीत होते.

ज्ञानेश्वरांनी देखील पराकाष्ठेची समाजसेवा केली व ज्ञानेश्वरीच्या-वाचनाने एकनाथांना वाटूं लागलें की —

समाजांत देव आहे, पण देव पाहण्यासाठी अहंकार सोडला पाहिजे. ते म्हणतात —

जनीं आहे जनार्दन ।
तयातें पहावया सांडी अभिमान ।

समाजाने ज्ञानेश्वरांचा खूप छळ केला,. पण ज्ञानेश्वरांनी समजाची जास्तींत जास्त सेवा केली व छळणाऱ्या लोकांच्याही विरुद्ध वांकडें न बोलतां ज्ञानेश्वरींत पसायदान मागताना म्हटलें —

दुरिताचें तिमिर जावो । विश्व स्वधर्मसूर्यें पाहो ।
जो जें वांछील तो तें लाहो । प्राणिजात ॥

सेवा करणाऱ्या कांही लोकांना वाटतें —

आपण समाजसेवा करतों त्याबद्दल समाजाने आपल्याभोंवतीं दिवे ओवाळावे.

मानसन्मानाकरिता कांही लोक इतके हपापलेले असतात की, आपल्या भोंवतीं कोण दिवे ओवाळीत नसले तर दिव्याभोंवतींच आपलें तोंड ते ओवाळून घेत असतात.

ज्ञानेश्वरी ज्याला कळली तो समाजसेवा करतो, पण मानसन्मानाची इच्छा बाळगीत नाही.

नोबेल पारितोषिकासारखा बहुमान स्वीकारण्यास फ्रेंच लेखक जॉपोल सार्त्र ह्यांनी नकार दिला. बर्नार्ड शॉ आणि बोरिस पास्टरनॅक ह्या साहित्यिकांनीही त्या बहुमानाकडे पाठ फिरवली होती. ह्या लोकांना वाटतें की,

सृजनशील लिखाण हेंच आपलें प्रशस्तिपत्र.

ह्याचप्रमाणे समाजाला देव मानून त्याची सेवा करणाऱ्या लोकांना वाटतें की--

सेवा हेंच आपलें प्रशस्तिपत्र.

साहित्यिक ज्याप्रमाणे पारितोषिकाची अपेक्षा न करतां ' स्वांत सुखाय ' लिखाण करतात, त्याप्रमाणे हे लोक मानसन्मानाची अपेक्षा न करतां ' स्वांत सुखाय ' सेवा करतात.

त्यांची सेवा पाहून आपणांला वाटतें की--

नसता हा सेवेचा व्यापार ।<br>
तरी कैसा जगाचा उद्धार ॥

सेवा व स्वर्ग ह्यांतून एकाची निवड करण्याचा प्रसंग आला तर हे लोक म्हणतील--

" आम्ही स्वर्गापेक्षा सेवेची निवड करूं. "

चवथा प्राण समन्वयाबद्दलचा आहे. गीतेंत ज्ञानयोग, कर्मयोग व भक्तियोग ह्यांचा समन्वय आहे व हा समन्वय करतांना गीतेने जास्तींत जास्त जोर भक्तीवर दिला आहे.

कांही लोक म्हणतात, गीतेंत कर्मयोग मुख्य आहे तर कांही लोक म्हणतात, गीतेंत ज्ञानयोग मुख्य आहे.

ज्ञानेश्वरीला समन्वय महत्त्वाचा वाटतो व हा समन्वय करतांना ज्ञानेश्वरीने भक्तीवर विशेष जोर दिला आहे.

ज्ञानेश्वरांना म्हणावयाचें आहे—

तुमच्या ठिकाणीं खूप ज्ञान आहे, खूप कर्म आहे, पण भक्ती नसेल तर जो प्रकार होईल तो असा—

शेतांत खूप पीक आलें आहे, कणसें दाटून आलीं आहेत, पण कणसांत दाणाच नाही.

किंवा एखादी सुंदर नगरी आहे, इमारती चांगल्या आहेत, पण त्या नगरींत माणसेंच नाहीत.

अथवा एखादी सुंदर स्त्री आहे, चाफेकळीसारखें नाक आहे, धनुष्याकृती भुवया आहेत, हरिणासारखे डोळे आहेत, केतकीसारखा गोरा वर्ण आहे, गालावर सौंदर्याची खळी आहे, पण त्या स्त्रीमध्ये प्राणच नाही.

मित्रहो ! आपल्या जीवनांत ज्ञान, कर्म व भक्ती ह्यांचा समन्वय असू द्या व समन्वय करतांना भक्तीवर जास्तींत जास्त जोर द्या.

एकदा बादशहाने विचारलें —

" सत्ताविसांतून नऊ गेले, बाकी किती ? "

लोक म्हणाले — " अठरा. "

बिरबल म्हणाला — " पूज्य. "

खुलासा करतांना बिरबल म्हणाला —

" सत्तावीस नक्षत्रें आहेत. त्यांतून पावसाचीं नऊ नक्षत्रें गेलीं तर बाकी पूज्य राहतें. "

भक्ती नवविधा आहे. भक्तीला नऊ गुण द्या. ज्ञानाला नऊ गुण द्या. कर्माला नऊ गुण द्या. बेरीज होते सत्तावीस. ह्या सत्ताविसांतून भक्तीचे नऊ गुण वजा केले तर बाकी पूज्य राहतें हें लक्षांत असू द्या.

गीतेचें तात्पर्य ज्ञानयोग असें म्हणणारे शंकराचार्य. गीतेचें तात्पर्य

कर्मयोग असें म्हणणारे लोकमान्य टिळक यांनी देखील भक्तीवर विशेष जोर दिला आहे.

विवेकचूडामणींत शंकराचार्य म्हणतात —

मोक्षकारणसामग्र्यां भक्तिरेव गरीयसी ।

गीतेचें रहस्य सांगतांना लोकमान्य म्हणतात —

ज्ञानमूलक भक्तिप्रधान कर्मयोग गीतेचें तात्पर्य आहे.

ह्याचा अर्थ असा की —

गीतेंत ज्ञानयोग, कर्मयोग व भक्तियोग ह्यांचा समन्वय आहे व त्यामध्ये भक्ती प्रधान आहे.

सर्व साधुसंतांनी भक्तीवरच विशेष जोर दिला आहे.

मी एके ठिकाणीं प्रवचनाला गेलों होतों.

प्रवचन संपल्यावर कांही वारकरी मला म्हणाले —

" आम्ही आमच्या पठडींत ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम ह्यांचें नांव घेतों, पण रामदासांचें नांव घेत नाही. "

" असें कां ? " असें विचारल्यावर ते म्हणाले —

" बाकीच्या संतांनी भक्तीवर विशेष जोर दिला आहे, पण रामदासांनी भक्तीवर जोर दिला नाही. "

मीं त्यांना म्हटलें —

" अहो ! मनाच्या श्लोकांत रामदासांनी म्हटलें आहे —

मना सज्जना भक्तिपंथेंचि जावें ।
तरी श्रीहरी पाविजे तो स्वभावें ॥

हा आधार ऐकल्यावर ते लोक म्हणाले —

" अहो ! मनाचे श्लोक हे लहान मुलांच्याकरतां व बायाबापड्यांच्याकरतां आहेत. आम्हा पुरुषांच्याकरतां दासबोध आहे. दासबोधांत रामदासांनी भक्तीवर विशेष जोर दिला नाही. म्हणून आम्ही त्यांचें नांव घेत नाही. "

मीं म्हटलें —

"दासबोधाचा नीट अभ्यास करा. त्यांतहि त्यांनी आपल्या ग्रंथाचें तात्पर्य सांगतांना भक्तीच्याच योगाने देव पावतो, असें म्हटलें आहे. ते म्हणतात —

भक्तिचेनि योगें देव ।
निश्चयें पावती मानव ।
ऐसा आहे अभिप्राव ।
इये ग्रंथा ॥

हा आधार ऐकून ते लोक म्हणाले —

"आता कधी तरी, केव्हा तरी आम्ही रामदासांचें नांव घेत जाऊं"

जे. कृष्णमूर्ती यांनी भक्तीवर जोर देऊन असें म्हटलें आहे की—

"Of all the qualifications love is the most important; for if it is strong enough in a man it forces him to acquire all the rest, and without it all the rest are not sufficient."

"देवाचा साक्षात्कार होण्यासाठी जे गुण आहेत त्यांमध्ये भक्ती हा सर्वांत महत्त्वाचा गुण आहे. हा गुण जर भरपूर प्रमाणांत असेल तर बाकीचे गुण मिळविण्याबद्दल तो मनुष्याला भाग पाडील; पण भक्तीचा गुण जर मनुष्यांत नसेल तर बाकीचे सारे गुण पुरेसे पडणार नाहीत."

पांचवा प्राण देवाबद्दलचा आहे. डॉ. थॉमसन, जे. हडसन, डॉ. शॅफ्ट्सबरी, मनरो, डॉ. पार्किन वगैरे शास्त्रज्ञांचे विचार वाचले म्हणजे आपणांस कळून येईल की —

देव देवळांत नाही, चर्चमध्ये नाही, मशिदींत नाही, तर तो प्रत्येकाच्या अंतःकरणांत आहे.

ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरींत म्हटलें आहे —

सर्व भूतांच्या अतरीं । हृदयमहाअंबरी ।
चिद्वृत्तीचा सहस्रकरी । उदयला असे जो ॥

मित्रहो ! परमेश्वर आपल्या अंतःकरणांत आहे हें लक्षांत ठेवा व त्या परमेश्वराला साक्षी ठेवून सर्व व्यवहार करा. म्हणजे तुमचें जीवन वंदनीय, नमनीय व कमनीय होईल.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलमत
अनुक्रम ५४०६८ ... वि: ... निबंध
क्रमांक ९६५६ ... बौ: कि: ...

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १५१९८

देवाचा शोध घेतांना आपणांला अनुभव येतो —

करितां शोध देवाचा मिळेना ठाव हो मला ।
करितां शोध ब्रह्माचा मिळेना ठाव हो मला ।
शोधूं जातां परी माझें अंतःकरण जेधवां ।
लागला ठाव सर्वांचा वाटे आनंद तेधवां ॥

नेहमीं अंतःकरणांतील परमेश्वराचा सल्ला घ्या. हा तुमचा खरा गुरू आहे.

महाराजा रणजितसिंग रस्त्याने जात होता. त्याला एक धोंडा लागला. ज्या म्हाताऱ्या बाईने तो मारला तिला पुढे आणण्यांत आलें. ती फार भ्याली होती. ती म्हणाली —

" माझा नातू कालपासून उपाशी आहे. घरांत दाण्याचा कण नाही. मी त्या बोराच्या झाडावर दगड मारला. माझ्या नातवाला बोरं देणार होतें, पण तो धोंडा चुकून तुम्हांला लागला. माझी चूक झाली. मला क्षमा करावी. "

महाराजांनी अंतःकरणांतील परमेश्वराचा सल्ला घेतला व हुकूम केला —

" हिला एक हजार रुपये देऊन सोडून द्यावें. "

महाराजांच्या नोकरांना आश्चर्य वाटलें. तेव्हा महाराज म्हणाले —

" जर एक निर्जीव वृक्ष दगड लागल्यावर फळ देतो, तर पंजाबच्या महाराजाने काय दिलें पाहिजे ? "

× × ×

मित्रहो ! ज्ञानेश्वरीचे हे पंचप्राण समजून घ्या. ही जीवनमार्गावरील उत्तम शिदोरी आहे. त्या शिदोरीचा उपयोग करा व मोठे व्हा.

पण त्याचबरोबर हेंही लक्षात ठेवा की —

मोठेपण मागून मिळत नाही. सत्ता अथवा संपत्ती ही मोठेपण मोजण्याची फूटपट्टी असत नाही. जे लोक अंतःकरणांतील परमेश्वराला स्मरून समाज-सेवा करतात, त्यांनाच मोठेपण प्राप्त होत असतें. असे लोक मोठेपणापासून

दूर राहण्याचा प्रयत्न करतात, पण मोठेपणच त्यांच्या चरणीं आपलें मस्तक ठेवीत असतें.

गोपालकृष्ण महाराज की जय

* * *

प्रवचन संपल्यावर एका गृहस्थाने आभार मानतांना माझी फार स्तुती केली, व साऱ्या श्रोत्यांतर्फे ग्वाही दिली की —

प्रवचनकारांनी सांगितलेले पंचप्राण आम्ही आपल्या हृदयांत कोरून ठेवू. आमचें जीवन उन्नत करण्याचा प्रयत्न करूं.

त्या वक्त्याच्या स्तुतीकडे माझें लक्ष नव्हतें. माझ्यासमोर गोपालकृष्ण दिसत होता. मीं त्याला नमस्कार केला व म्हटलें—

" देवा ! मी निमित्तमात्र आहें. अरे ! सारें तूंच बोललास. कशाला लोक माझी स्तुती करीत आहेत ? "

गोपालकृष्णाने माझ्या डोक्यावर हात ठेवला आणि —

मी एकदम जागा झालों.

* * *

## स्वप्न दहावें

‘ माझीं स्वप्नें ’ ही लेखमाला सुरू झाल्यापासून मला अनेक पत्रें येतात व तीं वाचून मोठी मौज वाटते. एका पत्रांत लिहिलें होतें – “बर्नार्ड शॉनें म्हटलें आहे — You cannot be sincere unless you are stupid — मूर्ख असल्यशिवाय प्रामाणिक होतां येत नाही. हें म्हणणें मला पटत नाही. मी मूर्ख नसतांनाही प्रामाणिक आहें. मी सारखा मानवी जीवनाचा विचार करीत असतों व हा विचार करीत असतांना ‘ माझीं स्वप्नें ’ ही तुमची लेखमाला मला फार मोलाची वाटते. जेव्हा जेव्हा मी निराश होतों, तेव्हा तेव्हा मी ‘ माझीं स्वप्नें ’ ही लेखमाला वाचतों आणि माझा

निराशेचा अंधकार जाऊन मला आशेचा प्रकाश दिसूं लागतो ... "

दुसऱ्या एका पत्रांत लिहिलें होतें,

मी मुंबईंत नोकर आहें. आमच्या ऑफिसांत उशिरां आलें तर सही करतांना कारण लिहावें लागतें. जो पहिल्यांदा उशिरां येतो तो लिहितो –

' लोकल उशिरां आली म्हणून. '

नंतरचे लोक —

' वरीलप्रमाणे ' असें लिहून सही करतात. एकदा उशिरां येणाऱ्या पहिल्या गृहस्थानें लिहिलें —

" बायको प्रसूत झाली. जुळें झालें. "

नंतरच्या लोकांनी लिहिलें —

' वरीलप्रमाणे '

जीवनांत देखील केव्हा केव्हा असा खुळेपण होतो. ' माझीं स्वप्नें ' ही तुमची लेखमाला वाचून माझी खात्री झाली की —

माणसाने कांहीतरी नक्कल करण्यापेक्षा अस्सलाच्या पाठीमागे लागावें. मनुष्य जास्त मनःशांतीसाठी भुकेलेला असतो. जेव्हा जेव्हा माझी मनःशांती नाहीशी होते तेव्हा तेव्हा ' माझीं स्वप्नें ' ही तुमची लेखमाला मी वाचतों आणि मला मनःशांती प्राप्त होते ...

× × ×

रात्रीं मी एक पत्र लिहीत होतों. मला एका मित्राचें पत्र आलें होतें. त्याने आपल्या पत्रांत खूप प्रश्नांची चर्चा केली होती व मला कांही शंका विचारल्या होत्या. त्या पत्राला उत्तर म्हणून मी पत्र लिहीत होतों.

हें पाहा — ' टवाळा आवडे विनोद ' असें एक वाक्य आहे, पण त्याच-बरोबर तूं दुसरें वाक्य लक्षांत ठेव —

जगांतील दुःखांकडे गांभीर्यानें पाहिलें तर तीं वाढतात आणि विनोद-बुद्धीने पाहिलें तर कमी होतात.

* * *

तूं त्या स्कॉच माणसाची गोष्ट ऐकली असशील. तो गृहस्थ मरणाच्या दारीं होता. पाद्री त्याच्या बिछान्याजवळ आला व म्हणाला, " तुझी

शेवटची इच्छा काय आहे ? "

तो स्कॉच गृहस्थ म्हणाला,

" दोनच गोष्टी जाणून घेण्याची इच्छा आहे : (१) सोडावॉटरच्या बाटलींत गोळी कशी घालतात ? (२) तुमच्या त्या अखंड कॉलरींतून तुम्ही आंत डोकें कसें घालतां ? "

* * *

तूं म्हणतोस की महात्मा गांधींना विनोदबुद्धी नव्हती. पण तुझें हें म्हणणें खरें नाही. महात्माजी एकदा म्हणाले होते —

' मला विनोदबुद्धी नसती तर मी आत्महत्या केली असती. '

तुला वाटतें की, विनोबांना विनोदबुद्धी नाही, पण हें मत देखील खरें नव्हे.

अरे ! तुला माहीत आहे की विनोबांना अल्सर आहे.

एकदा ते पदयात्रा करीत होते. वाटेंत त्यांच्या पोटांत दुखूं लागलें. खूप खूप दुखूं लागलें. त्यांना खूप दुःख होऊं लागलें.

ते वाटेंत थांबले. स्वतःशींच मोठ्यानें म्हणाले—

" विन्या ! काय दुखतें आहे ?"

" पोट."

" पोट दुखतें आहे. पाय दुखत नाहीत ना ? तर मग चल." असें म्हणून ते चालूं लागले.

हें पाहा, तुकारामहाराजांना देखील विनोदबुद्धी होती. तुला वाटतें की— तुकारामांना विनोदबुद्धी नव्हती. पण तुझें हें म्हणणें बरोबर नाही.

तुकारामांचा खालील अभंग वाच. एका सासू-सुनेबद्दलचा हा अभंग आहे. ह्यामध्ये तुला तुकारामांची विनोदबुद्धी दिसेल—

परिसे गे बाई । नको वेचू दूध दही ।।
उखळ मुसळ जाते । माझे मन गुंतले तेथे ।।
भिक्षुक आल्या घरा । सांग गेली पंढरपुरा ।।
सून म्हणे बहुत निके । तुम्ही यात्री जावें सुखें ।।

सासूबाई स्वहित जोडा। सर्व मागील आशा सोडा ॥
सुनमुखीचे वचन कानी। ऐकोनि सासू विवंची मनी ॥
सटवीचे चाळे खोटे। म्यां जावेसें हिजला वाटे ॥
आता कासया यात्रें जाऊ। काय जाउनि तेथें पाहू ॥
अवा चालली पंढरपुरा। वेशीपासुनी आली घरा ॥

तूं म्हणतोस की, वामन मल्हार जोश्यांना विनोदबुद्धी नव्हती, पण हें म्हणणें देखील बरोबर नाही. त्यांचें वाङमय नीट वाचून पाहा.

नवऱ्याला पत्र लिहिल्यानंतर सुशीलेने लिहिलें—

आपली सुशिला.

तिने 'शि' ऱ्हस्व काढली,

नवऱ्याने उत्तर लिहिलें—

'चांगल्या चारित्र्याची (शील–सुशीला) म्हणून तुझ्याशीं मीं लग्न केलें पण तूं (सु–शिला) चांगली दगड असशील अशी माझी कल्पना नव्हती.'

तुला वाटतें की, गौतमबुद्धांना विनोदबुद्धी नव्हती. पण हें म्हणणेंदेखील बरोबर नाही.

गौतमबुद्ध एकदा एका विद्वानाच्या घरीं भिक्षा मागण्यासाठी गेले. त्या विद्वानाने गौतमबुद्धांना खूप शिव्या दिल्या व म्हटलें—

"माझ्या घरीं भिक्षा मिळणार नाही. चालता हो."

गौतमबुद्ध तेथेच थांबले. ते म्हणाले...

"तुमच्या घरीं पाव्हणे येतात का ?"

विद्वान – हो.

गौतमबुद्ध – त्यांना कधी वस्तू भेट देतां का ?

विद्वान – हो.

गौतमबुद्ध – त्यांनी ती भेट घेतली नाही तर ?

विद्वान – तर ती वस्तू माझ्याकडेच राहते.

गौतमबुद्ध – तुमच्या शिव्या मी घेत नाही. त्या तुमच्याचजवळ राहणार.

गौतमबुद्धांचें भाषण ऐकून तो विद्वान त्यांच्या पायां पडला.

तू विचारतोस की, विनोदबुद्धीने सगुण रूप घेतलें तर ती देवाजवळ काय इच्छा प्रदर्शित करील?

हें पाहा! मला वाटतें—

विनोदबुद्धीने सगुण रूप घेतलें तर देवाजवळ आपली इच्छा प्रदर्शित करतांना ती म्हणेल–

**न त्वहं कामये राज्यं**
**न स्वर्गं ना पुनर्भवम्**
**कामये दुःखतप्तानां**
**प्राणिनामार्तिनाशनम् ॥**

"मला राज्याची इच्छा नाही, स्वर्गाची इच्छा नाही किंवा मोक्षाची इच्छा नाही. दुःखी प्राण्यांचें दुःख नाहीसें करावें एवढीच माझी इच्छा आहे."

त्या रात्रीं माझ्या स्वप्नांत कृष्ण आल्यावर मीं म्हटलें—

"देवा! तूं खरा विनोदी आहेस. ह्या विनोदबुद्धीमुळें तुझ्या जीवनाला मोठी मजा आली आहे. लहानपणीं गोकुळांत तूं खूप विनोद केलास व लग्न झाल्यानंतर देखील तुझी विनोदबुद्धी कायम राहिली. अरे! तूं सत्यभामेच्या अंगणांत पारिजातकाचं झाड लावलंस, पण त्याचीं फुलं पडत होतीं रुक्मिणीच्या प्रांगणांत."

माझें हें भाषण ऐकून कृष्णाच्या तोंडावर जें हास्य दिसूं लागलें तें पाहून मला वाटूं लागलें, कीं हें हास्य म्हणजे आनंदाचा कंद आहे आणि सुखाचें सर्वस्व आहे.

माझ्या मनांत एकदम एक श्लोक आला व मीं कृष्णाला म्हटलें--

आपल्या शास्त्रकारांनी म्हटलें आहे--

**अष्टादशपुराणानां सारं सारं समुद्धृतम् ।**

**परोपकारः पुण्याय पापाय परपीडनम् ॥**

(अठरा पुराणांचें सारें सार इतकेंच की, परोपकार हें पुण्य व परपीडा हें पाप.)

त्याबद्दल तुला काय वाटतें?

कृष्ण हसत म्हणाला--

" हें ठीक आहे. पण तूं असें लक्षांत घे की, दुसऱ्यावर उपकार करतांना अभिमान बाळगूं नये, तर असें मानावें की, दुसऱ्यावर उपकार म्हणजे स्वतःवरच उपकार. परोपकार करावयास मिळणें हें भाग्याचें लक्षण आहे. मोठेपणाच्या तोऱ्यांत दुसऱ्यावर उपकार करणें हें पुण्य नव्हे. दुसऱ्यावर उपकार करण्याने आपण धन्य होत असतों. ज्याच्यावर उपकार करतों तो नव्हे तर जो उपकार करतो तो धन्य होत असतो. उपकार करण्याची संधी मिळणें हेंच भाग्याचें लक्षण आहे असें समजून निरहंकार बुद्धीनें व कांहीही अपेक्षा न करतां उपकार करण्यानेच मनुष्याचें कल्याण होत असतें."

कृष्णाचा हा मूलगामी विचार मला फार आवडला.

सत्कृत्याबद्दल प्रश्न विचारल्यावर कृष्ण म्हणाला--

" सात्त्विक गुणांच्या समुच्चयास 'माणुसकी' असें सार्थत्वाने म्हटलें तर ज्या कृत्याने माणुसकी वाढेल त्या कृत्यास सत्कृत्य असें म्हणतां येईल."

सुखाबद्दल प्रश्न विचारल्यावर कृष्ण म्हणाला —

" अरे! सुख पाहिजे असेल तर तृष्णा सोडली पाहिजे."

मला एकदम महाभारतांतील श्लोक आठवला.

**यच्च कामसुखं लोके यच्च दिव्यं महत् सुखम् ।**
**तृष्णाक्षयसुखस्यैते नार्हतः षोडशीं कलाम् ।।**

इहलोकीं कामाच्या तृप्तीने होणारें सुख आणि स्वर्गामधलें जें मोठें सुख, त्या दोन्ही सुखांची योग्यता तृष्णाक्षयापासून होणाऱ्या सुखाच्या सोळाव्या हिश्श्याइतकी देखील नाही.

जगाबद्दल प्रश्न विचारल्यावर कृष्ण म्हणाला--

" जग चांगलें नाही व वाईट नाही. प्रत्येकजण स्वतःसाठीं आणि स्वतःचें असें जग निर्माण करीत असतो. अग्नी चांगला नाहीं व वाईटही नाही. ज्येव्हा अग्नीच्या साहाय्याने आपण सैंपाक करतों तेव्हा आपण म्हणतों--

" अग्नी किती चांगला आहे!"

पण जेव्हा अग्नीने एखादें घर भस्मसात होतें तेव्हा आपण म्हणतों—

"अग्नी किती वाईट आहे!"

वस्तुतः अग्नी चांगला नाही अगर वाईट नाही. आपण त्याचा जसा उपयोग करूं तसा चांगला—वाईट भाव तो उत्पन्न करतो. जगाच्या बाबतींत देखील असेंच आहे."

हा विचार माझ्या हृदयाला जाऊन भिडला.

धर्माच्या बाबतींत मुख्य गोष्ट कोणती ह्याबद्दल प्रश्न विचारल्यावर कृष्णानें सुंदर ऊहापोह केला. ह्या ऊहापोहांतील खालील वाक्य मला फार फार आवडलें.

**ज्या गोष्टी आपल्या बाबतींत होऊं नयेत असें माणसाला वाटतें त्या गोष्टी त्यानें दुसऱ्याच्या बाबतींत करूं नयेत.**

सुखदुःखांच्या बाबतींत प्रश्न केल्यावर कृष्ण म्हणाला—

"दुसऱ्याच्या ताब्यांत असतें तें दुःख व स्वतःच्या ताब्यांत असतें तें सुख. दुःखाचें चिंतन न करणें हें दुःख निवारण्याचें स्वस्त औषध आहे. कर्मफलाबद्दल आसक्ती, अभिमान, अभिनिवेश किंवा आग्रह निर्माण झाला म्हणजे दुःखपरंपरा सुरू होते. कर्मामध्ये दुःखाचें मूळ नसून कर्मफलाबद्दल जी आसक्ती असते तीच दुःखाचें मूळ आहे."

"मनुष्य सुखासाठी धडपडतो असें म्हणण्यापेक्षा मनुष्य आनंदासाठी धडपडतो हें म्हणणें जास्त सयुक्तिक आहे.

"कांही लोक देशासाठीं अथवा देवासाठी अगर मोठ्या कार्यासाठी आपण होऊन दुःखी आयुष्य पत्करतात. पण त्या दुःखांत देखील त्यांना आनंद वाटत असतो."

कृष्ण बोलत होता, आणि माझें मन आनंदाने नाचत होतें. माझे अष्टसात्त्विकभाव जागृत झाले होते. पौर्णिमेच्या चंद्रांतून प्रेमाचे बिंदू ठिपकावेत त्याप्रमाणे कृष्णाची प्रेमळ दृष्टी माझ्यावर प्रीतीचा वर्षाव करीत होती. माझ्या जीवनाला एक लय आली होती व ही लय कधीच लयाला जाऊं नये असें वाटत होतें.

मला कृष्णाकडे पाहून वाटू लागलें—

मानवी जीवनांत भक्तिप्रेमाला फार किंमत आहे. माणूस हा भक्ति-प्रेमाचा फार भुकेला असतो. तो त्या प्रेमावर जगतो. प्रेमाचा हा बारिक तंतु जीवनांतून काढून टाकला तर मानवी जीवन भकास, वैराण वाळवंट होईल.

महाभारतांत भक्तिप्रेम ओतप्रोत भरलें आहे. महाभारताचा नायक आहे कृष्ण आणि नायिका आहे द्रौपदी.

तसेंच पाहिलें तर, कृष्ण हा द्रौपदीचा दीर, पण त्यांच्यामध्ये नातें निर्माण झालें भावा-बहिणीचें. ह्या भावा-बहिणींच्या भक्तिप्रेमाला जगांत तोड नाही.

मला एकदम निराळें दृश्य दिसू लागलें.

कृष्णाच्या बोटाला रक्त आलें होतें. कृष्णाच्या बायका जवळ होत्या; द्रौपदी जवळ होती. त्यांनी सुंदर लुगडीं नेसलीं होतीं. कृष्णाच्या बायका चिंधी शोधण्याकरता इकडे तिकडे धावूं लागल्या. द्रौपदीनें आपल्या भारी लुगड्याचा पदर फाडला व कृष्णाचें बोट बांधलें.

ह्याच्या उलट ती शुक्रवारची कहाणी पाहा.

मला एकदम तो देखावा दिसू लागला.

एक भाऊ होता. तो खूप श्रीमंत होता. त्याने तीन दिवस गांवभोजन घातलें. कारण अशाने त्याची श्रीमंती शाबीत होणार होती.

त्याच गांवांत त्याची बहीण राहत होती. ती गरीब होती. तिला त्यानें जेवणास बोलावलें नाही.

तिला वाटलें, आपला भाऊराया विसरला असेल.

असें म्हणून ती मुलांना घेऊन जेवायला गेली.

तिला पाहून भावाला संताप आला. भरपंक्तींत तो तिला म्हणाला,

" न बोलावतां तूं आलीस. उद्यां आलीस तर खबरदार ! "

बिचारी रडत रडत व अपमान गिळत जेवली व घराकडे गेली.

दुसऱ्या दिवशीं तिचीं मुलं म्हणू लागलीं की–

" आई ! आपण मामाकडे जेवयला जाऊं. "

दारिद्र्य मोठें वाईट आहे. मध्यान्ह झाली, पोटांत कावळे ओरडू लागले म्हणजे अन्न गिळण्याच्या आधीं मनुष्य अपमान गिळतो.

ती दरिद्री बाई सारा अपमान गिळून मुलांना घेऊन भावाकडे जेवायला गेली.

तिला पाहून भाऊ खूप संतापला. "डुकरिणीसारखी पोर घेऊन पुन्हा कां आलीस ?"

असें म्हणून तो बहिणीला यथेच्छ शिव्या देऊं लागला.

बिचारी भरपंक्तींत सारखी रडत होती. कसेंबसें जेवून ती घराकडे गेली.

तिसऱ्या दिवशीं आपल्या मुलांना घेऊन ती पुन्हा जेवायला गेली.

भावाचा क्रोध अनावर झाला. त्याने आपल्या सख्या बहिणीला फराफरा ओढीत भरपंक्तींतून हाकलून दिलें.

प्रत्यक्ष पाठची बहीण, एकाच आईच्या पोटीं जन्माला आलेली, पण दरिद्री असल्यामुळें भावाने तिचा असा अपमान केला.

तिनें मग देवीची तपश्चर्या केली. देवी प्रसन्न झाली व ती खूप श्रीमंत झाली.

बहीण श्रीमंत झाल्यावर भावाला वाटलें कीं आता बहिणीला जेवायला बोलावण्यास हरकत नाही.

त्यानें तिला मोठ्या अगत्यानें जेवायला बोलावलें.

ती भरजरी लुगडें नेसून व अंगावर भारी किंमतीचे दागिने घालून जेवायला आली.

भावाने तिचें खूप आगतस्वागत केलें.

बसायला पाट, टेकायला पाट, ताटाखाली पाट, पंचपक्वान्नांचा बेत असा थाट होता.

बहीण जेवायला बसली. तिने आपले दागिने खाली काढून ठेवले व स्वतः जेवावयाच्या ऐवजीं ती एक एक पक्वान्न दागिन्यांपुढे ठेवूं लागली.

तो प्रकार पाहून भाऊ म्हणाला,

"ताई ! तूं स्वतः जेव. दागिन्यांना तूं कशाला जेवूं घालतेस ?"

ताई म्हणाली,

" भाऊराया ! तूं घातलेल्या गांवभोजनांत मी भरपूर जेवलें. तेंच माझें खरें जेवण. आज तूं माझ्या दागिन्यांना जेवायला बोलावलेंस ! मला नाहीं ! ! म्हणून मी दागिन्यांना जेवूं घालतें आहें ! ! "

हा देखावा माझ्या हृदयाला जाऊन भिडला आणि मी जागा झालों. जागा झाल्यावर देखील मला कृष्ण मनश्चक्षूंपुढे दिसूं लागला.

मी म्हणालों,

" कृष्णा ! तूं भक्तिप्रेमाचें माहेर, भक्तांचें जिव्हार व तत्त्वज्ञानाचें रत्न-भांडार आहेस. तुझ्यामुळें चातुर्य शहाणें झालें, प्रेम रुचीस आलें आणि सुखाचें सौभाग्य पोखलें. तुला शतशः – सहस्रशः नमस्कार ! "

* * *

# स्वप्न

## अकरावें

त्या रात्रीं मी एके ठिकाणीं प्रवचनास गेलों होतों. प्रवचनाला हजारो श्रोते जमले होते. प्रवचन खूप रंगांत आलें असतांना शेवटीं माझ्या तोंडून उद्गार बाहेर पडले—

"आपण आपल्या संस्कृतीबद्दल खूप स्तुती करतों, पण आपण असें लक्षांत घ्या, की संस्कारांचा दीप मावळला म्हणजे संस्कृतीचे तीन तेरा वाजतात. स्वराज्य मिळालें, पण धर्माचे–न्यायाचे–नीतीचे संस्कार लोप पावत आहेत. धान्य पिकूनही कृत्रिम टंचाई निर्माण होत आहे. अन्न महागलें

आहे. अन्न महागलें, तेल महागलें, तूप महागलें अन् लोकांच्या हातांत महागाईचें नि टंचाईचें घुपाटणें तेवढें शिल्लक राहिलें आहे. लोक म्हणतात की, पूर्वी सुख जवाएवढेंतरी होतें पण आता तेंही नाहीं. ते वैतागाने बोलतात की, ह्याला जीवन ऐसें नांव असेल तर ह्यांत जीवन आहे. ज्ञानेश्वरांना स्मरून विठूरायाचा धांवा करून मी असा टाहो फोडतों की --

"देवा ! भारताला स्वराज्य मिळालें पण अजून सुखाचें राज्य नाही मिळालें. तें मिळो, व समतेच्या नि सुबत्तेच्या व्यासपीठावर सर्व जाती, सर्व भाषा, सर्व धर्म आनंदाने नाचूं लागोत. तो सोनियाचा दिवस लवकर उगवो इतकीच इच्छा ! "

* * *

प्रवचन संपवून घरीं आल्यावर मी ध्यान केलें व निजण्याच्या तयारींत होतों, इतक्यात माझी पत्नी ताई म्हणाली —

"तुम्ही आज जें प्रवचन दिलें, त्यांतील कांही कांही वाक्यें मी टिपलीं आहेत. पाहा बरोबर आहेत का. "

तिची वही घेऊन मी वाचूं लागलों.

काम्य कर्माचा त्याग म्हणजे संन्यास असें गीतेचें सांगणे आहे. त्या दृष्टीनें लोकमान्य टिळक खरे संन्यासी होते. गीतेने जो कर्मयोग सांगितला आहे तो पाहिला म्हणजे आपणांस समजून येईल की, आद्य श्रीशंकराचार्य खरे कर्मयोगी होते. खोलवर विचार केला म्हणजे असें म्हणतां येईल की—

संन्यासमार्गावर जास्तींत जास्त जोर देणारे आद्य श्रीशंकराचार्य जास्तींत जास्त कर्मयोगी होते व कर्मयोगावर जास्तींत जास्त जोर देणारे लोकमान्य टिळक जास्तींत जास्त संन्यासी होते.

× × ×

ब्रह्मरूपी सागरांत मानवरूपी लाटा सदैव उठत असतात. प्रत्येक लाटेचें सौंदर्य आगळेंच असतें. तिला स्वतंत्र अस्तित्व असतें. पण ह्या सर्व लाटांचा समावेश शेवटीं त्या सागरांत होतो. ह्या लाटा स्वैर संचार करीत साहित्याला नवीन स्वर देतात व त्यांतूनच साहित्याचें संगीत निर्माण होतें.

आम्हांला आज अशा संगीताची आवश्यकता आहे की जे एकतेच्या तालावर आम्हांला निरनिराळ्या स्वरांत गातां येईल.

चुकणें हें माणसाच्या बाबतींत क्षम्य असलें तरी चुका दुरुस्त करणें हें माणसाचें कर्तव्य आहे.

× × ×

ताईने वाक्यें टिपण्याचें काम भक्तिभावाने केलें होतें. शृंगाराच्या गोष्टी वाचून वा ऐकून पतिपत्नींना मौज वाटते; पण पुढे अनुभव असा येतो की, शृंगारांत जी मौज आहे त्यापेक्षा जास्त मौज परमार्थांत आहे.

पती परमार्थमार्गांत असला व पत्नी त्याला साथ देऊं लागली म्हणजे शांतरस निर्माण होतो. हा शांतरस शृंगारापेक्षा सरस असतो. ज्ञानेश्वरांच्या भाषेंत बोलायचें म्हणजे "शृंगाराच्या माथा पाय ठेवी!" असा हा शांतरस असतो.

त्या शांतरसाचा अनुभव घेत मी ताईला म्हटलें —

"तूं चांगलीं वाक्यें टिपलीं आहेस."

ताईने मला प्रश्न केला—

मनुष्याला पैसा मिळाला, राहण्यास बंगला मिळाला, प्रेमळ लोकांचा सहवास मिळाला, आरोग्य मिळालें, कीर्ती मिळाली, तरी त्याला कोणती अपेक्षा असते ?

त्याला उच्च विचारांची अपेक्षा असते. पंडित जवाहरलाल नेहरू एकदा युवकसभेंत बोलत होते.

ते म्हणाले—

मला सारीं सुखें मिळालीं आहेत. अपेक्षा कांही नाही. एकच अपेक्षा आहे. उच्च विचारांची मला अपेक्षा आहे. मला विचारांच्या हिंदोळ्यावर खूप उंच झेप घ्यायची आहे.

ताईने पुढचा प्रश्न विचारला—

मुंबईला युकॅरिस्ट कॉंग्रेस झाली. येशू ख्रिस्ताची मुख्य शिकवण कोणती ?

येशू ख्रिस्ताची मुख्य शिकवण म्हणजे —

(१) शत्रूवर प्रेम करा.

(२) शेजाऱ्यावर प्रेम करा.

(३) एकमेकांवर प्रेम करा.

ताईने आणखी एक प्रश्न विचारल्यावर मीं म्हटलें--

रामकृष्ण परमहंस ह्यांचा ह्या बाबतींतला उपदेश फार चांगला आहे. एकदा एक तरुण मनुष्य त्यांच्याकडे आला व म्हणाला--

" मला जीव नकोसा झाला आहे. जगांतील जीवनाचा मला कंटाळा आला आहे. त्या जगाचा त्याग करून मला मोक्ष मिळवावयाचा आहे. "

रामकृष्णांनी विचारलें--

" तुझ्या घरीं कोण आहे ? "

तो तरुण म्हणाला--

" माझ्या घरीं माझी म्हातारी आई आहे. बाकी कोणी नाही. "

रामकृष्ण म्हणाले--

" अरे वेड्या ! घरीं जा. तूं आपल्या आईची मनापासून सेवा कर. त्या सेवेंतच तुला मोक्षाचा मार्ग दिसेल. "

ताई म्हणाली--

" गोष्ट फारच चांगली आहे. "

आमचें असें बोलणें सुरू असतांना मला झोप आली. झोपेंत गोपालकृष्ण माझ्या स्वप्नांत आल्यावर मीं विचारलें--

" देवा ! परमार्थमार्गांत गुरूशिवाय तरणोपाय नाही असें म्हणतात त्या बाबतींत तुझें काय म्हणणें आहे ? "

कृष्णाने हंसत उत्तर दिलें--

" गुरू दोन प्रकारचे : (१) लौकिक (२) पारमार्थिक.

" ज्ञानेश्वरांनी व एकनाथांनी लौकिक अर्थाने गुरू केले होते, पण रामदासांनी लौकिक अर्थाने गुरू न करतां रामालाच गुरू मानलें. तुकारामांनी देखील लौकिक अर्थाने गुरू केला नाही. त्यांना स्वप्नांत उपदेश मिळाला. तुकाराम व रामदास ह्यांनी लौकिक अर्थाने गुरू केला नसला तरी ते उच्च पायरीवर गेले.

प्रत्येकाच्या अंतःकरणांत ईश्वर आहे (ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन

तिष्ठति ।). अंतःकरणांतील ईश्वर हा पारमार्थिक गुरू आहे. हा गुरू केल्याशिवाय व त्या गुरूला शरण गेल्याशिवाय परमार्थमार्गांत तरणोपाय नाही."

मीं म्हटलें—

"देवा ! संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे ह्यामध्ये 'च' आहे त्याप्रमाणे पारमार्थिक गुरू केलाच पाहिजे, असेंच ना तुला म्हणावयाचें आहे?"

माझें हें बोलणें ऐकून कृष्ण हसू लागला. तो म्हणाला––

"अरे ! ज्याला परमार्थमार्गांत प्रवास करावयाचा आहे त्याने गुरू ह केलाच पाहिजे. त्याशिवाय तरणोपाय नाही.

गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुः गुरुर्देवो महेश्वरः ।
गुरुः साक्षात् परब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः ।।

असें म्हटलें जातें, ह्यामध्ये गुरू ह्याचा अर्थ अंतःकरणांत वास करीत असलेला ईश्वर. ह्याला तुम्ही दिव्यशक्ती म्हणा, आंतला आवाज म्हणा, कांहीही म्हणा. हा गुरू करणें नितान्त आवश्यक आहे."

आस्तिक व नास्तिक ह्यांबद्दल मी प्रश्न विचारल्यावर कृष्ण म्हणाला,

"वाटेल तीं दुष्कृत्यें करतो आहे व देवपूजेचें सोंग करतो आहे असा मनुष्य आस्तिक नाही. जो अंतःकरणाशीं प्रामाणिक तो आस्तिक व जो अंतःकरणाशीं प्रामाणिक नाही तो नास्तिक····"

ही व्याख्या मला फार आवडली.

श्री. पेंडसे ह्यांनी महाभारतांतील व्यक्तिदर्शन हा मोठा ग्रंथ लिहिला आहे. श्रीकृष्ण हा युगप्रवर्तक पुरुष असून त्याचा आदर्श हें भारताचें सौभाग्य आहे असें ग्रंथकाराला वाटतें. पण महाभारतांत जेथे कांही अलौकिक आहे अथवा अद्‌भुत आहे अथवा चमत्कृतिपूर्ण आहे तेथे भारतीय व्यक्तींना अन्याय करणारीं व दोषी ठरवणारीं अनेक विधानें ह्या ग्रंथांत आहेत. महाभारतांतील चमत्कार पाहून ग्रंथकर्त्याला वाटतें की––

श्रीकृष्ण हा कपटपटूंचा गुरु होता, त्याने बुवाबाजी केली व विश्वरूपदर्शन हा चित्तभ्रमाचा एक प्रकार होता.

असलीं विधानें पाहून माझ्या मनांत ज्या शंका आल्या होत्या त्या कृष्णास विचारल्यावर कृष्णाने जें उत्तर दिलें तें ऐकून मला एक नवी

दृष्टी आली व आनंद झाला.

व्यास, वाल्मीकि, कालिदास, शेक्स्पीअर अशांसारख्या प्रतिभासंपन्न कवींच्या कलाकृतींचें मोजमाप करतांना वास्तवतेला अवास्तव महत्त्व दिलें तर त्या कलाकृतींचें रसिकतेनें ग्रहण करणें शक्य नाही.

हॅम्लेट नाटकांत हॅम्लेटच्या बापाचें भूत दिसणें व त्या भुताने आपल्या खुनाची हकीकत सांगणें ही गोष्ट वास्तवतेला सुटून आहे. ही घटना म्हणजे मूर्खपणाचा कळस आहे असें समजून आपण हॅम्लेट नाटक वाचूं लागलों अथवा पाहूं लागलों तर त्या कलाकृतीमुळे होणाऱ्या आनंदाला आपण मुकूं. अशी समजूत म्हणजे अरसिकतेचा कळस आहे.

कवीची कल्पनाशक्ती, कलावंताची कलाकृती व भक्ताची भावना ह्यांच्या आवरणाखाली मूळ श्रीकृष्ण इतका विरून गेला आहे की तो मूळ महापुरुष आपल्या हातीं लागणें कठीण आहे. आज आपणांपुढे आहे ती कृष्णाची वाङ्मयीन मूर्ती—ऐतिहासिक मूर्ती नव्हे. कितीतरी कवी, लेखक, भक्त ह्यांनी ह्या मूर्तींत रंग भरण्याचें काम केलें आहे व अजूनही तें काम सुरूच आहे.

जगाची आदिशक्ती मानवी स्वरूपांत प्रकट झाली तर ती कशी असेल ह्याचें वर्णन ऐकण्याची ओढ जोंपर्यंत मानवी मनांत आहे तोंपर्यंत कृष्णाची मूर्ती मानवाच्या अंतःकरणांत कायमची राहील.

वेद पौरुषेय वा अपौरुषेय ह्याबद्दल खूप वादविवाद आहे. वेद हे पौरुषेय आहेत असें म्हणणारे म्हणतात—

वेद हें वाङ्मय असून वाङ्मय भाषेपासून बनतें. भाषा ही शब्दांपासून तयार होत असून शब्द ही मानवी कृती आहे. वेद हे कितीही जुने असले तरी ते माणसांनी उत्पन्न केलेले आहेत. आणि म्हणून ते पौरुषेय आहेत.

वेद हे अपौरुषेय आहेत असें म्हणणारे म्हणतात—

वेद हे फार पूर्वीच्या काळीं निर्माण झाले आहेत. त्या वेळीं भाषा फारशी प्रगत नव्हती. म्हणूत वेद भाषामय असले तरी ते मानवी कृती नव्हेत. पूर्वी मानवाचें ज्ञान तोटकें होतें. वेदांमध्ये जें ज्ञान आहे तें पूर्वीच्या मनुष्यांना असणें शक्य नाही. म्हणून वेद हे मानवाची कृती नसून ते

अपौरुषेय आहेत.

ह्या बाबतींत गोपालकृष्णाला प्रश्न विचारल्यावर कृष्ण म्हणाला—

प्रत्येक मनुष्याच्या हृदयांत परमेश्वर आहे. केव्हा केव्हा मनुष्य त्या ईश्वराशीं तादात्म्य पावतो. आपण कांहीच करीत नसून तो ईश्वर सारें कांही करतो असें त्यास वाटूं लागतें. त्याचा सारा अहंकार निघून जातो. अशा अवस्थेंत असतांना केव्हा केव्हा तो अंतःकरणांतील दिव्य शक्तीचे शब्द ऐकतो. ते शब्द कमालीचे प्रभावी असतात. ते शब्द तो नंतर बोलतो. पण त्याला वाटतें कीं—

हे माझे शब्द नसून अंतरंगांतील ईश्वर जें बोलला ते मी ऐकलेले हे शब्द आहेत.

साहजिकच त्या शब्दांचें कर्तृत्व तो स्वतःकडे घेत नाही.

वेद हे असेच शब्द आहेत. त्या उच्च अवस्थेंत असतांना ऋषिमुनींनी ऐकलेले ते शब्द आहेत. आणि म्हणूनच वेदांना 'श्रुती' असें म्हणण्यांत आलें आहे.

ह्या दृष्टीने विचार केला तर वेद हे अपौरुषेय आहेत असें म्हणतां येईल.

कृष्णाचा हा शास्त्रशुद्ध विचार ऐकल्यावर मला इतका आनंद झाला, की मी भक्तिभावानें डोलूं लागलों.

आणखी प्रश्न विचारल्यावर गोपालकृष्ण म्हणाला--

भूक भागत नसतांना अथवा मनुष्य उपाशीं असतांना त्याला तत्त्वज्ञान सांगण्यात अर्थ नाही.

दुसरी बाजू देखील तूं लक्षांत घे की मनुष्याला फार हव्यास असतो. हा हव्यास कमी करणें हें तत्त्वज्ञानाचें काम आहे.

मला एकदम दोन गोष्टी आठवल्या.

एक भिक्षु गौतमबुद्धांच्याकडे गेला व म्हणाला--

" मी त्या भिकाऱ्याला खूप उपदेश करतों आहें, तत्त्वज्ञान सांगतों आहें, पण तो माझ्याकडे लक्षच देत नाही. "

गौतमबुद्ध म्हणाले—

" त्याला इकडे आणा. "

त्याप्रमाणे त्याला आणण्यांत आलें.

गौतमबुद्ध म्हणाले--

" त्याला पोटभर खाऊं घाला. "

त्याप्रमाणे त्याला पोटभर खाऊं घालण्यांत आलें.

गौतमबुद्ध म्हणाले--

" आता त्याला भरपूर विश्रांती घेऊं द्या. "

त्याप्रमाणे त्याने विश्रांती घेतली.

गौतमबुद्ध म्हणाले--

" आता त्याला तत्त्वज्ञान सांगा. "

त्याप्रमाणे त्याला तत्त्वज्ञान सांगण्यांत आलें, तेव्हा त्यानें तें तत्त्वज्ञान अगदी लक्ष लावून ऐकलें.

दुसरी गोष्ट टॉलस्टॉय ह्यांनी लिहिली आहे.

एका माणसाला सांगण्यांत आलें की--

सूर्य मावळण्यापूर्वी तूं जेवढी जमीन पादाक्रांत करशील तेवढी जमीन तुझ्या मालकीची होईल.

वेळ संपण्यापूर्वी आपणाला जास्तींत जास्त जमीन मिळावी ह्या हव्यासाने तो जोराने सुसाट पळत सुटला व शेवटीं धापा टाकीत रक्त ओकून मरण पावला.

त्याच्या दफनाला फक्त साडेतीन हात जमीन पुरली !!

मानवी हव्यासाची ही बोधप्रद व करुणाजनक कथा मोठी मार्मिक आहे.

सुधारणेबद्दल बोलतांना गोपालकृष्ण म्हणाला--

" केवळ कायदे करून सुधारणा होऊं शकते ही समजूत एकांगी आहे. सुधारणारूपी रथाला दोन चाकें असतात. एकाचें नांव कायदा व दुसऱ्याचें नांव संस्कार. जेव्हा हीं दोन चाकें सुरक्षित चालूं लागतात तेव्हा सुधारणेचा रथ डौलाने चालूं लागतो. संस्कार चांगले झाले असले म्हणजे काय परिस्थिती असते व संस्कार नाहींसे झाले म्हणजे काय प्रकार होतो ह्याबद्दलचे तुझे अनुभव तुला माहीत आहेतच. "

एकदम गोपालकृष्ण अदृश्य झाला व माझ्या जीवनांतले पूर्वीचे अनुभव मी स्वप्नांत पाहूं लागलों.

त्या वेळी मी कॉलेजांत होतों. कोकणांत रत्नागिरी जिल्ह्यांत चिपळूणला मी गेलों होतों. तेथे प्लेग असल्यामुळे बरेच लोक शेतांत झोपड्या घालून राहत होते. आम्ही पांचसहा लोक सायकली घेऊन तिकडे निघालों. झोपड्या रस्त्यापासून शेतांत आंत चार फर्लांग अंतरावर होत्या.

बाकीचे लोक म्हणाले--

"आपण येथेच रस्त्यावर सायकली टाकूं व संध्याकाळीं परत येऊन सायकली घेऊन जाऊं."

मीं म्हटलें,

"अहो! तुम्ही काय म्हणतां? आमच्या सांगली गांवांत घरांतून देखील सायकली चोरीला जातात!"

ते लोक म्हणाले--

"अहो! हें कोकण आहे. आमचें कोकण गरीब असेल, दरिद्री असेल, पण येथे चांगले संस्कार झाले असल्यामुळे आमच्याकडे चोऱ्या होत नाहीत. आम्ही रात्रीं सुद्धा घराचीं दारें उघडीं टाकून झोपी जातों."

मला तें बोलणें ऐकून खूप आनंद झाला. आम्ही संध्याकाळीं जेव्हा परत आलों तेव्हा आमच्या सायकली रस्त्यावर होत्या तशाच होत्या. माझी खात्री झाली की--

चांगल्या संस्कारांचा लोकांच्या मनावर फार चांगला परिणाम होतो. संस्कार चांगले झाले तर त्यामुळे जीवन सुखी होण्यास फार मदत होते.

पुढे अठ्ठावीस वर्षांनी मी रत्नागिरीस सेशन्स जज्ज म्हणून गेलों त्यावेळीं चांगले संस्कार लुप्त झाले होते. संस्कार लुप्त झाल्यानंतर मनुष्य किती दुष्ट बनतो त्याचा पुरावा मला पाहण्यास मिळाला.

माझ्यापुढे पहिलाच जो सेशन कज्जा आला त्याचें नांव चाफा खून कज्जा. एका तरुण खोताचें कांही लोकांशी कुळकायद्यामुळे भांडण होतें.

तो तरुण खोत रात्रीं ८–८॥ वाजतां जेवण्यास बसला होता. कांही लोक त्याच्या दारीं आले व त्यांनी गूळपाणी मागितलें. लगेच गूळपाणी घेऊन तो

खोत बाहेर आला. त्या लोकांनी त्याचा सुऱ्यांनीं खून केला !

त्याची तरुण बायको ओरडूं लागली. त्या लोकांनी तिला सुऱ्यांनी ठार मारलें. मरणोत्तर रिपोर्टांत असें दिसून आलें की, तिच्या अंगावर सुऱ्यांचे एक नाही, दोन नाही, तर अठ्ठावीस घाव होते !

त्या लोकांनी त्या तरुण खोताच्या म्हाताऱ्या आईला ठार मारलें; त्याच्या गड्याला ठार मारलें व त्याच्या सहा वर्षांच्या मुलीला देखील सुऱ्यांनी ठार मारलें !

क्रौर्याची कमाल, दुष्टपणाचा कळस, म्हणजे त्या तरुण खोताचा सहा महिन्यांचा मुलगा पाळण्यांत निजला होता, त्याला देखील त्या लोकांनी सुऱ्यांनी ठार मारलें, व अशा तऱ्हेने त्या रात्रीं सहा खून केले ! !

माझ्या डोळयांत पाणी आलें, आणि मी एकदम जागा झालों.

गोपालकृष्णाच्या फोटोला नमस्कार केला व म्हटलें--

"देवा ! आमच्या सरकारला संस्कारांचें महत्त्व पटो. कायदा व संस्कार हीं दोन चाकें सुरळीत चालूं लागोत व भारतीय सुधारणेचा रथ डौलाने मिरवो !"

* * *

# स्वप्न

## बारावें

रात्रीं देवघरांत मी पाटावर बसलों होतों. उदबत्तीचा वास दरवळत होता. नंदादीप तेवत होता. माझ्या मनश्चक्षूंपुढें गोपालकृष्णाची मूर्ती उभी होती. आज माझें मन सुंदर पंख लावून विचाररूपी आकाशांत भरमसाट भ्रमण करीत होतें.

मनाला केव्हा केव्हा मोकाट सोडण्यांत मजा असते. त्याच मजेचा आज मी पुरेपूर अनुभव घेत होतों. मनाला कुठलें स्फुरण चढलें होतें कुणास ठाऊक, पण मन देवाबरोबर मोठमोठ्याने बोलत होतें.

देवा ! तुला मायाळू, ममताळू, कृपाळू व कनवाळू म्हणतात, पण

कितीतरी लोक दुःखाने तडफडत आहेत ! तुला दया कशी येत नाही ?

हें दुःखानें भरलेलें जग निर्माण करण्यास तुला कोणीं सांगितलें ? कसला हा तुझा खेळ सुरू आहे ? कितीतरी दुःखी जीव ओरडतात की. " तुझा खेळ होतो, पण आमचा जीव जातो."

ह्यापेक्षा चांगलें जग तुला निर्माण करतां नसतें का आलें ?

साधू म्हणतात, तूं दयाळू आहेस, पण गेल्या जन्मीं आपण पातकें केल्यामुळे ह्या जन्मीं आपल्या वांट्याला दुःख आलें आहे.

देवा ! गेल्या जन्माच्याही पलीकडे आपण पाहूं. अगदी आरंभाकडे जाऊं. त्या वेळीं माणसांना तूंच बुद्धी दिलीस ना ? त्यावेळीं तूं भेद कां केलास ? अगदी आरंभीं तूं सगळ्या लोकांना कां चांगली बुद्धी दिली नाहीस ?

आज कितीतरी लोक अन्न नाही म्हणून ओरडत आहेत. अन्नाच्या हिशोबानेच तूं प्रजा कां निर्माण करीत नाहीस ? देवा, तुला शक्य असतांना लोकसंख्येचा प्रश्न तूं कां सोडवीत नाहीस ? देवा ! ज्या संतांना तुझा साक्षात्कार होतो त्यांना देखील अमर्याद सत्ता प्राप्त होत नाही ह्याचा अर्थ काय ? अरे ! रामकृष्ण परमहंस व योगी रमणमहर्षी यांना तुझा साक्षात्कार झाला, पण त्यांना शेवटी कॅन्सर झाला आणि त्यांतच त्यांचें निर्वाण झालें !

देवा ! माणसाला वाटतें जग आदर्श व्हावें, सर्व लोक सुखी व्हावेत, सद्‌गुणांचा पूर वाहावा, दुर्गुण नाहीसे व्हावेत, लोकांना खायला भरपूर अन्न मिळावें, पांघरायला चांगलें वस्त्र मिळावें, राहण्यास चांगलें घर मिळावें व साऱ्या लोकांचा संसार सुखासमाधानाचा व्हावा. देवा ! अशा तऱ्हेचें जग तूं कां निर्माण केलें नाहीस ? तुला तें करतां नसतें का आलें ? जगांत दुःखाचा पूर वाहतो आहे, खायला भरपूर अन्न नाहीं, पांघरायला चांगलें वस्त्र नाही, राहण्यास चांगलें घर नाही, जिकडेतिकडे दुःखाचा सुकाळ व सुखाचा दुष्काळ सुरू आहे – अशा तऱ्हेचें जग तूं कशाला निर्माण केलेंस ?

असलें दुःखी जग निर्माण करणारा तूं दयाळू कसा ? ममताळू कसा ? कृपाळू कसा ?

माझें मन देवाबरोबर भांडत होतें, अन् भांडतां भांडतां मला झोप आली. झोपेंत मला स्वप्न पडलें व स्वप्नांत गोपालकृष्ण माझ्यापुढे आला.

देवाबरोबर मीं वादविवाद केला. मानवाचें खूप दुःख माझ्या मनीं दाटलें होतें. दुःखाने माझीं गात्रें शिथिल झालीं होतीं, तोंड कोरडें पडलें होतें, शरीराला कंप सुटला होता, अंगाचा दाह होत होता व मन भ्रमल्यासारखें झालें होतें.

कृष्ण मात्र गालांतल्या गालांत हसत होता व तो आपली बाज मांडीत होता.

कृष्णाचें भाषण ऐकून मला एक नवी दृष्टी आली.

हें जग असें नाही, अन् तसें नाही म्हणून चडफडण्यांत फायदा असत नाही. जे लोक ह्याप्रमाणें नुसते चडफडतात त्यांना सुख लागत नाही. आजपर्यंत जे मोठे शोध लागले त्याचें कारण हें जग आहे तसें मानावयाचें आणि सूक्ष्म विचार करून बारीक बारीक नियम शोधून काढावयाचे.

सूक्ष्मांत जा – खोलांत जा – म्हणजे सृष्टिदेवी आपलें गुपित तुम्हांस सांगते व तुम्ही सुखी होतां.

भूतकाळचें परटोक कोणीं पाहिलें नाही, भविष्यकाळचें परटोक देखील कोणीं पाहिलें नाही. भूतकाळ व भविष्यकाळ ह्यांच्या दरम्यानचा जो थोडा काळ असतो त्याला वर्तमानकाळ म्हणतात. वर्तमानकाळ व भविष्यकाळ चांगला करण्याकरितां भूतकाळाचा अभ्यास करणें श्रेयस्कर असतें.

मानवी मन असें आहे की, तें वर्तमानकाळांत राहत असूनही भूतकाळांत डोकावण्याची त्याला जबरदस्त ओढ आहे. हें मन भूतकाळाची जमीन उकरतें आणि त्याला नगरें सांपडतात, मंदिरें सांपडतात, स्तूप सांपडतात, विहार सांपडतात. आपणाला कांही विशिष्ट भूतकाळ आहे ह्याबद्दलचा विलक्षण अभिमान मानवी मनाला आहे. असें सांगण्यांत येतें की,

इंग्लंडच्या सिंहासनाच्या खाली एक वेडावाकडा दगड आहे. इंग्रजांच्या पूर्वजांनी एक मोठी लढाई पूर्वी मारली होती, आणि विजयी झाल्यावर आनंदाच्या भरांत रणांगणावर पडलेल्या एका दगडावर बसूनच राजाने आपल्याला राज्याभिषेक करून घेतला. तोच दगड इंग्लंडच्या रत्नखचित सिंहासनाच्या खाली आज कित्येक शतकें आहे. भूतकाळाशी संबंध जोडण्याचा मोह मानवी मनाला कल्पनातीत असतो.

वस्त्राला उभे नि आडवे धागे असतात, त्याप्रमाणें मानवी जीवनरूपी वस्त्राला सुखदुःखांचे धागे असतात. कोणताही मनुष्य नुसताच सुखी किंवा नुसताच दुःखी असत नाही. प्रत्येक मनुष्याचें जीवन सुख व दुःख ह्यांचें मिश्रण असतें.

भूतकाळचें संशोधन केलें म्हणजे आपणास समजून येतें की, तोच मनुष्य खऱ्या अर्थाने सुखी होतो की जो दुःखावर विजय मिळवतो.

कृष्ण म्हणाला, " ते लोकमान्य टिळक पाहा; ती सीता पाहा. "

माझ्या स्वप्नांत एकदम लोकमान्य टिळक आले.

राजद्रोहाच्या आरोपाखाली त्यांच्यावर खटला सुरू होता. त्यांचें उतार वय झालें होतें. घरीं त्यांची बायको आजारी होती, मुलें लहान होतीं. ह्यांना कडक शिक्षा होणार म्हणून कोर्टांतील लोक रडत होते. फार दुःखाचा प्रसंग होता.

न्यायमूर्तींनी टिळकांना दोषी ठरवलें. शिक्षेबद्दल कांही सांगावयाचें आहे काय, म्हणून विचारलें. दुःखांतून सुटका करून घेण्याकरिता एखाद्याने माफी मागितली असती. पण धीरगंभीर आवाजांत टिळक म्हणाले,

' ज्यूरीने कांहीहि निकाल दिला असला तरी मी निर्दोषी आहें. कदाचित देवाची अशी इच्छा असेल, की मला जास्तींत जास्त त्रास व्हावा व माझ्या देशाचें कल्याण व्हावें. होऊं दे मला वाटेल तितका त्रास. पण माझ्या देशाचें कल्याण व्हावें. '

लोकमान्यांना कडक शिक्षा देण्यांत आली. पण कडक शिक्षा होऊनही लोकमान्य दुःखाच्या पलीकडे गेले व त्या रात्रीं सुखाने झोपीं गेले.

लोकमान्यांना मी भक्तिभावाने नमस्कार केल्यावर ते म्हणाले,

" जो दुःखाला भितो तो सुखी होत नाही. ज्यानें दुःखावर विजय मिळविला तोच खऱ्या अर्थाने सुखी होतो. "

टिळक जाऊन माझ्या स्वप्नांत सीता आली.

राजाची बायको, राजाची मुलगी, राजाची सून, पण बिचारी दुःख भोगण्याकरतांच जन्माला आलेली. लग्नानंतर बिचारी नवऱ्याबरोबर वनवासाला गेली. तिथें तरी सुख लागावें ? पण रावणाने तिला पळवून नेली.

रावणाचा वध करून राम तिला अयोध्येला घेऊन आला. तिच्या शुद्धतेची रामाला खात्री होती, पण प्रजेला वाटत होतें की—

जिला रावणाने पळविलें तिला रामाने घरीं ठेवून घेणें बरें नाही.

राजाच्या इच्छेपेक्षा प्रजेच्या इच्छेला जास्त मान देणें हें रामाचें व्रत.

त्याने सीतेचा त्याग करायचा असें ठरविलें व तिला वनांत सोडून दिलें. सीतेला वाटत होतें की, आपले डोहाळे पुरविले जात आहेत. पण वनांत लक्ष्मणाकडून तिला कळलें की, रामानें आपला त्याग केला आहे व पुन्हा आपणाला रामाचें व राजवाड्याचें दर्शन नाही !

सीतेने लक्ष्मणामार्फत रामाला निरोप पाठवला—

मला वाटेल तितकें दुःख होऊं दे, पण रामाचा यशोध्वज यावच्चंद्र-दिवाकरौ या पृथ्वीतलावर फडकूं दे. मी आता तप करतें. माझी एवढीच इच्छा आहे की, पुढच्या जन्मीं देखील मला रामच पती मिळूं दे."

त्या साध्वीचे ते बोल ऐकून मीं सीतेला साष्टांग प्रणिपात केला; तेव्हां सीतामाई म्हणाली, "जीवनांत सुखदुःखांचा पाठशिवणीचा खेळ सुरू असतो. दुःखाला भिणारा मनुष्य कधीच सुखी होत नाही. जो दुःखावर विजय मिळवितो तोच खरा सुखी होतो."

सीतामाई मला आणखी म्हणाली—

"आपण दुःखाच्या वाळवंटांत प्रवास करीत असतांना त्या वाळवंटांत देखील आपणाला सुखाचा ओलावा लाभतो. रामाने माझा त्याग केला आणि लगेच मला वाल्मीकि भेटले. ते मला म्हणाले, 'जानकी ! तुझ्यावरचा आरोप मिथ्या आहे. तूं वाईट वाटून घेऊं नकोस. हें तुझें माहेर आहे. पहिल्या खेपेस स्त्रिया माहेरीं बाळंतपणासाठी येतात ना ? तूं देखील तशीच माहेरीं आली आहेस ! मी सारं सारं तुझ्यासाठीं करीन !'

"हे वाल्मीकीचे बोल म्हणजे माझ्या सुखाचा परमोच्च बिंदू होता."

सीतामाई बोलली तें माझ्या हृदयाला जाऊन भिडलें.

इतक्यांत सीतामाई अदृश्य झाली व माझ्यापुढे बादशहा-बिरबल आले.

एकदा बादशहा फिरायला गेला असतांना त्याच्या पायांत काटा मोडला; तेव्हा बादशहाने बिरबलास हुकूम केला, "उद्यापासून रस्त्यावर गालिचे

पसर म्हणजे माझ्या पायांत काटा मोडणार नाही. चांगले तीन चार मैल उत्तम गालिचे अंथर."

दुसऱ्या दिवशीं बादशहा फिरावयास निघाला, पण रस्त्यावर गालिचे पसरले नव्हते. बादशहा संतापला. तेव्हा बिरलाने त्याच्यापुढे जोडे ठेवले व म्हटलें, " हे जोडे पायांत घालून फिरायला जा. तुम्हांला काटा बोचणार नाही."

बिरबलाचें हें उत्तर ऐकून मला खूप आनंद झाला. पायांत जोडे घालून बादशहा फिरायला गेल्यावर बिरबल मला म्हणाला, " लोकांना वाटतें कीं दुःखाचे काटे बोचूं नयेत म्हणून मानवी जीवनाच्या रस्त्यावर सुखाचे गालिचे अंथरलेले असावेत. पण असें होत नाही. दुःखाचे काटे बोचूं नयेत असें ज्यांना वाटत असेल त्यांनी तत्त्वज्ञानाचे जोडे पायांत घालावे म्हणजे दुःखाचे कांटे बोचणार नाहींत."

बादशहा–बिरबल जाऊन माझ्या स्वप्नांत टॉलस्टॉय आला. तो म्हणाला,

"त्या वेळीं माझें वय ४६ वर्षांचें असेल. जगाकडे पाहून मी फार दुःखी झालों होतों. हें जग पाहून मला दारुण निराशा वाटूं लागली. मी दुःखाच्या टोकाकडे गेलों. बुद्धिवाद लुळा पडला. आत्महत्येचे विचार माझ्या मनांत येऊं लागले. शेवटीं मला साक्षात्कार झाला की, परमेश्वरावरील श्रद्धेने मनुष्य निर्भय बनतो, सुखी होतो व जीवनांतील गंभीर प्रश्न सोडवूं शकतो. ही श्रद्धा म्हणजेच जीवनांतील रामबाण औषध आहे.

× × ×

मी एकदम जागा झालों. माझ्या मनांत विचार आला. सुसंगतींत सौंदर्य असतें. विसंगतींत विनोद असतो. ज्याला विसंगतींत सुसंगती दिसूं लागली त्याला तत्त्वज्ञान समजलें.

समोरच्या गोपालकृष्णाच्या फोटोला मी नमस्कार केला व म्हटलें,

" अंतरंगांतील आत्म्याचें संगीत व जगांतील विश्वात्म्याचें संगीत ह्यांचा जेव्हा सूर जुळतो तेव्हा दिव्य स्वप्न पडतें. देवा ! अशीं स्वप्नें मला वरचेवर पडूं द्यात !"

* * *

# स्वप्न तेरावें

' माझीं स्वप्नें ' ही लेखमाला सुरू झाल्यापासून माझ्यावर पत्रांचा पाऊस पडत आहे. एका पत्रांत एका भगिनीने लिहिलें आहे,

" मला चार मुलें आहेत. माझ्या यजमानांना पोटापुरता पगार आहे. पण माझें मन सदा नैराश्याने ग्रासलेलें असे. मला जीवनांत राम वाटत नसे. त्यामुळें मी सदा दुःखीकष्टी असें. मला जीवनांत उत्साहच वाटत नसे. ह्यावर उपाय म्हणून माझ्या यजमानांनी बऱ्याच डॉक्टरांना माझी प्रकृती दाखविली. मी त्या त्या डॉक्टरांचीं खूप औषधें घेतलीं; पण मला कांही

केल्या गुण येईना. मला माझ्या मैत्रिणीने एकदा 'प्रसाद'चे बरेच अंक दिले व त्यांतील 'माझीं स्वप्नें' ही लेखमाला वाचण्याची शिफारस केली. त्याप्रमाणें 'माझीं स्वप्नें' ही लेखमाला मीं वाचून काढली. एखादी जादूची कांडी फिरवावी त्याप्रमाणे माझ्या जीवनांत क्रांती झाली. माझें नैराश्य निघून गेलें. मला जीवनांत राम वाटू लागला. मला उत्साह वाटू लागला........आपले आभार कोणत्या शब्दांनी मानावेत तें मला कळत नाही. श्रीकृष्ण आपणांस उदंड आयुरारोग्य देवो अशी प्रार्थना आहे..."

'माझीं स्वप्नें' ह्या लेखमालेचा लोकांना जीवन सुखी करण्याकरितां उपयोग होत आहे हें पाहून मनाला बरें वाटतें.

आरंभीं ज्या वेळीं मी न्यायाधीश झालों तेव्हा पुष्कळदा स्वप्नांत मला कोर्टाचा देखावा दिसत असे. मी न्यायाधीशाच्या खुर्चीवर बसलों आहें, साक्षीदाराची साक्ष सुरू आहे, कोर्टाचा हॉल तुडुंब भरला आहे, साक्षीदार देवाची शपथ घेऊन अशी कांहीं साक्ष देत आहे की, जणू कांही देवाची शपथ म्हणजे खोटें बोलण्याचें लायसेन्स आहे अशी त्याची समजूत झाली आहे. दादोबांच्या व्याकरणांत पहिलें वाक्य असें आहे की 'शुद्ध कसें बोलावें, आणि शुद्ध कसें लिहावें हें व्याकरण शिकल्यानें समजतें.' ह्याच चालीवर कोर्टांत जमलेले लोक मनांत म्हणत आहेत की, खोटें कसें बोलावें आणि खोटें कसें वागावें हें कोर्टांत गेल्याने समजतें. मला वाटत आहे की, चेहऱ्याला रंगसफेती फासावी त्याप्रमाणें साक्षीदाराचें बोलणेंसवरणें म्हणजे सत्यावर दिलेला खोटयाचा उजाळा आहे.....

अशा तऱ्हेचीं पूर्वी पडणारीं स्वप्नें आता मला पडत नाहीत. हल्लीं मी पुष्कळ ठिकाणीं प्रवचनें देतों, आणि कांही कांही वेळां स्वप्नांत देखील प्रवचनें देतों. मला स्वप्नें खूप पडतात, पण त्यांपैकी बरींचशीं मामुली असतात. जेव्हा श्रीकृष्ण माझ्या स्वप्नांत येतो तेव्हा त्या स्वप्नांचें दिव्य स्वप्नांत रूपांतर होतें आणि सुखदुःखांच्या पर्वतावर बांधलेल्या आनंदाच्या मंदिरांत मी प्रवेश करतों.

त्या रात्रीं मी समर्थ रामदासांचा विचार करीत होतों.

जर्मन तत्त्ववेत्ता हेगेल ह्याचीं राजनीतीसंबंधी प्रमेयें प्रसिद्ध आहेत.

त्याच प्रमेयांच्या चौकटींत इतिहासाचार्य राजवाडे ह्यांनी समर्थांच्या उपदेशाला बसवण्याचा प्रयत्न केल्यावर जिकडे तिकडे बराच वादविवाद झाला. " **पंढरी कीं परळी ?** " " **वारकरी कीं धारकरी ?**" असले प्रश्न निर्माण झाले व दोन्ही बाजूंकडचे लोक हमरीतुमरीवर येऊं लागले.

मी एका ठिकाणीं प्रवचनाला गेलों होतों. बरेच वारकरी लोक प्रवचन ऐकण्यास जमले होते. प्रवचनाचा विषय ' ज्ञानेश्वर ' हा होता.

प्रवचन संपल्यावर असलेले वारकरी मला म्हणाले :

" आमच्या पठडींत आम्ही कधी रामदासांचें नांव घेत नाही. ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम ह्यांचीं नांवें घेतों, पण रामदासांचें नांव घेत नाही."

मीं विचारलें, ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम व रामदास हे महाराष्ट्राचें साधु-पंचायतन आहे. तुम्ही रामदासांचें नांव कां घेत नाही ?"

ते वारकरी म्हणाले,

" अहो ! ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम ह्यांनी भक्तिमार्गावर जोर दिला आहे, पण रामदासांनी भक्तिमार्गावर जोर न देतां राजकारणावर जोर दिला आहे. म्हणून त्यांचें नांव आम्ही घेत नाही. "

मी त्यांना म्हटलें,

" अहो! रामदासांनी भक्तीवर फार जोर दिला आहे. मनाच्या श्लोकांत गणरायाला वंदन केल्यावर ते म्हणतातः—

**मना सज्जना भक्तिपंथेंचि जावें ।**
**तरी श्रीहरी पाविजेतो स्वभावें ।।**

" ह्यांत ' **चि** ' शब्द लक्षांत ठेंवण्यासारखा आहे. "

हा आधार ऐकून लोक म्हणाले :

" हा आधार चांगला आहे, पण मनाचे श्लोक लहान मुलांच्याकरतां व बाया-बापड्यांच्याकरतां आहेत. पुरुषांसाठी दासबोध आहे. दासबोधांत रामदासांनी राजकारणावर जोर दिला आहे. "

ही और विचारसरणी ऐकून मी म्हटलें—

" अहो! दासबोधाचें तात्पर्य अथवा रहस्य सांगतांना त्यांनी भक्तीवरच

जोर दिला आहे. ते म्हणतात,

**भक्तिचेनि योगें देव। निश्चयें पावती मानव।**
**ऐसा आहे अभिप्राव। इथे ग्रंथीं ॥**

आणखी ते म्हणतात—

**ग्रंथा नाम दासबोध। गुरुशिष्यांचा संवाद**
**येथ बोलिला विशद। भक्तिमार्ग ॥**

हा आधार ऐकून ते लोक म्हणाले,

"आधार चांगला आहे. आता आम्ही केव्हा केव्हा समर्थ रामदासांचें नांव घेत जाऊं."

रात्रीं माझ्या स्वप्नांत गोपालकृष्ण आले व म्हणाले,

"हें पाहा! आज तूं समर्थ रामदासांच्यावर प्रवचन कर."

लगेच देखावा बदलला.

हजारो श्रोते बसले आहेत. व्यासपीठावर मी बसलों आहें. लाउड-स्पीकरची उत्तम व्यवस्था आहे. श्रोत्यांकडे मी पाहात आहें, पण मला मध्यभागीं गोपालकृष्ण दिसत आहे. गोपालकृष्णाला नमस्कार करून मी भावावस्थेंत गेलों व प्रवचन सुरू केलें आहे :

तुकाराम ह्यांत राम नंतर आहे व रामदास ह्यांत राम अगोदर आहे. रामदास लहानपणापासूनच देवाच्या मागें लागले, तर तुकाराम प्रपंच करून दुःखी झाल्यावर देवाच्या मागें लागले.

देवाच्या मागे लागलेले रामदास लहानपणींच आईला म्हणतात,

**"आई! चिंता करावी विश्वाची!**

समर्थभक्त शंकरराव देव म्हणतात,

"रामदासांचें आराध्यदैवत राम. रामाचा जन्म चैत्र शुद्ध नवमीस दुपारीं मध्यान्हप्रहरीं झाला. रामदासांचा जन्म देखील चैत्र शुद्ध नवमीस दुपारीं मध्यान्हप्रहरीं झाला. हा चमत्कार इतर साधुसंतांच्या बाबतींत झाला नाही."

ह्या म्हणण्याला थोडी पुस्ती जोडली पाहिजे. ज्याप्रमाणे रामदा रामभक्त होते त्याप्रमाणें ज्ञानेश्वर कृष्णभक्त होते. कृष्णाचा जन्म आहेत

वद्य अष्टमीस मध्यरात्रीं झाला, त्याचप्रमाणे ज्ञानेश्वरांचा जन्म श्रावण वद्य अष्टमीस मध्यरात्रीं झाला. जो चमत्कार रामदासांच्या बावतींत तोच चमत्कार ज्ञानेश्वरांच्या बाबतींत देखील आहे.

हां ! एक मात्र चमत्कार असा आहे, की तो रामदासांशिवाय इतर संतांच्या बाबतींत झाला नाही.

अहो ! बोहल्यावर लग्नास उभे असतांना 'सावधान' म्हटल्यावर रामदास पळून गेले !

हल्लीच्या काळीं असा चमत्कार होईल ?

हल्लीच्या काळीं चमत्कार झालाच तर वर वधूसकट पळून जाईल !!

सारे श्रोते एकदम हसूं लागले. गोपालकृष्ण देखील हसूं लागला.

गोपालकृष्णाला नमस्कार करून मी बोलूं लागलों,

रामदासांच्या आयुष्यांत बाराला महत्त्व आहे. रामदासांचा जन्म शके १५३० च्या चैत्र शु. नवमीस झाला. बारा वर्षें झाल्यानंतर शके १५४२ सालीं ते लग्नमंडपांतून पळून गेले. पुढलीं बारा वर्षें म्हणजे शके १५४२ ते १५५४ हीं वर्षें त्यांनी तपश्चर्येंत घालविलीं. बारा वर्षें कडक तपश्चर्या केल्यानंतर पुढील बारा वर्षें म्हणजे शके १५५४ ते १५६६ त्यांनीं तीर्थयात्रा केली.

तीर्थयात्रा करतांना त्यांना फार भयानक स्थिती दिसली. तत्कालीन स्थितीबद्दल ते म्हणतात.

पदार्थमात्र तितुका गेला। नुसता देशचि उरला।
येणेंकरता बहुताला। कष्ट झाले ॥
लोके स्थानभ्रष्ट झाली। कितेक तेथेच मेली।
उरली ते मराया आली। गावावरी ॥
माणसा खावया धान्य नाही। आंथरूण पांघरूण तेही नाही।
घर कराया सामग्री नाही। कायें करिती ॥
काहीच पाहता धड नाही। विचार सुचेना काही।
अखंड चिंतेच्या प्रवाही। बुडाले लोक ॥

अशी स्थिती पाहून हे रामाचे दास उदास झाले. केवळ स्वतःपुरता परमार्थ

करून भागणार नाही—केवळ स्वतःचें पारमार्थिक कल्याण करून भागणार नाही—ह्या विचाराने जोर केला व त्यांनी निश्चय केला,

राघवाची पदे मानसी धरीन ।
विश्व उद्धरीन हेळामात्रे ।।

ह्या उद्देशाने समर्थ शके १५६६ सालीं कृष्णातीरीं आले व त्यांनी आपल्या संप्रदायाची उभारणी केली. त्यांचें ब्रीदवाक्य असें होतें.

देव मस्तकी धरावा।
आणि अवघा हलकल्लोळ करावा ।।

समर्थांनी देवाच्या नांवावर फार जोर दिला आहे.

रामपूरचे नबाब आजारी पडले व त्यांची वाचा बसली. बरेच डॉक्टर आले पण कांही उपयोग होईना. शेवटीं चंदोसीचे लीलाधर वैद्य आले. त्यांनी डॉक्टरांना विचारलें,

"औषध देऊन बरं करूं का औषध दाखवून बरं करूं ?"

डॉक्टर मनांत म्हणाले,

"हे वैद्य मोठे औरच दिसतात ! आम्हीं सगळे उपाय केले पण उपयोग होत नाही, आणि हे वैद्य म्हणतात औषध देऊन बरं करूं का औषध दाखवून बरं करूं ?"

डॉक्टर वैद्यांना म्हणाले,

"हिम्मत असेल तर औषध दाखवून नबाबसाहेबांना बरं करा."

वैद्यांनी शाळेंतील पन्नास मुलें बोलावलीं. प्रत्येकाजवळ एक लिंबू व एक चाकू दिला आणि त्यांना सांगितलें,

एकेकाने नबाबसाहेबांच्याजवळ जायचें; त्यांच्या देखत लिंबू कापावयाचें. त्यांना कापलेलें लिंबू दाखवून बाहेर जायचें.

त्याप्रमाणे हा प्रयोग करण्यांत आला. आवळा, चिंच, लिंबू ह्यांच्या स्मरणाने देखील आपल्या जिभेला पाणी सुटतें. ह्या प्रयोगामुळे नबाबसाहेबांच्या तोंडाला सारखें पाणी सुटलें व ते बोलूं लागले.

जमलेले डॉक्टर थक्क झाले. त्यांनी वैद्यांची पाठ थोपटली व म्हटलें,

"तुमचा प्रयोग शास्त्रीय आहे. धन्य आहे तुमची." ाहेत.

करून भागणार नाही—केवळ स्वतःचें पारमार्थिक कल्याण करून भागणार नाही—ह्या विचाराने जोर केला व त्यांनी निश्चय केला,

राघवाची पदे मानसी धरीन ।
विश्व उद्धरीन हेळामात्रे ।।

ह्या उद्देशाने समर्थ शके १५६६ सालीं कृष्णातीरीं आले व त्यांनी आपल्या संप्रदायाची उभारणी केली. त्यांचें ब्रीदवाक्य असें होतें.

देव मस्तकी धरावा ।
आणि अवघा हलकल्लोळ करावा ।।

समर्थांनी देवाच्या नांवावर फार जोर दिला आहे.

रामपूरचे नबाब आजारी पडले व त्यांची वाचा बसली. बरेच डॉक्टर आले पण कांही उपयोग होईना. शेवटीं चंदोसीचे लीलाधर वैद्य आले. त्यांनी डॉक्टरांना विचारलें,

"औषध देऊन बरं करूं का औषध दाखवून बरं करूं ?"

डॉक्टर मनांत म्हणाले,

"हे वैद्य मोठे औरच दिसतात ! आम्हीं सगळे उपाय केले पण उपयोग होत नाही, आणि हे वैद्य म्हणतात औषध देऊन बरं करूं का औषध दाखवून बरं करूं ?"

डॉक्टर वैद्यांना म्हणाले,

"हिम्मत असेल तर औषध दाखवून नबाबसाहेबांना बरं करा."

वैद्यांनी शाळेंतील पन्नास मुलें बोलावलीं. प्रत्येकाजवळ एक लिंबू व एक चाकू दिला आणि त्यांना सांगितलें,

एकेकाने नबाबसाहेबांच्याजवळ जायचें; त्यांच्या देखत लिंबू कापावयाचें. त्यांना कापलेलें लिंबू दाखवून बाहेर जायचें.

त्याप्रमाणे हा प्रयोग करण्यांत आला. आवळा, चिंच, लिंबू ह्यांच्या स्मरणाने देखील आपल्या जिभेला पाणी सुटतें. ह्या प्रयोगामुळे नबाबसाहेबांच्या तोंडाला सारखें पाणी सुटलें व ते बोलूं लागले.

जमलेले डॉक्टर थक्क झाले. त्यांनी वैद्यांची पाठ थोपटली व म्हटलें,

"तुमचा प्रयोग शास्त्रीय आहे. धन्य आहे तुमची." ाहेत.

मित्रहो ! आपण जेव्हा प्रेमाने देवाचें नांव घेतों तेव्हा हृदयाला आनंदाचें पाणी सुटतें, अंतरंगातील देवाची वाचा बोलूं लागते, व आपण सुखाने न्हाऊन निघतों.

मित्रहो ! पुष्कळ लोकांची अशी समजूत आहे, कीं गुरू केल्याशिवाय परमार्थमार्गांत तरणोपाय नाहीं. रामदासांनी लौकिक अर्थाने गुरू केले नव्हते. त्यांनी रामालाच आपले गुरू मानलें.

मी आपणांला एक गुह्य गोष्ट सांगतों की,

**समर्थांचा राम म्हणजे आत्माराम.**

गीतेंत सांगितल्याप्रमाणे ईश्वर प्रत्येकाच्या अंतःकरणांत वास करीत असतो. ह्या ईश्वराला--त्या आत्मारामाला-गुरू करणें नितान्त आवश्यक आहे.

समर्थ म्हणतात :

**राम राम सर्वही म्हणती । कोणी न जाणती आत्माराम ।।**
**राम हा कालचा सुत दशरथाचा ।**
**अनंत युगींचा आत्माराम ।।**
**रामासि राम जरी ठाव असता ।**
**शरण कां जाता वसिष्ठासी ।।**

ऑस्कर वाल्डइने म्हटलें आहे,
कलेच्या उपासनेनेच सर्व प्रश्न सुटतील.
समर्थं म्हणतील,
आत्मारामाच्या उपासनेनेच सर्व प्रश्न सुटतील.

असें दिसतें की, रामदासांना एकनाथांचें फार आकर्षण होतें. शके १५२० मध्ये एकनाथ पैठण येथे समाधिस्त झाले व पुढे दहा वर्षांनी शके १५३० मध्ये रामदास जांबेस जन्मले. असें म्हणतात की, रामदासांची आई व एकनाथांची बायको ह्या सख्ख्या बहिणी होत्या. नाथवाणी व दासवाणी [illegible]न बरेच ठिकाणीं साम्य आहे.

[illegible]नाथ म्हणतात :

**दत्त ध्यावा दत्त गावा। दत्त आमुचा विसावा।।**
**दत्त जनी दत्त वनी। दत्तरूप हे अवनी ।।**

रामदास म्हणतात :

**राम ध्यावा राम गावा। राम आमुचा विसावा।**
**राम जनी राम वनी। रामरूप हे अवनी ।।**

संत दैववादी असतात ही समजूत चुकीची आहे. ज्ञानेश्वर म्हणतात :

**म्हणोनि अभ्यासासी काही।**
**सर्वथा दुष्कर नाही ।।**

तुकाराम म्हणतात :

**असाध्य ते साध्य। करिता सायास ।।**
**कारण अभ्यास। तुका म्हणे ।।**

मित्रहो ! आपण असें लक्षांत घ्या की--

एक वेळ बैल दूध देईल, सूर्य उगवायचा थांबेल, किंवा गुलाब सुवास देण्याचें बंद करील, पण संत लोक प्रयत्नवाद सोडणार नाहीत.

रामदासांनी तर ह्या बाबतींत खूप उंच उडी मारून सांगितलें की,

**यत्न तोचि देव जाणावा।**

मी प्रवचन करीत होतों; माझ्यासमोर गोपालकृष्ण होता. मला एकदम जिकडे तिकडे गोपालकृष्ण दिसूं लागला. एका उच्च भावावस्थेंत असतांना मी बोलूं लागलों,

रामदासांना जिकडे तिकडे राम दिसत होता. एकनाथांना जिकडे तिकडे जनार्दन दिसत होता. मात्र हा अनुभव येण्यासाठी अहंकार जावा लागतो.

एकनाथमहाराज म्हणतात :

**जनी आहे जनार्दन।**
**परी तयाते पहावया सांडी अभिमान ।।**

लहान मुलांच्या शाळेंत एक बिशप गेले असतांना इतर मुलांचीं उत्तरें चुकलीं, पण मिल्टनचीं सारीं उत्तरें बरोबर आलीं.

शेवटीं बिशप म्हणाले,

" बाळ ! तुला शेवटचा प्रश्न विचारतों. ह्याचें उत्तर बरोबर दि

आहेत.

तुला एक नारिंग बक्षीस देईन. बाळ, देव कुठं आहे ? "

छोटा मिल्टन म्हणाला,

" फादर, देव कुठे नाही तें मला सांगा, म्हणजे तुम्हाला मी दोन नारिंगें बक्षीस देईन. "

त्या गोष्टींत खूप मार्मिकपणा आहे.

रामदासांनी आणि इतर संतांनी अहंकार सोडला म्हणून त्यांना जिकडें तिकडे देव दिसूं लागला. आपणाला देखील हा अनुभव येईल.

मित्रहो ! आता आपण एका नितान्त वादाच्या मुद्द्याकडे वळूं. तो मुद्दा म्हणजे समर्थ रामदास व शिवाजीमहाराज ह्यांची भेट झाली ती कोणत्या सालीं ?

ह्या बाबतींत दोन मतें आहेत, तीं अशीं : शिव-समर्थांची भेट शके १५७१ मध्ये झाली हें एक मत, व दुसरें मत असें की, शिव-समर्थ भेट शके १५९४ मध्ये झाली

पहिलें मत स्वीकारलें तर शिवाजीने स्वराज्य संपादन केलें त्यांतल्या यशाचा कांहीसा वांटा समर्थांच्याकडे जातो. दुसरें मत स्वीकारलें तर शिवाजीच्या स्वराज्य-संपादनाचा समर्थांच्या नेतृत्वाशीं कांहीही संबंध येत नाही.

दोन्ही बाजूंकडून जो पुरावा सादर करण्यांत आला आहे तो पाहून असा निकाल द्यावा लागतो की,

शिवाजीमहाराज व रामदास यांची भेट शके १५७१ मध्ये झाली.

रामदासांनी ' राजकारण ' हा शब्द कोणत्या अर्थानें वापरला त्याबद्दल खूप वादविवाद झाला आहे. तो वाद लक्षांत घेऊन असें म्हणावेंसें वाटतें की,

रामदास हे राजकारणी होते.

प्रपंच व परमार्थ ह्यांमध्ये समाज ह्या नांवाची एक वस्तू आहे, आणि देह व देव ह्यांमध्ये देश ह्या नांवाची वस्तू आहे. समर्थांच्या समाज-उन्मुखतेला व देश–उन्मुखतेला प्रसंगविशेषीं राजकारणाची प्रखरता प्राप्त झाली आणि म्हणूनच समर्थ राजकारणी झाले.

मी हें बोलत होतों आणि माझ्यापुढे असलेला श्रीकृष्ण संमतिदर्शक मान हालवीत होता. त्यामुळे विशेष जोर येऊन मी बोलूं लागलों,

गीतेमध्ये गोपालकृष्णांनी ज्ञान, कर्म व भक्ती यांचा समन्वय केला आहे. रामदासांनी ज्याप्रमाणे प्रपंच व परमार्थ ह्यांचा समन्वय केला, त्याचप्रमाणे—

**निवृत्ति माहेर। प्रवृत्ती सासर।**

असें म्हणून प्रवृत्ती व निवृत्ती ह्यांचा समन्वय केला.

आपण असें लक्षांत घ्या की, ज्याला उत्तम पोहतां येतें त्यालाच पाण्यामध्ये अजिबात हातपाय न हलवता निश्चेष्ट तरंगतां येतें. ज्याला उत्तम प्रवृत्तिमार्ग जुळला त्यालाच निवृत्तिमार्ग जुळतो.

आपण प्रवृत्तिमार्ग अनुसरत असलों तरी ध्यान करावें, शरीर निश्चल ठेवावें, मनांत देवाशिवाय कोणताही विचार आणूं नये ह्याकडे आपला ओढा असतो. त्यामध्ये आपणाला अत्युच्च आनंद मिळतो.

मुलीचें कार्यक्षेत्र सासर असतें पण तिचा ओढा माहेरीं असतो. आपलें कार्यक्षेत्र प्रवृत्तिमार्गांत असतें, पण आपला ओढा निवृत्तिमार्गाकडे असतो. सासर सोडून कायमचें माहेरीं राहण्यास आलेल्या मुलीला सुख लागत नाही. प्रवृत्तिमार्ग सोडून कायमचें निवृत्ति मार्गांत राहणाऱ्या माणसाला खरें सुख लागत नाही.

कांहीं लोकांचा आक्षेप असा आहे की,

रामदास समतावादी नव्हते व ते प्रतिगामी होते.

हा आक्षेप बरोबर दिसत नाहीं.

**भेटो कोणी एक नर धेड महार चांभार।**
**त्याचें राखावें अंतर त्या नांव भजन॥**

असें गर्जून व आवर्जून रामदास सांगतात हें लक्षांत घेण्यासारखें आहे.

रामदासांचा मुख्य भर गुणावर आहे. लोक गुणाकडे न पाहतां बाह्य गोष्टींकडे पाहतात. पण ही दृष्टी चुकीची आहे असें समर्थांना वाटतें.

जनकाने विद्वानांची सभा बोलावली होती. त्या सभेंत अष्टावक्र गेल्यावर बाकीचे विद्वान् मोठ्याने हसूं लागले.

अष्टावक्र देखील जोराने हसूं लागला.

एका विद्वानाने विचारलें,

" महाराज, आपण कां हसतां ?"

अष्टावक्राने विचारलें,

" बाकीचे लोक कां हसत आहेत ?"

तो विद्वान् म्हणाला,

" आपलें शरीर आठ ठिकाणीं वाकलें आहे ना ? म्हणून ते हसत आहेत."

अष्टावक्राने उत्तर दिले,

" मी हसतों ह्याचें कारण मला एका विद्वानांच्या सभेला येण्याबद्दल आमंत्रण होतें; पण येथें येऊन पाहतों तो येथे चांभारांची सभा जमली आहे. ह्या साऱ्यांचें लक्ष हाडें नि कातडें ह्यांकडे आहे."

मित्रहो ! ह्या गोष्टीचें मर्म लक्षांत घ्या. रामदासांनी बाह्य गोष्टींवर जोर न देतां गुणांवर जोर दिला आणि ह्यांतच त्यांचें मोठेपण आहे.

मी समोर कृष्णाकडे पाहिलें. त्याच्या चेहेऱ्यावर मला स्मित दिसत होतें.

मित्रहो ! समर्थांनी खूप वाङमय लिहिलें आहे. त्यामध्ये आनंदवनभुवनाची बहार कांही आगळी व वेगळी आहे. आपण हें म्हणूं लागा म्हणजे आपली इष्टदेवता आपल्यापुढे येते. मला ह्यामध्ये मोठें दिव्यत्व दिसतें. जेव्हा जेव्हा मी हें म्हणतों तेव्हा तेव्हा माझ्या डोळ्यांपुढे कृष्ण येतो. माझ्यासमोर असणाऱ्या कृष्णाला मी नमस्कार केला व भावावस्थेंत टोकाला जाऊन ' आनंदवनभुवन ' मधील कांही भाग मी म्हणूं लागलों :

कल्पांत मांडला मोठा । म्लेंछ दैत्य बुडवया ।
कैपक्ष घेतला देवी । आनंदवनभुवनी ॥
बुडला औरंग्या पापी । म्लेंच्छ संहार जाहला ।
मोडली मांडली क्षेत्रे । आनंदवनभुवनी ॥
उदंड जाहले पाणी । स्नानसंध्या करावया ।
जपतप अनुष्ठानें । आनंदवनभुवनी ॥
लिहिला प्रत्ययो आला । मोठा आनंद जाहला ।
चढता वाढता प्रेमा । आनंदवनभुवनी ॥

देव भक्त एक झाले। मिळाले जीव सर्वही।
संतोष पावले तेथें। आनंदवनभुवनी ।।

मी हा भाग म्हणत असतांना सारी सभा दिव्य वातावरणांत गेली.

थोड्या वेळाने मी म्हटलें,

कांहीं लोक म्हणतात, आनंदवनभुवन म्हणजे वाराणसी. दुसरे कांही लोक म्हणतात की, आनंदवनभुवन म्हणजे महाराष्ट्र.

सखोल अभ्यास केला म्हणजे असें दिसतें की, हें काव्य सर्वस्वी वाराणसीला लागू पडत नाही किंवा सर्वस्वी महाराष्ट्राला लागू पडत नाही. सखोल अभ्यास केला म्हणजे असें दिसतें की, ह्या काव्यांत साक्षात्कार सृष्टी आहे द्रष्टेपण आहे, व दिव्य दर्शन आहे. समर्थांचें जीवन पाहिलें म्हणजे असें दिसतें की,

आधी केले मग सांगितलें

हा त्यांचा बाणा होता.

पुष्कळ लोक सांगतात एक, बोलतात एक, पण करतात दुसरेंच.

अमेरिकेंत सिगमंड लोंबर्ग ह्यांचें 'स्मरणशक्ती कशी वाढवावी' ह्या विषयावर लॉस एन्जंल्स येथें उत्तम व्याख्यान झालें. पण व्याख्यान झाल्यानंतर स्वतः व्याख्यातेच आपली हॅट विसरून गेले.

समर्थांनी खूप खूप विचार करून आपलें वाङमय लिहिलें, म्हणून त्याला किंमत आहे. असें म्हणतात की, कांट ह्यांचा Critic of Pure Reason हा अत्युकृष्ट ग्रंथ आहे. पण हा ग्रंथ लिहिण्यापूर्वी कांट बारा वर्षे त्या ग्रंथाबद्दल विचार करीत होता.

समर्थांनी खूप खूप विचार केला; जीवनाचे धडे स्वतः पाठ केले व मग ग्रंथ लिहून लोकांना ते शिकविले.

चांगले विचार आचरणांत आणणें महत्त्वाचें आहे. तबल्याचे बोल तोंडपाठ म्हणणें सोपें आहे, पण ते वाजवून दाखविणें कठीण आहे.

द्रोणाचार्यांनी कौरव व पांडव ह्यांना एके दिवशीं दोन धडे पाठ करण्यास सांगितलें. पहिला धडा–खरें बोलावें. दुसरा धडा–क्रोध ताब्यांत ठेवावा.

दुसरे दिवशीं भीमाने कौरवांची चुगली केली व त्यांनाच मारलें.

कौरवांनी कुंतीकडे तक्रार केली. बाकीच्या पांडवांनी भीमाची बाजू बरोबर म्हणून समर्थन केलें, पण धर्मराजाने खरा प्रकार कुंतीमातेला सांगितला.

दुसरे दिवशीं द्रोणाचार्यांनी विचारलें—

" दिलेले धडे पाठ केलेत का ? "

साऱ्यांनी होय म्हटलें. पण--

धर्मराज म्हणाला,

" गुरुजी ! पहिला धडा पाठ झाला, पण दुसरा धडा अजून पाठ झाला नाही. "

द्रोणाचार्यांना राग आला. त्यांनी एकदम छोटया धर्मराजाच्या, तोंडात मारली.

धर्मराज शांत राहिला व म्हणाला,

" गुरुजी ! आता दोन्ही धडे पाठ झाले. "

मी सांगितलेली ही गोष्ट गोपालकृष्णाला फार आवडली असें मला त्याच्या चेहेऱ्यावरून दिसू लागलें. मी पुढे बोलूं लागलों,

समर्थ देवमय होऊन गेले होते. त्यांना वाटत होतें की,

देवापासून दूर जाणें म्हणजे पाप.

लूथरने देखील हेंच म्हटलें आहे. तो म्हणतो :

Sin is essentially a departure from God.

समर्थांचें वाङमय वाचून आपण जास्तींत जास्त प्रयत्न करावा, मात्र प्रयत्न केल्यावर अमुकच फळ मिळालें पाहिजे असा आग्रह करूं नये. हा आग्रह धरल्यामुळें आपण दुःखी होतों. जास्तींत जास्त प्रयत्न केल्यावर आपण म्हणावें कीं—

जें फळ देव देईल तें उत्तम. त्याची तशी इच्छा होती. माझी तीच इच्छा आहे.

मेरिडिथनें असेंच म्हटलें आहे. तो म्हणतो :

The best is which God sends;
It was his will; it is mine.

समर्थांचें वाङ्मय वाचून आपणांला वाटूं लागतें की,

विचार करणें म्हणजे आत्म्याचें स्वतःशीच बोलणें आहे.

प्लेटोने देखील असेंच म्हटलें आहे. तो म्हणतो,

Thinking is the talking of the soul with itself.

समर्थ जें बोलतात तें अंतःकरणापासून.

पुष्कळ लोक खूप बोलतात पण अंतःकरणापासून कांहीच बोलत नाहीत. शेक्स्पीअरच्या भाषेंत बोलायचें म्हणजे—

Words, words, mere words; no matter from the heart.

मित्रहो ! समर्थांचा उपदेश नुसता वाचून वा ऐकून उपयोगी नाही. तो आचरणांत आणला पाहिजे. जो मनुष्य शहाणपणाचे नियम फक्त जाणून घेतो पण त्याप्रमाणे वागत नाही, तो असा मनुष्य आहे की, जो फक्त शेताची नांगरणी करतो पण पेरणी करीत नाही. त्या बाबतींत सादीने जें म्हटलें तें तुम्ही ऐकलें असेल. तो म्हणतो :

He who learns the rules of wisdom without conforming to them in his life is like a man who ploughs in his field but does not sow.

उर्दूचे श्रेष्ठ कवी गालिब ह्यांना एका अधिकाऱ्याने विचारलें,

" आप मुसलमान ? "

गालिब म्हणाले,

" जी, आधा ! "

अधिकारी गोंधळांत पडला. त्याने विचारलें,

" मतलब ? "

गालिब हंसत हंसत म्हणाले,

" जी शराब पीता हूं, सुवर नहीं खाता. "

इस्लाम धर्माने मद्यपान निषिद्ध मानलें आहे, पण कितीतरी मुसलमान कवींनी मदिरेची खूप स्तुती केली आहे.

कवि दाग म्हणतात :

लुत्फ़े मैं तुझसे क्या कहूँ जाहिद।
हाय कमबख्त तूने पीही नहीं।

धर्म एक प्रकारचा व वर्तन दुसऱ्या प्रकारचें, असला प्रकार समर्थांच्या बाबतींत कदापि दिसावयाचा नाही.

गालिब व दाग ह्यांचे उद्गार ऐकून श्रोत्यांना हसूं आलें. गोपाल-कृष्णाच्या मुखावर देखील बारीकसें स्मित दिसूं लागलें.

कृष्णाचें स्मित म्हणजे माझा परमोच्च सुखाचा ठेवा. विश्वरूप पाहिल्यावर देखील अर्जुनाला छोटें सगुण रूप पाहण्याची अनावर इच्छा झाली ह्याचें रहस्य मला समजून आलें. मला वाटूं लागलें--

कृष्णाचें स्मित म्हणजे सुकावयास लागलेल्या झाडावर मेघांचा वर्षाव; किंवा तहानेने पीडलेल्या माणसाला अमृताची भेट; किंवा भुकेलेल्या माण-साला पंचपक्वानांचें जेवण. तें स्मित पाहून मला अनुभव येऊं लागला की,

माझ्या हृदयप्रदेशांत आनंदवृक्षांची लावणी होत आहे व आनंदाने मी मस्त होत आहें.

कृष्णाला नमस्कार करून मी पुढे बोलूं लागलों :

वेदान्ती लोक मुक्तीवर जोर देतात, सांख्य कैवल्यावर जोर देतात, राजयोगी निर्विकार समाधीवर भर देतात, तर बुद्धाचे अनुयायी निर्वाणावर भर देतात. मनाची संकल्प-विकल्प रहित अवस्था प्राप्त करून घेणें व वैयक्तिक मुक्ती साधणें ह्यांवर मुख्य भर असतो. समर्थांनी ह्यावर जोर दिलाच, पण त्याचबरोबर समाजाच्या कल्याणाचा ध्यास घेतला. त्याच उद्देशाने त्यांनी कृष्णातटाकीं वास्तव्य करून उदंड समाजकारण व धर्मकारण केलें.

समर्थांच्या काव्याला बरेच लोक ललित चष्म्यांतून पाहून नांवे ठेवतात. आपण असें लक्षांत घ्या की,

चाफळ खोऱ्यांतील वारा प्यालेलें, प्रयत्नांच्या पाण्यावर पोसलेलें, 'प्रचीतीविण बोलणें। वमनप्रायें त्यागणें।' ह्या मंत्रावर जगलेलें, आणि 'मिळमिळीत अवघें टाकावें। उत्कट भव्य तेंचि घ्यावें' ह्या आसनावर आरूढ झालेलें समर्थांचें काव्य जिवंत वाङमय आहे. तें रम्य नसेल, पण

भव्य व दिव्य आहे.

ह्या जिवंत वाङ्मयाच्या अंतरंगांत तुम्ही प्रवेश करा म्हणजे तुमच्या अंतःकरणांतील दिव्य शक्ती जागृत होईल.

आपण देहाचें मोठें कौतुक करतों, पण देहाला कधी सुवास येतो का ? तो येण्याकरितां सुगंध चोळावा लागतो.

तो वाळा पाहा. तें एक साधें गवत आहे, पण त्यामुळे सारी बाग सुगंधित होऊन जाते. तो मारवा पाहा. तो वीतभर सुद्धां वाढत नाही, पण त्याचा घमघमाट सगळीकडे पसरतो. मोगरा, गुलाब, चाफा, पारिजातक, जाईजुई ह्यांच्या सुगंधाने आपणाला नंदनवनांत गेल्यासारखें होतें.

मित्रहो ! समर्थांचें काव्य वाचून आपण आपल्या हृदयांत जो ईश्वर आहे, जो आत्माराम आहे, त्याची पूजा करूं लागलों व त्यामध्ये रंगून गेलों म्हणजे आपल्या अंतरंगांत दिव्य बाग निर्माण होते व आपल्या बोलण्यांत, चालण्यांत, वागण्यांत असा कांही रम्य सुगंध निर्माण होतो, की त्याला दुनियेंत तोड सापडत नाही.

म्हणा--समर्थ रामदासमहाराज की जय.

लोकांनी तसें म्हटलें व खूप वेळ टाळ्यांचा प्रचंड कडकडाट केला. तो कडकडाट ऐकून एकदम मी जागा झालों.

माझ्या स्वप्नांत कृष्ण आल्यामुळे व त्याच्या तालावर बोलत मी प्रवचन केल्यामुळे आनंदसागरांत मी पोहत होतों. मी मनांतच म्हणूं लागलों :

चंद्र तेथे चंद्रिका। सांब तेथे अंबिका।
भाग्य तेथे विलास। सुख तेथे उल्लास।
कृष्ण तेथे ज्ञान। ज्ञान तेथे समाधान।
दिव्य स्वप्न पडे जेव्हा। अपार आनंद होई तेव्हा ।।

गोपालकृष्ण महाराज की जय.

* * *

## स्वप्न चौदावें

लोक ज्याची स्तुती करतात तो चांगला माणूस. ज्याचा चांगुलपणा दिखाऊ नसून खरा असतो तो उत्तम माणूस. ज्याचा चांगुलपणा पूर्णत्वास गेलेला असतो तो दिव्य माणूस; आणि जो दिव्य माणूस लोकांच्या जीवनावर पराकोटीचा परिणाम करतो तो अवतार.

ह्या अवतारी पुरुषांमध्ये कृष्णाच्या जीवनाने मी मोहून गेलों आहें. ह्या कृष्णाने मला संदेश दिला आहे की, जेव्हा तुझ्याजवळ कांही सांगण्यासारखें असेल तेव्हाच लिही.

कोलंबियांतील प्रसिद्ध साहित्यिक डॉ. फ्रॅंक आयडेलॉट ह्यांनी एकदा आइन्स्टीनच्या सन्मानार्थ मेजवानी दिली. लोकांनीं बोलण्याचा आग्रह केला म्हणन आइन्स्टीन उभे राहिले व म्हणाले,

"मित्रहो, मला फार वाईट वाटतें की, माझ्याजवळ आपल्याला सांगण्यासारखें कांही नाही."

एवढें बोलून ते खाली बसले. जमलेले लोक फार दुःखी झाले. तेव्हा आइन्स्टीन पुन्हा उभे राहिले व म्हणाले,

"मला क्षमा करा. जेव्हा माझ्याजवळ सांगण्यासारखें कांही असेल तेव्हा मी आपणहोऊन तुम्हांपुढे येईन."

त्यानंतर बऱ्याच दिवसांनी डॉ. आयडेलॉटला आइन्स्टीनची तार आली, "आता माझ्याजवळ सांगण्यासारखें कांही आहे."

पुन्हा मेजवानीचा कार्यक्रम आंखण्यांत आला आणि त्या वेळीं आइन्स्टीनने भाषण केलें.

कृष्णाचा संदेश ह्या दृष्टीनें मला मोलाचा वाटतो. ज्या रात्रीं कृष्ण माझ्या स्वप्नांत येतो ती रात्र मला फार आनंदाची वाटते. स्वप्नांतून जागें झाल्यावर दिवसभर मला सारखें कृष्णाचें स्मरण होतें.

मुखावरील मुग्ध हास्य दाखवीत येणारी उषा, नयनांतून तेजस्वी प्रकाशाची झळाळी फेकणारी दुपार, आणि चेहऱ्यावर विलास व उल्हास दाखविणारी संध्या ह्या सर्वांमध्ये कृष्णाच्या वेगवेगळ्या छटा मला दिसू लागतात. माझ्या गॅलरीमधून जेव्हा मी सागराचा नील विस्तार पाहतों तेव्हा कृष्णाचा नीलवर्ण तर आपण पाहात नाही ना, असा मला भास होतो. चंद्रप्रकाशांत न्हाऊन निघालेल्या रात्रीचें सौंदर्य जेव्हा मी पाहतों तेव्हा मला वाटू लागतें की, मध्यरात्रीनंतर जिकडे तिकडे नीरव, निःस्तब्ध शांती पसरली असतांना माझें मन आनंदाने काठोकाठ भरून टाकणारें दिव्य स्वप्न मला पुन्हा पडेल का?

त्या दिवशीं संध्याकाळी ऑफिसांतून आल्यावर ताईने–माझ्या पत्नीने–मला आलेलीं बरींच पत्रें दिलीं. त्या पत्रांचा सूर असा होता :

"मनुष्याला शारीरिक दुःख झालें तर डॉक्टरकडे जातां येतें, पण

मानसिक दुःख झाल्यावर डॉक्टराकडे जाऊन उपयोग होत नाहीं. ' माझीं स्वप्नें ' ही आपली लेखमाला ह्या दृष्टीने फार उपयोगी आहे. मानसिक दुःखें नाहींशीं करून जीवन सुखी करण्याकरितां त्या स्वप्नांचा फार उपयोग होतो. कृपा करून ' माझीं स्वप्नें ' ह्या लेखमालेचें पुस्तक प्रकाशित करावें व समाजावर उपकार करावेत. "

हीं पत्रें मीं वाचून ठेवल्यावर ताई म्हणाली,

" तुमचे विचार लोक मोठ्या आवडीने वाचतात. तुम्ही लोकांच्या शंकांना सयुक्तिक उत्तरें देतां. मला एक शंका आहे, त्याचें उत्तर द्या. शंका अशी :

" सीता शुद्ध असतांना व ती गर्भार असतांना रामाने तिचा त्याग केला व तिला वनांत सोडून दिलें हें बरोबर झालें नाही असें मला वाटतें. नरकासुराने बंदींत टाकलेल्या स्त्रियांचा कृष्णाने उद्धार केला व त्यांना स्वतः आधार दिला. त्याच्या उलट, रामाने सीतेचा कांहीं अपराध नसतांना तिला स्वतः आधार देण्याऐवजीं तिचा त्याग केला, हें मला वाटतें बरोबर झालें नाही. "

ताईची शंका जरूर विचार करण्यासारखी होती. थोडासा विचार करून मीं म्हटलें,

" राग एरव्ही वाईट, पण संगीतांत राग पाहिजे. लय एरव्ही वाईट, पण संगीतांत लयीला फार किंमत आहे. कंप एरव्ही वाईट, पण संगीतांत कंपाला फार महत्त्व आहे. रामाने सीतेचा त्याग केला तो सर्वसाधारण दृष्टीने वाईट असेल, पण तत्त्वज्ञानाच्या प्रांतांत त्याला फार मोठें महत्त्व आहे. आपल्या आईला दुःख देणें एरव्ही वाईट असेल, पण रामदासांनी अथवा शंकराचार्यांनी घराचा त्याग करून आपल्या आईला जें दुःख दिलें त्याचें महत्त्व परमार्थाच्या प्रांतांत आगळें नि वेगळें आहे. सामान्य दृष्टीने सीतेचा त्याग वाईट ठरत असेल, पण राजाच्या इच्छेपेक्षा प्रजेच्या इच्छेला जास्त किंमत दिली पाहिजे, ह्या तत्त्वाचें पालन करून रामाने स्वतःची इच्छा बाजूस सारून व स्वतः जास्तींत जास्त दुःख भोगून सीतेचा त्याग केला ह्या गोष्टीचें मर्म तूं लक्षांत घे. अग ! वनांत जेव्हां सीतेला कळलें

कीं, रामाने आपला त्याग केला आहे तेव्हा ती म्हणते,

"मला वाटेल तितका त्रास होऊं दे, पण माझ्या रामाचा कीर्तिध्वज यावच्चंद्रदिवाकरौ फडकत राहूं दे. मी वाटेल तितकें दुःख भोगायला तयार आहें. मला पुढच्या जन्मीं देखील रामच पती मिळूं दे."

माझें उत्तर ऐकून ताईचें थोडेंबहुत समाधान झालें. मनुष्य अध्यात्म-मार्गांत पडला म्हणजे आपल्या पत्नीबरोबर देखील तो शृंगाराच्या गोष्टी बोलण्यापेक्षा अध्यात्माच्या गोष्टी बोलतो.

सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ सर ऐझॅक न्यूटन घरीं बसला असतांना त्याची प्रेयसी त्याच्या घरीं आली. रंगांत येऊन न्यूटननें तिचा हात आपल्या हातांत घेतला, पण इतक्यांत त्याच्या मनांत बायनॉमियल थिअरमसंबंधीचे विचार सुरू झाले व प्रेमाची भाषा बंद झाली.

अध्यात्ममार्गांत पडलेल्या माणसाचें असेंच कांही तरी होत असावें.

त्या रात्रीं मी देवघरांत बसलों असतांना समोर असलेल्या गोपाल-कृष्णाच्या फोटोला नमस्कार करून मीं मनांतल्या मनांत बोलूं लागलों :

महाभारतांत म्हटलें आहे —

> तर्कोऽप्रतिष्ठः श्रुतयो विभिन्नाः
> नैको ऋषिर्यस्य वचः प्रमाणम् ।
> धर्मस्य तत्त्वं निहितं गुहायां
> महाजनो येन गतः स पंथाः ॥

तर्क पाहावा तर तो अनिश्चित; वेद भिन्न भिन्न सांगणारे; स्मृतींमधील ऋषी पाहिले तर असा एकहि ऋषी नाही, की ज्याचें वचन इतरांपेक्षा अधिक प्रमाण मानतां येईल; धर्माचें मूलतत्त्व अंधारांत दडलेलें. ह्यासाठी महाजन, म्हणजे मोठे लोक, ज्या मार्गानें गेले तोच खरा मार्ग.

देवा! 'महाजनो येन गतः स पन्थाः।' हें म्हणणें ठीक आहे. पण कृष्णा, रामाचा कांही एक अपराध न करणाऱ्या वालीचा रामानें वध केला तें बरोबर आहे का? परशरामानें बापाच्या आज्ञेवरून आईलाच ठार मारलें! सामान्य माणसांनी "महाजनो येन गतः स पथाः।" असें म्हणून हा मार्ग अनुसरावा का?

ऐतरेय ब्राह्मणांत म्हटलें आहे की, देवांचें वर्तन पाहावें तर कोणी अहल्येचे जार, तर कोणी आपल्याच कन्येचा अभिलाष धरल्यामुळे रुद्राच्या बाणाने भग्नशरीर होऊन पडलेले ! !

मला वाटतें,

म्हणूनच म्हटलें असेल--

**न देवचरितं चरेत्।** ( देवासारखें वागूं नये )

देवा !

" महाजनो येन गतः स पंथाः " हें म्हणणें बरोबर आहे काय ? अरे ! द्रौपदीवस्त्रहरणाच्या वेळीं भीष्म-द्रोणादिक गप्प कसे बसले ?

भीष्म-द्रोण हे अन्यायी कौरवांच्या बाजूने लढले तें बरोबर आहे का ?

" **अर्थस्य पुरुषो दासः दासस्त्वर्थो न कस्यचित्।** "--पुरुष अर्थाचा गुलाम आहे—अर्थ कोणाचा गुलाम नाहीं--हें त्यांचें प्रतिपादन बरोबर आहे का ?

देवा तुला काय वाटतें ?

माझ्या स्वप्नांत असल्या शंकांचें मोहोळ उठलें असतांना मी निश्चय केला की--

जर रात्रीं कृष्ण स्वप्नांत आला तर ह्या शंका त्याला विचारावयाच्या.

त्या रात्रीं स्वप्नांत कृष्ण आला, पण वरील शंका विचारण्याचें भानच मला राहिलें नाही. पुष्कळदा असें होतें की,

आपण कांही शंका टिपून ठेवतों, पण स्वप्नांत कृष्ण आल्यावर त्याला दुसरेंच कांहीतरी विचारतों. स्वप्नसृष्टी मोठी मजेशीर आहे हेंच खरें.

स्वप्नांत मी व्यासपीठावर बसलों होतों. माझ्यापुढे हजारो श्रोते जमले होते. श्रीकृष्ण माझ्याकडे पाहून हसत होता. कोणत्या विषयावर बोलावें तेंच मुळीं ठरलें नव्हतें.

आजपर्यंत मीं खूप प्रवचनें दिलीं आहेत. पण प्रत्येक वेळीं विषय ठरलेला असे व त्या विषयाची तयारी करून मीं मुद्दे टिपलेले असत.

आजचा प्रसंग वेगळाच होता. विषय ठरला नव्हता. माझी कांहीच तयारी नव्हती. तो और प्रकार पाहून व पुढें बसलेले हजारो श्रोते पाहून

मला अंतःकरणांत भीती वाटूं लागली. समोरच्या गोपालकृष्णाला मी नमस्कार केला व मनांत म्हटलें,

"देवा! माझी अशी फजिती कां करतोस? तुझ्या मनांत तरी काय आहे?"

लग्न झालेल्या मुलीला उखाणा घेण्यास सांगितलें व तिला उखाणा आठवला नाही म्हणजे एखादी बाई तिला मदत करते व तिच्या कानांत कांही तरी सांगते. ह्या प्रकारामुळे त्या मुलीला दिलासा मिळतो व ती उखाणा घेते.

मला वाटलें, कृष्ण असाच कांहीं तरी दिलासा मला देईल व माझ्या कानांत कांहीतरी सांगेल. पण—

असें झालें तर तो कृष्ण कसला?

मी घाबरलों आहें, माझी फजिती होण्याची पाळी आली आहे, माझ्या अंगाला घाम सुटला आहे, हें पाहून कृष्णाची करमणूक झाली. माझ्याकडे पाहून तो हसूं लागला.

त्या हंसणाऱ्या कृष्णाकडे पाहून मी मनांत म्हटलें,

"देवा! तूं जेव्हा चेष्टा करतोस तेव्हा भक्ताला त्रास होतो, पण त्या त्रासांतच त्याचें कल्याण सांठवलेलें असतें. मला खूप त्रास झाला आहे. तुला अनन्यभावाने मी शरण आलों. कृपा करून माझें कल्याण कर."

इतक्यांत एक श्रोता उभा राहिला व म्हणाला,

"परमार्थमार्गात प्रवास करणाऱ्या माणसाचा आंतरिक जीवनाचा मार्ग कसा असतो?— ह्या विषयावर आपण आज कांहींतरी आम्हांस सांगा."

आणखी कितीतरी श्रोते म्हणाले, "हो! ह्याच विषयावर बोला. हेंच आम्हांला ऐकावयाचें आहे."

माझ्यापुढे गोपालकृष्ण होता. तो माझ्या अंतरंगांत आला. मी निमित्तमात्र झालों.

तोंडाने मी बोलत होतों, पण बोलविता धनी होता गोपालकृष्ण. मला कमालीचा आनंद वाटत होता. दोन दिवस उपाशीं असलेल्या माणसाला पंचपक्वान्नांचें जेवण मिळावें, किंवा पैसा पैसा भिक्षा मागणाऱ्या

भिकाऱ्याला एकदम हजार रुपये मिळावेत म्हणजे ज्याप्रमाणे आनंद होईल त्याप्रमाणें मला आनंद झाला.

सारा श्रोतृवर्ग साऱ्या इंद्रियांचे कान करून तन्मयतेने भाषण ऐकत होता व माझ्या तोंडून शब्द फुटत होते,

" जर्मन तत्त्वज्ञानी हेगेल ह्याने म्हटलें आहे की,

प्रगती होत असतांना ज्याप्रमाणे नाव प्रथम एका बाजूला व मग विरुद्ध बाजूला कलते आणि नंतर पुढे सरकते, त्याप्रमाणे परमार्थमार्गांत मन प्रथम आस्तिकवादाकडे जातें, मग नास्तिकवादाकडे कलतें, आणि नंतर पुढचा विकासाचा टप्पा गांठतें.

परमार्थमार्गांत प्रवास करणारा मनुष्य प्रथम आस्तिक असतो. परमेश्वराचा साक्षात्कार करून घ्यावयाचा असा त्याने दृढनिश्चय केलेला असतो. खूप प्रयत्न केल्यावर यश येत नाहीसें पाहून तो नास्तिक वादाकडे झुकतो. त्याची अंधारी रात्र सुरू होते. आणि मग देवाची कृपा होऊन परस्परविरुद्ध भासणाऱ्या अवस्थांचा समन्वय होऊन त्याला परमेश्वराचें दर्शन घडतें.

पहिल्या अवस्थेंत परमार्थी मनुष्य देवाचें दर्शन करून घेण्याचा निश्चय करतो. ह्या अवस्थेंत तो देवाला म्हणतो,

" देवा ! तुझी मला आठवण व्हावी म्हणून माझ्यावर दुःखें येऊं द्यात, माझ्यावर आपत्ती ओढवूं द्यात; मी फकीर देखील होऊं द्या, पण मला रात्रंदिवस तुझी आठवण होऊं द्या.

" देवा, तुझ्यावांचून मला कोणाचाच आधार नाही. माझें मन मायाजाळांत गुंतवूं नको. देवा ! माझा अहंकार नाहीसा कर. मन निर्मळ कर. मला नेहमी तुझें चिंतन घडूं दे.

" देवा ! वेठीस धरलेल्या बिगाऱ्याप्रमाणें मी संसार करीत आहें. पण माझा जीव तुझ्याच ठिकाणीं गुंतला आहे. तुझ्या चिंतनाच्या वेलीवर मी पक्षी होऊं द्या. कासव आपले पाय पोटांत सांठवतें त्याप्रमाणे मला तुझे पाय पोटीं सांठवूं द्या.

" देवा ! मला संतांचा समागम होऊं द्या. संतांच्या वाटेवरील धुळीचा

कण मी होऊं द्या. संतांच्या पायांतील जोडे मी होऊं द्या. देवाच्या मार्गावरील नळ मी होऊं द्या व त्या नळावर संत पाय धुऊं द्यात. ''

दुसऱ्या अवस्थेंत परमार्थी मनुष्य निराश होतो. त्याच्या आंतरिक जीवनाची अंधारी रात्र सुरू होते. खूप प्रयत्न करून देखील देवाला स्वप्नांत सुद्धा न पाहिल्यामुळे तो निराशेच्या टोंकाला जातो. संतमंडळींत बसण्याची त्याला लाज वाटते.

नामदेव, एकनाथ, तुकाराम, रासदास ह्यांना देवाने दर्शन दिल्याचें त्याला माहीत असतें; पण स्वतःला दर्शन न झाल्यामुळें तो कासावीस होतो. आत्महत्येचे विचार त्याच्या मनांत येतात. पाण्याशिवाय मासा तडफडतो तसा तो तडफडतो.

त्याला जग ओसाड वाटूं लागतें. देवाचें दर्शन म्हणजे आरशांतील धन आहे असें त्याला वाटूं लागतें. तो परमार्थाची भाषा बोलतो, पण मनांतून त्याला वाटतें की, आपले बोल म्हणजे अनुभवाशिवाय बोल – फळाशिवाय वृक्ष – चंद्राशिवाय रात्र – सूर्याशिवाय दिवस.

तो देवाला म्हणतो,

" मी तुझ्या दारींचा कुत्रा आहें. मला हांकलून देऊं नकोस. मी तुझ्या दारीं आलेला भिकारी आहें. मला भिक्षा घाल. नाही म्हणूं नकोस. कृपा कर. कृपा कर. मी लहान बालक आहें. मी फार दमलों आहें. मला आता चालवत नाही. आईप्रमाणे मला कडेवर घे. मी चातकाप्रमाणे तृषित झालों आहें. माझे डोळे आकाशाकडे लागले आहेत. कृपा करून मेघ होऊन पाऊस पाड. ''

शेवटीं त्याची निराशाच होते. संसार बुडाला व परमार्थ देखील बुडाला असें त्याला वाटूं लागतें. भोवऱ्यांत सांपडल्याप्रमाणे त्याची अवस्था होते. तो देवाला शिव्या देऊं लागतो. तो म्हणतो,

देवा ! तूं दयाळू नाहीस, कृपाळू नाहीस, ममताळू नाहीस. तुझें वर्तन सावत्र आईप्रमाणे दुष्टाव्याचें आहे. तूं स्वतः भिकारी आहेस आणि भक्ताला देखील भिकारी करतोस. माझ्यासारख्यांचें वाटोळें करावयास तूं बसला आहेस.

तुझें गुणगान करणें ह्यासारखा महामूर्खपणा जगांत दुसरा नाही. तूं माता नाहीस, पिता नाहीस, बंधू नाहीस, तर साता जन्मांचा वैरी आहेस. आता यापुढे तुझें नांव घेणें बंद. **मला आता तूं मेलास.** जगाला मी ओरडून सांगणार, की देव ह्या जगांत नाही. जो त्याच्या मागे लागतो तो अफूच्या तारेंत असतो. ह्या देवाच्या पाठीमागे लागल्यामुळे माझा सत्यानाश झाला. माझ्यासारखा दुर्दैवी मनुष्य दुसरा कोणी असणार नाही.

निराशेचें टोक गाठलें जातें. मग तिसरी अवस्था सुरू होते. निराशेच्या काळ्याकुट्ट ढगांभोंवतीं साक्षात्काराचा प्रकाश चमकूं लागतो. सुखाने—समाधानाने—भरलेलें देवाचें रूप त्याला दिसतें. अंतःकरणाच्या देवळांत तो देवाची मूर्ती सांठवून ठेवतो. अंधारी रात्र संपते, आनंदाची पहांट सुरू होते, व वाटूं लागतें की, आतापर्यंत भोगलेलें पराकाष्ठेचें दुःख देखील सुखास कारणीभूत झालें. धनाच्या लोभाने ज्याप्रमाणे कृपण मनुष्य जास्त जास्त संपत्तीकडे धांव घेतो, त्याप्रमाणे त्याचें मन वाढत्या आनंदाकडे धांव घेतें. नदी व समुद्र ह्यांचा संगम झाल्यावर साऱ्या लाटा एकरूप होतात, त्याप्रमाणे त्याच्या साऱ्या भावना ईश्वराशीं एकरूप होतात.

तेज, अनाहत नाद व आनंद ह्या त्रयीमुळें त्याचें जीवन सुखी होतें. तो आत्मानंदाने मस्त होतो. दुःखांत देखील त्याला सुख दिसूं लागतें.

त्याला वाटूं लागतें की, आपण निमित्तमात्र असून देवच सारें कांही करीत आहे. त्याला आता एकान्त मिळत नाही. कारण त्याला जिकडे तिकडे देवच दिसूं लागतो.

त्याला वाटूं लागतें की, सारें विश्वच माझें घर आहे. आत्मा व देव ह्यांमधील भेद नाहीसा होतो व त्याला समजून येतें की—

**देव आपल्या अंतरंगांत आहे व तो देव म्हणजे आत्माराम.**

तो आपलें मरण आपल्या डोळ्यांनी पाहतो व त्याचा पुनर्जन्म होतो. त्याचा अहंकार मरतो व त्याचें आनंदाचें नवीन जीवन सुरू होतें.

ह्या आनंदाच्या साम्राज्यांत उन्मनी अवस्थेचा ध्वज फडकूं लागतो, अनाहत ध्वनीचें गाणें सुरू होतें व परोपकाराचा प्रसाद वांटला जातो.

**गोपालकृष्ण महाराज की जय।**

प्रवचन संपल्यावर एक विद्वान् गृहस्थ आभार मानायला उभे राहिले. ते म्हणाले,

" इंग्लिशमध्ये एक म्हण आहे—

Knowledge comes and wisdom lingers.

ज्ञान येतें पण शहाणपणा यायला वेळ लागतो. पुस्तकें वाचून ज्ञान मिळतें, पण शहाणपणा मिळत नाही. शहाणपण येण्यासाठी अनुभव व चिंतन ह्यांची अत्यंत आवश्यकता आहे. आजच्या प्रवचनकारांचा अनुभव व चिंतन फार मोठें आहे. त्यामुळे त्यांच्या प्रवचनांत नुसतें ज्ञान नसून शहाणपणा देखील आहे.

ह्या प्रवचनाला हिंदू, मुसलमान, ख्रिश्चन, पारशी वगैरे साऱ्या धर्मांचे लोक आले आहेत. ते सारे लोक ह्या प्रवचनाने मोहून गेले आहेत. ह्याचें मुख्य कारण म्हणजे कोणत्याही विशिष्ट धर्माच्या चष्म्यांतून हें प्रवचन दिलें नसून, विश्वधर्म अथवा मानवताधर्म ह्या भूमिकेंतून हें प्रवचन देण्यांत आलें आहे.

संगीतांत म्हणतात की,

**सूर गया तो सर गया, लेकिन ताल गया तो जान गया।**

ह्या प्रवचनांत ताल व सूर ह्यांचा फारच सुंदर मेळ बसला होता. परमार्थ प्रांतांतलें इतकें सुंदर प्रवचन मीं ह्यापूर्वी ऐकलें नव्हतें..."

त्या वक्त्याने फारच स्तुती केलेली पाहून मला वाटूं लागलें की,

मी फक्त निमित्तमात्र आहें. स्तुती कृष्णाची करायला पाहिजे. मी कुठे ह्या स्तुतीला पात्र आहें ?

इतक्यांत देखावा बदलला. सारे श्रोते दिसेनासे झाले. एकटाच मी राहिलों. माझ्यापुढे गोपालकृष्ण आला. त्याला नमस्कार करून मी म्हटलें,

" देवा ! तुझ्यामुळे माणसाळा उच्च विचार स्फुरतात. उच्च विचाराला काळाचें बंधन असत नाही. तो कधी शिळा होत नाही. तो ऐकतांना वा वाचतांना आपल्या आंतरिक जीवनाचा एखादा कोपरा भरून जातो व आपणांला आनंदाच्या गुदगुल्या होतात. मला वाटतें, जो विचार काल,

आज, उद्या, केव्हाही मनाची पकड घेऊं शकतो तोच उच्च विचार."

गोपालकृष्ण म्हणाला

"तुझ्यावर मी प्रसन्न झालों आहें. काय वाटेल तें मागून घे."

मी गोपालकृष्णाच्या ह्या शब्दांनी आनंदाच्या पुरांत पोहूं लागलो. सुखाच्या चांदण्यांत नाचूं लागलों व समाधानाच्या पाण्याने न्हाऊन निघालों.

आनंदाने बेभान होऊन मी गोपालकृष्णाच्या सुंदर, मधुर, मनोहर रूपाकडे पुन्हा पुन्हा पाहूं लागलों.

गोपालकृष्णाला नमस्कार करून मी म्हटलें,

"देवा! मायबापा! परमेश्वरा! मला तुझी भक्ती दे. बाकी कांही नको."

गोपालकृष्णाने माझ्या डोक्यावर हात ठेवून म्हटलें,

"तथास्तु!"

आणि एकदम मी जागा झालों.

देव प्रसन्न झाला असतांना मीं जें मागितलें तें बरोबर का चूक ह्याबद्दल मला चुटपुट लागली. मला कितीतरी ऐहिक गोष्टी मागून घेतां आल्या असत्या, पण त्यांपैकी एकही गोष्ट मीं मागितली नाही.

असें सांगतात की, एका आंधळ्यावर देव प्रसन्न झाला असतांना व एक वर माग असें देव म्हणाला असतांना आंधळा म्हणाला,

"माझ्या नातवाच्या डोक्यावर राज्यछत्र धरलेलें मी माझ्या डोळ्यांनी पाहावें."

एकाच वरांत त्या आंधळ्याने खूप गोष्टी मागितल्यामुळे आपण त्याच्या अक्कलहुशारीचें कौतुक करतों. मीं जें मागणें मागितलें त्यांत अशी अक्कलहुशारी नव्हती.

मला पुनः पुनः वाटूं लागलें की, मीं मागितलें तें बरोबर का चूक?

रात्रीं निजतांना मीं ठरवलें होतें कीं, जर कृष्ण स्वप्नांत आला तर अमुक अमुक प्रश्न त्याला विचारावयाचे; पण त्यांपैकी एकही प्रश्न मी कृष्णाला विचारला नाही.

माझ्या डोक्यांत भलें मोठें विचारचक्र सुरू झालें. शेवटीं मला स्वामी विवेकानंदांची गोष्ट आठवली.

त्यांचे वडील वारल्यावर ते दरिद्री झाले. त्यांना नोकरी पाहिजे होती, पण नोकरी मिळेना. त्यांचे व त्यांच्या कुटुंबाचे पोटापाण्याचे फार हाल होऊं लागले.

ते आपले गुरू रामकृष्ण परमहंस यांच्याकडे गेले. रामकृष्ण म्हणाले,

" जा देवीच्या देवळांत. वाटेल तें माग. देवी तुला देईल. "

विवेकानंद मोठ्या आनंदाने देवळांत गेले. अमुक अमुक मागायचें असें त्यांनी मनाशीं ठरवलें होतें.

ते देवीजवळ गेले. त्यांना एकदम प्रकाश दिसला व ते म्हणाले,

" देवी ! मला तुझी भक्ती दे. दुसरें कांही नको. "

विवेकानंद बाहेर आले. त्यांच्या मनाला चटपूट लागली की झालें तें बरोबर झालें नाहीं.

रामकृष्ण परमहंस म्हणाले,

" वाईट वाटून घेऊं नकोस. पुन्हा देवळांत जा आणि पाहिजे तें मागून घे. "

विवेकानंदांनी काय काय मागावयाचें तें मनाशीं ठरवलें व ते देवळांत गेले. तेथें त्यांना पुन्हा प्रकाश दिसला व ते म्हणाले,

" देवी ! तुझी भक्ती मला दे. दुसरें कांही नको. "

× × ×

मला वाटूं लागलें, की ह्या गोष्टींत फार मोठा अर्थ आहे व आपण देवाजवळ जें मागायला पाहिजे तेंच मागितलें.

माझी चुटपूट नाहीशी झाली. मी मनांत म्हटलें,

भक्ती हें आत्म्याचें संगीत आहे, दुःखावरलें रामबाण औषध आहे, आणि सुखाच्या काळीं आनंद देणारें नंदनवन आहे.

* * *

# स्वप्न

पंधरावें

सकाळच्या टपालांत बरींच पत्रें होतीं. त्यांत एक पत्र असें होतें. " ....... मी बहुजनसमाजापैकी आहें. माझें थोडेंबहुत शिक्षण झालें आहे. ' माझीं स्वप्नें ' ही आपली लेखमाला मी फार आवडीने वाचतो. जीवनामध्ये मनुष्य पुष्कळदा निराश होतो. तो आपल्या दैवावर चडफडतो. त्याला ज्याची इच्छा असते तें त्याला मिळत नाही. तो वैतागून जातो व दुःखी बनतो. शारीरिक दुःख निर्माण झालें तर डॉक्टरांच्याकडे जातां येतें पण मानसिक दुःख निर्माण झाल्यावर डॉक्टरांच्याकडे जाऊन उपयोग होत नाही. अशा वेळीं आपली लेखमाला फार उपयोगी पडते. आपलें लिखाण

वाचून मला वाटूं लागतें की —

परमार्थाच्या व्यापारांत दुःखाचें भांडवल घालून जें व्याज अथवा जो नफा मिळतो त्याचें नांव सुख. परमार्थाच्या जमिनींत दुःखाची पेरणी करूनही सुखाचें पीक येऊं शकतें. नाथांच्या घरची अशी ही उलटी खूण आहे ......

आपण खूप लिहा, आणि माझ्यासारख्या लोकांच्यावर उपकार करा. परमेश्वर आपणाला शतायु करो ...... "

कौतुक करणारीं बरींच पत्रें होतीं. तीं वाचून फ्रान्समधल्या प्रख्यात विनोदी गृहस्थाची आठवण झाली.

हा मनुष्य पैसे लावून तीन तास प्रयोग करीत असे. त्या प्रयोगांत तो एकटाच बोलत असे; पण इतका विनोद करीत असे, की लोकांची हसतां हसतां मुरकुंडी वळत असे. त्याच्या प्रयोगाला नेहमीं चिक्कार गर्दी होत असे व "हाऊस फुल्ल" चा बोर्ड झळकत असे.

वर्तमानपत्रांतून त्याच्यावर स्तुतीचा वर्षाव होत असे.

एकदा एक मनुष्य एका डॉक्टरांच्याकडे गेला व म्हणाला,

" माझ्याजवळ खूप पैसा आहे, मी कीर्तिवान आहें, दिसायला चांगला आहें, मला प्रेमळ बायकापोरें आहेत. पण—

मला मनःशांती नाही.

मला कांहीतरी औषध द्या."

डॉक्टर म्हणाले,

" मनःशांतीवर माझ्याजवळ औषध नाही. पण मीं तुम्हांला एक उपाय सांगतों. आपल्या देशांत एक विनोदी गृहस्थ आला आहे. तो पैसे लावून आपले प्रयोग करतो आहे. त्याचा दौरा सुरू आहे. मी त्याचे प्रयोग पाहिले नाहीत पण वृत्तपत्रांतील रिपोर्ट पाहतां लोक सारखे तीन तास हसतात. तुम्ही त्याचे बरेच प्रयोग पाहा व खूप हसा, म्हणजे तुम्हांला मनःशांती मिळेल."

तो गृहस्थ म्हणाला,

"अहो ! जो विनोदी गृहस्थ प्रयोग करतो ना ? तो मीच. मलाच

मनःशांती नाही !"

ही गोष्ट मोठी मार्मिक आहे. ज्या पुस्तकांत मीं ही गोष्ट वाचली होती त्यामध्ये लेखकाने शेवटी लिहिलें होतें,

मनःशांती पाहिजे असेल तर तत्त्वज्ञानाचा आसरा घेतला पाहिजे.

मला वाटलें—

ह्या शेवटच्या वाक्यांत फार मोठा अर्थ सांठवला आहे.

मी नंतर स्वप्नाबद्दल विचार करूं लागलों.

आपल्या पूर्वीच्या लोकांना प्रत्यक्ष सृष्टींतही माया दिसत होती त्यामुळे स्वप्न म्हणजे भ्रम असें एखाद्या प्राचीन पंडिताने म्हटलें तर त्यांत आश्चर्य वाटण्यासारखें कांही नाही. असें असलें तरी पूर्वीच्या लोकांनीं स्वप्नाबद्दल थोडाफार विचार केला आहे.

छांदोग्य उपनिषदांत म्हटलें आहे—

**यदा कर्मसु काम्येषु**
**स्त्रियं स्वप्नेऽभिपश्यति ।**
**समृद्धि तत्र जानीयात्**
**तस्मिन्स्वप्ने निदर्शने ॥**

काम्य कर्में सुरू असतांना जर स्वप्नांत स्त्री दिसेल तर समृद्धी आहे असें समजावें.

पाश्चात्य व पौर्वात्य तत्त्वज्ञान यांचा खूप अभ्यास केला व अनुभवाचा आधार घेतला म्हणजे समजूत येतें की, परमेश्वर स्वर्गांत नाही, कैलासांत नाही किंवा दुसरीकडे कोठे नाही तर तो आपल्या अंतःकरणांत आहे. आपणांला पुष्कळदा मामुली स्वप्नें पडतात—त्यांना महत्त्व असत नाही. पण जेव्हा अंतरंगांतील दिव्य शक्ती स्वप्नांत सगुण रूप धारण करते व आपणाशीं बोलते तेव्हा त्या स्वप्नाला दिव्य स्वप्न म्हणतात, ह्या दिव्य स्वप्नामुळ दुःखाचें दुःखत्व सुसह्य होऊं शकतें व सुखाचें सुखत्व वाढतें.

स्वप्नाच्या निरनिराळ्या व्याख्या आहेत. एक व्याख्या अशी की,

ताबा असलेल्या किंवा नसलेल्या आठवणींचा भास म्हणजे स्वप्न.

दुसरी व्याख्या अशी की,

झोपेत इंद्रियें स्तब्ध असून मनच निरनिराळीं रूपें धारण करतें व जागें झाल्यावर आपणाला झोपेंत मनाने केलेले कांही चाळे आठवतात. ते चाळे म्हणजे स्वप्न.

तिसरी व्याख्या अशी की, विवेकशील मनाचा लोप झाल्यावर विवेक-शून्य मनाचें झोपेंत जें वावरणें तें म्हणजे स्वप्न.

चौथी व्याख्या अशी की, जागृत मनाकडून आलेले देखावे स्पष्टपणें अथवा अस्पष्टपणें आंतर मन झोपेंत दाखवतें तेव्हा त्याला स्वप्न म्हणतात.

पांचवी व्याख्या अशी की, मनुष्याचा सूक्ष्मदेह स्थूलांतून बाहेर पडून सूक्ष्म तंतूमधून झोपेंत जे देखावे पाहतो तें म्हणजे स्वप्न.

सहावी व्याख्या अशी की, चतुर्थ परिणाम भूमिकेवरील ( फोर्थ डायमेन्शन) दैवी प्रपंच म्हणजे स्वप्न. शंकराचार्य म्हणतात :

**इंद्रियाणामुपरमे मनोऽनुपरतं यदि।**
**सेवते विषयानेव तद्विद्यात् स्वप्नदर्शनम् ॥**

इंद्रियांचा व्यापार थांबल्यावर मन जर व्यापारयुक्त असून विषयांचें ग्रहण करील तर त्याला स्वप्न म्हणावें.

थोडासा सखोल अभ्यास केला म्हणजे समजून येतें की,
जागृती, स्वप्न, सुषुप्ती व तुर्या या चार अवस्था आहेत.
विचारवंत म्हणतात की,

जागृतीमध्ये विचारशक्तीचें प्राबल्य असतें, तर स्वप्नांत कल्पनाशक्तीचें प्राबल्य असतें; तुर्यावस्थेमधें स्मरणशक्तीचें प्राबल्य असतें, तर सुषुप्तीमध्ये वरीलपैकी कोणत्याच गोष्टीचें प्राबल्य असत नाही.

खूप खूप वाचून, त्यापेक्षा जास्त विचार करून व शक्य तितका अनुभव घेऊन माझी खात्री झाली आहे की,

सर्व शोधांचें प्रमुख साधन म्हणजे अंतःकरणांत वास करीत असलेली दिव्य शक्ती. सारा अहंकार सोडून त्या दिव्यशक्तीला मनोभावें शरण गेलें म्हणजे स्वप्नामध्ये ती दिव्यशक्ती सगुण रूप धारण करते, आपणांला दिव्य संदेश देते व आपलें जीवन आनंदित करते.

ब्रह्म निर्गुण, निराकार असलें तरी साधुसंत सगुण रूप पाहण्यासाठी धडपडतात. त्या दिव्यशक्तीचें सगुणरूप घ्यानांत अथवा स्वप्नांत आपणांला दिसतें आणि आपलें जीवन सुखी होतें.

एडिसनला त्याची पत्नी म्हणाली,

"तुम्ही फार दमलां आहां. उद्यापासून विश्रांतीसाठी कुठेतरी जा."

एडिसन : पण कुठे जाऊं ?

पत्नी : तुमच्या मनाला जेथे प्रसन्नता व हुशारी वाटेल तेथे जा.

एडिसन : बरें आहे.

दुसरे दिवशीं एडिसन आपल्या प्रयोगशाळेंत गेला.

माणसाचें असेंच होतें. ज्याचें जें आवडीचें ठिकाण असतें तेथेच त्याला विश्रांती मिळते. मला विश्रांति मिळते ध्यानांत व दिव्य स्वप्नांत—

त्या दिवशीं मीं खूप ध्यान केलें आणि झोपीं गेलों. झोपेंत हलक्याशा पिसांवर मी तरंगू लागलों. माझ्या मनांत आनंदाचीं कमळें डुलूं लागलीं. सौख्याचे तुषार उडवीत सप्तरंगी कारंजीं नाचूं लागलीं. मायेचा वारा वाहूं लागला. मंत्रमुग्ध करणारा मुरलीचा नाद ऐकूं येऊं लागला. आणि —

त्या दिव्य स्वप्नांत माझ्यापुढे गोपालकृष्ण आला.

गीतेमध्ये कृष्णाने ज्ञानयोग, कर्मयोग व भक्तियोग ह्यांचा समन्वय केला आहे व तो करतांना भक्तीवर विशेष जोर दिला आहे. भक्तियोगा-बद्दल कांही प्रश्न विचारल्यावर कृष्ण म्हणाला,

"अरे ! भक्तियोग सोपा नाही. भक्ताचीं जीं लक्षणें दिलीं गेलीं आहेत तीं तूं नीट समजून घे. देवाचा ज्याला भक्त व्हायचें आहे त्यानें हीं लक्षणें अंगीं आणण्याचा प्रयत्न करायला पाहिजे."

मला नवीन प्रकाश दिसूं लागला. गीतेच्या बाराव्या अध्यायांत भक्ताचीं लक्षणें दिलीं आहेत तीं मी आठवूं लागलों.

(१) **अद्वेष्टा**–कोणाचाही द्वेष न करणारा.

(२) **सर्वभूतानां मैत्रः**–सर्व प्राणिमात्राशी मित्रत्वाने वागणारा.

(३) **करुण**–कृपाळू.

(४) निर्ममः—ममत्वबुद्धी नाहीशी झालेला.
(५) निरहंकारः– ज्याला अहंकार नाही.
(६) समदुःखसुखः—ज्याला सुख व दुःख सम झालीं आहेत.
(७) क्षमी–क्षमावान.
(८) संतुष्टः–संतुष्ट.
(९) योगी-जो योगी आहे.
(१०) यतात्मा–आपलीं इंद्रियें ताब्यांत असलेला.
(११) दृढनिश्चयः–दृढनिश्चयी.
(१२) मर्य्यर्पितमनोबुद्धिः–ज्याने आपलें मन व बुद्धि मला अर्पण केलीं आहेत.
(१३) यस्मान्नोद्विजते लोकः–ज्याला लोक कंटाळत नाहीत.
(१४) लोकान्नोद्विजते यः – जो लोकांना कंटाळत नाही.
(१५) हर्षामर्षभयोद्वेगैर्मुक्तः – हर्ष, क्रोध, भय व विषाद ह्यांपासून जो मुक्त आहे.
(१६) अनपेक्षः – निरपेक्ष.
(१७) शुचिः – शुचिर्भूत.
(१८) दक्षः – दक्ष.
(१९) उदासीनः – फळाबद्दल उदासीन असणारा.
(२०) गतव्यथः – ज्याची व्यथा गेली आहे.
(२१) सर्वारंभपरित्यागी – काम्य फलांचे सर्व आरभ ज्याने सोडले आहेत.
(२२) यो न हृष्यति – जो कशाचाही आनंद मानत नाही.
(२३) न द्वेष्टि – जो द्वेष करीत नाही.
(२४) न शोचति – जो दुःख करीत नाही.
(२५) न कांक्षति – जो इच्छा करीत नाही.
(२६) शुभाशुभपरित्यागी – ज्याने कर्माचें शुभ व अशुभ फळ सोडलें आहे.
(२७) भक्तिमान् – जो भक्तीने युक्त आहे.

...

(२८) **समः शत्रौ च मित्रे च** – ज्याला शत्रू व मित्र सारखेच.

(२९) **तथा मानापमानयोः** – मान व अपमान हे ज्याला सारखेच.

(३०) **शीतोष्णसुखदुःखेषु समः** – शीत व उष्ण, सुख व दुःख हीं ज्याला सारखींच.

(३१) **संगविवर्जितः** – आसक्तिविरहित.

(३२) **तुल्यनिंदास्तुतिः** – ज्याला निंदा व स्तुति समान.

(३३) **मौनी** – मितभाषी.

(३४) **संतुष्टो येनकेनचित्** – जें कांही मिळेल तेवढ्यावर संतुष्ट.

(३५) **अनिकेतः** – देवाशिवाय ज्याला दुसरें घर नाही.

(३६) **स्थिरमतिः** – ज्याची मती स्थिर आहे.

भक्ताचीं हीं छत्तीस लक्षणें पाहून माझी खात्री झाली, की भक्त होणें महाकठीण आहे.

मला असेंही वाटूं लागलें की,

गीतेंत स्थितप्रज्ञाचीं लक्षणें सांगितलीं आहेत, ज्ञानी माणसाचीं लक्षणें सांगितलीं आहेत, भक्ताचीं लक्षणें सांगितलीं आहेत त्यांमध्ये शब्द भिन्न असले तरी मुख्य गाभा सारखाच आहे.

कृष्णाकडे पाहून मीं म्हटलें,

" देवा ! खालच्या पायरीवरून पाहातां ज्ञान, कर्म व भक्ती ह्यांमध्यें भेद दिसतो. पण वरच्या पायरीवरून पाहिलें म्हणजे ज्ञान, कर्म व भक्ती ह्यांमध्ये भेद दिसत नाही.

माझें हें बोलणें ऐकून कृष्णाने मधुर स्मित केलें.

त्या मधुर स्मिताने मला जोर आला व मीं विचारलें—

" देवा ! पूर्वीचे लोक म्हणतात की—

स्त्रियांना वेदाचा अधिकार नाही, त्यांना मोक्षाचा अधिकार नाही.

तें असेंही म्हणतात की—

स्त्रियांनी ह्या जन्मीं चांगलें काम केलें तर त्यांना पुढच्या जन्मीं पुरुष जन्म मिळेल व मग त्यांना वेदाचा नि मोक्षाचा अधिकार मिळेल. तुला काय वाटतें ?"

कृष्णाने उत्तर दिलें,

"हें मत बरोबर नाही. स्त्रियांना वेदाचा अधिकार आहे, त्यांना मोक्षाचा अधिकार आहे.

परमार्थमार्गांनें त्यांना समान हक्क आहे.

पुरुषाने आपल्या पहिल्या मुलाच्या वेळी उत्सुकतेने विचारावें,

मुलगा की मुलगी ?

व त्याला उत्तर मिळावें "मुलगा."

म्हणजे जसा त्याला आनंद होईल तसा आनंद कृष्णाचें उत्तर ऐकून मला झाला.

आणखी कांही प्रश्न विचारल्यावर कृष्ण म्हणाला—

( १ ) वासनात्मक बुद्धी शुद्ध, सम, पवित्र व निर्मम झाली म्हणजे मनुष्याच्या हातून पाप घडत नाही.

( २ ) ब्राह्मणे गवि हस्तिनि—ब्राह्मण, गाय व हत्ती ह्यांच्या ठिकाणीं पंडितांची बुद्धी सम असते. ह्याचा अर्थ असा नव्हे, की गाईकरितां आणलेला चारा ब्राह्मणास व ब्राह्मणाकरितां शिजवलेलें अन्न हत्तीस घालणें. व्यवहारांत सापेक्षता महत्त्वाची असते......

( ३ ) नीतिमत्तेचा निर्णय करतांना कर्माच्या बाह्य फलापेक्षा कर्त्याच्या बुद्धीकडे विशेष लक्ष द्यावें लागतें......

( ४ ) ज्याला लोककल्याण करण्याची बुद्धी झाली त्याने जेवणखाण सोडून द्यावें असें नाही, तर मी आपलें देहधारणादि कर्म लोकोपयोगार्थ करतों अशी त्याची बुद्धी झाली पाहिजे. ज्याला लोककल्याण करावयाचें आहे त्याने मन व इंद्रियें ताब्यांत ठेवणें नितान्त आवश्यक आहे.....

( ५ ) आपल्याला जें दुःखकारक व प्रतिकूल वाटतें तसें आपण लोकांबरोबर वर्तन करूं नये हें धर्माचें व नीतीचें थोडक्यांत सार आहे......

( ६ ) दुष्टांचा निग्रह करणें हें साधुपुरुषांचें देखील महान् कर्तव्य आहे. दुष्टांच्या दुष्ट कृत्यांचें साधुपणानें निवारण करण्याचा प्रयत्न करावा; पण साधुपणाने दुष्टाला जिंकणें शक्य नसेल तर आपल्याबरोबर

दुसरा जसा वागतो तसें त्याच्याशीं वागण्यानें अधर्म किंवा अनीति घडत नाही......

( ७ ) हत्या, मग ती कशीही असो, तिला एकाच मापाने मोजणें योग्य नव्हे. आपल्या अंगावर चालून आलेल्या मनुष्यास स्वसंरक्षणाकरितां मारणें व एखाद्या श्रीमंत मनुष्याचा पैशाच्या हव्यासाने खून करणें ह्या दोन गोष्टी नैतिक दृष्टचा अगदीं भिन्न आहेत.

( ८ ) सारे उपाय थकल्यावर न्याय प्रस्थापित करण्याकरितां अर्जुनाला युद्ध करावें लागलें ह्यांत पाप नसून तें त्याचें पुण्यकारक कर्तव्य आहे......

( ९ ) भारतीय युद्ध झाल्यावर व पांडवांचा जय झाल्यावर माता कुंती धृतराष्ट्राबरोबर वानप्रस्थाश्रम आचरण्यास जेव्हा वनांत जाण्यास निघाली तेव्हा फारसा पाल्हाळ न लावता तिने युधिष्ठिरास उपदेश केला--

मनस्ते महदस्तु !

बाबा ! तुझें मन मोठें असूं दे.

हा उपदेश फार मोलाचा आहे.

(१०) आज जगांत निरनिराळे धर्म आहेत. लवकरच जगांत मानवताधर्माचा सूर्य प्रकाशणार आहे. त्या दृष्टीनें तूं मानवताधर्माचें शक्य तितकें कार्य कर. म्हणजे माझा भक्त होशील; व सुखी नि आनंदी होशील.

× × ×

कृष्ण माझ्याशी प्रेमाने बोलत होता. मला कार्लाइलच्या वचनाची आठवण झाली.

'A great man shows his greatness by the way he treats little men'

मोठा मनुष्य ज्या तऱ्हेने लहान माणसांना वागवतो त्या तऱ्हेने तो मोठेपणा दाखवीत असतो.

मीं कृष्णाला म्हटलें,

"देवा ! तूं केवढा मोठा ! मी किती लहान ! पण माझ्याशी इतक्या प्रेमानें बोलतोस ! तुझे उपकार मी कसे फेडूं ? देवा ! बालबुद्धीने मी बडबड करतों, पण तूं त्याचें कौतुक करतोस. देवा, लहान मूल आईच्या ताटांत जेवावयास बसतें आणि खेळ म्हणून आईलाच भरवूं पाहतें, तसाच कांहीसा प्रकार माझ्या हातून होत नाही ना ? देवा ! गाईच्या सडाला वासराने ढुसणी दिली तर त्या योगाने तिला जास्तच पान्हा फुटतो ! देवा! तूं माझी माता आहेस, नाउली आहेस ! देवा ! तुझें बोलणें चंद्रापेक्षा शांत व अमृतापेक्षा गोड आहे. किती ऐकलं तरी पुरेच होत नाही......"

माझ्या डोळ्यांतूच आनंदाश्रू वाहूं लागले. मला वाटूं लागलें,

कृष्णाची वाणी गंगेप्रमाणे आहे. गंगेचें पाणी डोळ्यांच्या बुबुळांना देखील त्रास देत नाही; पण इतकें मृदु असून देखील प्रसंग येतांच खडक देखील फोडूं शकतें.

माझ्या डोळ्यांतून आनंदाश्रू वाहतच होते.

कृष्णाने मला प्रेमभराने जवळ घेतलें आणि इतक्यांत—

मी जागा झालों.

* * *

# स्वप्न सोळावें

" देवा ! आता फक्त तुझी सेवा. इच्छा असेल तसें कर. तुझी इच्छा तीच माझी इच्छा. देवा ! काळजी करणें मूर्खपणाचें, काळजी निवारण करणें शहाणपणाचें. देवा ! सुखदुःख मनुष्य निर्माण करतो व त्यांतच तो गुरफटतो. तुझा हात हातांत घेतला म्हणजे मनुष्य सुखदुःखांच्या पलीकडे आनंदाच्या प्रांगणांत जातो..."

रात्रीं देवघरांत उदबत्त्यांचा वास दरवळत असतांना पाटावर बसून मी मनांतल्या मनांत देवापाशी बोलत होतों. 'वन वे ट्रॅफिक' प्रमाणे मी एकटाच बोलत होतों. देव नुसता ऐकत होता. देवाबरोबर एकट्याने बोलण्यांत

देखील खूप मजा असते. नाना तऱ्हेचे विचार माझ्या मनांत येत होते व मी बोलत होतों,

" देवा ! अंतरंगांत वास करीत असलेल्या दिव्य शक्तीचा शोध म्हणजे साक्षात्कार व त्या शक्तीचा बोध म्हणजे ज्ञान.

" देवा ! अंतरंगांतील आकाशांत भ्रमण करीत असतांना ऐकूं येणारें दिव्य गाणें म्हणजे अनाहत नाद व ऐकूं येणारे दिव्य विचार म्हणजे श्रुती.

" देवा ! तुझं माझं नातं अभंग आहे. जीवनांतले कितीतरी कटु प्रसंग तें नातं तोडूं पाहतात, पण देवा ! पाण्यांत काठी मारून पाणी कसं दुभंगेल ? ... ... "

रात्रीं निजतांना माझी पत्नी ताई म्हणाली,

" आजच्या टपालांत पुष्कळ पत्रें आहेत. पत्रलेखकांनी ' माझीं स्वप्नें ' ह्या लेखमालेची खूप स्तुती केली आहे. ह्या लेखमालेमुळे मनःशांती प्राप्त होते असें ह्या लोकांना वाटतें. एका पत्रलेखकाने तुम्हांला विचारलें आहे—

" अहो ! तुम्ही आणखी किती दिवस देवाचें ज्ञान मिळवणार ? "

ताईला मीं प्लेटोची गोष्ट सांगितली.

" हें पाहा, प्लेटोला एकाने विचारलें, आणखी किती दिवस तुम्ही ज्ञान मिळवणार ? "

प्लेटोने उत्तर दिलें–

" ज्ञान मिळवण्याची मला जोपर्यंत लाज वाटत नाही तोपर्यंत. "

ताई म्हणाली—

" ही गोष्ट फार मार्मिक आहे. "

ताईने पुढचा प्रश्न विचारला–

" तुमचें लिखाण वाचणारे वाचक खूप आहेत. वाचकांचे कांही प्रकार आहेत का ? कोणते वाचक जास्त चांगले ? "

" हें पाहा, वाचकांचे चार प्रकार आहेत. पहिल्या प्रकारचे वाचक वाळूच्या घड्याळासारखे असतात. ह्या घड्याळांतील वाळू इकडून तिकडे जाते आणि तिकडून इकडे येते; त्याप्रमाणे ह्या वाचकांनीं कितीही वाचन

केलें तरी ते कोरडेच राहतात. दुसऱ्या प्रकारचे वाचक स्पंजासारखे असतात. स्पंज शोषून घेऊन पुन्हा तो पदार्थ बाहेर टाकतो. मात्र मूळ द्रव्य थोडें खराब होऊन बाहेर पडतें. तिसऱ्या प्रकारचे वाचक गाळण्यासारखे. गाळण्यांत गाळ अडकतो व शुद्ध अंश बाहेर पडतो. वाचकांचा चौथा वर्ग गोवळकोंडयाच्या खाणींतील मजुरासारखा. हे लोक गदळ तेवढें सारें फेकून देतात व शुद्ध हिरा तेवढा नेमका काढून घेतात. ह्याच प्रकारचे वाचक सर्वांत श्रेष्ठ."

आणखी एक प्रश्न ताईने विचारल्यावर मीं म्हटलें,

"जगांत लोकांना पैशाची फार किंमत वाटते. पैशाच्या सुखापेक्षा अंतरंगांतील दिव्यशक्तींच्या मागे लागण्यांत जें सुख आहे तें फार मोठें आहे हें ज्याला कळतें त्यालाच तत्त्वज्ञान समजून येतें."

बोलतां बोलतां मीं एक गोष्ट सांगितली.

एकदा विन्स्टन चर्चिल एका टॅक्सीवाल्यास म्हणाले,

"मला ब्रिटिश ब्रॉडकास्टिंग स्टेशनकडे घेऊन चल."

टॅक्सीवाला म्हणाला,

"साहेब ! थोडयाच वेळांत चर्चिलचं भाषण आहे. तें मला ऐकायचं आहे. मी आता येऊ शकत नाही."

चर्चिलनी टॅक्सीवाल्यास एक पौंड दिला व म्हटलें,

"कृपा करून चल. मला जाणें जरुरीचें आहे."

टॅक्सीवाला म्हणाला,

"You are a very good man. झक मारतो तो चर्चिल अन् त्याचें तें भाषण !"

ताई म्हणाली,

"गोष्ट फारच छान आहे."

त्या रात्रीं गोपालकृष्ण माझ्या स्वप्नांत आल्यावर मी कांही प्रश्न विचारले. गोपालकृष्ण म्हणाला,

"ज्याचा जसा विचार तसा तो मनुष्य. मनुष्य सुखी का दुःखी हें परिस्थितीवर अवलंबून नसून त्याच्या विचारांवर अवलंबून आहे. चांगल्या

परिस्थितींतही एखाद्याचे विचार असे असतील की तो दुःखी असेल; व वाईट परिस्थितींतहि एखाद्याचे विचार असे असतील की तो सुखी असेल.

"विचारांची शक्ती फार मोठी आहे. सुविचारांमुळे नरकाचा स्वर्ग बनेल, तर कुविचारांमुळे स्वर्गाचा देखील नरक बनेल.

"आपले विचार सुखी तर आपण सुखी. आपले विचार दुःखी तर आपण दुःखी.

"दुःखें नाहींशीं करण्याकरितां विचार बदलणें आवश्यक आहे.

"एखादा प्रदेश जिंकण्यापेक्षा मन जिंकणें जास्त महत्त्वाचें आहे.

"विचारांचे आपण मालक आहोंत. आपण विचारांना सुखाच्या मार्गाने चालायला लावावें म्हणजे आपण सुखी होतों...... "

कृष्णाच्या ह्या विचारांत मला फार मोठा अर्थ दिसूं लागला. मला नेपोलिअन व हेलेन केलेर ह्यांची आठवण झाली. नेपोलिअनला सत्ता संपत्ती व ऐश्वर्य भरपूर मिळूनही सेंट हेलिना बेटांत तो म्हणाला,

"माझ्या जीवनांत सहा दिवस देखील सुखाचे गेले नाहीत ! "

ह्याच्या उलट आंधळी, बहिरी व मुकी हेलेन केलेर म्हणते,

"खरंच ! माझं जीवन किती सुंदर आहे ! "

मला वाटूं लागलें—

मनुष्य सुखी का दुःखी हें त्याच्या विचारांवर अवलंबून असतें हेंच खरें.

गोपालकृष्ण पुढे म्हणाला,

"बाहेरच्या गोष्टींनी मनःशांती मिळत नाही. ती आपणच मिळवायाची आहे.

"वाईट अन्न न घेण्याची आपण कोशिश करतों. त्यापेक्षाही वाईट विचार मनांत येऊं न देण्याची आपण कोशिश करायला पाहिजे.

"काय घडतं ह्याला विशेष महत्त्व नसून जें घडतं त्याविषयीं आपणाला काय वाटतं ह्याला विशेष महत्त्व आहे.

"ज्याला कोणत्याही प्रसंगीं विचाराची दिशा बदलण्याची कला येऊं लागली त्याला दुःखांतून सुखाकडे जाण्याचा मार्ग सांपडला.

"हें पाहा, सुख हें आंतरिक आहे. मन सुखी तर मनुष्य सुखी. मन

दुःखी तर मनुष्य दुःखी...

"हें पाहा, विचार हें मनाचें अन्न आहे. विचार सुखी तर मन सुखी; विचार दुःखी मन दुःखी..... "

कृष्णाचे विचार ऐकतांना मी रंगून गेलों होतों.

ह्या विचारांत जिवंतपणा होता.

मला वाटूं लागलें, सुखी होण्याकरता लढलें पाहिजे — मनांतील वाईट विचारांना हांकून दिलें पाहिजे -- त्यांचा पराभव केला पाहिजे.

मला वुइल्यम जेम्सचे शब्द आठवले.

तो म्हणतो,

Much of what we call Evil can often be converted into a tonic by a simple change of the sufferer's inner attitude from one of fear to one of fight.

ज्याला अमंगल म्हणतात त्यापैकी बराचसा भाग भाग पुकष्ळदा टॉनिक होऊं शकतो. पण केव्हा? –आपण आपल्या अंतरंगांतील भीतीची भावना सोडून त्या ठिकाशीं युद्धाची भावना प्रस्थापित केली तर.

आणखी कांही प्रश्न विचारल्यावर कृष्ण म्हणाला,

"सुखांत ज्याप्रमाणे आनंद आहे त्याचप्रमाणे दुःखांत देखील कसा आनंद आहे हें मातेचें प्रेम अंगीं बाणल्याने समजतें. दुःखांत देखील आनंद मानणाऱ्या मातेच्या दिव्य प्रेमाचा गुणच असा कांही और आहे, की मातेला त्रास देणारे लोक पश्चात्तापदग्ध होतात व डोळयांत अश्रू आणून मातेच्या पायां पडतात. माणसाने मातेचें दिव्य प्रेम अंगीं बाणविण्यास शिकलें म्हणजे सुखाचें सुखत्व वाढतें व दुःखाचें देखील सुखांत रूपांतर होतें. "

मीं देवाला म्हटलें,

"देवा! त्याबद्दल एखादी गोष्ट सांग ना!"

कृष्ण म्हणाला,

"वाढती भाऊबीज ही गोष्ट तूं वाचली असशील?"

एकदम कृष्ण अदृश्य झाला व पूर्वी झालेली ती सत्यकथा मला स्वप्नांत दिसूं लागली.

एका गरीब बाईचा नवरा मेल्यावर फार कष्ट करून ती आपल्या मुलाला शिकवते. तिच्या श्रमांचें सार्थक होतें. मुलगा विद्वान् होतो व त्याला मोठ्या हुद्द्याची नोकरी मिळते.

एका सुंदर मुलीशीं त्याचें लग्न होतें. नवराबायको मजा करतात व आई त्यांना स्वयंपाक करून वाढते.

एकदा एक अधिकारी माडीवर येतो व मुलाला विचारतो,

" खाली बाई आहेत त्या कोण ? "

ती आपली आई आहे हें सांगण्याची मुलाला लाज वाटते. तो म्हणतो,

" ती सैंपाकाची बाई आहे ! "

पोटच्या पोराच्या तोंडून निघालेले ते शब्द ऐकून आई मूर्च्छित पडते. थोड्या वेळाने शुद्धीवर येऊन ती सैंपाक करूं लागते.

मुलाची मोटार असते. नवराबायको मोटारींतून हिंडतात. आईला मोटारींत कधी घेत नाहीत. त्यांत त्यांना कमीपणा वाटतो.

नवरा बायकोला मोटार चालवण्यास शिकवतो. एकदा त्याची आई देवळांत जाऊन परत येत असते. सून मोटार चालवत असते. गर्दीमुळे ती बावरते व अपघात होऊन आईला खूप लागतें.

आईला दवाखान्यांत ठेवण्यांत येतें. कांही दिवसानंतर घरीं आणण्यांत येतें.

सैंपाक करण्याची पाळी सुनेवर येते पण त्यामुळे ती सारखी चडफडते. एकदा ती नवऱ्याला म्हणते,

" सैंपाक टाळण्याकरतां सासूबाई आजाराचें सोंग करीत आहेत. "

बायकोचे हे बोल ऐकून मुलगा आईला म्हणतो,

" आई ! दुसऱ्याची सुकुमार मुलगी घरीं सैंपाक करण्याकरतां का आणायची ? तुझें ढोंग पुरे कर व सैंपाक करूं लाग ! "

मुलाकडे पाहुन दुःखांत देखील सुख मानणारी आई बरी होण्यापूर्वीच सैंपाक करूं लागते.

दिवाळी जवळ आल्यावर आई मुलाला म्हणते,

" ताईकडे जा आणि तिला भाऊबीजेला घेऊन ये. "

ताई गरीब घराण्यांत दिलेली असते.

मुलगा ताईच्या गांवीं जातो पण तिच्या घरीं न जातां परत येतो. येतांना तो आपल्या बायकोकरितां चपलाहार घेऊन येतो.

दिवाळीच्या आदल्या दिवशीं मुलगा आईवर संतापतो व म्हणतो,

"आई ! तूं माझ्या घरांतून चालती हो ! "

नवरा मेल्यानंतर काबाडकष्ट करून वाढवलेल्या मुलाचे हे शब्द बिचारी माउली ऐकून घेते.

इतक्यांत दारांत टांगा वाजतो. त्यांतून उतरून ताई येते व म्हणते,

"भाऊराया ! तूं माझ्याकडे आला नाहींस, पण मीच तुझ्याकडे भाऊबीजेला आलें आहें."

लगेच आई बाहेर येऊन म्हणते,

"तसं नव्हे ग ! भाऊराया प्रेमळ आहे. त्याला रजा मिळाली नाही म्हणून तो आत्ताच तुला इकडे येण्याबद्दल तार करण्यासाठी बाहेर पडणार होता."

त्याच दिवशी सुनेला ताप येतो. डॉक्टर म्हणतात,

"दुखणं गंभीर आहे. शुश्रूषेकरिता बाई माणूस पाहिजे."

मुलगा आईला म्हणतो,

"आई ! मी तुला घरांतून जा म्हणालों, पण कुसुम आजारी आहे. माझ्या घरीं राहशील ना ? कुसूमची शुश्रूषा करशील ना ? "

आई कुसुमची पराकाष्ठेची सेवा करते. कांही दिवसांनंतर एक दिवस असा बांका प्रसंग येतो की डॉक्टर म्हणतात,

"उद्या ताप नॉर्मल आला नाही तर जगण्याची आशा नाही !"

हे ऐकून मुलगा रडूं लागतो. रात्रीं आई कुसुमचे पाय चेपीत असते. बारा वाजतां ती देवघरांत जाते व मोठ्याने म्हणते,

"देवा ! मायबापा ! ह्या दुखण्यांतून माझ्या सुनेला बरी कर. तुला बळीच घ्यायचा असेल तर माझा बळी घे. मला वाटेल तितकें दुःख दे, पण माझ्या मुलाला व सुनेला सुखी ठेव. त्यांच्या सुखांतच माझें सुख सांठवलें आहे ! "

एका गरीब बाईचा नवरा मेल्यावर फार कष्ट करून ती आपल्या मुलाला शिकवते. तिच्या श्रमांचें सार्थक होतें. मुलगा विद्वान् होतो व त्याला मोठ्या हुद्द्याची नोकरी मिळते.

एका सुंदर मुलीशीं त्याचें लग्न होतें. नवराबायको मजा करतात व आई त्यांना स्वयंपाक करून वाढते.

एकदा एक अधिकारी माडीवर येतो व मुलाला विचारतो,

" खाली बाई आहेत त्या कोण ? "

ती आपली आई आहे हें सांगण्याची मुलाला लाज वाटते. तो म्हणतो,

" ती सैंपाकाची बाई आहे ! "

पोटच्या पोराच्या तोंडून निघालेले ते शब्द ऐकून आई मूर्च्छित पडते. थोड्या वेळाने शुद्धीवर येऊन ती सैंपाक करूं लागते.

मुलाची मोटार असते. नवराबायको मोटारींतून हिंडतात. आईला मोटारींत कधी घेत नाहीत. त्यांत त्यांना कमीपणा वाटतो.

नवरा बायकोला मोटार चालवण्यास शिकवतो. एकदा त्याची आई देवळांत जाऊन परत येत असते. सून मोटार चालवत असते. गर्दीमुळे ती बावरते व अपघात होऊन आईला खूप लागतें.

आईला दवाखान्यांत ठेवण्यांत येतें. कांही दिवसानंतर घरीं आणण्यांत येतें.

सैंपाक करण्याची पाळी सुनेवर येते पण त्यामुळे ती सारखी चडफडते. एकदा ती नवऱ्याला म्हणते,

" सैंपाक टाळण्याकरतां सासूबाई आजाराचें सोंग करीत आहेत. "

बायकोचे हे बोल ऐकून मुलगा आईला म्हणतो,

" आई ! दुसऱ्याची सुकुमार मुलगी घरीं सैंपाक करण्याकरतां का आणायची ? तुझें ढोंग पुरे कर व सैंपाक करूं लाग ! "

मुलाकडे पाहुन दुःखांत देखील सुख मानणारी आई बरी होण्यापूर्वीच सैंपाक करूं लागते.

दिवाळी जवळ आल्यावर आई मुलाला म्हणते,

" ताईकडे जा आणि तिला भाऊबीजेला घेऊन ये. "

ताई गरीब घराण्यांत दिलेली असते.

मुलगा ताईच्या गांवीं जातो पण तिच्या घरीं न जातां परत येतो. येतांना तो आपल्या बायकोकरितां चपलाहार घेऊन येतो.

दिवाळीच्या आदल्या दिवशीं मुलगा आईवर संतापतो व म्हणतो,

"आई ! तूं माझ्या घरांतून चालती हो !"

नवरा मेल्यानंतर काबाडकष्ट करून वाढवलेल्या मुलाचे हे शब्द बिचारी माउली ऐकून घेते.

इतक्यांत दारांत टांगा वाजतो. त्यांतून उतरून ताई येते व म्हणते,

"भाऊराया ! तूं माझ्याकडे आला नाहींस, पण मीच तुझ्याकडे भाऊबीजेला आलें आहें."

लगेच आई बाहेर येऊन म्हणते,

"तसं नव्हे ग ! भाऊराया प्रेमळ आहे. त्याला रजा मिळाली नाही म्हणून तो आत्ताच तुला इकडे येण्याबद्दल तार करण्यासाठी बाहेर पडणार होता."

त्याच दिवशी सुनेला ताप येतो. डॉक्टर म्हणतात,

"दुखणं गंभीर आहे. शुश्रूषेकरिता बाई माणूस पाहिजे."

मुलगा आईला म्हणतो,

"आई ! मी तुला घरांतून जा म्हणालों, पण कुसुम आजारी आहे. माझ्या घरीं राहशील ना ? कुसूमची शुश्रूषा करशील ना ?"

आई कुसुमची पराकाष्ठेची सेवा करते. कांही दिवसांनंतर एक दिवस असा बांका प्रसंग येतो की डॉक्टर म्हणतात,

"उद्या ताप नॉर्मल आला नाही तर जगण्याची आशा नाही !"

हे ऐकून मुलगा रडूं लागतो. रात्रीं आई कुसुमचे पाय चेपीत असते. बारा वाजतां ती देवघरांत जाते व मोठ्याने म्हणते,

"देवा ! मायबापा ! ह्या दुखण्यांतून माझ्या सुनेला बरी कर. तुला बळीच घ्यायचा असेल तर माझा बळी घे. मला वाटेल तितकें दुःख दे, पण माझ्या मुलाला व सुनेला सुखी ठेव. त्यांच्या सुखांतच माझें सुख सांठवलें आहे !"

सासूबाईंचे हे शब्द ऐकून कुसुम डोक्यावर पांघरूण घेते व सारखी रडूं लागते.

दुसरे दिवशीं कुसुमचा ताप नॉर्मल येतो. डॉक्टर म्हणतात,

"साहेब ! रात्रंदिवस शुश्रूषा करणाऱ्या तुमच्या आईची पुण्याई आहे ! "

पुढे ताई जायला निघते तेव्हा वाढती भाऊबीज करण्याचें ठरतें.

कुसुमच्या आग्रहाखातर, ती ज्या खोलींत निजली आहे त्याच खोलींत पानें मांडण्यांत येतात.

भाऊ पानावर बसतो. ताई ओवाळायला येते. भाऊ दहाची नोट तबकांत टाकतो. इतक्यांत कुसुम अंथरुणावरून उठून पुढे येते व म्हणते—

"नाही ! माझा हा चपलाहार घ्या व ओवाळणी म्हणून ताईंना घाला."

कुसुम सासूबाईंच्या पाया पडते व रडत रडत म्हणते,

"माझें चुकलें. क्षमा करा. तुम्ही देवीसारख्या असतांना मी राक्षसासारखी वागलें. क्षमा करा."

भाऊबिजेच्या दिवशीं कुसुम रडते आहे. तिचा नवरा रडतो आहे. ताई रडते आहे व आई देखील रडते आहे.

हा देखावा हृदयद्रावक होता. शेवटीं आई म्हणते,

"लाडक्यांनो ! तुमच्यासारखीं प्रेमळ माणसें असल्यावर माझ्या सुखाला पारावारच नाही."

तो देखावा पाहून माझ्या डोळ्यांत अश्रू आले. त्या अश्रूंमध्ये मला नवीन विचार दिसूं लागले.

अन् इतक्यांत--

मी जागा झालों.

* * *

# स्वप्न सतरावें

"'माझीं स्वप्नें" ही लेखमाला वाचून वाचकांना मनःशांती मिळते व ते पत्रांतून तुमची खूप स्तुती करतात. आज आलेल्या पत्रांतही तुमच्यावर स्तुतीचा वर्षाव केला आहे. ही स्तुती स्वीकारावी असें तुम्हांला वाटतें का ?"

ताईने – माझ्या पत्नीने – प्रश्न केला.

"अग, स्तुती कशी स्वीकारतां येईल ?" असें म्हणून ताईला मी संस्कृत पंडिताचे विचार समजावून दिले.

तसेंच पाहिलें तर स्तुतीचें लग्न होत नाही, आणि तिला कुमारीच

राहावें लागतें. कारण साधू तिला वरत नाहीत व ती असाधूंना वरत नाही. ह्यामुळे ती बिचारी कुमारीच राहते.

संस्कृत कवी म्हणतो —

**अद्यापि दुर्निवारं स्तुतिकन्या वहति कौमारम् ॥**
**सद्भ्यो न रोचते साऽसन्तोऽप्यस्यै न रोचन्ते ॥**

( तीव्रतर असें कौमार्यव्रत अद्यापि स्तुती पाळते; कारण साधूंना ती आवडत नाही व असाधू तिला आवडत नाहीत. )

ताई म्हणाली,

" हे विचार फारच चांगले आहेत. "

त्या दिवशीं आमच्या घरीं एक संन्यासी आले होते. ते फार विद्वान् होते, पण अत्यंत अहंकारी होते.

बोलतां बोलतां ते म्हणाले,

" माझ्याइतका शहाणा मनुष्य ह्या जगांत नाही. "

त्यांचें हें बोलणें ऐकून मला आश्चर्य वाटलें.

'जो म्हणतो की मी शहाणा आहें, तो मूर्ख असतो.' असें एक सुभाषित आहे.

ते संन्यासी पुढे म्हणाले,

" हें पाहा, माझ्या मनाची इतकी तयारी आहे की, प्रत्यक्ष माझी आई वारली त्या वेळीं सुद्धा मला थोडेंदेखील दुःख झालें नाही...... तुम्हांला काय वाटतें ?"

मीं म्हटलें,

" हा प्रकार बरोबर झाला नाही. आईसारखं प्रेमळ माणूस ह्या जगांत दुसरं नाही. आई मेल्यावर तुमच्या डोळ्यांतून पाणी यायला पाहिजे होतं. "

ते संन्यासी म्हणाले,

" तुमचं ज्ञान कोतं आहे. मी पूर्ण ज्ञानी आहें. मला कांही दुःख झालं नाही ह्याचं कारण मी खरा ज्ञानी आहें. "

" हें पाहा !" मी म्हटलं, " रावणानं सीतेला पळवून नेल्यावर राम

झाडांना मिठया घालून रडूं लागला. ज्याला आपण पूर्णावतार मानतों त्या रामाला ज्ञान नव्हतं असं का आपल्याला म्हणायचं आहे ?"

ते संन्यासी म्हणाले,

"अहो ! राम खरा ज्ञानी नव्हता. जग मिथ्या आहे व ब्रह्म सत्य आहे हें त्याला कळलं असतं तर सीतेला रावणाने पळवून नेल्यावर तो गप्प बसला असता. त्याला खरं ज्ञान नव्हतं म्हणून पुढचं रामायण आलं !"

हे विचार मोठे और होते.

घरीं आल्यावर त्या संन्यासीमहाराजांनी माझ्या पत्नीकडून चहा मागून घेतला होता. आमचें बोलणें झाल्यावर त्यांनी पुन्हा चहा मागून घेतला.

थोडा वेळ गेला आणि ते संन्यासी म्हणाले,

"कृपया आणखी थोडा चहा टाकायला सांगा हं !"

मला खूप आश्चर्य वाटलें.

चहा पिऊन झाल्यावर ते म्हणाले,

"हें पाहा, मला चहाची वरचेवर तल्लफ येते ! ह्या बाबतींत माझें मन मला आवरतां येत नाही ! !"

ज्याला चहाच्या बाबतींत मन आवरतां येत नाही त्यानें म्हणावें,

"मी खरा ज्ञानी आहें ! माझ्या मनाची इतकी तयारी आहे की, प्रत्यक्ष माझी आई वारली त्या वेळीं सुद्धा मला दुःख झालें नाही........ राम खरा ज्ञानी नव्हता......! !"

त्या संन्यासीमहाराजांना खूप शाब्दिक ज्ञान होतें. बराच वेळ बोलून ते गेल्यानंतर त्या रात्रीं माझ्या मनांत रामायणाचे विचार घोळूं लागले.

बनांतून रावणाने सीतेला पळवून नेल्यावर राम आक्रोश करूं लागला.

रामाला सीतेचा आवडता कदंब वृक्ष दिसला. त्याला डोळयांत पाणी आणून रामानें मिठी मारली व म्हटलें,

"हे कदंबा ! अरे तूं सीतेचा फार आवडता ! तूं सीता कोठे पाहिलीस का ?"

कदंब कांही बोलला नाही.

रामाने मग बिल्वाला कवटाळलें व म्हटलें—

" सख्या ! नुसत्या फांद्या काय हलवतोस ? सांग ना माझी प्रिया कोठ लपली आहे ?"

बिल्व बोलला नाही. शोकमग्न रामावर त्यानें फक्त बिल्वपत्रेंच ढाळलीं.

रामाने मग अर्जुन वृक्षाकडे दृष्टी वळवली व म्हटलें,

" कृतघ्ना अर्जुना ! सीता तुला रोज पाणी घालीत असे ! मग आता तूं गप्प कां ?"

शेवटीं मधुमालतीच्या वेलीसमोर उभें राहून राम म्हणाला,

" हे सारे वृक्ष मौन धारण करून उभे आहेत. तूंही त्यांच्याप्रमाणे मौन धारण कर. माझ्या डोळयांतले अश्रू खूप वाहूं देत. ह्या अश्रूंच्या पाण्याने तूं मोठी हो. मग तुझ्यावर फुलें उमलतील. जेव्हा सीता ती फुलें तोडायला येईल तेव्हा तिला सांग की,

" रामाच्या अश्रूंचीं हीं फुलें आहेत. "

रामाचें हें दुःख पाहून त्याचें सीतेवर असलेलें प्रेम आपणाला दिसतें व बरें वाटतें.

राम नुसताच रडत बसला असता तर तो आपणांला आवडला नसता. तो रावणाला ठार मारून सीतेला सोडवून आणतो म्हणूनच तो आपणांला आवडतो.

रामायणांत एक सुंदर सुभाषित आहे—

" ज्याची प्रिय वस्तू नष्ट झाली त्याने प्रयत्नांची पराकाष्ठा केली पाहिजे. उत्साहासारखें बल नाही व उत्साही पुरुषाला कांही अप्राप्य नाही. "

सीतेला रावणाने पळवून नेल्यावर ' ब्रह्म सत्य आहे, जग मिथ्या आहे ' असें म्हणून कांहीही हालचाल न करतां राम गप्प बसला असता तर तो आपणाला आवडला नसता.

सीतेसाठी रडणारा व रावणाला ठार मारून सीतेला शोधून आणणारा रामच आपणाला आवडतो.

मी जेव्हा परमार्थाचा विचार करतों तेव्हा मला कळून येतें की,

परमार्थ परिस्थितींत बदल घडवून आणून सुखाची प्राप्ती करून देतो असें म्हणण्यापेक्षा परमार्थ प्राप्त परिस्थिती सुखाने भोगण्याची कला शिकवतो.

शेक्स्पीअरने म्हटलें आहे--

Nothing is good or bad. Everything depends upon how you look at it.

( कोणतीही गोष्ट मूलत: चांगली अथवा वाईट असत नाही. आपण ज्या तऱ्हेने पाहतों त्याप्रमाणे ती वस्तू चांगली अथवा वाईट असते. )

रात्रीं झोपण्यापूर्वी देवाची प्रार्थना करतांना मी म्हटलें,

" देवा ! कांही लोक तुझीं दगडाची मंदिरें उभारतील. तसें मंदिर मी उभारणार नाही. परंतु माझें शरीरच तुझें मंदिर होईल. माझे पाय त्याचे स्तंभ होतील. माझें डोकें त्याचा सुवर्णकलश होईल. माझ्या हृदयांत तुझी मूर्ती बसवून मी माझें शरीर मंदिर तयार करीन. "

स्वप्नांत गोपालकृष्ण आल्यावर मी आनंदातिशयाने म्हटलें,

" देवा ! तुझ्या प्रेमाचं खत-पाणी घालून माझ्या जीवनाचा फुलोरा तूं फुलव. तुझ्या गोड गळ्यांतून निघणाऱ्या अमर वाणीने माझें आयुष्य सुखी कर. तुझ्याकडे पाहून माझ्या मनांत मांगल्याची भावना अखंड जागृत राहूं दे. तुझ्या अनुपम अमृतवाणीने भरलेले कुंभ साऱ्या जगाला मला मुक्तपणें वाटूं द्यात. "

माझ्या मनांत विचार आला—

" रामाने एकच बायको केली, पण कृष्णाने सोळा हजार एकशें आठ बायका केल्या. ह्यावर कांही लोक कृष्णाला नांवें ठेवतात, त्याबद्दल कृष्णाला प्रश्न विचारूं का ? "

पुन्हा मला वाटलें,

" असला प्रश्न प्रथमच विचारणें बरें नव्हे, "

मी थोडासा विचार केला व म्हटलें,

आपल्या जीवनांत करावा व तो करतांना भक्तीवर विशेष जोर द्यावा म्हणजे मनुष्य सुखी होतो.

× × ×

श्रीकृष्णाचे हे विचार ऐकून माझे अष्टसात्त्विकभाव जागृत झाले. माझ्या मनीं आनंद मावेना, आणि त्या अलौकिक सुखाने मला अवर्णनीय शांती प्राप्त होऊन मी श्रीकृष्ण, श्रीकृष्ण असें वरचेवर म्हणूं लागलों.

मला ज्ञानेश्वरींतील ओव्या आठवल्या--

**किंबहुना सात्त्विका आठां। चाचरू मांडतां उमेठा। संजचो जालासे चोहटा। संवादसुखाचा॥ तया सुखाची ऐसी जाती। जे आपणचि वरी शांती। मग पुढती देहस्मृती। लाधली तेणे॥ तेथ असंवरे आनंदे। अलौकिकहि कांही स्फुंदे। श्रीकृष्ण म्हणे सद्गदे। वेळोवेळा॥**

मला वाटूं लागलें की,

आरंभीं आपल्या मनांत प्रश्न आला तो कृष्णाला विचारावा. रामाने एकच बायको केली म्हणून लोक रामाची स्तुती करतात, पण कृष्णाने हजारो बायका केल्या म्हणून कांही लोक त्याला नांवें ठेवतात. त्या बाबतींत कृष्णाला प्रश्न विचारल्यावर तो म्हणाला,

"अरे! तूं पूर्वीचा प्रकार नीट लक्षांत घे!"

कृष्ण अदृश्य झाला व पूर्वीचा प्रकार माझ्या डोळ्यांपुढे येऊं लागला

कृष्णाच्या काळीं फत्तराला पाझर फोडणारे सामाजिक संकट निर्माण झाले होते. आसामच्या त्या वेळच्या प्राग्ज्योतिषपूरचा राजा नरकासुर भारतवर्षांतील हजारो सुंदर मुली पळवून नेत असे व त्यांना आपल्या बंदीखान्यांत ठेवून त्यांचा व्यापार करीत असे.

स्वतःला सनातनी समजणारे कितीतरी धार्मिक लोक हा प्रकार डोळ्यांवर कातडें ओढून पाहात असत.

दीनदुबळ्यांचें रक्षण करणाऱ्या कृष्णाला हा प्रकार पाहवेना. त्यानें नरकासुरावर स्वारी करून त्याला ठार मारलें.

विशेष महत्त्वाची गोष्ट म्हणजे कृष्णाने नरकासुराच्या राज्याचा अपहार न करतां भगदत्त नांवाच्या त्याच्या ज्येष्ठ मुलाला गादीवर बसविलें.

नरकासुराच्या बंदीखान्यांतून सोडविलेल्या हजारो मुलींना घेऊन कृष्ण द्वारकेला आला व त्याने त्यांच्या आईबापांकडे निरोप पाठविला. त्या आईबापांनी कृष्णाला उलट निरोप पाठविला कीं,

" त्या मुली पतित आहेत. नरकासुराने पळवून नेल्यानंतर त्या आम्हांला मेल्या व आम्ही त्यांना मेलों. आता आम्ही त्यांना परत घेणार नाही. "

ह्या विषयावर चर्चा करण्याकरिता कृष्णाने धर्ममार्तंडांची परिषद् द्वारकेला बोलावली. लोकांनी कृष्णाला सांगितलें—

" कृष्णा ! तूं म्हणतोस त्याप्रमाणे ह्या मुलींचा कांही दोष नाहीं हें आम्हांला मान्य आहे; पण समाज मोठा चमत्कारिक आहे. आईबाप ह्यांना घरांत घ्यायला तयार नाहीत व त्यांच्याशी कोणी लग्न करावयास तयार नाही. कृष्णा ! हा प्रसंग मोठा बांका आहे. तुझ्यासारखा पतितोद्धारक आजपर्यंत कोणी झाला नाही. तुझें चरित्र व चारित्र्य इतकें थोर आहे की, ह्यांना जर तूं आसरा दिलास तर समाजांत ह्यांना मानाने जगतां येईल; नाहीतर ह्यांना वेश्येचें जीवन कंठावें लागेल. "

कृष्णाने त्यांचें म्हणणें मान्य केलें व त्या सर्व स्त्रियांच्या पालनपोषणाची जबाबदारी स्वतःवर घेतली.

त्या हजारो स्त्रियांनी कृष्णालाच आपला पती मानलें व द्वारकेमध्ये तपश्चर्या करीत त्या आपला काळ कंठूं लागल्या.

कृष्णाच्या ह्या तेजस्वी पतितोद्धाराच्या कार्यामुळे आपले पूर्वज इतके मोहून गेले की, त्यांनी ह्या कार्याचें कायमचें स्मारक करण्याचें ठरविलें.

कृष्णाने नरकासुराला मारलें तो दिवस म्हणजे आश्विन वद्य चतुर्दशी. ह्याच दिवसाला त्यांनी नरकचतुर्दशी असें नांव दिलें व ह्या दिवसापासून चार दिवस दिवाळी करावी असा प्रघात पाडला.

दिवाळीचा अर्थच असा की,

पतितांचा उद्धार झाल्यानतर दिवे लावावयाचे, मंगल स्नान करावयाचें, गोड खायचें व सुखांत राहावयाचें.

हा दिव्य प्रकार पाहून कृष्णाला मी मनोमनीं शतशः प्रणाम केला.

× × ×

इतक्यांत मी जागा झालों.

उदवत्तीचा उत्कृष्ट सुगंध येत होता. जवळ कोठेच उदबत्ती नव्हती तरी उदबत्तीचा सुगंध दरवळत होता.

अनाहत नाद ऐकण्यांत जो आनंद आहे, ध्यानांत दिव्य प्रकाश पाहण्यांत जो आनंद आहे, त्यापेक्षा त्या सुगंधाचा वास घेण्यांत जास्त आनंद वाटत होता!

* * *

# स्वप्न

अठरावें

पृथ्वीचंग पोळून निघत होतं. पावस ती अहोरात्र घाट पाहून होती. मसावर ती खूप रागावली होती, रुसली होती. दूरवर गेलेल्या प्रियकराची काकुळतीनें वाट पाहावी त्यमाणें ती पावसाची वाट पाहत होती.

शेवटीं एकदा ढगांमागून लपत छपत पर्जन्य ाला अन् धरणी सुखाने न्हाऊन निघाली.

त्या रात्रीं देखील पाऊस पडत होता. मला वाटू लागलं —

आज रात्रीं स्वप्नांत कृष्ण आला पाहिजे.

अमुकच रात्रीं कृष्ण स्वप्नांत येईल ह्याची खात्री नसते, पण त्या रात्रीं मला कृष्णाच्या भेटीची फार उत्सुकता लागली होती. कृष्णाच्या भेटीचा हमखास उपाय म्हणून झोपण्यापूर्वी मीं कृष्णचरित्राचा विचार करूं लागलों.

गंगा आणि यमुना त्यांच्या तीरावरील प्रदेश म्हणजे ब्रह्मावर्त. ह्या दोन नद्यांमुळें ब्रह्मावर्त जणूं उभ्या आडव्या धाग्यांनीं विणलें आहे.

अशा त्या मनोहारी ब्रह्मावर्तांत मथुरा नगरी वसली होती. मथुरेचा राजा उग्रसेन ह्याचा धाकटा भाऊ जो देवक त्याची देवकी नांवाची मुलगी वसुदेवास दिली होती.

देवकीच्या पोटीं कृष्ण जन्मास आला पण तो वाढला नंद-यशोदेच्या घरीं.

बारशाच्या दिवशीं नांव ठेवण्याचे वेळीं गर्गाचार्य म्हणाले—

" इतका देखणा मुलगा मीं आजपर्यंत पाहिला नाही. अशा ह्या गोजिरवाण्या बाळाला दृष्ट लागूं नये म्हणून मी ह्याचें नांव कृष्ण असें ठेवतों."

मुलाचें पाळण्यांतलें नांव कृष्ण असें ठेवण्यांत आलें. पण बोलतांना कोणीं गोपाळ म्हणे तर कोणी गोविंद म्हणे. कोणी मुकुंद म्हणे तर कोणी कन्हय्या म्हणे.

कृष्णाने आपल्या बाललीलांनी साऱ्यांना मोहून टाकलें.

कार्तिकांतली पौर्णिमा. मध्यरात्रीचा सुमार. पृथ्वीला हिरवें बाळसें आलें असून हिरवेपणावर थोडीशी पिवळी छटा आली आहे. भांडीर वृक्षाच्या खाली कृष्णाची मुरली वाजूं लागते. ती स्वरवेली सारें आकाश व्यापून टाकते. तो नाद दिव्य, रम्य आहे. सारें गोकुळ तेथे जमा होत आहे. त्यांना श्रीकृष्ण दिसत आहे. कुरळे केस खांद्यावर रुळत आहेत. दांत हिऱ्यासारखे आहेत. भुवया धनुष्याकृती आहेत, नासिका सरळ आहे. डोळ्यांभोवती तेजोवलय आहे; गळ्यांत सुगंधी फुलांची माला आहे. मस्तकावर मोरपिसांचा मुकुट आहे. मुरलीचा नाद सुरू असतांना त्याच्या लयीबरहुकूम गोपगोपी रासक्रीडा करीत आहेत, आणि जिकडे तिकडे आनंदी आनंद ओसंडून जात आहे.

गोकुळामध्ये कृष्णाचे दिवस मोठ्या मजेंत चालले होते. कृष्णाशीं बोलणें-

हसणें, त्याची थट्टा करणें यामुळे सारे गोपगोपी एका अनिर्वचनीय आनंदाने भारले गेले होते. त्या सर्वांची समजूत होती की कृष्ण नंदाचा पुत्र आहे, तो असाच जन्मभर आमच्याबरोबर राहणार आहे, तो आमचा नेता होणार आहे, तो आमचा भाऊ आहे, सखा आहे, मित्र आहे, सहोदर आहे.

लहानगा कृष्ण गोपींची थट्टा करी आणि खोडचा करण्यामध्यें त्याला मजा वाटे. कधी कधी यमुनेवर पाण्याकरिता येणाऱ्या गोपींच्या डोक्यावरील घागरींना तो बारके बारके दगड मारी. गोपींना खोटा राग येई व त्या कृष्णाला कांही बोलत. पण छोटा कृष्ण हसून म्हणे–

"मी पाखराला दगड मारीत होतों. तुम्ही कशाला मध्यें आलांत?" कृष्णाच्या बाललीलांनी सारें गोकुळ मोहून गेलें होतें.

जेव्हा अक्रूर वृंदावनांत आला व त्याने कृष्णाच्या जन्माच्या वेळेची खरी कथा साऱ्या गोपांना सांगितली, तेव्हा गोपगोपी रडूं लागल्या. नंद आणि यशोदा यांना कांही सुचेनाच.

त्या साऱ्यांची समजूत करून कृष्ण म्हणाला :

"मी परका नाही. जन्मभर गोप म्हणवून घेण्यांतच मला आनंद वाटेल. मी कुठेंही गेलों तरी मी तुम्हांला कधीच विसरणार नाही. लोक कांही म्हणोत, पण नंद-यशोदेचा मुलगा म्हणवून घेण्यांतच मला अभिमान वाटेल."

कृष्णाने मथुरेंत येऊन अचाट पराक्रम केला व चाणुराला मारून कंसाचा देखील वध केला. कंसाचा वध केल्यानंतर कृष्णाने उग्रसेनाला गादीवर बसविलें आणि उग्रसेन राज्य करूं लागतांच मथुरेंत पुन्हा एकदा आनंदी आनंद सुरू झाला.

एका शुद्ध मुहुर्तावर कृष्णाची मुंज करण्यांत आली व कृष्ण आणि बळराम यांना सांदीपनीकडे शिकण्यास ठेवण्यांत आलें. शिक्षण झाल्यानंतर कृष्ण पुन्हा मथुरेंत आला.

कुंडिनपूरचा राजा भीष्मक याने आपली मुलगी रुक्मिणी हिचें स्वयंवर मांडलें होतें. ती कमालीची सुंदर होती. तिचा वर्ण गोरा होता. आणि ती जशी रूपाने सुंदर होती तशी अंतःकरणाने देखील सुंदर होती. तिने मनोमनीं कृष्णासच वरिलें.

तिने एक सुंदर पत्र कृष्णास पाठविलें :

श्रुत्वा गुणान्भुवनसुंदर श्रृण्वतां ते।
निर्विश्य कर्णाविवरैर्हरतोऽङ्गतापम् ।
रूपं दृशां दृशिमताखिलार्थलाभं ।
त्वय्यच्युताविशति चित्तमपत्रपं मे ।

"हे भुवनसुंदरा, जे लोक तुझे गुण ऐकतात त्यांच्या अंगीं दाटलेले विविध ताप लगेच त्यांना सोडून जातात. जे तुझें रूप आपल्या नयनांत साठवितात त्यांना सारा अर्थलाभ होतो. तुझी कीर्ती ऐकून माझ्या निर्लज्ज मनाने तुझ्या चरणांचा ध्यास घेतला आहे...

"हे प्राणप्रिया, तूं वाटेल तें म्हण, मीं तुला मनोमनीं वरलें आहे. तूं मृगेंद्र आहेस. जर तूं आपला वांटा घेऊन गेला नाहीस तर त्याच्यावर शिशुपालरूपी कोल्हा तुटून पडेल. गरुडाचा वांटा कावळ्याने पळवावा तसा प्रकार होईल. जर तूं माझी विनंती मान्य केली नाहीस तर तुझें स्मरण करीत मी प्राणत्याग करीन. हे प्राणप्रिया, तूं ये आणि मला घेऊन जा."

रुक्मणीहरणाचा जो प्रसंग आहे, तो पुनः पुन्हा माझ्या मनःचक्षूंसमोर येऊं लागला.

श्रीकृष्णाने नरकासुराचा वध केल्यानंतर त्याने कारागृहांत कोंडलेल्या तरुणी मोकळ्या झाल्या. पण त्या कृष्णाला विनवूं लागल्या,

"नरकासुराने आम्हांला कारागृहांत कोंडल्यामुळे आमचा कोणी स्वीकार करणार नाही. नुकती फुलूं लागलेलीं आमचीं जीवनें या दुष्टाने निष्पर्ण केलीं आहेत. अशा स्थितींत तुझ्याशिवाय आम्ही कोणाच्या तोंडाकडे पाहावें ? तूं आम्हांला आधार दे. आमच्याकडे केव्हातरी ये, एखादा कृपाकटाक्ष टाक. यापेक्षा आम्ही कशाचीच अपेक्षा करीत नाही."

कृष्णाने त्यांचें म्हणणें मान्य केलें. कृष्णचरित्रांतील हा प्रसंग फार उदात्त आहे.

अर्जुनाला सुभद्रा पाहिजे होती आणि त्या बाबतींत बळराम विरुद्ध असतांना कृष्णानेच त्याला साहाय्य केलें. बळरामाने खूप विरोध केला पण कृष्णापुढे त्याचें कांही चाललें नाही.

राजसूय यज्ञाच्या अगोदर कृष्णाने मोठ्या युक्तीने जरासंधाचा वध करविला. राजसूय यज्ञामध्यें अग्रपूजेचा मान कृष्णालाच मिळाला. त्या वेळी शिशुपाल जे बोलला तें मोठें और होतें. तो युधिष्ठिराला म्हणाला :

"अरे ! आम्हां राजे लोकांना वगळून तूं एका गवळ्याची पूजा केलीस. याची पूजा कर म्हणणारा भीष्मक देखील अगदीच बावचळला आहे. कृष्ण हा आचार्य नव्हे, हा वृद्ध नव्हे आणि हा ऋत्विजहि नव्हे."

कृष्णाकडे वळून शिशुपाल म्हणाला.

"अरे दीडशहाण्या ! तूं काय समजून आपली अग्रपूजा करून घेतलीस ? एखाद्या कुत्र्याने कोणी नाहीसें पाहून हविष्यान्नावर झडप घालावी तशी तूं पूजा स्वीकारली आहेस. एखाद्या शिखंडीचा विवाह करावा तसा हा प्रकार झाला आहे. रुक्मिणी माझी वाग्दत्त वधू होती पण तिचें हरण करून तूं निर्लज्ज कृत्य केलें आहेस."

जेव्हा शिशुपालाचे शंभर अपराध भरले तेव्हा कृष्णाने आपलें चक्र त्याच्यावर फेकून त्याचा शिरच्छेद केला.

द्रौपदीवस्त्रहरणाचा प्रसंग फारच और आहे. युधिष्ठिराबरोबर कपटद्यूत खेळून त्याला फसविल्यानंतर दुःशासनाने द्रौपदीला फरफटत ओढीत राजसभेंत आणलें. ती रजःस्वला होती व केवळ एक वस्त्र नेसली होती. कसाघाने गायीला ओढावें तसें दुःशासनाने द्रौपदीला केस धरून ओढीत ओढीत राजसभेंत आणलें. तिला मध्यभागीं उभी करून दुःशासन एक विकट हास्य करून बोलला,

"तूं एकवस्त्रा आहेस, पण विवस्त्र असलीस तरी चालेल." आपलें एकुलतें एक वस्त्र अंगाभोवतीं घट्ट चिकटवून धरण्याचा द्रौपदी प्रयत्न करीत असतांना दुःशासन तिच्या वस्त्रास हिसडे देऊं लागला. आता कांहीच उपाय नाही असें पाहून द्रौपदीने कृष्णाचा धांवा केला. तिची हांक कृष्णाने ऐकली. जों जों दुःशासन तिचें वस्त्र ओढी, तों तों ती नव्या नव्या वस्त्राने वेढलेली दिसे. दुःशासनाने खूप प्रयत्न केला पण द्रौपदीचें शरीर विवस्त्र झालेंच नाही !

कृष्णचरित्रामध्ये सुदामा जेव्हा द्वारकेस आला तो प्रसंग मोठा और

आहे. सुदाम्याच्या घरीं अठराविश्वे दारिद्र्य होतें. तो आपल्या बायको-जवळ नेहमी कृष्णाचें कौतुक करी. त्याची बायको म्हणे,

"तुमचा कृष्ण जर इतका चांगला आहे तर त्याच्याकडे कां जात नाही ? तो चांगला असेल तर आपलं दारिद्र्य दूर करील."

सुदामा त्याप्रमाणे द्वारकेस निघाला. जातांना तो आपल्या बायकोस म्हणाला,

"अग, बालमित्राला भेटायला जातों आहें, त्याला कांहीतरी खाऊ दे."

बायकोने सारें घर शोधून एका फुटक्या मडक्यांत चार मुठी पोहे होते ते आपल्या नवऱ्याला आणून दिले. सुदाम्याने आपल्या फाटक्या पंचांत पोह्यांची पुरचुंडी बांधली आणि तो द्वारकेकडे निघाला.

कृष्णाच्या प्रासादांत गेल्यावर त्याला दिसून आलें की कृष्ण एका रत्न-जडित सोन्याच्या आसनावर विराजमान झाला आहे. एक सुंदर रेशमी वस्त्र तो नेसला आहे. दिसायला तो फार सुंदर आहे. गळयांत वैजयंती माळ रुळत आहे.

सुदाम्याला पाहिल्यावर कृष्णाने धांवत जाऊन त्याला मिठी मारली. आणि त्याच्या पुरचुंडींतील पोहे घेऊन तो मोठ्या आनंदाने खाऊं लागला.

कांही दिवस सुदामा कृष्णाकडे मोठ्या आनंदाने राहिला. तो अंगावर दागिने घालीत होता, भरजरी वस्त्रें नेसत होता, पंचपक्वान्नें जेवत होता व उत्तम मंचकावर झोप घेत होता.

जेव्हा जायची वेळ आली तेव्हा कृष्ण त्याला विनोदाने म्हणाला :

"अरे ! तुझ्या अंगावरचे अलंकार व वस्त्रें पाहून वाटेंत तुला चोराने मारलं तर ?"

सुदाम्याने तें बोलणें ऐकून सारे अलंकार आणि वस्त्रें खालीं काढून ठेवलीं आणि जुनीं फाटकीं वस्त्रें पांघरून तो घराकडे निघाला.

वाटेंत त्याला सारखें वाटत होतें कीं, आपण कृष्णाकडे जाऊन देखील दरिद्रीच राहिलों. पण घरीं येऊन पाहतो तर त्याची बायको भरजरी वस्त्र नेसलेली व रत्नजडित अलंकार घातलेली. घरांत सोन्याच्या राशी, आणि सेवेला दासदासी !

तो प्रकार पाहून सुदाम्याच्या डोळ्यांत पाणी आलें आणि तो म्हणाला, "कृष्णा ! तुझे उपकार मी कसे फेडूं ?"

पांडवांचा वनवास संपल्यावर कृष्णाने शिष्टाई केली व त्यामध्ये फारच उत्तम भाषण केलें. पण दुर्योधनाच्या मनावर त्याचा कांही परिणाम झाला नाही. उलट तो म्हणाला,

"सुईच्या अग्रावर जेवढी माती राहील तेवढी देखील युद्धाशिवाय पांडवांना मिळणार नाही."

युद्धारंभीं कृष्णाने अर्जुनाला जी गीता सांगितली त्याचा मी विचार करीत असतां मला केव्हा झोप लागली कुणास ठाऊक !

स्वप्नांत गोपालकृष्ण माझ्यासमोर आल्यावर मीं त्याला नमस्कार केला व म्हटलें :

"देवा, मला एखादी गोष्ट सांग ना."

कृष्ण हसून म्हणाला :

"ऐक. मी पूर्वी गोपाळांना केव्हा केव्हा गोष्टी सांगत होतों त्यांतलीच एक गोष्ट सांगितली तर चालेल का ?"

मीं म्हटलें, "चालेल, चालेल."

कृष्ण म्हणाला, "एका वटवृक्षावर एक भुकेलेला पक्षी येऊन बसला. त्याने कांही फळें खाल्लीं व उडून गेला. दुसऱ्या दिवशीं त्याच्या मळावाटे एक छोटेंसें बी भूमीवर पडलें. ऊन तापत होतें, वारा वाहत होता, भोवतालची माती त्या बीजावर येऊन पडत होती.

तें बी गुदमरून जात होतें, पण जीवनाची साधना करीत होतें. त्या साधनेंतून उद्याचें तेजस्वी भविष्य निर्माण व्हावयाचें होतें.

एके दिवशीं पाऊस आला आणि मग पुढे कांही दिवसांनी त्या बीजाचा कोंब होऊन तो भूमींतून वर आला. तो बालवृक्ष हळूहळू वाढूं लागला आणि शाखा, पानें, पल्लव यांनी तो भरून गेला.

त्याला वाटत होतें की हें सर्व आपल्यासाठीच आहे. पण पुढे त्याला नवीन दृष्टी आली आणि वाटूं लागलें, की आपला जन्म दुसऱ्यांच्या कल्याणासाठी आहे.

एकदा एक मानव धडपडत त्या वृक्षाखाली आला आणि त्याच्या छायेखाली बसून तो संतुष्ट झाला. वृक्षाला वाटूं लागलें की दुसऱ्यांवर छाया धरण्यासाठी, त्यांना फळें-फुलें देण्यासाठी आणि लोकांवर उपकार करण्यासाठी माझें अस्तित्व आहे.

शेवटीं वृक्ष स्वतःशीच म्हणाला :

" शेवटीं मी शुष्क होऊन वठेन पण लोक माझ्या काष्ठांचा उपयोग देखील स्वयंपाकासाठी करतील. अशा रीतीने गळून पडल्यावर देखील माझा देह कारणीं लागेल. "

ही गोष्ट सांगून कृष्ण मला म्हणाला,

" गोष्टीचें तात्पर्य लक्षांत घे. कायावाचानेंकरून तूं जास्तींत जास्त लोकांच्यावर उपकार कर. उपकार करतां करतां दुसऱ्याचीं जीवनें फुलूं द्यात. उपकार करतां करतांच आपण मरून जावें हेंच मानवी जीवनाचें रहस्य आहे. "

मी कृष्णाला पुढचा प्रश्न विचारला,

" देवा, संत या शब्दाबद्दल मला कांहीतरी सांग. "

कृष्ण म्हणाला :

" सत् पासून संत हा शब्द झाला आहे. गीतेमध्ये सत् शब्दाचा अर्थ विशद करून सांगितला आहे. सत् चा अर्थ चांगलें, भलें असा होतो. ज्याने संसाराकडे पाठ फिरविली, जटा वाढवल्या असा मनुष्य म्हणजे संत, असें कांही लोकांना वाटतें, पण तें बरोबर नाही. जो लोकोद्धाराकरतां आपलें आयुष्य वेचतो अशा चांगल्या मनुष्याला संत म्हणतां येईल. "

देवाला मी पुढचा प्रश्न विचारला.

" देवा, आदर्श पुरुषाबद्दल तुला काय म्हणायचं आहे ? "

कृष्ण म्हणाला,

" गीतेमध्ये स्थितप्रज्ञ, भक्त, त्रिगुणातीत, दैवी संपत्ती आणि सात्त्विक यांबद्दल चर्चा केली आहे. या साऱ्या चर्चेचें मुख्य सूत्र आदर्श पुरुष कसा असावा हेंच आहे. समाजाला सोडून राहणारा मनुष्य म्हणजे आदर्श पुरुष

असें मानण्याचें कारण नाही. मान-अपमान सारखे मानणारा, स्तुती-निंदा सारखी लेखणारा, असें जेव्हा आदर्श पुरुषाबद्दल म्हणण्यांत येतें तेव्हां असें लक्षांत घेतां येईल की, समाजाच्या बाहेर राहिलें तर मान-अपमान किंवा स्तुती-निंदा यांचा प्रश्न उत्पन्न होत नाही. मानापमान किंवा स्तुती-निंदा यांचा अनुभव समाजामध्यें राहूनच येतो. भक्ताचें वर्णन करतांना ज्याला लोकांचा उद्वेग वाटत नाही व लोकांना ज्याचा उद्वेग वाटत नाही असें म्हटलें आहे. ही बाब फार महत्त्वाची आहे. तूं खरा भक्त झालास–गीतेच्या अर्थानें भक्त झालास–म्हणजे आदर्श पुरुष होशील."

बोलतां बोलतां मी कृष्णाला विचारलें:

"देवा, गीतेंतला मुख्य विचार कोणता?"

कृष्ण म्हणाला :

"प्रत्येकाच्या हृदयांत परमेश्वर आहे. त्याला सर्व भावानें शरण गेलें म्हणजे त्याच्या कृपेनें परमशांती व शाश्वत स्थान प्राप्त होतें, हा गीतेंतील सर्वांत मुख्य विचार आहे."

कृष्णाकडे मी पाहत होतों आणि माझ्या मनांत एकदम विचाराची वीज चमकून गेली. मला वाटूं लागलें––

ज्ञानाचा विचार, भक्तीचा उच्चार आणि कर्माचा आचार म्हणजे परमेश्वर.

मीं कृष्णाला म्हटलें,

"माझें सारें जीवन तूं व्यापून टाक आणि ज्या दिवशीं माझ्या हातून तुझें कार्य होणार नाही त्या दिवशीं माझें जीवन संपवून टाक."

कृष्ण कांहीच बोलला नाही. तो नुसता माझ्याकडे पाहातच राहिला. कृष्णाला मीं नमस्कार केला व म्हटलें.

"कृष्णा, तुझें सारेंच जीवन और आहे. बालपणीं गोकुळांत तूं साऱ्यांना मोहून टाकलेंस, मोठेपणीं खूप पराक्रम केलास, युद्धारंभीं अर्जुनाला गीता सांगून तूं तत्त्वज्ञानाच्या मंदिरावर कळस चढविलास. उद्यांच्या जगाचा धर्म म्हणजे मानवता धर्म आणि हा धर्म जेव्हा प्रस्थापित होईल तेव्हा लोक या धर्माचें अधिकृत पुस्तक म्हणून गीतेकडे पाहातील. कृष्णा, तुझ्या

चरित्राबद्दल काय काय बोलावें ? अरे ! तुझ्या जीवनांतला शेवटचा प्रवेश देखील और आहे."

कृष्णाच्या जीवनांतील शेवटच्या प्रवेशाचा उल्लेख केल्यानंतर कृष्ण एकदम अदृश्य झाला व त्याच्या जीवनांतील शेवटचा प्रवेश मला दिसूं लागला.

कौरव-पांडवांचें युद्ध समाप्त झाल्यानंतर कृष्णाने युधिष्ठिराकरवीं अश्वमेधयज्ञ करविला. अवभृथ स्नान झाल्यावर कृष्णाने युधिष्ठिराला आलिंगन दिलें व म्हटलें,

" युधिष्ठिरा, आपले दोघांचे मनोरथ आता पूर्ण झाले आहेत. जीवनाची संध्याकाळ दिसूं लागली आहे. आता करण्याजोगें कांहीं राहिलें नाही. "

हें बोलणें ऐकून द्रौपदीला फार वाईट वाटलें. ती कृष्णाला म्हणाली

" कृष्णा, तूं आज असें निर्वाणीचें कां बोलतोस ? "

कृष्ण म्हणाला.

" प्रत्येक कार्याचा केव्हा ना केव्हा शेवट होत असतो. आपलें काम संपलें की माणसाने बाजला व्हावें. "

द्रौपदीने विचारलें.

" म्हणजे मृत्यू ? "

कृष्ण म्हणाला, " होय, मी मृत्यूविषयी बोलत आहें. मरण्यांत भिण्याजोगें कांही नाही. मृत्यू ही मंगल अवस्था आहे. थकल्याभागलेल्या जीवाला देवाने दिलेलें तें वरदान आहे. "

द्रौपदी सुन्न झाली. तिच्या तोंडून शब्द फुटेना.

श्रीकृष्ण द्वारकेस गेला. द्वारकेमध्यें यादव कमालीचे गर्विष्ठ झाले होते. बेदरकारपणे दारू पिऊन ते एकमेकांशीं भांडूं लागले होते. शेवटीं वासुदेवाने असा निबंध घातला की, कुणीही मदिरापान करूं नये. पण या निबंधाला न जुमानतां उन्मत्त झालेले यादव खुशाल मदिरापान करीत होते.

कार्तिक वद्य अमावास्येला सूर्यग्रहण होतें. प्रभासक्षेत्रीं जाऊन समुद्रस्नान करावें असें यादवांनी ठरविलें. प्रभासक्षेत्रीं यादवांनी बेफाम मदिरापान

केलें आणि त्यांचा तोल सुटला. हातांत हत्यारें घेऊन ते एकमेकांचा वध करूं लागले. जिकडे तिकडे हाहाकार माजला !!

कृष्णाने आपला पिता वासुदेव याला म्हटलें.

"व्हायचें तें झालें. आता एखाद्या वृक्षातळीं मी आसन घालून बसेन. प्राण आणि अपान यांचा संयोग होऊन ते डिवचून कुंडलिनीला जागृत करतील. जागी झाल्यावर ती विश्वमाता सप्तधातूंचा ग्रास करील. नंतर ब्रह्मरंध्रांचा भेद करून ती महाकाशांत विलीन होऊन जाईल, चैतन्य चैतन्याला मिळेल आणि जिवाशिवाची गांठ पडेल."

एवढें बोलून कृष्ण वनांत जाऊन एका झाडाखालीं बसला. त्याने योगासन मांडलें आणि जगाचा निरोप घ्यायची तयारी केली. एका व्याधाला वाटलें वाटलें की कृष्णाचा तळवा म्हणजे एक मृगच आहे. लांबून त्याला तो मृग वाटला. मृग समजून त्याने एक बाण कृष्णावर फेकला.

बाण फेकला गेला आणि जगत्-जीवन श्रीकृष्णाचा अवतार समाप्त झाला. तो प्रकार पाहून माझ्या डोळ्यांत अश्रू आले. मी ओरडत म्हणालों,

"कृष्णा, असें कसें झालें? तुझा अवतार कसा समाप्त झाला? एखाद्या सम्राटाप्रमाणे तूं जीवन उपभोगलेंस आणि एखाद्या संन्याशाप्रमाणें त्याचा त्याग केलास. कृष्णा, इतक्यांत तूं नको जाऊंस. माझ्याकडे जरा बघ, बघ ना."

मी मोठ्याने ओरडलों—

आणि एकदम जागा झालों.

* * *

८४०६८ निबंध
१९५६ ८।३।८९

# न्या. राम केशव रानडे, एल्एल्. एम्.

## यांनीं लिहिलेलीं पुस्तकें

पुस्तकाचें नांव

(१) बापाचें कर्ज
(२) दस्तऐवजाचा कायदा
(३) पोलीसाबाबत कायदा
(४) स्मृतिकालीन कायदा
(५) कबुलायतीचा कायदा
(६) मुदतीबाबत कायदा
(७) दत्तकाचा कायदा
(८) भारतीय पुराव्याचा कायदा
(९) हिंदु-स्त्रीधनाचा कायदा
(१०) मृत्युपत्राचा कायदा
(११) सावकार – कुळांचा कायदा
(१२) माल-खरेदीचा कायदा
(१३) हिंदु दत्तकाचा व पोटगीचा कायदा
(१४) हिंदु अज्ञानपण व पालकत्वाचा कायदा
(१५) हिंदु-विवाहाचा कायदा

पुस्तकाचें नांव

(१६) हिंदु-वारसा कायदा
(१७) मुद्रणविषयक कायदे
(१८) कायदा व लोकशाही
(१९) वधूवरांचा कायदा
(२०) कायद्याचे शंभर प्रश्न
(२१) तुमचा वकील
(२२) मजेशीर निवाडे
(२३) तमारो वकील
(२४) स्त्रियांचा कायदा
(२५) कोर्ट–कथा
(२६) Marriage
(२७) प्रॉमिसरी नोट
(२८) मालतीमाधव
(२९) संत तुकारामांचा समतावाद
(३०) बाळ महाराज भाग १
(३१) बाळ महाराज भाग २
(३२) ज्ञानेश्वरी प्रसाद

REFBK-0015196
REFBK-0015196